म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 2

REFBK-0019435
REFBK-0019435

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ९८३
ठाणें सन १९८९

काव्य

REFBK-0019435
REFBK-0019435

# भारत.

## (आदिपर्वांतील आर्या.)

### अध्याय. १.

[ १—५ ] नमस्क्रियारूपमंगलाचरणरूपानें नारदादिमुनिश्रेष्ठांचें व विष्णुप्रमुखदेवतांचें ध्यान. [ ६ ] वैशंपायनादिपुराणवक्त्यांचें स्मरण. [७—८] शौनकादिऋषि व कथानायक पांडव यांस वंदन. [१०—१२] शौनकादि मुनींच्या द्वादशवार्षिकयज्ञांत तीर्थयात्रेहून उग्रश्रवा (सूत) येतो. [१—८] भारतकथा सांगण्या विषयीं सूतास शौनकादिकांची आज्ञा. [१९] सूताचें परमेश्वरास वंदन व कथा सांगण्यास आरंभ [२०] भारतग्रंथ [२१]त्याचे विभाग [२२]कथांचें गुण.

---

श्री*मत्सद्गुरु नारद वाल्मीकि व्यास शुक कवींश मनीं ॥
आणुनि नमितों भावें जे मोहतमाचिया रवी शमनीं ॥ १ ॥
श्रीश-श्रीकण्ठ-चरण नमितों जे सर्व-सेवक-स्वरगे ॥
भलतेहि वर्ण होती श्रुतिमत यन्निष्ठ जेंवि सुस्वरगे ॥ २ ॥
नमिला गज-मुख ज्याचे सेवुनि मृदु मधुर बोल कानांहीं ॥
—नि शंभु ह्मणे वा तुजसम आम्नाय बोलका नाहीं ॥ ३ ॥

---

१ भुंग. २ शिव. ३ कल्पवृक्ष. ४ जाति. पक्षीं, अक्षरें. ५ वेदाधिकारी इत्यादि. ६ शिवविष्णुचरणांचे भक्त. ७ सुस्वरांतील. ८ वेद. नेत्र ज्याचे.
१२ कुरुपां. १३ गंगादनें.

* प्रथमार्याप्रथमाक्षर या प्रमाणें क्रमानें घेतलेल्या "श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षोजयताम" हें

नमितों सरस्वतीतें जी कवि-कीरासि पढवुनी वदवी ॥
जीचा प्रसाद देतो वाचस्पतिची जडासही पदवी ॥४॥
गुरु[1]-भागवत-वरेंद्र- प्रेरित-कवि-मुदिर भारताब्धिरसा[2] ॥
प्राशिति तृप्त कराया स्वरसें सद्रसिक-मंडळीमुरसा[3] ॥५॥
नमिला वैशंपायन सुखवी जनमेजया श्रवणसक्ता[4] ॥
तैसाचि लोमहर्षण[5]- नंदन उग्रश्रवाहि जयवक्ता[6] ॥६॥
ज्यां शौनकादि साधु श्रोते नमिले, जयांसि कानांहीं ॥
दोहीं पूर्ति नसे; जे ह्मणति, अहा!हे उदंड कां नाहीं× ॥७॥
हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितों भावें ॥
वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें ॥८॥
व्यासकृत महाभारत लक्ष*ग्रंथ प्रसिद्ध हा भारी ॥
आर्या-वृत्तें रचितों स्वल्पांतचि आणितों कथा सारी ॥९॥
श्रीरामनाम-मंत्र श्रितं[7]-चिंतामणि करील हें पूर्ण ॥
चूर्ण प्रत्यूहांचें रसिकांचें चित्तही सुखी तूर्ण ॥ १० ॥

१ गुरु व संत यांचा वर हाच इंद्र त्यानें प्रेरणा केलेला जो कवि हाच मेघ. २ भारतरूपसमुद्रोदकास. ३ संत व रसज्ञ लोक हीच पृथ्वी. ४ कथाश्रवणाविषयीं तत्पर. ५ लोमहर्षण हा व्यासाचा शिष्य,हा जातीचा सूत. ह्म०ब्राह्मणीच्या पासून झालेला. सूताचा धंदा सारथ्य, पुराणकथन णें. लोमहर्षणास वेदाधिकार नसल्यामुळें व्यासानें याचा मुलगा उग्रश्रवा. ६ पुराणवक्ता. *बत्तीस ग्रंथ ह्म० ७ आश्रितांस इच्छिलेलें देणारा. ८ ×अनेकवचनाबद्दल एकवचन हें कवीचें निरंकुश

नैमिष-वनांत शौनक- कुलपति[1]च्या द्वादशाब्दिकीं[2] सत्रीं[3]॥
गेला सौति[4] अलि[5] जसा कमळीं सद्गंधसद्रसाऽमत्रीं[6]॥११॥
नमुनि मुनींतें अंजलि जोडुनि विनयें तपः*समृद्धि पुसे ॥
ते ऋषि त्यासि सुखविती म्हणतासि मधु-स्मराद्यसद्रिपुसे[7] १२
कमल[8]-दलाक्षा,सौते साधो,कोठोनि पातलास ? कसें ॥
कोठें क्रमिलें[9] वा त्वां? पुसिलें एकें द्विजें तयासि असें १३॥
सांगे सुवृत्त विनयें त्यांतें अंजलि करूनियां तो तों ॥
अहि[10]-सत्रीं जनमेजय- राजर्षीच्या समीप मी होतों ॥१४॥
वैशंपायन-वदनें व्यास-रचित-भारतेतिहासाचें ॥
घडलें श्रवण; नृलोकीं प्याला पीयूष[11] दास हा साचें॥१५॥
मग मी तीर्थें क्षेत्रें पुण्याऽरण्यें विलोकिता झालों ॥
कुरु-पांडव-रणमख[12]ही पाहोनि तुह्मां पहावया आलों॥१६॥
आज्ञा द्याल तरि सुखें सांगेन रुचेल तें तुह्मां स्वामी ॥
गंगातर्पण गांगें[13] हें इच्छितसें तसें अहो वा, मी ॥१७॥
ऋषि ह्मणति महाभारत- पीयूष तुवां यथेष्ट पाजावें ॥
चंद्र चकोरांत जसा तैसें आह्मां द्विजांत साजावें ॥१८॥

---

१ आश्रमाचा अधिपति. २ बारा वर्षांचें. ३ यज्ञांत. ४ सूतपुत्र. ५ भुंगा. ६ सुगंध व सुरस यांचें पात्र कमल. ७ मधुदैत्य व मदन इत्यादिदुष्टांचे शत्रु विष्णु शिव. ८ कमळाच्या पाकळी सारखे नेत्र ज्याचे तो. ९ काळ घालविला. १० सर्पसत्रांत. ११ अमृत. १२ कुरुपांडवांचा रणयज्ञ ज्यास्थानीं झाला तें स्थान. (कुरुक्षेत्र.) १३ गंगोदकानें* तपाची समृद्धि आहेना ?

विश्वगुरूप्रति वंदुनि तो सौति सुखें करी तदाऽऽरंभा ॥
त्या रसिकांत *मुनीची मनोरमा ÷कृति गमे तदा रंभा१९
इतिहास साठ लक्ष व्यासें स्वमनींच योजिला पहिला॥
मग विधिनें वर दिधला गणनाथें भक्तवत्सलें लिहिला२०
त्यांतूनि तीस लक्ष त्रिदशांला पंधराचि पितरांला ॥
गंधर्वांला चौदा एक सुमनुजां दिला न इतरांला ॥ २१ ॥
सांगे मुनीश्वराला एक-शत-सहस्र संहिता सौती ॥
श्रुति-गंगा-सुरभींच्या त्या त्या सुगुणें करूनि ज्या सौती २२॥

# अध्याय २.

## सारांश.

[१–४] कुरुक्षेत्रांत जनमेजयाच्या सत्रांत सारमेय [कुत्रा] येतो. त्यास जनमेजयाचे बंधु ताडन करितात. तो आपली आई सरमा(देवाची कुत्री) हिजकडे रडत जातो. तिचा जनमेजयास शाप [४–१३] सत्रसमाप्तीनंतर राजा शिकारीस जातो.तेथें ऋषीचा आश्रम पाहतो.श्रुतश्रव्याच्या सोमश्रवा पुत्रास शापादि विघ्ननिवाराणार्थ उपाध्याय करितो. [१९–६९]धौम्यमुनीचे आरुणि,उपमन्यु व वेद हे तिघे शिष्य. त्यांचें संक्षिप्त वर्णन.[ ६९–१३० वेदाचा शिष्य उत्तंक याचा गुरुदक्षिणा घेण्यावि-

१ चराचर गुरु परमेश्वर. २ श्रीगणपतीनें. ३ देव. ४ शौनकाला. ५ मूलग्रंथ. ६ वेद. ७ कामधेनु. ८ अनुक्रमें ज्ञान, पावित्र्य व इष्टफलप्राप्ति या गुणांनीं. ९ मवनी. *व्यासाची. ÷ ग्रंथरचना

षयीं गुरूस आग्रह. गुरुपत्नीची त्यास पौष्यराजस्त्रीचीं कुंडलें आणून देण्याविषयीं आज्ञा. त्याचें पौष्याकडे गमन वकुंडलें घेऊन येणें. गुरुची त्यास घरीं जाण्यास आज्ञा. तो जनमेजयाकडे [१३०–१३८] जाऊन सर्पसत्रास उत्तेजन देतो.

पारी÷क्षित जनमेजय वहुवार्षिकसत्र करि कुरुक्षेत्रीं ॥
सत्रांत श्वा[१] येतां जनमेजय-बंधु ताडिती वेत्रीं* ॥ १ ॥
तो सुर-शुनी-सुत[२] तिला गेला रोदन करीत सांगाया ॥
सरमा ह्मणे नृपाला त्वां केला व्यर्थ दंड कां गा या ॥२॥
ह्मणतो नाहीं शिवलों दृष्टि करुनिही धराधवा[३] हविला[४] ॥
कां धर्म व्यर्थ तुवां गांजुनि हा निरपराध वाहविला ॥३॥
अघ[५] न कारितांहि दंडुनि माझ्या पुत्रास मज दिला ताप ॥
तरि तुज अतार्कताचि भय येईल असा तिनें दिला शाप ४॥
देउनि शाप क्रोधें जातां तेथूनि सुरशुनी सरमा ॥
झाला विषाद-भाजन[६] नृप चिंता त्यास लागली परमा ॥५॥
सत्र-समाप्ति करुनि तो गेला मग हास्तिनापुरा राजा ॥
चिंता करी वहु ह्मणे कोण निवारील शाप हा माजा ॥६॥
त्यावरि नृप मृगयेला गेला असतां सदाश्रमा[७] पाहे ॥
नामें श्रुतश्रवा मुनि जेथें निरुपम तपोनिधी राहे ॥ ७ ॥
सोमश्रवा तयाचा सुत तेजस्वी सुविद्य[८] त्याहूनी ॥
राजा बहु आनंदे त्या दोघां आश्रमांत पाहूनी ॥ ८ ॥

---

१ कुत्रा. २ देवांची कुत्री सरमा. ३ पृथ्वीपते. ४ यज्ञद्रव्यांला. ५ पाप. ६ दुःखाचें पात्र. ÷ परीक्षितीचा पुत्र. * वेतानें. ७ उत्तम असें ऋषीचें स्थान. ९ मोठी. ८ मोठा विद्वान्.

नमुनि मुनीस ह्मणे नृप   नंदन सोमश्रवा तुझा स्वामी ॥
हो मत्पुरोहित तुला   वरदा वर दास मागतों हा मी ॥९॥
तो मुनि ह्मणे नृपाला   जें माझें गलित शुक्र[1] तें व्याली[2] ॥
व्याली या तेजस्वि-   प्रवरा[3] मन्नंदनासि ते व्याली ॥१०॥
हा सर्व पाप-कृत्या   नाशील न एक शंभुच्या कृत्या ॥
रक्षील आश्रितासि   व्यसनीं हर राक्षितो जसा भृत्यां[4] ११॥
व्रत याचें एक असे   जो जें मागेल तें तया द्यावें ॥
हें चालविशील तरी   स्वपुरोहित करुनियां स्वयें न्यावें ॥१२
मान्य करूनि नृपें तो   वंदुनि सोमश्रवा पुरा नेला ॥
भ्रातांतें हितबोध   स्वपुरोहित-वाक्य-पालनीं केला ॥१३॥
तक्षशिलादेशातें[5]   जाउनि जिंकोनि वश करी राजा ॥
दावी शत्रुजनीं बळ   दावित होता पिता जसा आजा १४॥
होता धौम्य मुनी त्या   शिष्य तिघे[6] ज्यांसि गुरु-पदींच रुचि॥
उपमन्यु एक; दुसरा   आरुणि; तिसराहि वेद; सर्व शुचि[7] १५
गुरु आरुणिला सांगे   शालि-क्षेत्रांत सर्व जल जातां ॥
नासेल बीज ह्मणउनि   रोधावा मार्ग वारिचा[8] बा तां[9]॥१६॥
दुर्जय[10]-जल-प्रवाहें   आरुणि-कृत सेतुबंध शत नेलें ॥
श्रीगुरुनें योगबळें   शिष्यपरीक्षार्थ तें तसें केलें ॥ १७ ॥
दुर्वार-वारिमार्गीं   मग रचिलें शीघ्र आपुलें गात्र ॥
आरुणि ह्मणे न नासो   गुरु-शालिक्षेत्र एक हें मात्र ॥१८॥

---

१ वीर्य. २ सर्पिणी. ३ श्रेष्ठ. ४ सेवकाला. ५ पंजाबांतील एक प्रांत. ६ तिघेही. ७ पवित्र. ८ पाण्याचा. ९ त्वां. १० अनिवार

शिष्यांप्रति धौम्य पुसे आरुणि कोठें? करूनि ते प्रणती॥
केदारखंड-बंधन आज्ञापुनि धाडिला तुह्मीं ह्मणती १९॥
जाउनि केदाराप्रति आपण शिष्यासि धौम्य तो पाहे ॥
धेनु जसी निज वत्सा एहि काऽस्यारुणे, असें बाहे ॥२०॥
गुरुशब्दश्रवण करुनि आरुणि धांवूनियां धरी चरण ॥
पुसतां स्ववृत्त सांगे तें कारि मुनि-चित्तवृत्तिचें हरण ॥२१॥
गुरुधान्यक्षेत्राहुनि ज्या ज्ञानक्षेत्रंही उणें काय * ॥
त्या श्रीगुरु-प्रसाद- स्वर्द्रुम-मूळाश्रिता उणें काय ॥ २२ ॥
त्या कर्में उद्दालक नाम शिरीं पार्णिपद्मही ठेवी ॥
त्यासी आशी दे तो देतो पुत्रा जशी पिता ठेवी ॥ २३॥
झाला गुरुप्रसादें लोकत्रयमान्य आरुणि कविवर ॥
छात्रीं नुरावे तिळहि खळ- दृष्टिस गुरुराज कारुणिक विवरें
ज्ञानामृतें भरुनि तो स्वस्थाना जोंवि मेघ जलधीनें ॥
पाठविला निववाया जग त्या गुरुनें दयाविमलधीनें ॥२५॥
उपमन्यु गुरु-निंदेशें धेनु वनामाजि सर्वदा रक्षी ॥
सूर्यास्तीं घेउनि ये त्यातें गुरु चरण वंदितां लक्षी ॥ २६ ॥
धौम्य ह्मणे रे वत्सा, भ्रमसि वनीं तदपि दीससी मोटा ॥
उपमन्यु ह्मणे येउनि भिक्षा मागोनि तर्पितों पोटा ॥ २७ ॥

---

१ शेत. २ हे आरुणे, कोठें आहेस ? ये. ३ ज्ञानाचें शेत. ४ गुरुकृपा हाच कल्पवृक्ष त्याचे मूळाचा आश्रित. ५ केदारखंडाचा भेद करून उठलेला. ६ हस्तकमल. ७ आशीर्वाद. ८ शिष्याचे ठायीं. ९ दोष. १० समुद्रानें. ११ दयेनें शुद्ध बुद्धि ज्याची तो. १२ आज्ञा. १३ तृप्त करितों. * शरीर.

न निवेदितां मला त्वां भिक्षा भक्षूं नये ह्मणे धौम्य
आज्ञा माथां वाहे तैसेंचि करी गुरूक्त* तो सौम्य॥२८॥
भैक्ष्यं[1] निवेदी जें तें सर्वहि घे नित्य गुरु जसा खोटा॥
पुनरपि पुसे तयाला वत्सा दिसतोसि तूं वरा मोटा॥२९॥
दुसरी भिक्षा खातों ऐसें कथितां ह्मणे गुरु,आज्ञा,॥
अन्याय हा न करणें परवृत्त्यवरोध[2], हे असे आज्ञा॥३०॥
भिक्षाहार- निवारण केल्यावरिही दिसोचि बहु पुष्ट॥
ह्मणुनि उपाध्याय पुसे वत्सा, आहेसि तूं कसा तुष्ट॥३१॥
उपमन्यु ह्मणे स्वामी धेनूच्या सेवितों वनीं दुग्धा॥
धौम्य ह्मणे तुज आज्ञा नसतां करिसी असें कसें मुग्धा÷३२
आज्ञा धरी शिरीं परि उपमन्यु दिसे तथापि तो पीन[3]॥
पुनरपि पुसे गुरु मनीं कीं मी सर्वस्व यासि ओपीन॥३३॥
शिष्य म्हणे स्तन-पानीं वत्स- मुखीं ये तयाचि फेंसाचें॥
प्राशन करितों स्वामी कारण या पीनतेसि हें साचें३४॥
हे वत्स सुगुण सकरुण आत्म- विभागीं करूनियां तोटा॥
देताति फेनपा[4],तुज फेन बहु अहा अधर्म हा मोटा॥३५॥
देशिक[5] ऐसें सांगे न करीन असें म्हणे,न मानें तो[6] भी॥
जठराऽग्निप्रशमाऽर्थी उपमन्यु तसें करी,नव्हे लोभी॥३६॥
मग धेनु चारितां तो क्षुद्विकल[7] वनांत अर्कतरु[8] लक्षी॥
त्याचीं पत्रें प्राज्यं[9] क्षीरें[10] स्त्रवती म्हणोनि बहु भक्षी॥३७॥

---

१ भिक्षान्न. २ दुसऱ्या विद्यार्थ्यांच्या वृत्तीस अडथळा आणणें. ३ पुष्ट. ४ फेंस पिणारा. ५ गुरु. ६ तो उपमन्यु. ७ क्षुधेनें व्याकुळ. ८ रुईचें झाड. ९ पुष्कळ. १० चीक. *गुरुवचन. ÷मूर्खा.

साऱ्या तीक्ष्ण- विपाकें झाला तत्काळ अंध कूपांत ॥
आश्रमपदासि येतां पडला उपमन्यु घोर- कूपांत ॥ ३८ ॥
आल्या धेनु न आला, शिष्य म्हणुनि त्यासि गुरु वनीं हुडकी॥
एक म्हणे लेवविली हा÷ घडितां सांडिली दुजी कुडकी॥ ३९
एहि काऽस्युपमन्यो, वत्स, अशी हाक फोडितां थोर ॥
श्रवण करुनि उत्तर दे दूरुनि तो तोयदा जसा मोर॥ ४०॥
स्वामी हा मी आहें कूपीं पडलों पथीं न लक्षूनी ॥
झालों अंध स्वकृतें अर्काऽऽर्द्र- दळें यथेष्ट भक्षूनी ॥ ४१ ॥
तुज दृष्टि अश्विनीसुत देतील स्तुति करीं असें शिकवी ॥
परते करुणा- घन गुरु शिष्य-क्षेत्रांत सद्यशें पिकवी ॥ ४२॥
स्तावितांचि भेटले गुरु- भक्ताला देववैद्य नासत्य ॥
व्यसनीं गुरूपदेशाचे रक्षी दुसरा न या जना सत्य ॥ ४३॥
जो भक्षी अर्काचा दास्या वागावया वपू पाला ॥
सत्त्व पहाया देती त्या क्षुधिताच्या करीं अपूपाला ॥ ४४॥
उपमन्यु ह्मणे गुरुला पुसिल्या वांचोनि या अपूपा मी ॥
खाया उत्साह मनीं पावत नाहीं दया करा स्वामी॥ ४५ ॥
अस्मद्वचनें, आह्मी देतांचि अपूप-सेवना सत्य ॥
पूर्वी करिता झाला त्वद्गुरुही, ह्मणति देव नासत्य ॥ ४६॥

---

१ परिणामानें. २ कुंपणांत. ३ विहिरींत. ३ कानांतील एक दागिना. ४ एक आरुणिरूप व दुसरी उपमन्युरूप कुडकी. (कर्णभूषण) ५ हे उपमन्यो, कोठें आहेस? ये. ६ रुईचीं ओलीं पानें. ७ अश्विनीकुमार. ८ संकटांत. ९ शरीर. १० धारगा ÷हाय हाय. * मेघ.

तदापि तसेंच विनवितां गुरुभक्तिप्रेमाविगलदस्त्रांनीं ॥
देऊनि आत्मदृष्टिहि केला तो बहुकृतार्थ दस्रांनीं ॥ ४७ ॥
त्वद्गुरुचे कार्ष्णायस- दंत हिरण्मय तुझे असोत असें॥
वदले दस्र तदर्थे स्वगुरुपरिस होउनी कृतार्थ असें ॥ ४८ ॥
ब्रह्मज्ञ गुरु नसे परि तूं भक्तिबळें कृतार्थ होशील ॥
गुरु-भक्त धन्य तूंचि छळ कोण असा अधन्य सोशील॥४९॥
उद्धरुनि देव गेले मग तो उपमन्यु गुरुपदीं लागे ॥
पुसतां झालें वृत्त प्रांजलि होऊनि सर्वही सांगे ॥ ५० ॥
धौम्य ह्मणे तुज यावें शास्त्रांसह कंठपाठ वेदांनीं ॥
हो धन्य मज वराच्या प्रेमभरें किमपि नाठवे दानीं ॥५१॥
जें आश्विनेय वदले त्या कल्याणासि पात्र होशील ॥
शिष्य-चकोरांसि तुझा अमृतें मुखचंद्र नित्य पोशील ॥५२॥
हे उपमन्यु-परीक्षा वेदपरीक्षाहि आइका आतां ॥
गुरु-सेवा-सुकृत-फळ- प्राप्ति गुरूपासका असे गातां॥५३॥
कांहीं काळ करावी शुश्रूषा श्रेय पावसील असी ॥
आज्ञा करि गुरु लावी सेवन-शाणीं गुणार्थ शिष्यासी ॥५४॥
गुरु-सदनीं वेद जसा विषयीं तैसा न देह राबेल ॥
तो दास्यरूप वाहे त्या नित्य चुकों न दे हरा बेल॥५५ ॥
गुरु-सदन अमृत-सागर त्यामाजि तरंगवृंद तें कृत्य ॥
मोठें लहान न ह्मणे सेवी भवदावदग्ध तो भृत्य ॥ ५६ ॥

१ गळत आहेत अश्रु ज्यांचे ते. २ अश्विनीकुमारांनीं. ३ काळ्या लोखंडाचे. ४ स्वर्णमय. ५ हात जोडून. ६ सेवारूप कसोटी. ७ सेवारूप बेल. ८ गुरु हाच शिव. ९ लाटांचा समूह. १० संसाररूपी वणव्यानें दग्ध झालेला. ११ पुण्य.

वेद जसा गुरु-भजना यक्षं कृपणहि न तसा धना जपला ॥
रात्रि-दिवस उत्साहें दुष्कर सेवा-महातपें तपला ॥५७॥

निज पूजाचे विसरला चुकला जठराग्निलाचि तर्पाया ॥
निद्रेलाचि न जपला खिजला मन आळसासि अर्पाया॥५८॥
होय प्रसन्न बहुतां- दिवसीं गुरुवामदेव वेदा त्या ॥
सर्वज्ञत्व कुशल-वर दे, कोण न काम देववे दासा ॥५९॥
प्रथमच्छात्र-परीक्षा- तात्पर्य असेंचि जाणती आर्य ॥
अत्यल्पाहि निज-गुरुचें साधावें त्यजुनि देहही कार्य ॥६०॥
गुरुनें अत्यावश्यक अशनादि निषेधितांचि सोडावें ॥
हें उपमन्यु-परीक्षा- तात्पर्य प्रेमळेंचि जोडावें ॥६१॥
वेद-परीक्षेचें हें तात्पर्य, गुरूक्त अनुचितहि कर्म॥
करितां हिमोष्णदुःखा तदनुग्रह मानितां घडे शर्म ॥६२॥
जरि गुरु सेवेसि न घे शिष्यें अर्थें करूनि तरि त्यातें ॥
प्रार्थूनि तोषवावें अहिततमाज्ञान-बीजहारित्यातें ॥ ६३ ॥
गुरुदक्षिणार्थ उद्यमें करितां शक्रादि-देवता तूर्ण ॥
होती सहाय दुर्जन- विघ्नितही कार्य होतसे पूर्ण ॥ ६४ ॥
हें प्रतिपादन आहे वेदचरित्रांत तेंचि परिसा हो ॥
गुरुभक्ताचा महिमा पापांत महागजांत हरिसा हो॥ ६५ ॥
वेद गुरुकुळापासुनि अंबुधिपासोनि जोंवि चंद्र निघे॥
त्यासहि होते झाले उत्तंकप्रमुख साधु शिष्य तिघे ॥ ६६ ॥

---

१कुबेराचा द्रव्यरक्षक. २ वामदेवासारखा गुरु. ३ मुख. ४ अत्यंत अहितकारक अज्ञानांचें बीज नाहींसें करणारा. ५ उद्योग— ६ त्वरित. ८ शिष्य. ९इंद्र७ विघ्न केलेलें. १० समुद्र.

सेवा न घेचि गुरुकुळ- वासानुभवी ह्मणोनि तो कांहीं॥
शिष्यांनीं अनुभविलें लालनसुख जेंवि वृद्ध*तोकांहीं॥६७॥
जनमेजयपौष्यांचा झाला होता पुरोहित स्ववरें॥
वेदासि कोण न म्हणे गुरु ज्यावर ढळति गुरुकृपा-चवरें६८
एकासमयीं ठेवुनि उत्तंकाला निजाश्रमीं वेद ॥
याज्याप्रति कुमुदाप्रति विधुसा गेला हरावया खेद ॥६९॥
उत्तंकाला कांहीं सांगे स्वाभिमतकार्य गुरुभार्या ॥
श्रीमदयोध्या जैशी भरता गुरुभक्तिसादरा आर्या ॥ ७० ॥
जेंवि वसिष्ठाद्युक्ती सांगति भरता वरीं गुरुश्रीतें ॥
उत्तंकासि मुनिसत्या स्वीकारीं ह्मणति निजगुरुश्रीतें ७१ ॥
राम जसा भरतातें उत्तंकातें तसाचि गुरु वेद ॥
सुखवी वरप्रसादें नाहीं गुरु देव यांत तिळ भेद ॥ ७२ ॥
उत्तंक ह्मणे गुरुला द्यावी म्यां काय दक्षिणा सांगा ॥
वेद वदे बहु दिधलें वत्सा उपरोध कारिसि हा कां गा ।७३।
त्वां मज अर्थ दिला जो न ह्मणें गुरु त्यापरीस हेमागा ॥
पूस उपाध्यायीतें जरि तूं ह्मणतोसि आग्रहें मागा ॥ ७४ ॥
प्रार्थुनि तसेंचि पुसतां, त्यास उपाध्यायिनी असें मागे॥
पौष्यस्त्री- तांटकें दे, न प्रिय अर्थ मज दूजा लागे॥७५॥

१ ह्या नांवाचे दोन राजे. २ त्या राजांच्या प्रार्थनेवरून. ३ यजमानाकडे. ४ कमल. ५ चंद्र. ६ आपला मनोरथ. ७ वडील माणसें; शिक्षक. ८ श्रेष्ठ, पूज्य. ९ वसिष्ठादिकांचा उपदेश. १० स्त्रिया. ११ स्त्रीला. १२ फुकट विद्या शिकल्याबद्दल संकोच. १३ मोठा. १४. मेरूला. १५ कुंडलें.*. वृद्धांच्या.मुलांनीं.

होणार आजिपासुनि चवथे दिवशींच पुण्यकव्रत[1] ती ।
वेळा सांभाळीं, कीं होइल तुज इष्टदा[2] सुरव्रतती[3] ॥ ७६ ॥
तीं कुंडलें स्वकर्णी घालुनि ज्यां श्रीसमान[4] साजावें ।
वाढावें विप्रांतें तरि सत्वर शुद्धमानसा जावें ॥ ७७ ॥
उत्तंका त्यासमयीं येतां तूं पावशील कल्याण ।
नाहींतरि तें कैचें, तुजवरी घालील शाप पल्याण[5] ॥ ७८ ॥
आज्ञा घेउनि जातां पुरुष वृषारूढ[6] देखिला वाटे ॥
सांगे मद्वृष- गोमय- भक्षण तें त्यासि निद्यसें वाटे ॥७९॥
गुरुनेंहि भक्षिलें, हें त्या पुरुषें सत्य सांगतांचि मना ॥
ये, भक्षी, शीघ्र निघे, उठतां उठतां करूनि आचमना ॥ ८० ॥
वृष धर्म, पुरुष ईश्वर, जें गोमय मूत्र अमृत धर्म-फळ ॥
तें मृत्युभय—हर म्हणुनि सेवन करवी प्रभू करूनि बळ ८१ ॥
पौष्यनृपाप्रति जाउनि अमृतरस[11]- स्रावि कुंडलें यांची[12] ।
तों तो प्रसन्नचित्तें याच्ञा[13] सफळा करावया याची ॥ ८२
कृतपुण्यासि[7] हरि जसा कल्पलतेजवळि इष्ट साधाया
स्वगृहीं स्त्रीनिकट तसा भूप प्रेषी[8] विशुद्धभावा[9] या ॥ ८३
पाहे गृहांत परि ती देवी कोठें न देखतां क्षिप्र ॥
परते; म्हणे नृपा या योग्य विनोदास हा नव्हे विप्र ॥ ८४

---

१ पतिप्रीत्यर्थ व पुत्रप्राप्त्यर्थ स्त्रियांनीं करावयाचें व्रत. २ इच्छि लें देणारी. ३ कल्पवल्ली. ४ लक्ष्मीसारखी. ५ खोगीर. ६ बैला बसलेला. ७ पुण्यवानास. ८ पाठवी. ९ निर्मल अंतःकरणाचा उत्तं १० खरकुरा. ११ अपनग्म गळतो ज्यांतून तीं. १२ मागे १३ याच

करुनि विचार नृप म्हणे केला मी शोध म्हणसि बहु धामीं॥
देवी न पाहिली तरि म्हणतों उच्छिष्ट असति बहुधा मी८५॥
साध्वीदर्शन दुर्लभ अशुचि तयाला करीं बरें स्मरण ॥
ऐसें म्हणतां स्मरला गुरुचे चित्तांत चिंतितां चरण ॥ ८६॥
उत्तंक म्हणे केलें आचमन उठोनि चालतां वाटे॥
तें झालें व्यर्थ खरें मज तों साध्वीच देवता वाटे ॥८७ ॥
होउनि शुद्ध यथाविधि सदनीं जातांचि देखिली देवी ॥
ती या सत्पात्राच्या चरणीं शिर कुंडलें करीं ठेवी ॥८८॥
सावध पथीं असावें तक्षक जपतो असें सती शिकवी ॥
दे आशीर्वाद निघे तो शीघ्र पुसोनि त्यांसि तीसि कवी८९॥
गुणवत्पात्र म्हणुनि तो भूप श्राद्धार्थ विनवितां राहे ॥
भोजनसमयीं पात्रीं शीत सकेशान्न वाढिलें पाहे ॥ ९० ॥
कोपें म्हणे असें हें श्राद्धीं विप्रास अन्न वाढावें ॥
हो अंध, प्रभुनें पद मत्तापासूनि शीघ्र काढावें ॥ ९१ ॥
भूप म्हणे अन्न अशुचि नसतां जरि दूषितोसि घे शाप ॥
अनपत्य हो तुझें, तुज बाधो शुद्धान्नदूषका, पाप ॥ ९२ ॥
विप्र म्हणे अन्न पहा पौष्या नससीच योग्य कोपाया॥
नैशी असती पतिला करुनि बळें पाप शाप ओपाया९३ ॥

---

१ घरांत. २ पौष्यास. ३ बुद्धिमान्. ४ गुणवान् व योग्य. ५ निवालेलें. ६ ईश्वरानें. ७ अपवित्र. ८ निःसंतान. ९ व्यभिचारिणी.

अन्नां-दोष पहातां राया अपराध आपुला कळला ॥
शाप-निवृति-वरार्थ प्रांजलि होतांचि विप्र तो वळला९४॥
विप्र म्हणे येईलचि पारि चिंर न टिकेल अंधता राया ॥
साधु समर्थचि धरितां चरण च्छेदून बंध ताराया ॥ ९५ ॥
तूंही स्वशाप वारीं म्हणतां विप्रासि नृप म्हणे बापा ॥
क्षत्रियहृदय क्षुरसम जाणतसे घावयासि हें शापा ॥ ९६ ॥
हृदय नवनीत तुमचें वचन क्षुर, आमुचें वचन लोणी ॥
चित्त क्षुरचि, सहज गुण लोकीं केला नअन्यथा कोणीं९७॥
उत्तंक म्हणे राया, जरि मी शुद्धान्न दूषितों तरि तो ॥
मज बाधता तसें तों नाहीं मग शाप काय गा करितो ९८॥
ऐसें वदोनि त्याचा जायासि निरोप कार्य साधुनि घे ।
आठवुनि मनीं आणुनि तो श्रीसद्गुरु सभार्य साधु निघे९९
क्षण दृश्य अदृश्य पथीं नग्न क्षपणक विलोकितां विप्र ॥
धांवे बुध दुःस्वप्न प्रेक्षुनि काशी-पथीं जसा विप्र ॥ १०० ॥
उदकार्थ पथीं गुंते ताटंकें वेगळीं क्षण स्थापी ॥
क्षपणकतनु तक्षक खळ तितुक्यांतचि कुडलें हरी पापी१०१
पळतांचि देखिला खळ वंदुनि गुरुदेवतांसि तो रागें ॥
सा दुष्टाच्या लागे जैसा सुमुमुक्षु मृत्युच्या मागें ॥ १०२

---

१ अन्नांतील दोष. २ निवारण. ३ फार वेळ. ४ वस्त्र्यासारखें तीक्ष्ण. ५ लोणी. ६ स्वाभाविक. ७दिसतो न दिसतो. ८ बौद्धमताचा यति. ९ मोक्षार्थी १० ज्ञाता

विप्रें धांवुनि धरितां क्षपणक केशीं धरूनि निज रूपें ॥
शिरला विळांत तक्षक तों क्षोभे द्विज जसा दहन तूपें।३।
ऐसें होतां तो मुनि रक्षाया स्वयश आणि ताटंकें ॥
झाला क्षितिला दंडें जेंवि शिळेलागिं खाणितां टंकें॥१०४
तें पाहुनि शक्र ह्मणे वज्रा मुनिच्या प्रविष्ट हो दंडीं ॥
आश्रय दिला खळाला जेणें त्या भूमिकुक्षिला दंडीं१०५
वज्रें तसेंचि केलें खणिली यावद्भुजंगदेश रसा ॥
गेला द्विज पाताळीं चापच्युत रावणारिचा शरसा॥१०६॥
जाऊनि नागलोकीं नागांतें स्तवुनि कुंडलें मागे ॥
परि त्यासि न वळले ते स्तुति करितां हात जोडितां भागे७
दोघी स्त्रिया सित असित तंतूंनीं विणिति पट असें पाहे॥
तों द्वादशार चक्रहि सा शिशुनीं फिरवितांचि जें वाहे१०८
देखे तसाचि तेथें एक पुरुष एक त्याजवळ वाजी ॥
त्यातें स्तवि, पुरुष ह्मणे माग, ह्मणे विप्र नाग वळवा जी९
पुरुष ह्मणे विप्रा या अश्वापानीं करीं अगा धमन ॥
साधो तुझें न मानू त्या खल-बल-जलधिला अगाध मन१०
विप्र तसेंचि अनुष्ठी तों हयवदनादिरंध्रभव धूम ॥
मूषक-बिळीं जसी तासि करि त्या नागालयांत बहु धूमें ११

१ आग्नि. २ पृथ्वी. ३ टांकीनें. ४ भूप्रदेशाला. ५ नागलोकपर्यंत. ६ धनुष्यापासून सुटलेला. ७ रामाचा. ८ पांढरी. ९ वस्त्र. १० बारा आऱ्यांचें. ११ सहा. १२ मुलांनीं. १३ फिरतें. १४ घोडा. १५ घोड्याच्या गुदद्वारप्रदेशीं. १६ फुंकणें. १७ दुष्टाचें बळ हा समुद्र. १८ करी. १९ घोड्याच्या मुखादि द्वारांतून उत्पन्न झालेला. २० उंदीर. २१ पाताळांत. २२ [illegible].

पाताळांत सधूम ज्वाळा शिरतांचि तापले भोगी ॥
संसर्गींही भोगिति, दोषीच न दोष आपुले भोगी ॥११२॥
मरतो ऐसें कळलें व्यसनांत सुचेचिना उपाय, नतें ॥
मागे मग कुंडलयुग जें केलें मुनिपदीं उपायन तें ॥ ११३ ॥
चुकलों रक्षीं म्हणतां कर जोडुनि, लाज तक्षका नाहीं ॥
दंडेंचि खळ वळे, हें तत्व प्राकृत दक्ष कानांहीं ॥ १४ ॥
देउनि अभय नतातें घेउनि तीं कुंडलें ह्मणे आजी ॥
पुण्यक, मी दूर अहा! क्षोभेल गुरुप्रिया मनामाजी ॥११८॥
तो पुरुष म्हणे विप्रा, हो अश्वारूढ दिव्य वाजिप हा ॥
क्षणमात्रें गुरुसदना तुज नेइल कुतक तेंहि आजि पहा ॥
चढतांचि आणिला तो क्षणमात्रें गुरुकुळांसि अश्वानें ॥
व्यसनीं पराभवासि न पावे गुरुभक्त सिंह, न श्वानें ॥ १७ ॥
तैं गुरुपत्नी न्हाउनि वेणी करवीत बैसली होती ॥
टळलाचि अवधि, द्यावा शाप,असें जैं मनीं म्हणे होती १८॥
तीतें वंदुनि ठेवी कुंडलयुग तीपुढें पुन्हा वंदी ॥
गुरुपत्नीनें केला धन्य शिवादृष्टिनें जसा नंदी ॥ १९ ॥
मग अमृतघनाच्याही ज़ीची हांसेल धूलि करकेला ॥
गुरुपदयुगली नमिली ह्मीतें जिनें पारिजातकर केला॥ २०॥

---

१ सहवासी, २ नम्र झालेला. ३ नजराणा, ४ उत्तम घोडा. ५ कौतुक. ६ पार्वती. ७ गारेला. ८ जोडी. ९ लज्जित. १० पारिजात हातांत आहे ज्याच्या तो, श्रीकृष्ण. ११ गृह.

पुसतां विलंबकारण    सांगे मग जें विलोकिलें होतें ॥
वृषगोमय-भक्षण जें    पाताळांतीलही पुसे तो तें ॥ २१ ॥

गुरु वेद म्हणे वत्सा, चिंतिति जीतें सदैव धीर, चितीं ॥
ती एक स्त्री[1], दुसरी[2]    अमित ब्रह्मांडकुंभ जीं रचिती ॥ २२ ॥
जें वृत्त[3] देखिलें त्वां    तें होय अनेक-वासना-जाळ ॥
सित असित तंतु तीं सुख-    दुःखें, पट भव, तसेचि जे बाळ २३
ते वत्सा, तुज कथितों    एक अविद्या[4] असें मनीं आण ॥
तैशाचि अस्मिता[5] ती    दुसरी ऐसें महामते जाण ॥ २४ ॥
तिसरा राग[6], चतुर्थ    द्वेष, अभिनिवेश[7] पांचवा, सावी ॥
ती ईश्वरमाया[8] हे    व्हावी अध्यात्मखुण तुला ठावी ॥२५॥
जें चक्र पाहिलें तें    स्थूलशरीर[10], प्रमाण हें बापा ॥
याच्या संसाराचा[11]    हेतु अविद्यादिषट्क निष्पापा ॥ २६ ॥
जो पुरुष सांगसी तो    अंतर्यामी[12] महेश मायावी ॥
जो अश्व जीव तो, हे    दृष्टि तुला साधुसत्तमा, यावी ॥२७॥
पौष्याप्रति जातां जो    पुरुष वृषारूढ देखिला अध्वनीं[13] ॥
तो परमेश्वर, वृष तो धर्म    वृषभरूप देखिला नयनीं ॥ २८ ॥
गोमय भक्षविलें तें    अमृत, म्हणोनीच नागगेहांत[14] ॥
तूं वांचलासि वत्सा, विषबाधा जाहली न देहांत ॥ २९ ॥

---

१ आदिपुरुष. २ प्रकृति. ३ स्त्रिया व मुलें जें जें कर्म करीत होतीं तें. ४ अज्ञान. ५ अहंभाव. ६ विषयासक्ति. ७ आग्रह. ८ अवस्तूचे ठिकाणीं वस्तुत्वबुद्धि होण्यास कारण जी ती. ९ परमार्थज्ञान. १० पंचभूतात्मक जो देह तें. ११ जन्ममरणादिरूप व्यवहार. १२ अंतःकरणाचें दमन करणारा. १३ मार्गांत. १४ पाताळांत.

परमेश्वरें अनुग्रह तुजवरि केला स्वतत्त्व कळवीलें ॥
या आह्मां जीवांच्या सुत्हृदें दुस्तर अरिष्ट पळवीलें ॥ ३०

आहे तुझी स्वधर्मी सान्निष्ठा तीच या फळा फळली ॥
हो मदधिक सत्संमत, जा स्वगृहा, चित्कळा तुला कळली।
गुरुला नमुनि निघाला गेला तो हस्तनापुरासि कवी ॥
तक्षशिलाजयमुदिता भेटे जनमेजया, असें शिकवी ॥३२॥
कर्तव्य तें न करितां राया, भलतेंचि करिसि बाळकसा ॥
काय ह्मणावें तुज या भरतकुळीं तूं असा नृपाळ कसा ॥३३
पूजुनि त्या मुनिस ह्मणे, प्रकृतीच्या पालनें सदा धर्म ॥
रक्षितसें;भगवंता, वद जें चुकलों असेन मी कर्म ॥ ३४ ॥
उत्तंक ह्मणे केला भस्म तुझा तात तक्षकें अहितें ॥
आजुनि तरि फेडावें गुरुचें ऋण,भस्म करुनि त्या अहितें
विषहरणदक्ष कश्यप धन देउनि फिरविला,असा खोटा ॥
विघ्न करुनि गुर्वर्थी मजहि दिला ताप या खळें मोटा ॥३६॥
जरि यासि सर्पसत्रीं दहनीं जरि होमिशील तरि तात ॥
स्वर्गी होईल सुखी, गुरु-विप्र-प्रिय सुशील करितात ॥३७॥
मुनिवाक्य श्रवण करुनि जनमेजय नृप पुसे अमात्यातें ॥
होतेंच विदित डसला तक्षक भोगी नरोत्तमा यातें ॥३८॥

---

१ माझ्याहून अधिक. २ सन्मान्य. ३ ज्ञानकला. ४ जयानें हर्ष पावलेला. ५ प्रजा. ६ शत्रु. ७ विषनाशाविषयीं समर्थ. ८ गुरूच्या कामांत. ९ प्रधानाला. १० सर्प. ११ परीक्षितीला.

# अध्याय ३.

## सारांश.

[१-२४]भृगुवंश—च्यवनोत्पत्ति—भृगुपत्नीस ती गर्भिणी असतां पुलोमा राक्षस अग्नीस विचारून हरण करितो. तिचा भयानें गर्भ पडतो. त्याच्या (च्यवनाच्या) तेजानें राक्षस दग्ध होतो. तें वृत्त भृगूस समजल्यावर तो अग्नीस शाप देतो. ब्रह्मदेव अग्नीचें समाधान करितो. [२५-६०] प्रमतिमुनि व घृताचीरंभा यांचा पुत्र रुरु आणि विश्वावसुगंधर्व व मेनका यांची स्थूलकेशमुनीनें पाळिलेली कन्या प्रमद्वरा यांचा विवाह ठरल्यावर प्रमद्वरेस सर्पदंश होतो. तिला रुरु आपलें अर्धें आयुष्य देऊन जीवंत करितो, त्याची सर्पवधप्रतिज्ञा. तो भलत्याच सर्पावर काठी मारीत असतां तो डुतोंडें ना० सर्प त्याच्या दर्शनानें पूर्वरूप पावतो. तो त्यास सर्प न मारण्याचा उपदेश करून गुप्त होतो.

---

शौनक मुनिवर्य ह्मणे सौते, भृगुवंश आमुचे कर्णीं॥
यावा, सातेंचि सुखें आधीं तूं साधुसत्तमा वर्णीं॥ १॥
सौति ह्मणे ब्रह्म्याचा भृगु पुत्र, तदीय पुत्र तो च्यवन ॥
त्याचा प्रमति, तयाचा रुरु, तत्सुत शुनक सुमतिचें भवन॥
तो तव पूर्वपितामह, शौनक तुज ह्मणति यामुळें आतां ॥
च्यवनत्वहेतु कथितों सुख होतें साधु-वंश-यश गातां ॥ ३ ॥
भृगुची वधू पुलोमा ती होती प्रथम-गर्भिणी धार्मी॥
गेला असतां तीर्थ- स्नानाला एकदा तिचा स्वामी ॥ ४ ॥
दुष्ट पुलोमा राक्षस त्या भृगुच्या आश्रमांत रामाच्या ॥
रावणसा शिरला हो आल्ला शिरिं धरूनि कामाच्या ॥ ५ ॥

---

१ त्याचा, २ घर, ३ पूर्वज, ४ च्यवन, हें नाव पडण्याचें कारण.

घे, राक्षसा, दिली तुज, वदला होता पिता असें,रडतां ॥
तें दुःख मनीं वाहे योग पुढें भृगुसवें तिचा घडतां ॥ ६॥
अग्निगृहीं अग्नीतें पाहुनि राक्षस म्हणे अगा, आर्या ॥
वद साचें हे माझी किंवा भृगुचीच होय हे भार्या ॥ ७ ॥
तातें इच्छ्या प्रथम मज मग भृगुला हे समर्पिली दहना॥
देवमुखा, तुज पुसतों कीं आहे धर्मगति महागहना ॥८॥
अग्नि म्हणे प्रथम तुवां शब्दें वरिली मनांत ही धरिली ॥
भृगुनें मग विधिपूर्वक मजला साक्षी करूनियां वरिली॥९ ॥
प्रथम स्वस्त्री ऐसें येतां वाक्यांत वह्निच्या तुष्ट ॥
होऊनि सूकररूपें भृगुच्या पत्नीस तो हरी दुष्ट ॥ १० ॥
रडतां दुःखें कोपें गर्भ सतीचा पथीं गळाला हो ॥
तो राक्षस तत्तेजें क्षय दहनें शलभसा जळाला हो ॥ ११ ॥
जननी-कुक्षींतूनि क्रोधें च्यवला म्हणोनि तो च्यवन ॥
विधि सांत्वितां सवत्सा धेनु तसी पावली सती भवन ॥ १२ ॥
जे अश्रुबिंदु मार्गा माजि गळाले तिहीं महासरिता ॥
झाली तीतें म्हणती बिंदुसरा निववितीं अर्धज्वरिता ॥१३॥
भृगु येतां तीस म्हणे कथिसी न अनर्थ-हेतुला कां गे॥
ती कर जोडुनि राक्षस- पावक-संवाद जाहला सांगे ॥१४॥

---

१ मूल रडत असतां तें उगें राहावें ह्मणून "राक्षसा घेऊन जा" असें मुलास भय दाखविण्या कारितां ह्मणतात. २हे अग्ने. ३ "घे राक्षसा दिली तुज" ह्या शब्दावरून ४ टोळ. ५नदी. ६ पापरूपी ज्वरानें पीडिलेल्या जनास.

तें कळतां मुनिवर भृगु त्या देवाच्या शिरीं अघ स्यापी ॥
हो सर्वभक्ष ऐसें कोपें सर्वामराननां शापी ॥१५ ॥
छळेंविधिहि सत्य म्हणतां देवमुखालाहि बाधला शाप ॥
विधिसि असत्य म्हणे जो राक्षस झालाचि भस्म तो पाप
अग्नि म्हणे ब्राह्मण मज मान्य,भृगो, तूं दिला जरी शाप ॥
मुझें ताप सहावा द्यावा ताप-प्रदासिहि न ताप ॥ १७ ॥
रुसला भगवान् पावक झाला गुप्त त्यजूनि लोकांतें ॥
सोशील सत्यवादी दूषण जगदेकपूज्य तो कां तें ॥१८ ॥
झाला तेव्हां हुतभूक् गुप्त भृगुकृतावमानजें कोपें ॥
लोकत्रयही व्याकुळ होय स्वाहा-स्वधा-क्रिया-लोपें ॥१९॥
ऋषि-देवांहीं कथिला विधिला निजताप अग्निचा शाप॥
तेव्हां तो समजावी त्या दहना जेंवि बाळका बाप॥ २०॥
एकाच्या कोपें कां बहुतांचा करिसि घात शापातें ॥
दे तो भृगु, परि वाग्गु- च्चारीं जें बळ तुझेंचि वापातें॥ २१॥
क्रव्यादा मूर्ति तुझी अपान-संबंधिनीहि ज्या ज्वाळा ॥
त्या सर्वभक्षितील स्वाहाप्राणप्रिया,स्वधापाळा, ॥ २२ ॥
स्वांशें अमेध्यभक्षण करितां तुज लेशही नसे दोष॥
हो प्रकट जगांत पुन्हा कांहीं चित्तीं धरूं नको रोष॥ २३॥

---

१ सर्व देवांचें मुख अग्नि. २ "घे राक्षसा दिली तुज" असा, मूल उगी राहावें या छलानें(हेतूनें)झालेला दानविधि. ३ जगांत प्राधान्यें करून पूज्य. ४ अग्नि. ५ भृगूनें केलेल्या अपमानापासून उत्पन्न झालेला. ६ देवकार्य. ७ पितृकार्य. ८ वाणीच्या उच्चारांत. ९ मांसभक्षक १० अपवित्र.

ऐसें सांत्वन करितां वह्नि पुन्हा प्रकटला असा चंड ॥
भृगुनें केला सत्यां ऽऽभासाला सत्य मानितां दंड ॥२४॥
च्यवनोत्पत्ति--कथा हे शुनकाऱ्याही तुह्मांसि मी गुरुची ॥
कथितों कथा पवित्रा प्रमति–घृताची–तनूद्भवा रुरुची २५
विश्वावसुच्या वीर्यें प्रसवोनि सुतेसि मेनका देवी ॥
श्रीस्थूलकेश–मुनिच्या आश्रमनिकटीं नदी–तटीं ठेवी २६
स्थूलकच वनीं पाहुनि तें कन्यारत्न आश्रमीं आणी ॥
तैसेंचि तो दयालु ब्राह्मण निजलोचनद्वयीं पाणी ॥ २७॥
तीं पोपिली मुनीनें प्रमद्वरा नाम ठेविलें विधिनें ॥
वाढविली मूर्तिमती आत्मतपःसिद्धिसी दयानिधिनें २८॥
तेव्हां विलोकिली ती गंधर्ववराप्सरोद्भवा सुरुची ॥
झाली सर्वस्मरशर- लक्ष्य मनोवृत्ति तत्क्षणीं रुरुची २९॥
तें निजसुतमित्रमुखें कळतां स्थूलालकाप्रति प्रमति ॥
मागे प्रमद्वरेला तोही देतों ह्मणे उदार-मति ॥ ३० ॥
निश्चय विवाह-तिथिचा केला त्यावरि तिला डसे व्याळ॥
तें कळतां तच्छोकें रुरु एकांतीं रडे पिटी भाळ ॥३१॥
शब्देंचि कलिपली स्त्री मरतां, रुरु पावला महाकष्ट ॥
तात्पर्य या कथेचें हें कीं दुःखद परिग्रह स्पष्ट ॥ ३२ ॥

---

१आपलें बोलणें वस्तुतःसत्य नसतां सत्याचा आभास(भ्रम)आहे ह्मणून भृगूनें आपणास(अग्नीस)शापरूप दंड केला तो सत्य [न्याय्य] असें अग्नीनें मानिल्यावर. २ पूर्वजाची. ३ पुत्र.४समीप. ५ दोन डोळ्यांत. ६ देहधारिणी. ७ गंधर्वश्रेष्ठ व अप्सरा यांपासून उत्पन्न झालेली. ८ सुंदरकांतीची. ९वेध्य. १० कुटुंब.

तप दान गुरूपासन   जरि मज घडलें असेल तरि तेणें ॥
वांचो हातीं येऊ   जें हरिलें काळ-तस्करें लेंणें ॥ ३३ ॥
जरि मी असेन जन्म- प्रभृति शुचि उठो मनःप्रिया तरि ती
हा! आधि-सर्पदष्टा   विकळा मन्मातिहि विकळ मज करिती
ऐसे करी विलाप   स्त्रीशोकें प्रमति-पुत्र जो त्यासी ॥
दे देवदूत दर्शन   रवि जेवि तमीं विमूढहोत्यासी ॥३५॥

दूत ह्मणे जो प्राणी   सरतां आयुष्य पावला अंत ॥
तो न पुन्हा उठला हें   वदाते रुरो तत्त्व जाणते सन्त ३६॥
पुण्यें देशी परि तीं   क्षणभरिहि न उठवितील मेलीला ॥
गतबुद्बुदेच्छु-शिशुची   जसि तसिच तुझी मला गमे लीला
तुज या दयिता-विरह-   ज्वलनापासोनि व्हावया मुक्ति ॥
एक भविष्यज्ज्ञांनीं   कथिली ती सांगतों तुला युक्ति ३८॥
अर्ध स्वायुष्याचें   जरि तूं देशील तीस, नवरी ती ॥
वांचेल, रीति पहिली   तीच पहाशील तूं, न नव रीती ३९॥

विप्र ह्मणे आयु दिलें   येणें हस्तें करोनि निजलीला ॥
उठवावें तैसें तूं   उठवीं, प्रकटीं जनांत निज लीला ॥४०॥
मग तो विश्वावसुसह   दूत सुरांचा यमाकडे गेला ॥
स्वोक्ताचा निर्वाह   प्रार्थुनियां त्यास तन्मतें केला ॥४१॥

---

१ अलंकार. २ पासून. ३ मनोव्यथा रूप सर्पानें दंशित. ४ व्याकुळ. ५ अंधकार, ५० दुःख. ६ गेलल्या बुडबुड्यांची इच्छा करणारा बाळ. ७ युक्ति. ८ साफल्य.

धर्में दिव्यधर-करें जागविली ते प्रमद्वरा सुरुची ॥
जसि अधनाची श्रीनें तशि स्त्रीनें हीहि निववली रुरुची४२
तत्पाणि-ग्रहणोत्तर भार्गव घे अहिवध-व्रत क्रोधी ॥
तो चण्ड दण्डपाणी सर्प वधी वारुळें बिळें शोधी ॥४३॥
तो एकदां वनांत भ्रमतां रुरु निर्विषाहिला पाहे ॥
दण्ड उगारूनि ह्मणे दुष्ट भला पुष्ट भेटला आहे ॥ ४४॥
डुण्डुभ ह्मणे वधिसि अप- राध नकरितां किमर्थ सांग मला
हा अनपराधभूत- द्रोह अहित तदपि विहित कां गमला ॥
रुरु त्यासि ह्मणे माझी वधिली होती प्रिया खळें नागें ॥
म्यां व्याळ-वध-व्रत हें त्यापासुनि घेतलें असे रागें ४६॥
सर्प ह्मणे ते अन्य प्राणघ्न व्याळ करिति जे दंश ॥
आकृति सम परि त्यांच्या स्वगुणांचा डुण्डुभीं नसे अंश॥
अपराधी दण्डावा किंवा भलताचि जो अनपराधी ॥
धर्मज्ञा कोंवि तुझी झाली ही पापसाधन-परा धी ॥४८॥
हा ऋषि ऐसें जाणुनि हेतु पुसे सर्पयोनिचा अहिला ॥
यास्तव सांगे रुरुला डुण्डुभ वृत्तांत आपुला पहिला ॥४९
होतों ब्राह्मणसुत मी मन्नाम सहस्रपात् सखा माझा ॥
ज्याचें नाम खगम तो मुनिवृंदीं उडुगणीं जसा राजा५०॥

---

१ यमानें २ भृगुवंशोत्पन्न रुरु. ३ हातांत दंड घेणारा. ४ निर्विष सर्प. ५ दुतोंडे. ६ निरपराध प्राण्यांचा द्वेष. ७ तत्पर. ८ नक्षत्रपुंज. ९ चंद्र.

बाळपर्णी तृणसर्पे भिववुनि कोपोदयासि त्या खगमीं ॥
करिता झालों आलों, तच्छापें या कुयोनिला मग मी५१॥
खगमें कथिलें होतें होइल भृगुच्या कुळांत त्या रुरुचें ॥
दर्शन हरील शापा तापाला नाशितें जसें गुरुचें ॥५२॥
तो तूं प्रमतिसुत मला मद्भाग्यें भेटलासि नवसांनीं ॥
ऐसें वदतां झाला शापाच्या दिव्यरूप अवसानीं ॥५३॥
प्राप्त-स्वरूप तो मुनि मग त्या रुरुला ह्मणे अगा, बापा, ॥
हिंसा तुज योग्य नव्हे जोडिसि दारूनि कां महापापा५४।
ब्राह्मण-धर्म अहिंसा, सत्योक्ति, तसी क्षमा मनीं आण ॥
क्षत्रिय-धर्म प्रजाति- प्रतिपालन, दण्ड, उग्रता, जाण ॥५५॥
जनमेजयभूपाच्या अहिसत्रामाजि भग्नदर्पांतें ॥
आस्तीकविप्र यत्नें संरक्षी तक्षकादि सर्पांतें ॥ ५६ ॥
भार्गव रुरु त्यासि ह्मणे कथिला त्वां मज बरा नय मुने तें
वृत्त कथीं, न उपेक्षीं गंगा मिळतां त्यजी न यमुनेतें ॥५७।
इतिहास हा मुनि तुला कथितील असें ह्मणोनि तो विप्र॥
झाला गुप्त, चकोरा क्षुधिता सांडुनि जसा विंधु क्षिप्र५८॥
हारपला चिन्तामणि मणि घ्यावा तोंचि काय तो हातें ॥
बहु-शोधितां न मिळतां पावे रुरुविप्र शोक-मोहातें५९॥
सावध होउनि गेला प्रमतीतें वृत्त सांगता झाला ॥
मग रुरु तातमुखें तें आख्यानश्रवण करुनियां धाला६०

---

१ गवताच्या सर्पानें. २ राग उत्पन्न करणें. ३ शेवटीं ४ ज्यास पूर्वरूप मिळालें तो. ५ बुद्ध्याच. ६ कठोरपणा. ७ गर्वहीन. ८ नीति. ९ चंद्र.

# अध्याय ४.

## सारांश,

[१-२१] जरत्कारूची कथा- तो आपले पूर्वज पाहतो. ते त्यास लग्न करण्यास सांगतात. लग्नाविषयीं जरत्कारु त्यांस वचन देतो. वासुकी त्यास आपली बहीण देतो. आस्तीकऋषीचें जन्म. त्याचें-कृत्य. [२२–३५] कश्यपभार्या कद्रू व विनता.सर्पोत्पत्ति. अरुणोत्पत्ति. अरुणाचा विनतेस शाप- उच्छाप. [३६–६२] अमृतमथन. चतुर्दशरत्नोत्पत्ति. मोहिनीचा अवतार. राहुशिरश्छेद. [६३–८०] सर्पशाप. कद्रूविनतासंवाद. गरुडोत्पत्ति.[८१—८७] अरुण, सूर्य-सारथि होतो. [८८—१७२] पुत्रासह विनता कद्रूचें दास्य करिते. दास्यविमोचनोपाय. अमृताहरणार्थ गरुडाचें जाणें.त्याचें भक्ष्य.वालखिल्यऋषिकथा. देवगरुडयुद्ध.गरुडास विष्णुवर. इंद्रगरुडयुद्ध इंद्रगरुडसंवाद. गरुड सर्पास अमृत देतो. इंद्र त्याचें हरण करितो. सर्पांचाशोक.

**शौनक पुसे तयाला सौति ह्मणे चरित आइका चारुं ॥**
**होता यायावरकुल- तिलक प्रथमाऽश्रमी जरत्कारु ॥ १ ॥**
**यतचित्त ऊर्ध्वरेता जितनिद्राहार तरुतळीं राहे ॥**
**गर्तांत पूर्वजांतें करितां तीर्थाटनासि तो पाहे ॥ २ ॥**

१ मनोहर. २ यायावरनामक ऋषींचे कुळांत श्रेष्ठ. ३ ब्रह्मचर्याश्रमी. ४ मनोनिग्रह करणारा. ५ आमरण ब्रह्मचर्यानें राहणारा. ६ निद्रा व भोजन स्वाधीन ठेवलीं ज्यानें तो. ७ खळग्यांत.

त्यासि जरत्कारु पुसे  कोण तृणस्तोमलग्नपाद असे ॥
गर्तीं अधोमुख तुह्मी  लोंबतसां पावलां विपत्ति कसे ॥३॥
ज्याचा अवलम्ब तुह्मां  त्याहि तृणस्तोममूलकासि महा ॥
मूषक खण्डितसे कीं  हा शीघ्रचि गर्तपातहेतु अहा! ॥४॥
भूलोक गर्त, मूषक  काल, तृणस्तोम वंश, हा भाव ॥
सन्तति नसतां स्वर्गीं  पितरांसि बसावया नसे ठाव ॥५॥
ते पितर ह्मणति अह्मी  यायावर-नाम ऋषि जनख्यात ॥
आहों पतनोन्मुख हा  होत असे संतति-क्षयें घात ॥ ६ ॥
आहे वंशीं एकचि  पुरुष जरत्कारुनामक ज्ञानी ॥
परि तेणें स्त्री नकरुनि  केली हे संततिक्षयें हानी ॥ ७ ॥
एक तपचि करितो तो  मंद करीनाचि यत्न संतानीं ॥
संतानोत्पादन जरि  निन्दित, केलें कशास संतांनीं ॥८॥
आह्मीच मन्दभाग्य  स्वर्गापासोनि होतसों भ्रष्ट ॥
तूं कोण साधु दुःखित-  वृत्तें होतोसि विह्वल स्पष्ट ॥९॥
त्यांसि ह्मणे तो मीच  स्वोद्धाराचा प्रयत्न मज सांगा ॥
ते ह्मणति जरत्कारो  वत्सा, पुससी कळोनियां कां गा ॥१०
स्त्री संपादुनि जोडीं  तीच्या ठायीं विशुद्ध संततिला ॥
तारिल तेचि आह्मां  ह्मणती व्यसनांत नाव संत तिला ॥११

---

१ गवताच्या समुदायास ज्यांचे पाय चिकटले आहेत. ते. २ आश्रय. ३ मूळाला. ४ खळग्यांत पडण्यास कारण. ५ लोकप्रसिद्ध. ६ व्याकुळ.

येरु ह्मणे जरि मजला नामें शीळें वयें समा कन्या ॥
देतिल बंधु भिक्षे जरि तरि मान्या असे नसे अन्या ॥ १२॥
पोषण न करीन तिचें स्वल्पहि न तदर्थ वित्त जोडीन ॥
होतांचि गर्भधारण संग तिचा मी स्वतंत्र सोडीन ॥ १३ ॥
विधि हाचि मान्य आहे याहुनि विधि मान्य मज नसे इतर॥
ऐसें ऐकुनि ह्मणती आह्मांला हेंचि लक्ष्य ते पितर ॥ १४॥
मग पृथ्वी वारि फिरला पारि कोठेंही न काम तो घडला ॥
दार-करग्रहणार्थी साधु जरत्कारु संकटीं पडला ॥ १५ ॥
कन्याभिक्षार्थी मी विप्र जरत्कारु,वचन माना, व्हा ॥
सिद्ध,मला द्या विधिनें, परि तीहि असे जरी समानाव्हा ॥१६
यापरि वनांत हाका मोठ्यानें तीन विप्र जों फोडी ॥
तों भगिनीतें आणुनि वासुकि तत्काळ कर तया जोडी ॥१७
नाम जरत्कारु असें पुसतां कथिलें दिल्ही तया विधिनें ॥
वरुनि तिला हर्षविलें निज-पूर्वज-चित्त त्या तपोनिधिनें॥१८
जनमेजयसत्रीं निज- जननीशापें हुताश भक्षिल ॥
त्या व्यसनीं तेजस्वी भगिनीसुत आपणासि रक्षील ॥ १९
या अर्थें वासुकिनें दिधली अनुजा तयासि आणूनी ॥
शापाचा परिहार श्रीविधिच्या आननेंचि जाणूनी ॥२०॥

---

१ स्वभावानें. २ द्रव्य. ३ इष्टगोष्ट. ४ इच्छा. ५ कन्यारूपी भिक्षा इच्छिणारा. ६ माझ्या नांवाची. ७ अग्नि. ८ ब्रह्मदेवाच्या. ९ मुखानें.

आस्तिकनामक तिजला सुत झाला, आधि जेधवां भक्षी॥
जनमेजय- सत्रीं तो जाउनि हुतशेष मातृकुल रक्षी ॥ २१

आतां आहिशापाचें कारण सूतात्मजोक्त बोलावें ॥
संक्षेप³- विस्तरज्ञ श्रोत्यांचें मस्तकाब्ज डोलावें ॥ २२ ॥
कद्रू विनता कन्या दक्षाच्या कश्यपर्षिच्या जाया ॥
पतिनें दोघींस दिले वर झाल्या मागत्या प्रिया ज्या या॥२३
कद्रू समवर्चस दश— शतसुत मागे ,तिला ह्मणे तो, घे ॥
विनतेसहि दे कद्रू– तनुजाधिक– शक्ति पुत्रमणि दोघे॥२४
यत्नें गर्भ धरावे ऐसा उपदेश आदरें केला ॥
मग तो भगवान् कश्यप तप साधाया तपोवना गेला ॥२५
प्रसवे अनल्पकाळें कद्रू अंडें सहस्र वरदानें ॥
विनता दोन्ही प्रसवे दिधलीं पतिनें अभीष्ट- वरदानें ॥२६
वृद्ध्युचितोष्ण—स्थानीं दासींनीं पूर्ण पंचशत—वर्षें ॥
केलीं अंडें जतन प्राणांसम कृपण—वित्तसम हर्षें ॥ २७ ॥
अंडें भेदुनि झाले प्रकट आहि सहस्र, माय सुख पावे ॥
विनता ह्मणे अहा सुत कां न उपजले बरें मजाहि व्हावे॥ २८
फोडी अंडाप्रति तों पाहे पूर्वार्ध– सिद्ध देहातें ॥
ताप अधैर्यें विनता आपुलिया आपणासि दे हातें ॥ २९ ॥

१ जळून शिल्लक राहिलेलें २ सूतपुत्रानें सांगितलें .३ सारांश व विस्तार जाणणारे. ४ शिरःकमल. ५ समान तेजाचे. ६ कद्रूपुत्रांहून अधिक बळवान् ७ पोष्यावेळानें. ८इच्छित वर देणारानें. ९ वाढण्यास योग्य अशा उष्ण स्थानीं.

क्रोधें तो पुत्र ह्मणे तूं जीची धरुनि मानसीं स्पर्धा ॥
करुनि त्वरा अधीरें केला मद्देह हा असा अर्धा ॥ ३० ॥
या अन्यायेंचि तिची दासी होशील पंचशत–अब्द ॥
देवाविला शाप तुझ्या कर्में, लावूं नको मला शब्द ॥ ३१ ॥
जरि दुसऱ्याहि सुताचा घात न करिशील तरिच तो मुक्त ॥
दास्यापासुनि तुजला करिल, असोंदे मनांत हें उक्त ॥ ३२ ॥
पंचशताब्दा नंतर उपजेल दुजा स्वयें सुत, न तूर्ण ॥
जरि रक्षिशील तोंवरि करिल मनोरथ समस्त परिपूर्ण ॥ ३३ ॥
विनतेचा प्रथम तनुज अरुण तरणिसूत[1] जाहला आहे ॥
दुसरा गरुड उपजतां भरला गगनीं न मंदिरीं राहे ॥ ३४ ॥
झाला क्षुधित मलया– नलसा तेजस्वि–[2] वर्य तो पक्षी ॥
क्षुत्पीडा–शमनार्थ[3] ब्रह्म्यानें अन्न कल्पिलें भक्षी ॥ ३५ ॥
ज्या कद्रूची विनता दासी सुतशापकारणें[4] झाली ॥ ॥
तीच कथा सांगावी ह्मणुनि अमृतमथनसत्कथा आली ॥ ३६ ॥
चतुरानन–मुख्यामर[5] सर्व कनकनगशिरीं[6] बसोनि कसें ॥
अमृतोत्पादन करणें चिंतिति नारायणासमक्ष असें ॥ ३७ ॥
हरिनें विधिला केलें अमृतप्राप्त्यर्थ युक्तिचें कथन ॥
मंदरनगें[7] करावें लवणोदधिचें[8] सुरासुरीं मथन ॥ ३८ ॥

---

१ सूर्याचा सारथी २ तेजस्व्यांत श्रेष्ठ. ३ क्षुधानिवारणार्थ. ४ पुत्रशापामुळे. ५ ब्रह्मादि देव ६ मेरूच्या शिखरावर, ७ मंदरनामक पर्वतानें. ८ क्षारसमुद्राचें.

प्रभुमंत्रें संधि करुनि झाले एकत्र देव दैत्य मग ॥
यत्न करिति परि त्यांच्या वीर्यें नुचलेचि मंदराख्य नग ३९
अकरासहस्र–योजन तो वरि तितुकाचि भूमिच्या पोटीं ॥
उचलेना गिरि देवां दैत्यांचीं भागलीं बळें मोटीं ॥ ४० ॥
नारायणासि अचलो- द्धाराची युक्ति तेधवां सुचली ॥
आज्ञापितां अनंता तो भगवान् तत्क्षणीं तया उचली ॥४१
नेला नग सिंधूप्रति झाला आधार कूर्मराज तळीं ॥
वासुकि-मंथन-रज्जु भ्रमविति सुर असुर सासि अब्धिजळीं
मुख जिकडे वासुकिचें धरिती तिकडेचि ते असुर मानी ॥
तद्गरलज्वालांनीं प्राणांची निश्चिताचि जरि हानी ॥४३॥
दैत्यांनीं वासुकिचें त्यजिलें जें काय मानुनी तुच्छ ॥
तें धरिलें देवांनीं स्वहितकर-प्रभुवरोदितें पुच्छ ॥ ४४ ॥
विष-धूमार्चिस्पर्श- श्रांतां करि शांत शक्र जलदानीं ॥
त्या श्रम-शिथिल-भुजांतें प्रभु झाला मुक्तहस्त बळदानी४५॥
मथितां सिंधूतूनि प्रथम प्रकटे कलानिधी सोम ॥
तो धवलात्मा धवली स्वांशुपटें करुनि दिङ्मही व्योम४६
झाली प्रकट मग श्री- देवी, देवी सुरा मग निघाली ॥
प्रकटे धवल तुरग मग जो झगमग आपुली गगनिं घाली॥

---

१ विष्णूच्या मसलतीनें. २ सख्य. ३ पर्वत उचलण्याची. ४ शेषाला. ५ वासुकिरूप मंथन करण्याची दोरी. ६ समुद्रोदकांत. ७ गर्विष्ठ. ८ वासुकीच्या विषज्वालांनीं- ९ आपलें हितकरणाऱ्या विष्णुवचनानें. १० विषाच्या धूमयुक्तज्वालांच्या स्पर्शानें श्रमलेले, ११ श्रमानें थकले बाहु ज्यांचे त्यांस. १२ उदारहस्त.

कौस्तुभमणि प्रकटला श्रीसह घे श्रीपति स्वयें साला ॥
मग अमृतकंमंडलुकर भगवान् धन्वंतरि प्रकट झाला ४८॥
श्वेत चतुर्दंत करी ऐरावत जन्मला, तया हरि घे ॥
हयपतिसहि घे, तैसें कवणाच्या रत्न मानसीं न रिघे॥४९
अति-निर्मथनें प्रकटे अतिदारुण काळकूटनाम गरं ॥
तद्गंधें विश्व विकळ झालें जैसें दवानळें नगर ॥ ५० ॥
दहन--व्यसन शमाया प्रार्थावा जलद सा जसा नगरें ॥
शंभु विनविला विश्वें कीं खावें आपणासि या न गरें ५१
ब्रह्मप्रार्थित शंकर सा त्रिजगद्ग्रासंसिद्धपाप्याला ॥
तत्काळचि लीलेनें विश्वावर करुनियां कृपा प्याला५२॥
कंठींच विष धरी प्रभु त्यास्तव आणी निकां मनीं लाभ॥
कीं अतुळ--यश मिळालें कंठाहि शोभे निकामं नीलाभ ५३
धन्वंतरिपासुनि तीं अमृत--कमंडलु बळें असुर हरिती ॥
करिती चिंता निर्जर जाणे त्यांचा अभीष्टकर हरि ती ५४
अद्भुत ललनारूप स्वीकारुनि विश्वरूप हरि त्यांचें ॥
प्रथम हृदय मग अमृतहि हारि, अप्रार्थित बळेंचि हरित्यांचें
प्राप्तहि अमृत करींचें स्त्रीसंगें जाय, हें जना कळवी ॥
प्रभु दृक्पातें हसितें भुलवुनि सर्वस्व जोडिलें पळवी॥ ५६॥

---

१ अमृताचा कलश हातांत ज्याच्या तो. २ चार दांतांचा. ३ इंद्र. ४ उच्चैःश्रवानामक उत्कृष्ट घोडा. ५ विष. ६ वणव्यानें. ७ ब्रह्मदेवानें प्रार्थिलेला. ८ तीन जगांचा ग्रास करण्यास तयार झालेल्या दुष्ट विषास. ९ पूर्ण. १० अत्यंत. ११ नीलवर्ण. १२ देव.

जे जे साधु स्वाश्रित त्यांतें तें अमृत मोहिनी वाढी ॥
तात्पर्य अमृतमथनीं ऐसें मणिगर्भकार हें काढी ॥ ५७ ॥
सुररूप असुर राहु प्राशी अमृतासि तें तरणि इंदु ॥
सुचवी तोंचि हरि हरी औरिनें अरिशिर,गिळों न दे बिंदु
गुरुचा प्रसाद नसतां अमृत न पावे असाधुजन कपटें ॥
हें कळविलें बुधांतें अमृत पितां वधुन राहु कनकपटें ५९
तें गगनग राहुशिर द्वेषें अद्यापि रवि-विधु-ग्रास ॥
करितें,कवि अघ-भीरुचि बहु भीति अघा तयाचे उग्रास६०
राहून्मथनीं झाला अतुल तुमुल दितिज-दनुज-नाकि-रण
रविचे शररेणुपटल- पटाधिकृत न दिसती जना किरण ६१
सुरशरगणें चतुर्भुज- चक्रें झाले असंख्य असुरहित ॥
अमृतें न तसें होतें रणमरणें होय फार असुरहित ६२ ॥
अमृतार्थ युद्ध दारुण केलें, ती बहु कथा, असो यत्नें ॥
सिंधूतूनि चतुर्दश- संख्याक प्रकट जाहलीं रत्नें ॥६३
सांतिल हरि किंवर्ण स्वसपत्नीला असें पुसे कद्रु ॥
निजमत्सर वृद्धिगत व्हाया सत्वर जसा सुसेकद्रु ॥ ६४ ॥
विनता ह्मणे भगिनि, सा हयपतिचा वर्ण निश्चयें धवळ ॥
तूं तर्कें वद कैसा पाहूं जाऊनियां तया जवळ ॥ ६५ ॥

---

१ सूर्य. २ चक्रानें. ३ दुर्जन. ४ कनकवर्ण वस्त्र ज्याचें त्या विष्णूनें. ५ चंद्र. ६ राहूच्या शिरश्छेदसमयीं. ७ दैत्य, राक्षस व देव यांचें युद्ध. ८ बाण व धूळ यांचा समूह हेंच वस्त्र त्यानें आच्छदित. ९ प्राण. १० घोडा. ११ कोणत्या रंगाचा. १२ ज्यास उत्तम शिपर्णे आहे तो वृक्ष. १३ विष्णु. १४ दैत्यांचें हित—रणमरणानें तत्काळ स्वर्गप्राप्ति होते, तशी अमृतानें होत नाहीं, असा उद्देश .

कद्रू ह्मणे नसे तो धवल असे कालवाल हें साचें ॥
विनता ह्मणे दुधाच्या मित्रचि तें अश्वरत्न फेंसाचें ६६ ॥
कद्रू ह्मणे करीं पण तेंव्हां विनता ह्मणे जिचें लटिक ॥
होईल तिनें व्हावें जीचें तर्कित खरें तिची वटिक ६७ ।
व्याळांची माय ह्मणे बहु बरवें आजि तों असो राहूं
दोघी उद्यांचि जाउनि उच्चैःकर्णाप्रति स्वयें पाहूं ॥ ६८ ॥
निश्चय करूनि ऐसा कद्रू सांगे सुतांसि गूढ पण ॥
शिकवी कुमति स्वमुखें प्रकट करी आपुलेंचि मूढपण ६९
अंजननिभ केश तसे होऊनि शिरा तुरंगपतिपुच्छीं ॥
ऐसें कपट शिकवितां ते स्वमतीं घालिती न मन तुच्छीं ७०
सांसि ह्मणे, जनमेजय- सत्रांत जळाल, तों तथास्तु तिला
विधिहि ह्मणे, कारि कारितां पूर्ण स्वमहामनोरथा स्तुतिला
विधि कश्यपासि सांगे जगदहितभुजंगशाप मज रुचला ॥
खेद तुवां न करावा होणारासारिखा तिला सुचला ७२ ॥
प्रातःकाळीं कद्रू विनता लंघूनि जलधिला स्वपथें ॥
गेल्या अश्व पहाया दासीपण करुनियां पुन्हा शपथें ७३
जातां विनता अश्वीं कद्रूक्ता कालवालता पाहे ॥
पावे वल्ली भरितां जेंवि विपें आलवालतापा हे ॥ ७४ ॥

---

१ काळे केश (शेंपटाचे)ज्याचे तो. २उच्चैःश्रव्याला. ३काजळा सारखे ४ जगाचे शत्रु सर्प त्यांस दिलेला शाप. ५ अळें.

जे जे साधु स्वाश्रित  त्यांतें तें अमृत मोहिनी वाढी ॥
तात्पर्य  अमृतमथनीं  ऐसें मणिगर्भकार हें काढी ॥ ५७ ॥
सुररूप असुर राहु  प्राशी अमृतासि तें तरणि इंदु ॥
सुचवी तोंचि हरि हरी  अरिनें अरिशिर,गिळों न दे बिंदु
गुरुचा प्रसाद नसतां  अमृत न पावे असाधुजन कपटें ॥
हें कळविलें बुधांतें  अमृत पितां वधुन राहु कनकपटें ५९
तें गगनग राहुशिर  द्वेषें अद्यापि रवि-विधु-ग्रास ॥
करितें,कवि अघ-भीरुचि  बहु भीति अघा तयाचे उग्रास६०
राहून्मथनीं झाला  अतुल तुमुल दितिज-दनुज-नाकि-रण
रविचे शररेणुपटल- पटाधिकृत न दिसती जना किरण ६१
सुरशरगणें चतुर्भुज-  चक्रें झाले असंख्य असुरहित ॥
अमृतें न तसें होतें  रणमरणें होय फार असुरहित ६२ ॥
अमृतार्थ युद्ध दारुण  केलें, ती बहु कथा, असो यत्नें ॥
सिंधूंतूनि चतुर्दश-  संख्याक प्रकट जाहलीं  रत्नें ॥६३
सांगतिल हरि किंवर्ण  स्वसपत्नीला असें पुसे कद्रु ॥
निजमत्सर वृद्धिगत  व्हाया सत्वर जसा सुसेकद्रु ॥ ६४ ॥
विनता ह्मणे भगिनि, सा  हयपतिचा वर्ण निश्चयें धवळ ॥
तूं तर्कें वद कैसा  पाहूं जाऊनियां तया जवळ ॥ ६५ ॥

---

१ सूर्य. २ चक्रानें. ३ दुर्जन. ४ कनकवर्ण वस्त्र ज्याचें त्या विष्णूनें. ५ चंद्र. ६ राहूच्या शिरश्छेदसमयीं. ७ दैत्य, राक्षस व देव यांचें युद्ध. ८ बाण व धूळ यांचा समूह हेंच वस्त्र त्यानें आच्छादित. ९ प्राण. १० घोडा. ११ कोणत्या रंगाचा. १२ ज्यास उत्तम शिंपणें आहे तो वृक्ष. १३ विष्णु. १४ दैत्यांचें हित—रणमरणानें तत्काळ स्वर्ग-प्राप्ति होते, तशी अमृतानें होत नाहीं, असा उद्देश .

कद्रू ह्मणे नसे तो धवल असे कालवाल हें साचें ॥
विनता ह्मणे दुधाच्या मित्रचि तें अश्वरत्न फेंसाचें ६६॥
कद्रू ह्मणे करीं पण तेंव्हां विनता ह्मणे जिचें लटिक ॥
होईल तिनें व्हावें जीचें तर्कित खरें तिची वटिक ६७।
व्याळांची माय ह्मणे बहु बरवें आजि तों असो राहूं
दोघी उद्यांचि जाउनि उच्चैःकर्णाप्रति स्वयें पाहूं ॥ ६८ ॥
निश्चय करूनि ऐसा कद्रू सांगे सुतांसि गूढ पण ॥
शिकवी कुमति स्वमुखें प्रकट करी आपुलेंचि मूढपण ६९
अंजननिभ केश तसे होऊनि शिरा तुरंगपतिपुच्छीं ॥
ऐसें कपट शिकवितां ते स्वमतीं घालिती न मन तुच्छीं ७०
त्यांसि ह्मणे, जनमेजय- सत्रांत जळाल, तों तथास्तु तिला
विधिहि ह्मणे, करि करितां पूर्ण स्वमहामनोरथा स्तुतिला
विधि कश्यपासि सांगे जगदहितभुजंगशाप मज रुचला ॥
खेद तुवां न करावा होणारासारिखा तिला सुचला ७२ ॥
प्रातःकाळीं कद्रू विनता लंघूनि जलधिला खपथें ॥
गेल्या अश्व पहाया दासीपण करूनियां पुन्हा शपथें ७३
जातां विनता अश्वीं कद्रूक्त कालवालता पाहे ॥
पावे वल्ली भरितां जेंवि विपें आलवालतापा हे ॥ ७४ ॥

---

१ काळे केश (शेंपटाचे)ज्याचे तो. २उच्चैःश्रव्याला. ३काजळा सारखे ४ जगाचे शत्रु सर्प त्यांस दिलेला शाप. ५ अळें.

हयपुच्छवर्ण फिरवुनि ऐसा कपटें करूनि लटिक पण ॥
कद्रूनें आत्मोचित विनतेसि दिलें बळेंचि बटिकपण ७५॥
तेव्हां विनते मागें झाला उत्पन्न गरुड पावकसा ॥
त्रस्त सुर ह्मणति अग्ने, आटोपीं स्वोग्रतेज पाव कसा ७६
अग्नि ह्मणे तो विनता- सुत गरुड खगेंद्र, जाणतां अरुणा॥
तदनुज तो साधु तुह्मां देवांवरि करिल सर्वदा करुणा ७७
सुर-मुनि दुरूनि विनता- पुत्राला मग करूनियां प्रणती ॥
स्तवुनि यथामति जोडुनि कर जगदभयार्थ सौम्य हो, ह्मणती
होउनि सौम्यतनु गरुड त्यांसि ह्मणे म्यां स्वतेज आवरिलें
सोडावें तें तुमच्या हृदयानें न समजोनि ज्यां वरिलें ७९ ॥
देतां अभय असें ते वंदुनि गेले तया सकरुणातें ॥
सिंधुपरतटा गेला पृष्ठीं वाहोनि गरुड अरुणातें ॥ ८० ॥
पूर्वोदधि-परपारीं गरुडें नेऊनि ठेविला अरुण ॥
रवि जैं झाला होता करवाया विश्वभस्म निष्करुण ८१
रविचा क्षोभ असा कीं सूचविला सुर-हितार्थ जो अरि तो
राहु स्ववध करविला ह्मणउनि पीडा सुदुःसहा करितो ८२
सर्व उदासीनपणें पाहति आह्मांसि देउनी भरिला ॥
प्राशाया अमृताला आपण सिद्ध न सहावया अरिला ८३

---

१ अग्नीसारखा. २ आपलें प्रखर तेज. ३ जगास अभय देण्या. करितां. ४ ज्या भयाला. ५ पूर्वसमुद्राचे परतीरास. ६ करण्यास (स्वार्थीरूप.)

या क्षोभें अस्ताप्रति गेल्यावरि सर्व लोक तापउनी ॥
बहु विकळ करी रात्रौ ग्रीष्मींच्याही तसा न ताप उनीं८४
कथिति महर्षि सुरांला ताप नुगवतांहि देतसे अर्क ॥
भस्म करिल जगत्रय उदयानंतर असा दिसे तर्क ॥ ८५ ॥
सुर ह्मणति चला जाऊं कळवूं विधिला तसेंचि मग करिती
सूर्याभिप्राय कथुनि विधि सांगे युक्ति जी तिला वरिती८६
भानुपुढें अरुणाचें स्थापन गरुडासि सांगवुनि करवी ॥
पात्र अकाळत्रिंजग- न्नाशाऽपयशासि होय तो न रवी॥८७॥
जलनिधिच्या परपारीं गेला माते समीप मग पक्षी ॥
आधिमलिन मुख न तिचें नतिचें भाजन पदांबुजचि लक्षी
दासी होउनि कद्रू- चरणयुगीं सर्वदा असे विनता ॥
कपटाजिता दक्षसुता खगपति-माता महासती विनता॥८९॥
तीतें दे ताप सदा सर्वांगीं जेंवि वाढली दद्रू ॥
एके समयीं सांगे न्याया द्वीपांतरासि ते कद्रू ॥ ९०
घे स्कंधीं कद्रूला विनता नागांसि गरुडही वाहे ॥
तेजस्वी परिमातृ- स्नेहें स्वातिक्रमासि तो साहे ॥ ९१ ॥
नागांसि रामणीय- द्वीपा नेतां नभःपथें पक्षी ॥
सूर्या-समोरचि उडे व्याळांची विकळता न तो लक्षी ९२

---

१ प्रलयकाळ नसतां भलत्याच वेळीं त्रैलोक्याच्या नाशानें येणारें अपयश. २ मनोव्यथेनें निस्तेजस्क. ३ नमस्कार. ४ नम्र. ५ खरूज. ६ आपल्या अमर्यादेस. ७ राम्णीयनामक बेट. ८ आकाशमार्गें.

तेव्हां इंद्रासि ह्मणे कद्रू जोडोनियां स्वकर पावें॥
इंद्राहि वृष्टि करीं कीं अहिकुळ तीव्रातपें न तापावें ॥ ९३
गेली द्वीपा समुता कद्रू तें स्थान जेंवि नाकवन ॥
दे सुख त्यांला जैसें साधूचें सर्व-सज्जना कवन ॥ ९४
गरुडाला अहि ह्मणती याहुनि ही स्थळ असेल जें रम्य
तेथें आह्मां नेई सामर्थ्यें तुज खगा असे गम्य ॥ ९५ ॥
गरुड ह्मणे मातेला ऐकावें पन्नगोक्त म्यां कां गे ॥
अश्रुमुखी ती विनता पुत्राला सर्व वृत्तही सांगे॥ ९६ ॥
नागांला गरुड पुसे उक्त कराया असेंचि उद्युक्त ॥
सांगा तुमच्या दास्या- पासुन होईन मी कसा मुक्त ९७॥
अहि ह्मणाति अमृत जरि तूं आणुनि देशील मुक्त होशील
नाहीं तरि तुजसह तव माता हें दास्य नित्य सोशील॥ ९८
तें मान्य करुनि सांगे मातेला मग ह्मणे न कुत्सां हें ॥
भुजयुग पावो, जातों अमृतानयनार्थ आजि उत्साहें ॥ ९९
परि भक्षावें काय क्षुद्बाधा दारुणा वदें युक्ति ॥
तनु-मति-सामर्थ्यातें कारण सर्वांसि पाहिजे भुक्ति १०० ॥
विनता ह्मणे पयोनिर्धि-कुक्षींत निषाद फार आहेत ॥
ते खा, आणुनि अमृत क्षिप्र करीं मुक्त,पुरावें हा हेत १०१

१ प्रखर तापानें २ नंदनवन. ३ सर्पवचन. ४ कुटाळी. ५ अमृत आणण्यास. ६ शरीर व बुद्धि यांस शक्ति येण्यास. ७ भोजन. ८ समुद्रा जवळच्या प्रदेशांत. ९ कोळी.

ब्राह्मण मात्र न खावा　तद्घातें होय आपुला घात ॥
दहन रवि शस्त्र विष तो[1]　जोडावे त्यासि सुमतिनें हात ॥
चिह्न पुसासि तरि कंठीं　जाळील तयावरूनि वळखावा ॥
विप्र करूनि निराळा　त्वां सर्व निषाद-लोक खळ खावा
तव पक्षांतें मारुत　पक्ष्मांतें चंद्र सूर्य रक्षोत ॥
वह्नि[2] शिरातें, तनुतें　वसु, वत्सा विघ्न तुज न लक्षोत॥४॥
आशीर्वादें सुखवुनि　आज्ञा दे पादपंकजीं विनता ॥
मग तो तैसेंचि करी　वदली होती सती जशी विनता ५।
वृंदावनीं अजगरें　मोहुनि गिळिले निषाद सर्व तसे ॥
जठरानळांत झाले　भस्म प्रळयानळांत पर्वतसे ॥ १०६ ॥
तेव्हां गरुडें पसरुनि　मुख गिळिले बहुसहस्र ते कोळी ॥
तेव्हां कंठीं एक　ब्राह्मण अंगार[2]-राशिसा पोळी ॥ १०७॥
त्याला खग नीघ ह्मणे　पारि न निघे विप्र तो विषादी[3], तें
मरण तसें मान्य करी　मग सोडी तत्प्रियानिषादीतें[4] ८ ॥
भक्षुनि निषादांतें　वंदी जाऊनि कश्यपास मग ॥
आशीः[5] कुशल-प्रश्नें　तातें केला प्रसन्नचित्त खग ॥ ९ ॥
वृत्त कथुनि गरुड ह्मणे　आलों ताता, त्वदंघ्रि देखाया ॥
अमृत-हरणासि जातों　क्षुत्परिहारार्थ अन्न दे खाया॥१०

---

१ तो ब्राह्मण दहन इ. वस्तुरूप होय. २ अग्नि. ३ दुःखी.
४ त्याची आवडती निषादस्त्री. ५ आशीर्वाद

कश्यप ह्मणे सुता, या कासारीं कूर्मराज जो राहे ॥
तो उन्नत त्रियोजन दश योजन- मंडल स्वयें आहे ॥ ११
गजहि वनीं एक असे सागोंवें उच्च, आयतांहि बारा ॥
ते भक्षावे, म्यां हा तुज वत्सा अंडजा, दिल्हा चारा॥१२॥
गज सुप्रतीक-नामा मुनि, जो कच्छप विभावसू तो, ते॥
झाले असे स्वशापें धनलोभें अनुज अग्रजांनि होते ॥१३
अद्यापि पूर्व वैरें कलह करिति उठाते त्या गजीं कूर्मी॥
दृक्पात- वात- योगें क्रोधविषाऽब्धींत तापकर ऊर्मी॥१४
आशीर्वाद निरोपाहि दे, मग खगपति तसेंचि करि तो घे॥
एकेंचि नखें कच्छप गजही एकेंचि उचलिले दोघे ॥१५॥
करि- कच्छप-धर खगवर तो जाय उडोनि मेरुच्या शिखरीं
आश्रय द्याया भ्याली त्याचीं गुरु-तरु-वनेंहि त्यासि खरीं१६
आश्रय वृक्षन देती, कांपति, मग खग ह्मणे करूं कैसें ॥
तों एक वट वदे ये मच्छाखेवरि खगेश्वरा बैसें ॥ १७ ॥
शतचर्म-तंतुमाजि न मायांची आणि लांब शत गांवें ॥
भंगे वसतांचि तिचें त्या गुरुभारें स्वधैर्य नतगावें ॥ १८॥
पाहे जों शाखेला तोंचि तिच्या आश्रयें अधस्तुडें ॥
श्रीवालखिल्य-वृंदें लोंवत होतीं तपोऽग्निचीं कुंडें ॥ १९ ॥

---

१ तलाव. २ सहा योजनें. ३ लांब. ४ विभावसु व सुप्रतीक हे दोघे बंधु परस्परांच्या शापानें कांसव आणि हत्ती झाले होते. ५ ज्येष्ठभ्राता ७ दर्शनरूप वाऱ्यानें. ८ लहरी. ९ हत्ती व कांसव धरणारा. १० शंभर सबंध कातड्यांचे बारीक तंतु एकापुढें एक जोडून होणाऱ्या वादीमध्यें. ११ रहावयाची. १२ अधोमुख.

नाश न पावावीं तीं [१]दिव्यतपःश्री-विलासिनीसदनें ॥
ह्मणउनि पडतांचि धरी शाखेला [२]वैनतेय तो वदनें ॥ २०
गज-कच्छप-शाखाधर गरुड उडाला नभीं बहु भ्रमला ॥
मुन्यवनाधिभरेंचि न शाखादिभरें करोनि तो श्रमला २१॥
मग गंधमादनाप्रति जातां पाहे पिता ह्मणे बा, हें ॥
साहस नकरीं, तुजला भस्म न मुनिवर करोत, ये, राहें॥ २२
मार्थुनि ह्मणे मुनींप्रति मजवरति दया करूनि हे शाखा ॥
सोडा, सद्यश जोडा, व्यसनीं विनता-प्रजा तुह्मी राखा २३
ते मुनि त्या शाखेला सोडुनि गेले हिमालया, मग ती ॥
तातकथित-विजननगीं गरुडें त्यजितांचि कांपली जगती ॥
ज्यावरि शाखा त्यजिली त्याचि नगाशिरीं बसोनियां पक्षी
त्या स्वचरण-नखर-शिखर- लग्न-द्विप-कच्छपांसि तो भक्षी
भोजन करुनि उडे तो अमृत हरायासि तेधवां झाले ॥
भूकंपाद्युत्पात त्रिदशमहेंद्रादि सर्वही भ्याले ॥ २६ ॥
उत्पात-बीज पुसतां हरिसि गुरु ह्मणे करीं स्मरण, मागें ॥
वदले त्वां स्वबळमदें अपमानित वालखिल्य ते रागें ॥ २७
पूर्वी करीत होता पुत्रार्थी कश्यप स्वयें यजन ॥
साहित्य देत होते सुरऋषि गंधर्व सर्व भव्य जन ॥ २८ ॥

---

१ उत्तम तपस्यारूपी लक्ष्मी हीच विलास करणारी स्त्री तिर्चीं मंदिरें ( ऋषि. ) २ विनतापुत्र गरुड. ३ ऋषिरक्षणाच्या चिंतेचा भार. ४ कश्यपावर. ५ कश्यपानें सांगितलेल्या निर्जन पर्वतावर. ६ पायाच्या नखांच्या टोंकांस लागलेले हती व कांसव यांस.

मराठी ग्रंथ संग्रहालय

समिधांचा गिरिसम गुरु भुजलीलेकरुनि आणितां भार ॥
मार्गांत वालखिल्याहि तुज येतां भेटले निराहार ॥ २९ ॥
अंगुष्ठोदर-मित-वपु ते एक पलाशवृंतिका वाटे ॥
आणित असतां श्रमले होते, गोष्पदांहि सिंधु ज्यां वाटे॥३०
त्या गोष्पदांत पडतां बुडतां श्रमतां तयांसि पाहोनी ॥
तूं हासलासि, नाहीं झालासि सहाय जवळि राहोनी॥३१
त्या अपमानें चित्तीं कोपातें धरुनि, यज्ञ ते धन्य ॥
करिते झाले, स्वतपें, निर्माया इंद्र तुजहुनी अन्य ॥ ३२॥
कामगम कामरूप स्वाधिकबळ इंद्र निर्मितलि मुनी ॥
कारितील पदच्युत मज हें त्या स्वपित्यासि कळविलें नमुनी॥
त्यांप्रति कश्यप वदला मुनिहो स्वतपें नवी जगद्रचना ॥
शक्याचि तुह्मां असे, परि विधिच्या मिथ्या करूंनये वचना
मिथ्या संकल्प नसो तुमचाहि, करा खगेंद्रं, विभ्रम या ॥
हरिचें वदन पहा, हो वारा याच्या तुह्मी सुविप्र भया॥३५
ते सुप्रसन्न होउनि वदले ऐसें प्रजापते साधो ॥
तरि हा त्वत्पुत्र असो त्वत्संकल्पितहि या फळें साधो॥३६ ॥
तो विनता-कुक्ष्युद्भव काश्यपि पक्षींद्र गरुड बळशाली ॥
जातां अमृत हराया उत्पातोत्पात्ति तद्भयें झाली ॥ ३७ ॥

१. आंगठ्या एवढ्या शरीराचे. २ पानाचा देंठ. ३ गाईच्या पावलांतील पाणी. ४ इच्छानुरूप गमन करणारे. ५ इच्छेप्रमाणें रूप घेणारे. ६ कश्यपास. ७ खगेंद्र ( गरुड ) उत्पन्न करा. ह्म० तुमचा संकल्प मिथ्या होणार नाहीं. ८ निस्तेजस्क (वदन.) ९ हे कश्यप १० गरुड. ११ तुझी पुत्रकामना. १२ आमच्या तपःसिद्धी या फळानें. १३ कुक्षीपासून झालेला. १४ कश्यपाचा. पुत्र.

हें ऐकुनि इंद्र ह्मणे सुर हो पक्षी हरो न सोमातें ॥
रक्षा खगकृतपरिभव- नूत्नमषीलेप हा नसो मातें ॥ ३८ ॥
झाले सिद्ध सुर सकळ नेले अमृतासमीप अशनिकरें ॥
ह्मणति करावाचि सुधा- हरणेच्छु विहंग काळवश निकरें ३९।
सो तेथें गेला तों खगपतिचूडामहामरीचिमणी ॥
भ्याली त्यासि सुरचमू श्येनाचें जेंवि भय धरी चिमणी॥४०
नखपक्षतुंडपातें बहुमूर्च्छित होय विश्वकर्मा तें ॥
वर्णावें किति त्याच्या वाखाणी फार विश्व कर्मातें ॥ ४१॥
उडवूनि पक्षपवनें धूळि करी अंध देवसेनांतें ॥
जें धैर्य मनीं होतें, वीरांला पाठि दे वसेना तें ॥ ४२ ॥
शक्रें पवनाकरवीं रज वारविताचि देवकटकीं हीं ॥
बहु शस्त्रवृष्टि केल्या परि नाटोपेचि पक्षिभट कांहीं ॥ ४३ ॥
मग गगनग खग त्यांतें जर्जर करि पक्षतुंडनखरांनीं ॥
सुरकटकीं तो तैसा जैसा प्रज्वलित वायुसख रानीं ॥ ४४ ॥
पळवुनि सुर सकळ वधुनि अश्वक्रंदादि यक्ष नव धरणी ॥
रंगविली, सर्वांचा केला तेणें द्रवोनि न वध रणीं ॥ ४५ ॥
कोटाचे होय अनळ जें जाय हरायासि गरुड सोमातें ॥
गर्वें ह्मणे विदारूं खरनखराघातकर डसो मातें ॥ ४६ ॥

---

१ अमृताला. २ गरुडकृत पराभव हाच नवीन शाइचा डाग. ३ वज्रधर इंद्रानें. ४ अमृत हरूं इच्छिणारा. ५ मरणाधीन. ६ पक्षिश्रेष्ठाच्या शिखेवरील अतितेजस्वी रत्न-गरुड. ७ देवसेना. ८ ससाण्याचें. ९ नखें, पंख व चोंच यांच्या प्रहरानें. १० हा देवांचा शिल्पी. ११ उडवितांच १२ सैन्यांनीं. १३ वीर. १४ अग्नि. १५ अश्वक्रंद इ० यक्ष. १६ तटबंदी किल्ला.

विझवी त्यासि गरुड बहु- मुख होउनि करुनि बहुनदीपानें[1] ॥
दावावा झंझानिल- सूर्यांतें[2] गर्व बहु न दीपानें ॥ ४७ ॥
क्षुरपर्यंत[3]सुदारुण चक्र वरी भ्रमतसे, तळीं दोघे ॥
अमृतघटप[4] चक्षुर्विष[5] अहितें पाहूनि सूक्ष्म वपु तो घे॥४८
शिरला अरांतरें[6] तो वायु तसा मग अनल्प[7] रज[8] उडवी ॥
अंध करुनि ते काळ व्याळ नभरतां निमेषें[9] तो तुडवी ४९
घेउनि अमृतघट करुनि चक्राचा भंग जाय कावि, त्याचें
तेज अतुळ ह्मणति, नभीं तें मंडल लोपलेंचि सवित्याचें[10]५०
प्याला अमृत न लेशहि केवळ सदतिक्रमासि[11] तो भ्याला॥
ह्मणउनि निस्पृह[12]-जन-धन भगवान् दे भेटि त्या अलोभ्याला
विष्णु ह्मणे विहगवरा, तूं माग मला अभीष्ट वर दात्या ॥
मागे सुधेविणें अज-[13] रामरता केतुवास[14] वरदा त्या ॥ ५२॥
आपणहि ह्मणे प्रभुला मजपाशीं तूंहि इष्ट वर मागें ॥
देव ह्मणे मद्रथ[15] हो सरले[16] नाहींत शिष्ट-वर मागें ॥ ५३ ॥
स्वपराभव करुनि बळें जातां घेऊनि सोमकलश मन ॥
क्रोधासि होय वश मग ताडी वज्रें तयासि बळशमन ॥५४
विहगेंद्र ह्मणे जेणें निजतेजें सकळ अचल कांपविला ॥
दादुनि मजवर सोडुनि अपयश दिधलें रणांत कांपविला

१ अनेक नद्यांच्या प्राशनानें. २ पर्जन्ययुक्त वायु व सूर्य यांस. ३ वस्तऱ्याप्रमाणें तीक्ष्ण धारेचें. ४ अमृतकलश पिणारे. ५ दृष्टींत विष ज्यांच्या ते सर्प ६ चाकाच्या मधील अवकाशांतून. ७ पुष्कळ. ८ धूळ. ९ अल्पकाळ. १० सूर्याचें. ११ सन्मार्गाचें उल्लंघन. १२ विरक्तजन हेंच धन ज्याचें तो. १३ जरामरणरहितता. १४ ध्वजावर राहणें. १५ माझें वाहन. १६ मागें हटले नाहींत.

विप्रास्थिंचा अनादर नकरावा ह्मणुनि सोडिलें पत्र ॥
हें तुमच्या दृष्टीला हो साक्षाद् दिव्यरुचिसुधासत्र ॥ ५६
सुरपति ह्मणे सुपर्णा, सांग मला स्वबळ आयकों दे गा ॥
वरिचेवरि तें तुझिया श्रितजयद-भुजांत काय कोंदे गा॥५७
तार्क्ष्य ह्मणे आत्ममुखें न करिति आत्मप्रशंसन ज्ञानी ॥
परि कथितों संकोचें कीं हें घ्यावें मनीं न अज्ञांनीं ॥ ५८॥
सनगवनसमुद्रोद- क्षिति पक्षाग्रीं सदैव वाहेन ॥
ब्रह्मांडकंदुकें मी क्रीडेन, अशीं सहस्र साहेन ॥ ५९ ॥
शक्र ह्मणे विहगेंद्रा घे देतों तूं सुपात्र सख्यातें ॥
गरुड ह्मणे तृप्त असें मी सुरसें याचि सुरसिक-ख्यातें॥६०
इंद्र ह्मणे जरि अमृत- प्राशनवांछा नसेचि मग मातें ॥
खिन्न करूनि कशाला नेसि, नदेसी फिरोनि खगमा तें ६१
तूं देणार जयां हें ते आह्मां पीडितील, था सुरसा ॥
भलता उचित नव्हे वा, तूं पी अससी महायशा सुरसा६२
गरुड ह्मणे हें कांहीं कारण आहे ह्मणूनियां मात्र ॥
नेतों, त्वां आणावें ठेविन तेथोनि निजसुधापात्र ॥ ६३॥
वृत्रारि ह्मणे झालों त्वत्साधुत्वेंचि तुष्ट, वर माग ॥
वीश ह्मणे मज हें दे भक्षावे भ्यां समस्त खळ नाग ॥ ६४॥

---

१ दधीच नामक विप्राच्या अस्थीचा.( त्या अस्थीचें वज्र केलें होतें.)२एक पीस(वज्राच्या सन्मानाकरितां सोडिलें.)३सुंदरकांतीचें अमृतगृह. ४ सुंदर पंख ज्याचे तो गरुड. ५ आश्रितांस जय देणाऱ्या भुजांत ६ गरुड. ७ पर्वत, वनें व समुद्रोदक यांसह पृथ्वी. ८ ब्रह्मांडरूप चेंडूनें. ९सख्यरूप उत्तम रसानें.१०रसज्ञांत प्रसिद्ध (सुरस). ११ महायशस्वी. १२ देवा सारखा.

इंद्रें दिधलें ह्मणतां जाउनि संर्पारि तो ह्मणे, उक्त ॥
केलें, हें घ्या, आह्मी दास्यापासूनि जाहलों मुक्त ॥ ६५॥
घ्यां ठेविला कुशांवरि हा तुमचा अमृतघट पहा, सेवा ॥
स्नान करा,शुचि व्हा हो, उद्योगांतर मुहूर्तभरि ठेवा ॥६६
अहि गेले स्नाना तों अमृत हरुनि हरि ह्मणे, धुवा वपु न्हा
खळहो पहाल पुष्कळ निजनेत्रांतील अमृत,हें न पुन्हा॥६७
न्हाले, भूषित झाले आले त्या लेंखजीवना प्याया ॥
अन्योन्यांतें ह्मणती व्हा अजरामर, करा त्वरा, प्या, या
कलश न दिसतां सोडिति निश्वासा तळमळोनि अहिंमा या॥
हानीच्या हेतूनें समजाति ते आपुलीच अहि मायां॥ ६९
तो घात त्यांसि दुःसह सर्वस्वविनाश साहता शतदा ॥
चुकलों मुकलों स्नानें ह्मणती ते सर्प हा! हतार्श! तदा७०
लटिक वाटिक, माय न, हें कपटें दुःसह्य वैर वरचीलें ॥
खाय चरारां चावुनि उग्रत्व तसें न भैरंव रचील ॥ ७१ ॥
चुकवी कुगाते यशें उ- त्सुकंवी सन्मन,असन्मुखें सुकवी ॥
सुखवी मातेला निज- मुखंवीक्षामृतरसेंचि तो सुकवी॥७२ ॥

---

१ सर्पशत्रु. २ दर्भावर.३ दुसरा उद्योग.४उदक, पक्षीं अमृत. ५देवांचें उदक, अमृत.६ उष्ण(निश्वास.)७कपट-आपण पूर्वी विनतेशीं कपट केलें. तसें ह्या प्रसंगीं आपणांशीं गरुडानें कपट केलें. ८दुष्टा दैवा,९वरचें-आपल्या आईच्या कपटानें हें वर सांगितलेलें दुःसह्य वैर उत्पन्न झालें.यास्तव ही माय नव्हे.दुष्ट दासी आहे. असें सर्प बोलतात. १० शिवाचे भयंकरस्वरूपी आठ अवतारां पैकीं एकैक. ११. उत्सुक करी. १२ दुर्जनमुखें. १३ स्वमुखदर्शनामृतानें.

# अध्याय ५.

## सारांश.

[ १-११ ] स्वजनांचा दुष्ट सहवास तोडण्या करितां शेषाचें तप. ब्रह्मा त्यास वर देऊन पृथ्वी मस्तकावर घेण्यास सांगतो. [ १२-३६ ] सर्पांचा शापनिवारणार्थ विचार. [३७-९१]जरत्कारूची तपोनिष्ठा. परीक्षितीची कथा- तो मृगयेस गेला असतां, ध्यानस्थ शमीकमुनीस पहातो.तो ऋषीच्या कंठांत मृतसर्प घालून जातो. शमीकपुत्र शृंगी यास त्याचा मित्र कृश तें वृत्त सांगतो. शृंगीचा परीक्षितीस शाप. शमीकास त्या मुळें खेद होतो. गौरमुख शिष्यास पाठवून तो राजास शाप कळवितो. शापनिवारणार्थ राजाचे उपाय. कश्यपब्राह्मण व तक्षक यांची भेट-संवाद-प्रभाव. तक्षक कश्यपास धन देवून परत पाठवितो. तक्षक कीटकरूपानें जाऊन राजास दंश करून उडून जातो. जनमेजय राजा होतो. [ ९२-११९] जरत्कारूचा विवाह-तो स्त्रीचें कार्य संपल्यावर तिला सोडून जातो. आस्तिकजन्म.

---

**कद्रूचा ज्येष्ठ तनय शेष दुजा वासुकी महाभाग[1] ॥**
**ऐरावत कर्कोटक तक्षक कालीय बहु असे नाम ॥ १ ॥**

१ भाग्यशाली.

सर्वगुरूत्तम माता पारि तीची रीति वी नव्हे नीट ॥
ह्मणउनि शेष तप करी दुःसंगतिचा धरोनियां वीट ॥ २॥
अत्युग्र गंधमादन- गोकर्णादि-स्थळीं सदा तपतां ॥
भेटे त्यासि पितामह यमनियमांतें सुयुक्तिनें जपतां ॥ ३ ॥
वत्सा, कां उग्रतपें तापुनि लोकांसि तापविसि, बोल ॥
मद्दृष्टिवरतरिंगता शेष, न मनोरथाब्धि तुज खोल ॥ ४
शेष ह्मणे द्वेष करिति गरुडाचा न धरिती भया भ्राते ॥
दुर्मति परस्परहि अरि- सम भावुनि सर्वदा दयाभ्रा, ते॥५
जन्मांतरिंही त्यांचा संग नसावा ह्मणूनि देहातें ॥
त्यागाया तप करितों वरदा, वरदान हेंचि दे हातें ॥६ ॥
द्रुहिणे ह्मणे मी जाणें कद्रूचें आणि त्याहि सापांचें ॥
विनता-गरुड-द्वेष- प्रभृति विचेष्टित अशेष पापांचें ॥ ७ ॥
वर माग शोक नकरीं म्यां तत्परिहार योजिला आहे ॥
सन्मतिला वर देतां माझें मागें पुढें न मन पाहे ॥ ८ ॥
मज नय-निष्ठ शुचि तुझें नवनीताहूनि हृदय मउ ठावें ॥
या त्वन्मतिमधुपीनें धर्म-सरोज त्यजूनि न उठावें ॥ ९ ॥
हाचि वर मला द्यावा शेष ह्मणे विधि करी दया फार ॥
मग त्याला प्रभु सांगे निज-माथां घ्यावया धरा-भार १०॥
धरिली पृथ्वी माथां त्या पाताळीं शिरोनियां विवरें ॥

१ सर्व वडिलांत श्रेष्ठ. २ माझी दृष्टि हीच श्रेष्ठ नौका हींत बसलेल्याला. ३ मनोरथ हाच सागर. ४ कृपाघना. ५ ब्रह्मा. ६ कृत्य. ७ सर्व.

सकळयें आनंदविलें विधिच्या आज्ञेकरूनि त्या विंवरें ११
शाप्रुकिहि करी चिंता न सुचे कांहींच शापपरिहार ॥
झाला म्लान, फिरविला पुष्पांचा जेंवि वह्निवारि हार १२
वासुकिला कोणी अहि ह्मणती आह्मीं विचार हा केला॥
जनमेजयराजाच्या घ्यावें होऊनि विप्र भाकेला ॥ १३ ॥
शोवुनि त्यासि ह्मणावें भरत-कुलश्री-सु-रत्न-हारा, हो ॥
सत्यप्रतिज्ञ, राया, अहिसत्रारंभ उग्र हा राहो ॥ १४ ॥
अन्य अहि ह्मणति होऊं तन्मंत्री दाखवूनि नयपटुता ॥
पुसतां विचार आणूं तच्चित्तीं सर्प-सत्र-फळ-कटुता ॥१५॥
इतर ह्मणति सर्वज्ञ ब्राह्मण नृपहित असेल जो शिष्ट ॥
तो चावुनि मारावा भलत्या भुजगें, विचार हा इष्ट ॥१६॥
असतील तज्ज्ञ बहु तरि मारूं सर्वांसि ही करूं दंश॥
साधु ह्मणति शिव शिव! या मंत्रें वांचेल हा कसा वंश१७
एक ह्मणति घन होऊं विझवूं अनळासि सत्र-विघ्न करूं ॥
एक ह्मणति स्रुगादिक- पात्रें असतां असावधान हरूं ॥१८॥
किति ह्मणती मळमूत्रें दूषावें सर्व अन्न, तो यज्ञ ॥
मग कैसा चालेल, स्वमत असें बोलती किती अज्ञ॥१९॥

---

१ पक्षिश्रेष्ठानें. २ भरतकुलरूप लक्ष्मीच्या उत्तम रत्नांचा हार-जनमेजय. ३ नीतिनिपुणता. ४ कडूपणा. ५ राजाचें हित करणारा, ६ कोणत्या तरी. ७ स्रुगू—ज्यांत तूप इ० पदार्थ घेऊन अग्नींत टाकितात तें पात्र, ८ बेसावध.

ऋत्विज होउनि सत्रीं रायाला दक्षिणार्थ अडवावें ॥
प्रारंभींच करावा प्रत्यूह बहु च्छळूनि रडवावें ॥ २० ॥
अथवा उदकीं क्रीडा करितां राजा धरूनि आणावा ॥
बद्ध करावा हाचि स्व-श्रेयस्कर उपाय जाणावा ॥ २१ ॥
कोणी पंडितमानी अहि ह्मणति तुह्मांसि लागलें खूळ ॥
चावूं नृपासि खाणूं स्वानर्थाचें अशेष तें मूळ ॥ २२ ॥
वासुकि ह्मणे भुजग हो, तुमचा मजला विचार हा नरुचे॥
क्षुधितें कसे गिळावे कवळ गरळदूषितांतरा चरुचे ॥२३॥
गुरुलाचि शरण जावें वाटे आह्मांसि तोचि रक्षील ॥
वारील शापताप प्रभु जरि करुणे करोनि लक्षील २४
एलापत्र ह्मणे मी वदतों परिसा त्यजूनि संताप ॥
होतों तेव्हां अंकीं मातेच्या जेधवां दिला शाप ॥ २५
सुर हळहळले वदले तीक्ष्णा न स्त्री-परीस तरवारी ॥
मग ते विधिस विनविती तो त्यांचा खेद शीघ्रतर वारी२६
जवळचि तेव्हां होतों ह्मणउनि म्यां ऐकिलें तदुक्त असें ॥
मज शाप मानला हो जरि नसता मान्य वारितों नकसें२७
तीक्ष्ण जगदहित-पन्नग- वृद्धि नसावी असें मनीं होतें ॥
मद्वांच्छित स्नुषेच्या तेजें सिद्धीस पावलें हो तें ॥ २८
जे पापाचार खळ व्याळ जगत्काळ तेचि मरतील ॥
दुस्तर-शाप-व्यसनीं जे धार्मिक सदय तेचि तरतील २९

---

१ यज्ञ चालविणारे सोळा ब्राह्मणांपैकीं प्रत्येक.२ भात.

आस्तीकनामक द्विज पुत्र जरत्कारुचा तयां कवच ॥
होईल स्वस्थ असा हें माझें देवहो मृषा न वच ॥ ३०
देवांनीं श्रवण करुनि विधिची अभयप्रदा असी उक्ति॥
आस्तीक-मौक्तिकाची पुसली त्या ज्ञानसागरा शुक्ति ३१
ऐसें आइकिलें म्यां स्व जरत्कारु स्वसा तया ऋषितें॥
द्यावी जीवनकामें यत्न करावाचि सर्वथा तृषितें ३२
अभिधान समान जिचें वरिल जरत्कारु जीस ती कन्या॥
कद्रूची, वासुकिची अनुजा आहे, जगीं नसे अन्या॥ ३३
एलापत्रोक्तें ते झाले सानंद सर्व ही भोगी ॥
अमृतमथनींच ऐसा मंत्र करी वासुकी महा-योगी ३४
शापातें वासुकिनें मग डोळे करुनि अश्रुनीं बोले ॥
विधि सुरमुखें विनावितां जें एलापत्र तेंचि तो बोले ३५
अमृतमथन झाल्यावरि वासुकिनें सावधानधी भोगी ॥
आज्ञापिले कथाया होतांचि विवाह-काम तो योगी ३६
दिव्यतपस्यासंगें भुलला होता महर्षि तो कां जी ॥
स्त्रीला स्मरेल, रसिक त्यजुनि सुधा कोण सेवितो कांजी
ऐसें असतां साचा त्या व्यसनीं काळ लोटला भाज्यं ॥
जोंपर्यंत परीक्षि- न्नपति करायास लागला राज्य ३८ ॥
सा अभिमन्युकुमारें हर्षविली रक्षुनी प्रजा अवनी ॥
एका दिवशीं केला मृगया- क्रीडेस्तव प्रवेश वनीं ॥ ३९

---

१ खोटें. २ शिंप. ३ भगिनी. ४ उदक, पक्षी आयुष्य इच्छिणारा. ५ बहुत ६ पृथ्वी. ७ शापास्तव.

तेथें एक शरक्षत- हरिण पळाला ह्मणोनि त्या मार्गें ॥
लागे तो नृप ऐसें झालें होतें कधीं न त्यामागें ॥४०॥
पुनरपि विंधावा मृग ह्मणउनि तो धरुनि सज्ज धनु सरला
विंशिखा योजुनियां मग हरिणातें हरि तसाचि अनुसरला
झाला अदृश्य मृग तो स्वर्गतिंचा हेतु होय त्या रूपें ॥
केला भरीं भरूनि श्रम भोगुनि शोध काननीं भूपें ॥४२
देउनि वियोग विधिनें लुब्ध नृप भ्रमाविला तसा एणें ॥
मग विपिनीं मौन-व्रत फेनप मुनि एक देखिला तेणें ४३
नाम शमीक तयाचें जो सत्वविशुद्ध मानसा गमला ॥
त्यासि ह्मणे क्षतमृग जरि तुज आढळला असेल सांग मला४
मुनि न वदे, नृप कोपे, मग कार्मुककोटिनें मृता अहिला
घाली त्याच्या कंठीं घडला पूज्यापराध तो पहिला ४५
भावि प्रबळ, भ्रमतो सर्वेहि, बालिश असो, असो सुकवी
होणार सत्पथींही दिवशींही डोळसासिही चुकवी ४६
नृपति निज-पुरा गेला न क्षोभे मुनि न तो मनांत रुसे ॥
साधु कृतोपद्रवही प्रतिकूळ न होति ते जनां तरुसे ४७॥
त्या साधुशमीकाचा सुत नाम तया महर्षिचें शृंगी ॥
सेवी दृष्टि जयाची ब्रह्मपदाब्जा सदा जसी भृंगी ॥४८॥

---

१ सरळ- विशिख २बाण. ३ सिंह. ४ मरणाचा. ५ हरिणानें. ६ धनुष्याच्या टोंकानें. ७ मूर्ख. ८ भविष्य. ९ ज्यांस उपद्रव केला ते. १०ब्रह्मदेवाचें पदकमल.

तो स्वाश्रमासि विंधिला  वंदुनि येतां तयाप्रति सखा तें
गुरुलंघन सांगे कृश  असमंजसकर्म सन्मतिस खातें ॥४९॥
वृत्त अशेष कृशमुखें  कळतां शृंगी तदा असें शापी ॥
तक्षकदंशें सप्तम-  दिवशीं तत्काळ तो मरो पापी ॥५०॥
मग आश्रमासि येउनि  शृंगी जों तातमूर्तिला पाहे ॥
मृतसर्प कंठदेशीं  तोंवरि तैसाचि अर्पिला आहे ॥ ५१
काढुनि सर्प पित्याला  सांगे ज्या दुर्जनें असें पाप ॥
केलें, म्यां त्यासि दिला  तक्षकदंशें मरो असा शाप॥५२॥
पुत्रासि शमीक ह्मणे  सुतपस्या व्यर्थ गेलि हें काय ॥
केलें? न पावलें क्षय  कंठगतप्रेतलेलिहें काय ॥ ५३
पूज्य दशश्रोत्रियसा  अध्ययनतपःक्रतु·क्रियाहेतु ॥
राजा गुरु प्रजांचा  चोरादिव्यसनसागरीं सेतु ॥ ५४
या क्रोधदस्युतिलकें  कोण तपोधन जगीं नसे लुटिला ॥
बापा विचक्षणा, तूं, कैसा विश्वासलासि या कुटिला ॥५५
बहु हळहळोनि मुनिनें  गौरमुखच्छात्र शीघ्र पाठविला ॥
शाप नृपासि कळविला  तेणें स्व-कृतापराध आठविला५६
गुरु-लंघन-परितप्तें  भूपें तो गौरवदन बोळविला ॥
आधीं मस्तक त्याच्या  असकृत् शुचिपदरजांत लोळविला
मंत्रिमतें तोपविले  विषनाशोपायदक्ष कनकांहीं ॥
ते ह्मणति स्वस्थ असा  आह्मांहुनि शक्त तक्षक न कांहीं५८

---

१कंठांतील प्रेतरूपी सर्पानें. २ वेदवेत्त्या ब्राह्मणांसारखा. ३ य . ४ क्रोधरूप श्रेष्ठ चोर. ५ वारंवार.

शीघ्र करविला एक[1]— स्तंभप्रासाद त्यांत नृप राहे ॥
जेथें प्रवेश साऱ्या आज्ञेवांचूनि वातहि न लाहे ॥ ५९
तेथेंचि राजकार्यें करितां सा दिवस लोटले नीट ॥
आप्तोक्त[2] करी परि नृप भ्याला नाहींच तो महाधीट ६०
सप्तमदिवशीं कश्यप मुनि कोणी एक मृत्यु वाराया ॥
धांवोनि येत होता द्विजतनु तक्षकहि त्यासि माराया
दोघांसि गांठ पडतां तक्षक त्यातें पुसे अगा आर्या ॥
सांग त्वरा करुनि तूं कोठें जातोसि कोणत्या कार्या ॥ ६२
कश्यप ह्मणे परीक्षि- न्नृपतीतें आजि विप्रशापानें ॥
तक्षक डसणार, तया जातों रक्षावया प्रतापानें ॥ ६३
त्यासि ह्मणे जो तक्षक डसणार तयासि तो महाविष मी
साधो, जा मागें तूं कां पडसी संकटीं अशा विषमीं ॥ ६४
विप्र ह्मणे मद्विद्या- बळ मज ठावें तुझेंहि हरिन गर ॥
पति-कुशळें[3]-मुदित गजपुर करिन जसें नागमुक्त[4] हरिनगर[5] ६५
नाग ह्मणे जरि मद्विष- हत नृप उठवावयासि तूं शक्त ॥
म्यां चाविला करुनि तरु जीवंत स्वबळ दाखवीं व्यक्त ६६
विप्र ह्मणे हूं, तों तो स्वविषाचा दाखवी विभव डांस ॥
घेउनि तक्षक भस्मचि करि एका घन-घटानिभ वडास ६७
तो मुनि हांसोनि ह्मणे हा अद्भुत गा अहे, तुझा डांस

१ एका खांबावर वाडा. २ हितकर्त्यांचें वचन. ३ राजाचे कुशलानें आनंदित. ४ कालियसर्पानें सोडलेलें. ५ गोकुळवृंदावन. ६ मेघसमूहासारखा. ७ हे सर्पा ८ हस्तिनापूर.

क्षणाहि न मरतां झाला ऐसा भस्मत्वहेतु झाडास ॥६८॥
आतां माझें विद्या- बळ लोकीं अतुळ निर्विवाद पहा ॥
होता तसाचि करितों जरि झाला भस्मराशि पादप[1] हा ६९
ऐसें वदोनि मुनिनें तें सर्व करूनि भस्म एकवट ॥
केला जीवंत करुनि सोवारि विद्यासुधाभिषेक[2] वट ७०
आला क्षणांत अंकुर नव पत्र स्कंध[3] पल्लवहि दाट ॥
झाला वृक्ष यथास्थित मुनितेजें करुनि तोहि आहे भाट[4]॥७१॥
तक्षक ह्मणे मुने, तूं धन्य, ब्रह्माचि भाससी बापा ॥
हरिसील गरळ माझें इतरांचें ही समस्त निष्पापा ॥ ७२
जरि अससील धनार्थी तरि मजपासोनि अर्थ बरवे घे ॥
नृप तों गतायु कुशल न खंडितमूळाफळद्रुवर[5] वेंघे[6] ।७३।
दुर्वार विप्रशापें निःशेष ग्राशिलें नृदेवायु[7] ॥
तेणें करसिल काय न वृद्धि निरिंधनशिखीस[8] दे वायु॥ ७४
अयश न जोडावें त्वां क्षीणायु क्षितिप[9] निश्चयें मरतो ॥
येथूनिच पुष्कळ धन घेऊनि अमलिनयशा[10] भवान्[11] परतो ७
ध्यानें जाणूनि ह्मणे मुनि तोचि तपस्विशेखर[12] खरा हो ॥

---

१ वृक्ष. २ विद्यारूप अमृताचा अभिषेक. ३ खांद्या. ४ स्तुतिपाठक. ५ ज्याचीं मूळें तुटलीं व जोफलरहित अशा वृक्षावर. ६ चढतो. ७ राजाचें आयुष्य. ८ काष्ठरहित अग्नीस. ९ पृथ्वीपाति. १० मलिन झालें नाहीं यश ज्याचें तो. ११ तूं. (तृ.पु.स० सं) ० १२ तपस्व्यांत श्रेष्ठ.

धन घेऊनि परतला परि चित्तीं लागला खरखरा हो ७६
मग तक्षक नृपतीचें जाणुनि बहु सावधानपण सर्वी
नागांतें मुनिवेषें प्रेषी ते शिरति अलि जसे पद्मीं ७७
भेटति कपटमुनि कुशळ पुसति सबहुमान साधुता राया ॥
दावुनि फळ जळ अर्पिति वदति प्रिय मानसा घुताराया ७८
पूजुनि बोळवुनि तयां मग तो नृप विप्रदत्ततीर्थजळें
घेउनि माथां ससचिव सेवूं बैसे ऋषिप्रसादफळें ॥ ७९ ॥
शिरला होता तक्षक योगबळें ज्यांत तेंचि भूप फळ ॥
घेता झाला, वाटे मोठें सर्वां बळांत भाविबळ ॥ ८०
त्यांत नृपासि क्रामि दिसे ज्याहुनि वर्णें लहान सेंदूर॥
ज्याचें नेत्रयुग ह्मणे तिमिरा, उपमा लहा, नसें दूर ८ ॥
त्या हूस्वर्काणुक्रामिला राजा सचिवांसि दाखवी हांसे ॥
भ्रमला सुविचक्षण परि पडले कंठांत मृत्युचे फांसे ॥८२॥
सचिवांसि ह्मणे सप्तम दिन सरलें मरण युक्तिनें टळलें ॥
क्रामि कंठीं डसवावा शृंगिवचनही न पाहिजे मळलें ॥ ८३
सचिव ह्मणति बहु उत्तम न करावा शब्द साधुचा लटिका
टळलाचे समय जाया अस्ताप्रति भानुला नको घटिका
काळप्रेरितसचिवा- नुमतें नृप आपुल्या करें क्रामिला ॥
डसवी कंठीं हांसे तों तेणें कंठदेश आक्रमिला ॥ ८४
भीषणभोगें वेष्टुनि फूत्कारें कांपवूनि साग रसा ।

---

१ चुटपुट. २ ठकविण्यास. ३ दैवबळ. ४ कमी. ५ मिळीव. ६ आखूड व बारीक किड्याला. ७ भयंकर शरीरानें. ८ पर्वतसहित.

नागें कंठीं चावुनि नृप केला घटजपीत सागरसा ॥ ८६
दवकवळितनगखगसे तग सेवक काढिती न तैं पळ ते
जळते प्रासादासह नृपतिसवें जरि न तत्क्षणीं पळते ८७
मोठा वेग करुनि तो गगनपथीं मग उडोनियां जाय ॥
राय प्रासादासह होय भैंसित सर्वपुर ह्मणे हाय ॥८८॥
परलोकहित नृपाचें करुनि गुरु पुरोहितप्रधान जन ॥
कारिति जनमेजयाचें अभिषेकुनि साविधि पितृपदीं भजन ८९
बाळपणींच सुमति तो जनमेजय रंजवी प्रजा माता ॥
तात तसा पाळी, ज्यां गुरुधन सत्कार्य विप्र जामाता॥ ९०
काशिप सुवर्णधर्मा राजा जनमेजया नृपा धन्या ॥
संबंध योग्य जाणुनि देता झाला वपुष्टमा कन्या ॥ ९१
त्या काळींच ब्राह्मण– वर्य जरत्कारु सांडुनी पहिला ॥
आश्रम दुसरा सेवी धन्य करी स्वांगनाग्रजा आहिला ९२
वासुकिनें रम्य गृहीं करवुनि साहित्य सर्व वसवीला ॥
मुक्त्यर्थ उमाशंकर जाणों देवालयांत बसवीला ॥ ९३ ॥
स्त्रीस मुनि ह्मणे अप्रिय करितांचि त्याजिन तत्क्षणीं तुजला
विप्रिय सोसी विषयीं हा विषयाकारणें नसे सुजला ॥ ९४
त्या शब्दें कंपिततनु झाली झंझानिलें जसी कदली ॥
पदलीना ते साध्वी मान्य करुनि बहु वरें असें वदली ९५
भयचकितता मृगाची शुनकाची जागरूकता शिकली ॥
ती इंगितज्ञताही काकाची, ह्मणुनि सेवनीं टिकली ॥९६

१ उत्तरक्रिया. २ सत्कार्य हें गुरुधन आणि विप्र,जामाता वाटे. ३स्वस्त्रीचा ज्येष्ठ बंधु वासुकि. ४केळ. ५अगस्तीनें प्यालेला. ६पदाला नम्र झालेली. ७ भस्म.

मराठी ग्रंथ संग्रहालय

पत्नी अंतर्वत्नी[1] होतांचि ह्मणे मनांत तो जावें ॥
हा स्नेहपाश कैसा तोडावा, यासि काय योजावें ९७॥
एका समयीं स्त्रीच्या अंकीं ठेवूनि शिर निजे श्रमला ॥
साध्वीस तोच अवयव सर्वावयवांत धन्यसा गमला ९८॥
संध्यासमयावधि पति निजला नउठे ह्मणोनि ते व्यालीं
निद्राभंग कराया न करायाही सती मनीं भ्याली ॥ ९९
निद्राभंग बरा परि न बरा आवश्यकक्रियालोप ॥
करुनि विचार असा जों उठवी तों विप्र तो करी कोप१००
कां गे भुजंगमे, त्वां मजला निद्राभरांत जागविलें ॥
काय करसील अंकीं शिर ठेवुनि तुज उदंड भागविलें१०१
जातों न साहवे मज ऐसा अवमान पळहि हा कांहीं ॥
गृहसुख पुरे कळविलें शूळचि उठले शिरांत हाकांहीं १०२
अस्तासि चालिला रवि संध्याविधि अंतरेल या भावें ॥
ह्मणसी जागविलें तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें १०३
मी निजलों असतां बळ कैंचें अस्तासि जावया रविला ॥
भ्यां काय द्युतांत ख्यात स्वतपःप्रताप हारविला ॥१०४
दाटूनि दोष ठेवी तो काय किती प्रकार बोलावा ॥
स्नेहाचा निजचित्तीं लेशहि येऊं नदेचि ओलावा १०५
जातां स्त्रीस ह्मणे मी होतों सुखरूप या तुझ्या भवनीं ॥
गेल्यावरि वासुकिला सांगावें योग्य हा जन स्वत्रनीं[3] १०६
नमुनि जरत्कारु ह्मणे नसतां अपराध टाकितां दासी ॥

---

१ गर्भिणी. २ भगिनीजन. ३ उत्तम रक्षणास ४ सर्पिणी.

द्विजराज[१] तुह्मी या अप[२]- वादा कैं[३] घ्याल हर्ष चांदासी १०॥
वासुकिनें ज्या अर्थें या देहें पूजिले भव[४]चरण ॥
अजि वरद, अहो वत्सल, आहे कीं तें नसे तुह्मां स्मरण ॥
विप्र ह्मणे त्वद्गर्भी आहे गुणमणि[५]करंड कवि शिष्ट ॥
शाप[६]–व्याकुळ--मातुळ- कुळ-विपदर्णव- तरंडक विशिष्ट१०९
वासुकि पुसे अहा तो कां हो गेला मुनि स्वसे, नमनीं ॥
चुकलोंचि काय,आह्मी क्षणभरिरही स्वस्थ निः[७]स्वसे न मनीं
मुनिच्या अभयोक्तीनें झाला सानंदचित्त वासुकि, ती ॥
स्वस्थ करी विश्वातें तेथें कद्रूतनूद्भ[८]वासु किती ॥ ११
चिंतामणि पेटीला कीं जेंवि निधानकुंभ[९] सुक्षितिला ॥
कीं अमृतरस कुपीला बहु गौरव दे तिचाच कुक्षि तिला१२
स्वहितेच्छु भुजग जपती फार जरत्कारुला तसे, चुकवी
जो बोध[१०] मरण त्याच्या माते विद्येसि सर्वदा सुकवी ॥
उत्तमसमयीं झाला पुत्र तिला प्रकटतां रवि प्राची[११] ॥
जसि शोभे तसि तेणें ती भार्या फारफार विप्राची ॥१४॥

---

१ ब्राह्मणश्रेष्ठ, पक्षीं चंद्र. २ कलंकानें. ३ केव्हां. ४ आपले पाय. ५ गुणरूप रत्नांचा डबा. ६ शापानें व्याकुल जें मातुलकुळ त्याच्या दुःखरूप समुद्रास तरण्यास नौका. ७ निर्धना सारखे–मनीं क्षण भरिही स्वस्थ नव्हतों. ८ सर्पाचे प्राण. ९ रत्नादि द्रव्यानें भरलेला हांडा. १० जो बोध(तत्वज्ञान) मरण चुकवितो त्याच्या मातेला अर्थात् विद्येला सुकवि जसे जपतात तसे. ११ पूर्वदिशा.

आस्तीक नाम त्याचें ठेवुनि मानूनि लाभ लाभाचा ॥
वासुकिनें स्वप्राणां- हूनि सदा रक्षिला भला भाचा ॥१८॥

# अध्याय ६.

## सारांश.

[ १–१९ ] प्रधानां कडून परीक्षितिच्या मृत्यूची कथा जनमेजयास कळते. तक्षकाचें कौटिल्य जाणून राजास राग येतो. सर्पसत्राचा निश्चय व उद्योग.

सचिवमुखें जनमेजय परिसे साद्यंत तात-घात-कथा ॥
कोपें ह्मणे न शापीं, पापी भुजगींच तातघात कथा[१] ॥१
हा तात! मला झाली अत्यंत असह्य तापदा वार्ता ॥
हा साहवेल कवणा क्षणभरि सोसेल ताप दावार्ता[२] ॥ २
भूप आमात्यांसि ह्मणे झालें वनवृत्त तें कसें श्रवण ॥
कश्यप-तक्षक-भाषण ऐकूनि तुह्मांसि भेटला कवण ॥ ३
ह्मणति प्रधान होता काष्ठार्थी पुरुष वटनगारूढ[३] ॥
होवोनि भस्म झाला जीवंत वटासवेंचि तो गूढ ॥ ४ ॥
तेणें कथिलें देवा, जरि मध्यें प्राप्त जाहलें मरण ॥
कश्यपमुनिच्या विद्या- सामर्थ्यें त्यासि राहिलें स्मरण ॥५
सचिवांसि ह्मणे राजा जेणें बाधों दिली न हानि वडा
वांचविता ताताला तो मुनि, चित्तांत भाव हा निवडा ॥६

१ तातघात शापीं न, पापी भुजगींच कथा. २ ह्मणा. ३ वटवृक्षावर चढलेला.

मार्गांतूनि फिरविला कश्यप देऊनि धन असा मोटा ॥
आग्रह घातीं ज्याचा तो तक्षक अहि कसा नव्हे खोटा ७
तोचि भुजग कृतपातक घातक, तात कपटें खळें वधिला ॥
शृंगिक्षोभ बरा, परि नबरा त्या कुमतिच्या मनामधिला ८
प्रिय आपुलें कराया उत्तंकाचेंहि मी तया आरिला ॥
भस्म करीन कुळासह, संकल्प असा स्वमानसीं धरिला ॥९
ऋत्विक्- पुरोहितांतें भूप ह्मणे, तक्षकें जसा तात ॥
केला भस्म, तसा मी त्या दुष्टाचाहि इच्छितों घात ॥१०
होतील भस्म दहनीं पन्नग जेणें जरि प्रयोग असा ॥
अवगत असेल सांगा हो पति[1]-रिपु-कुळ-विनाश-हृष्ट रसा ११
ते ह्मणति नृपा, आहे वेदपुराणोक्त सर्पसत्र पहा ॥
कौतुक, ह्मणोत होउनि अहि पश्चात्तप्त सभय सत्रपे[2] हा ॥ १२
पारीक्षित जनमेजय नरनाथ करील सर्प-सत्रास ॥
बुध वदति तोचि तूं हो दीक्षित, होऊत सर्प सत्रासे[3] ॥१३
साहित्य नृपति करवी यज्ञायतनार्थ मोजितां भूतें[6] ॥
विप्रनिमित्तें यज्ञाऽ सिद्धि, असें भावि वर्णिलें सूतें ॥१४॥
तें परिसोनि नृप ह्मणे द्वाःस्थां या यज्ञमंदिरामाजी ॥
मज नकळतां न कोणी यावा, आज्ञा मनीं धरा माजी १५

---

१ राजाच्या शत्रूच्या कुळाच्या नाशानें आनंदित. २ लज्जायुक्त. ३हायहाय. ४(आ.प. अ.४ आ.७१पहा). ५यज्ञमंडपाकरितां. ६ भूमीतें. ८ आस्तीकविप्राच्या निमित्तानें९द्वारपाल. १०(आ.प.अ.२ आ. १३६ पहा. )१२ सभय.

# अध्याय ७.

## सारांश.

---

[ १–६ ] सर्पसत्र–व्यासादि तपोधन ऋषि जनमेजयास यज्ञदीक्षा देतात–ऋषींचें वर्णन– [ ७–६९ ] तक्षक आत्मसंरक्षणार्थ इंद्रास शरण जातो.वासुकि भयभीत होऊन आपली बहीण जरत्कारु हिचा पुत्र आस्तिक यास तें सत्र बंद करण्याकरितां पाठवितो. आस्तीक सत्रांत जाऊन राजा, यज्ञ, ऋत्विज इत्यादिकांची प्रशंसा करितो. राजा प्रसन्न होऊन सर्वऋषींच्या अनुमतानें त्यास वर देतो. सत्र बंद करावें असा तो वर मागतो. राजा वर देऊन त्याचा सत्कार करितो. आस्तीक घरीं येऊन वासुक्यादिकांस तें वृत्त सांगून आनंदित करितो.

**दीक्षा नृपासि देउनि विधिलागिं जपोनि धीर विप्र कृती॥**
**करिती सत्रारंभ व्यासादि तपोनिधी रविप्रकृती ॥ १ ॥**
**गुरुशापेंविधिकृत तदनु- मोदनसन्मंत्रमुनिवळें कुंडीं ॥**
**जैसे पतंग दीपीं पडति तसे सर्प वह्निच्या तुंडीं ॥ २ ॥**
**नानावर्ण महाबळ वृद्ध शिशु व्याळ ह्मणति हा! रडती ॥**
**पडतां कृशानुवदनीं दीन महाकाय फार आरडती ॥**

---

१कुशल २मातृशाप, ब्रह्मदेवानें त्या शापास दिलेलें अनुमोदन, उत्तम मंत्र आणि ऋषिसामर्थ्य यांच्या योगानें. ३ अग्निमुखांत.

उद्गाता कौत्समुनी, पिंगळ अध्वर्यु, त्या मखीं होता
शार्ङ्गरवऋषि ब्रह्मा, च्यवनात्मज चंडभार्गवाहि होता ४॥
मौद्गल्य देवशर्मा कोहल उद्दालक प्रमिति वत्स्य ॥ ॥
कुंडजठर काळघट श्रुतश्रवक वेदवारिनिधिमत्स्य ॥ ५ ॥
इत्यादि मुनि सदस्य व्यासहि ती अद्भुत-प्रताप सभा ॥
लोपे वैश्वानर-भा अधिक दिसे त्यामखांत तापस-भा ॥ ६
शक्रासि शरण गेला तक्षक जाणोनि त्या मखारंभा ॥
दे अभय हरिहि शरणा- गताचि सखा शर्मद,न सखा रंभा॥७
बहु भुजग भस्म होतां उरतां परिवार केवळ स्वल्प ॥
वासुकिहि विकळ होउनि सर्वांचा पातला ह्मणे कल्प ॥
भगिनीस ह्मणे वत्से, वाटे उसळोनि मीहि त्या कुंडीं ॥
सत्वर पडेन, सर्प- ग्रास करी मंत्र-दीप्तशिखि तुंडीं ॥ ९ ॥
दिग्भ्रम झाला, गेलें धैर्य बळ, भ्रमतसें महातापें ॥
मन नवळे मज जैसा गज अंकुश नवसतां महातापें ॥ १०
आह्मां रक्षील तुझा आत्मज कथिलें भविष्य हें विधिनें ॥
ह्मणुनि जरत्कारुकरीं पूर्वीं म्यां तुज समर्पिलें विधिनें ११॥
तें आज सत्य व्हावें वत्से, वत्सासि सांग, माहेर॥
व्यसनीं न बुडो, काढीं पुत्रातें बोध करुनि बाहेर ॥ १२॥
आस्तीकासि तसी तूं बहुमान्या जानकी जसी कपिला ॥

१सामवेदी ऋत्विज. २यजुर्वेदी ऋत्विज. ३तीन वेद जाणणारा ऋत्विज. ४ ऋग्वेदी ऋत्विज. ५ वेदसमुद्रांतील मत्स्य. ६ सभासद. ७ अग्निकांति. ८ (आ.प.अ०७ आ.१पहा.)९मंत्रानें प्रदीप्त झालेला अग्नि. १० अग्नीला दोन तोंडें आहेत ह्मणून "तुंडीं" असा तृतीया अनेक वचनी प्रयोग आहे. ११ महातापाशीं. १२ मारुतीला.

कीं देवहूति माता जैसी त्या सर्वमुनिवरा कपिलीं ॥ १३॥
स्वस्थ हृदय वासुकिचें करुनि जरत्कारु वृत्त सत्वर तें ॥
पुत्रासि कथी तेंव्हां अभय दिलें त्यासि त्याहि सत्वरतें॥ १४
आस्तीक ह्मणे मामा तुमचे असु या भयें न कांपावे ॥
स्वकृत -सुकृत रक्षोद्यत असतां तें संकटीं न कां पावे ॥ १५
जे मेले ते मेले, उरले रक्षील, आळस त्रात्या ॥
हरिस नसे, वरिलचि तो सर्वात्मा विश्वपाळ सत्रा त्या १६
देउनि अभय असें तो रक्षाया वासुकिप्रभृति भोगी ॥
वामन जसा बळिकडे गेला जनमेजयाकडे योगी ॥ १७ ॥
व्हावा प्रवेश ह्मणउनि मख-ऋत्विङ्नृप-सदस्य-यश वर्णी॥
साधु जरत्कारु मुनी- श्वरबाळ व्याळ-पाळ मुनि वर्णी १८
सोम वरुण प्रजापति सुरपति यम रंतिदेव शशबिंदु ॥
नृग गय अजमीढ धनद दशरथकुळदुग्धसिंधुचा इंदु ॥ १९
नृपति युधिष्ठिर भगवान् व्यास असे सुविधि-देश-समयज्ञ ॥
जे जे त्यांहीं केले मख हाही योग्य त्यांचि सम यज्ञ ॥
या सत्रींचे विप्र श्रुतिशास्त्रयशस्तपोनिधि ज्ञानी ॥
साक्षाद्वेदपुरुष हे गावे ध्यावे सदा विधिज्ञांनीं ॥ २१ ॥
भगवान्पुत्रच्छात्रां- सह वेदव्यास देव आपण ज्या ॥
सांनिध्य देतसे, निज- भाग्यें बहुमान्य भूप हा पण ज्यां २२

१ सांख्यशास्त्रकर्ता.१५( आ. प. अ. ५ आ. ३० पहा. ) २ रक्षणास उद्युक्त. ३ ईश्वरास. ४ रक्षणरूप औदार्याला. ५ ब्रह्मचारी. ६ हा चंद्रवंशांतील राजा. ७ कृष्ण. ८ इक्ष्वाकुराजाचा पुत्र. ९ राजर्षिविशेष. १० धर्मराज. ११ नियम, स्थान व काल जाणणारे. १२ अर्जुनाला, १४ रामचंद्र.

जे विधिनें तुज भजले तरलेचि भवांत वीतिहोत्रा, ते ॥
त्वां अभय ज्यासि न दिलें रक्षाया त्यासि भीति हो त्राते
राया, अपूर्व दिधला त्वां हा या हव्यवाहना भाग॥
तूं तैसाचि जसे ते खट्वांगें दिलीप भीष्म नाभाग ॥२४॥
भीष्म व्रतें, दिवाकर तेजें, प्रभुतेकरूनि तूं शक्र ॥
द्युतिनें नारायण तूं यद्यपि नाहीं तुझे करीं चक्र ॥२५॥
गुण-रत्नाकर कृष्णा- परि, धर्मविनिश्चयज्ञ तूं धर्म ॥
आश्रय वसुश्रियांचा तूं यज्ञनिधान, भूमिचें शर्म ॥ २६ ॥
तूं अस्त्रशस्त्रशास्त्र- ज्ञाता दाशरथिराम बाहुबळें ॥
और्व त्रित तेजें तूं भगीरथ पहावया अशक्य खळें ॥ २७ ॥
वीर्य सदा गुप्त तुझें जैसें वाल्मीकिचें, जितक्रोध ॥
जोडा तूंचि वसिष्ठा, न दुजा, केला उदंड म्यां शोध ॥२८॥
अस्मन्मनःप्रिया तुज या सर्वांसह सदा असो स्वस्ति ॥
त्वद्यश करो तुझ्या अरि- भटकटकासह दिगंतरीं वस्ति२९
या ऐशा सत्राचा कर्ता तूं मात्र भारता राया ॥
तूं व्यसनीं सेतु जनां वाहूनि जनाधिभार ताराया ॥ ३०॥
ऐसें करितां स्तवन प्रज्ञातेजोनिधी प्रति द्वारीं ॥
शोध करावा कवणें झाला बहुमान्य वेदविद्वारीं ॥ ३१ ॥
वय अल्प, अनल्प तपो- विद्यातेज, प्रगल्भता शब्दीं ॥

---

१ अग्नि. २ सूर्यवंशांतील अंशुमान् राजाचा पुत्र. ३दशरथाचा पणजा. ४ इक्ष्वाकूचा बंधु. ५ रत्नें व लक्ष्मी यांचा. ६ विप्रसमूहांत.

पाहोनि सर्व सादर झाले मुनि ते जसे शिखी अब्दीं॥३२॥
भूप ह्मणे बाळ दिसे परि मतिनें वृद्धसा न बाळकसा ॥
वय अल्प परि अनल्प- ज्ञान ह्मणावा असाहि बाळ कसा॥
वर द्यावासा वाटे भलत्यासि सुपात्र हें नव्हे लभ्य ॥
सांगोत श्रीव्यास- प्रभृति करुनि ऐकमत्य मज सभ्यं॥ ३४
सर्व सदस्य ह्मणति बहु- उत्तम-सत्कारयोग्य हें पात्र ॥
द्यावा वर, थांबावें परि ये तक्षकभुजंग तों मात्र ॥ ३५ ॥
आस्तीकचातकावरि तो नृप जीवनद बोळला होता ॥
तों तेंचि वदे जाणुनि मखविघ्न मनांत पोळला होता ॥ ३६
तक्षक येऊं द्यावा ऐसें ह्मणतांचि राय होत्यातें ॥
पार्थुनि ह्मणे शिखिमुखीं होमा अवकाश काय हो त्यातें॥
ऋत्विज ह्मणति नृपा,सुर- पति आहे सिद्ध शत्रुच्या अवनीं
शास्त्राधिदेवता हें सांगति हरिच्याचि तो असे भवनीं॥३८
तों लोहिताक्ष सूतहि बोले मुनि बोलिले यथार्थ नृपा ॥
कथितों पुराणमत मी कोण न शरणागतीं करील कृपा॥३९
इंद्रें स्वतातघातक पाठीशीं घातला ह्मणूनि करें ॥
कर चोळी अधरांतें चावी जनमेजय प्रभू निकरें ॥ ४० ॥
नृपतिप्रियार्थ होता मंत्रबळें तक्षकासि आकर्षी ॥
गडबडले बहु तेव्हां वासव सुर साध्य सिद्ध नाकर्षी ॥४१॥

---

१ मोर. २ मेघाविषयीं. ३ सभासद. ४ मेघ. ५ शास्त्रांच्या मुख्य देवता. ६ हा जनमेजयाच्या वेळचा पुराणवक्ता. ७ ओठांला ८ ( आ. प. अ. ७ आ. ४ पहा.) ९ स्वर्गांतील ऋषि.

शक्र बसोनि विमानीं लपवुनि अहि उत्तरीय[1]वस्त्रांत ॥
सत्रासि जाय होउनि विवश; बळ अनंत विप्र-शस्त्रांत[2] ॥४३
सर्पमखायतनोपरि गगनीं आला भयार्त मघवा हो ॥
अतुळा ऋषिकीर्ति-सुधा- तटिनी[3] तीमाजि सर्व अघ वाहो ॥
तों नृप होत्यासि ह्मणे आजुनि जरि हरि अरीस सोडीना ॥
निजभक्त[4]संततीचें करुनि हित प्रेम यशहि जोडीना ॥ ४४
तरि काय पाहतां हो दोघांसहि पावकांत होमा जी ॥
तुमच्या पदप्रसादें वांछा सफळा जगांत हो माजी ॥ ४५
ऐसी यजमानाची आज्ञा होतांचि विप्रवर होता ॥
झाला सिद्ध, तयीं त्या यज्ञाच्या उपरि वज्रधर होता॥४६
भ्याला नाहीं जो प्रभु करितां वृत्रासवेंहि भीमरणा[5] ॥
पविधर[6] कवि धरभेत्ता[7] तोही सुरराज फार भी मरणा॥४७
त्यजिला सुरपतिनें तो शरणागत तक्षक स्वपदरींचा ॥
पावेलचि भंगातें प्रभुहि जरि धरील पक्ष सदरींचा[8] ॥४८
हरि भवनासचि गेला शरणागत सोडुनी स्वहस्तींचा ॥
दवकवळितनिजकलभ[9]- त्राणीं दुर्बळचि पतिहि हस्तींचा॥
वोढोनि आणिला हो तो तक्षक मंत्रशक्तिनें जवळ ॥
आपण घे ह्मणतांचि ज्वलनें घ्यावाचि आननें कवळ॥५०
ऐसें करूनि ऋत्विज ह्मणति नृपा, जें त्वदिष्ट सत्कार्य ॥

---

१ अंगवस्त्र. २ मंत्रांत. ३ नदी. ४ आपला भक्त अर्जुन त्याची संतति. ५ भयंकर युद्ध. ६ वज्रधर. ७ पर्वतांना तोडणारा. ८ सज्जनांच्या शत्रूंचा. ९ वणव्यानें व्याप्त झालेला आपला छावा.

नें हें ह्मणेंचि बरें सत्कारीं शिशुमुनींद्र- सत्कार्य ॥ ५१ ॥
बहुधा अहि कंपित-हरि- हस्तापासोनि पावला पतन ॥
हे नाद तक्षकाचे भवदंहिता करिल कोण गा जतन ५२॥
मुदितमना नृपति ह्मणे बाळमुने, वर तुला महाकविला ॥
देतों, माग, न आह्मीं कोण्हीहि कधीं सकाम हाकविला
आस्तीक ह्मणे देवा तुमचा महिमा बहूत्तम खरा हो ॥
जरि वर देतां द्या हा न बरा अत्यंत उग्र मख राहो ॥५४
नृपति ह्मणे मणिकांचन धेनु गज ग्राम घे, न मख राहो ॥
देवी सरस्वतीच्या मजवरि तूं सुप्रसन्न मखरा, हो ॥५५॥
विप्र ह्मणे मणि कांचन धेनु नको हय नको नको हस्ती॥
ग्राम नको धाम नको मख राहो मातृकुळ असो स्वस्ती॥
ऋत्विक् सदस्य ह्मणती राया स्तुतिचा मनोज्ञ नवरा हो॥
दे वर मुनिला, त्वद्यश साधु वदान्यांत नित्य नव राहो५७
नृप लोभवीत होता जोंवरि मुनिला अनेकवरदानें ॥
सांवरिला होता अहि मुनितेजानें प्रपन्नकरदानें ॥ ५८ ॥
मग त्या आस्तीकाला भूप ह्मणे जरि नको दुजी वस्तु ॥
त्वत्सत्रमेव विरमतु ह्मणसि तरि तुझेंचि इष्ट तें अस्तु॥ ५९
विप्राचें प्रिय करितां सर्वहि ऋत्विक् सदस्य वरदा त्या॥
ह्मणति भला ब्रह्मण्यां सर्वां दात्यांत तूंचि वरदात्या॥६०॥

---

१ सत्कारास योग्य. २ तुझा शत्रु. ३ मनोहर. ४दात्यांत. ५ शरणागताला हात देणाऱ्या मुनितेजानें. ६ तुझें सत्र राहो. ७ ब्राह्मणांविषयीं चांगला.

केलें सत्र समाप्त क्षितिपतिनें विप्र तर्पिले वित्तें ॥
गौरविला आस्तीक प्रेमें मानूनि आत्मभू चित्तें ॥ ६१ ॥
जेणें विप्रनिमित्तें विघ्नित होईल मख असें भावी ॥
कथिलें होतें, नृप त्या सूतींहि महागुणज्ञता दावी ॥ ६२
व्हावें सदस्य माझ्या हयमेधीं त्वां महामनुज्ञात्या ॥
ऐसें आस्तीका नृप विनवुनि दे जावया अनुज्ञा त्या ६३
दुष्कर कर्म करुनि तो मुनि जाउनि शीघ्र मातुळावासा।
दे हर्ष घनें दिधल्या दवार्तहर्षासवें तुळावासा ॥ ६४ ॥
जीवनदानें झाला सर्वांसह सुप्रसन्न नागवर ॥
वासुकि त्या भगिनीच्या पुत्रासि ह्मणे यथेष्ट माग वर॥ ६५
आस्तीक ह्मणे माझ्या व्याख्यानीं अर्पितील जे श्रवण।
त्यांसि न लेशहि द्यावें भय, व्हावें सर्वदा तुह्मी प्रवण॥६६
पन्नग ह्मणति दिला वर बापा, त्वच्चरितनामगात्याचा ।
घात करील अही जो मूर्धा शतधा उलेल गा, त्याचा॥६७
ऐसा आस्तीक मुनि व्याळांचा शाप मृत्यु वारूनी ॥
तप करुनि वंश ठेवुनि गेला मोक्षासि भक्त तारूनी॥६८॥
सौति ह्मणे हे शौनक मुनिवर्या, सुमतिकीर्तिसदनानें ॥
रुरुला अशी प्रमतिनें पूर्वी कथिली कथा स्ववदनानें॥ ६९

१ ब्रह्मदेव. २ (आ. प. अ. ७ आ. ३९ पहा.) ३ मनुस्मृति जाणणारा. ४ निरोप. ५ मामाचें घर. ६ वणव्यानें पीडित झालेल्या प्राण्यास मेघानें दिलेल्या हर्षा बराबर तुलना करण्यासारखा हर्ष. ७ नम्र. ८ फुटेल. ९ सुबुद्धि आणि सुकीर्ति यांचें घर अशा प्रमतीनें.

# अध्याय ८.

## सारांश.

---

[ १–६ ] शौनक व सूत यांचीं प्रश्नोत्तरें [ ७–२७ ] चेदि-
शांत पुरुवंशोत्पन्न वसुनामक राजा ( उपरिचर ) उग्र तप करितो.
त्यास इंद्र प्रजापालना विषयीं आज्ञा करून एक पुष्पमाला, एक
वेणुयष्टि ( वेळूची काठी ) व स्फटिकविमान देतो. त्याच्या नगरा
जवळील कोलाहलपर्वत, श्रुतिमति नदीचा बलात्कारानें उपभोग
घेतो. राजा त्या पर्वतावर लत्ताप्रहार करितो. ती नदी, पर्वता
पासून तिला झालेलीं, कन्या ( गिरिका ) व पुत्र अशीं दोन अपत्यें
घेऊन बाहेर येते. तीं मुलें ती राजास देते. राजा मुलास सेनापति,
व कन्येस स्वस्त्री करितो. तो मृगयेस वनांत गेला असतां वनश्री पाहून
स्वस्त्रीविषयीं कामातुर होतो. त्याचें वीर्य स्खलित होतें. तें द्रोणांत
घालून तो श्येनपक्ष्या बराबर स्वस्त्रीकडे पाठवितो. मार्गांत त्या पक्ष्यास
दुसरा श्येन भेटून त्यांचें युद्ध होऊन तें वीर्य यमुनेंत पडतें. तेथें एक
मत्स्यी ( अद्रिका नामक अप्सरा ) तें प्राशन करिते. ती मत्स्यी
कोळ्याच्या जाळ्यांत सांपडते. तिच्या पोटांत एक पुत्र व एक
कन्या अशीं सांपडतात. कोळी तीं मुलें राजास देतात. राजा,
मुलास ठेवून घेऊन, कन्या ( सत्यवती ) कोळ्यास देतो [ २८–४६ ]
सत्यवती यमुनेंत आपल्या बापाचें नौका चालविण्याचें काम करिते.
वसिष्ठाचा पुत्र जो शक्ति त्याचा पुत्र पराशर यमुनातीरीं येतो. तो

सत्यवतीस पाहून मोहित होतो. त्यापासून तीस पुत्र ( व्यास ) होतो. [ ४७–६९ ] रामकृष्ण, भीष्म इत्यादिकांची उत्पत्ति.

शौनक सौतीस ह्मणे   सत्रीं कर्मांतरीं[1] कथा व्यासें ॥
कथिल्या नृपा, तशा त्या   वाटे आह्मां तुवां कथाव्यासें ॥
सौति ह्मणे परिसा जी   कथनीं आहे मलाहि हव्यास ॥
सांगेन तेंचि वदला   नृपतिप्रति जें सुखावह व्यास ॥ २ ॥
व्यासासि ह्मणे राजा   संतति संरक्षिली[2] तुवां कुरुची ॥
क्षय-हेतुविरोधाची[3]   उठली तीच्या मनांत कां कुरुची ॥ ३
कौरव पांडव बंधू   वैर कसें त्यांत वाढलें अजि तें ॥
सांगा न वारिलें त्वां   प्रभुनें कां त्याहि ईश्वरें अजितें[4] ॥ ४
श्रीव्यासें सच्छात्रा   श्रीवैशंपायना दिली आज्ञा ॥
पूर्वज-कथा कथावी   राया जनमेजया तुवां भाज्ञा ॥ ५ ॥
सांगे वैशंपायन   संक्षेपें प्रथम सर्वही पारि तें ॥
तृप्ति नदे ह्मणुनि पुन्हा   सांगे रायासि विस्तरें चरितें ॥ ६ ॥
उपरिचर-वसुकथा जी   मुनिगीता आयका कवी हो ती ॥
हेचि सुधा तुळितां तरि   बहु बोलों काय काकवी होती ॥ ७
पुरुवंशज वसु पूर्वी   उग्रतप करी, प्रजावन[5] त्यागी ॥
त्यासि हरि[6] ह्मणे तुज भू-   त्राणचि हित, हे नव्हे असत्या गी[7]

१ हवनकर्म झाल्यावर जो रिकामा वेळ राहतो त्या वेळांत. २ विचित्रवीर्याच्या स्त्रियांस व्यासानें पुत्र ( पंडु धृतराष्ट्र ) देऊन वंश रक्षिला. ३ क्षयास कारण अशा वैराची. ४ श्रीकृष्णानें. ५ प्रजांचें रक्षण. ६ इंद्र. ७ वाणी.

सुरमुनि तसेंचि ह्मणती मग वसु तें मान्य कारि, तया माळा
यष्टि स्फटिकविमानहि दे शक्र सख्या स्वचेदिभूपाळा ॥ ९
तो हरिदत्तविमानीं हरिसा साजे ह्मणोनियां भणती ॥
करुनि उपरिचर वसुतें प्रेमें गंधर्व अप्सरा ह्मणती ॥ १० ॥
होती नदी श्रुतिमती त्याच्या नगरासमीप जी तीतें ॥
रोधुनि बळेंचि कोला- हलनग भोगी त्यजूनि नीतीतें। ११
तटिनीस सोडवाया बळसिंधु नृपति जसें विटा मत्ता ॥
त्या कोलाहलगिरिला हाणी अशनी जसी तसी लत्ता१२
पादाघातें पडलें विवर तयांतूनि ती निघोनि नृपा ॥
अर्पुनि नगजसुतसुता मजवरि केली ह्मणे उदंड कृपा१३॥
सेनापति करुनि तिचा सुत वसुनें तत्सुताहि गिरिकेला ॥
स्त्रीत्वें वरूनि विधिनें श्वशुरत्वें तोहि धन्य गिरि केला१४
गिरिकेच्या ऋतुकाळीं केली आज्ञा स्वयेंचि पितरांनीं ॥
मृगयार्थ ह्मणुनि गेला संपादाया तदीय हित रानीं ॥
तें वन चैत्ररथोपम खवळी कामासि ह्मणुनि गिरिकेला
वसुनृप चिंती मदनें वश तो तत्काळ धैर्यगिरि केला ॥ १६
चित्तांत चिंतितांचि स्त्रीसंगसुखासि शुक्रपात घडे ॥
पत्रपुटीं धरुनि वसु क्षितिपति पळमात्र संकटांत पडे॥१७
वीर्य अमोघ व्यर्थ न जावें ऐसा विचार आठविला ॥
तें स्त्रीस द्यावयाला मग खग नगरासि शीघ्र पाठविला१८

---

१ वेळूची काठी. २ जाराला. ३वज्र. ४ चैत्ररथ कुबेराचें वन. ५ द्रोण. ६ तत्सुता याबद्दल “ तत्सुते ” बरें.

पत्रपुट धरुनि तुंडीं  श्येन उडे त्यासि धांवतां अडवी ॥
आमिषशंकित अन्य  श्येन नभीं, दैव अन्यथा घडवी॥१९
ते श्येन तुंडयुद्धीं  जेव्हां खपथीं प्रवर्तले दोघे ॥
तेव्हां पादनखांनीं  पत्रपुटातें धरूनि खग तो घे ॥ २० ॥
तें वसुवीर्य गळालें  श्येनाचें चित्त गुंततां युद्धीं ॥
पडलें दैवनियोगें  श्रीमद्भास्करसुतोदकीं शुद्धीं ॥ २१ ॥
त्यातें मत्स्यी प्राशी  ते तैसी अद्रिकाप्सरा शापें ॥
विधिच्या झाली होती  आपण संपादिल्या तशा पापें२२
शापांतहि वसुवीर्यें प्रसवेल अपत्ययुग तिच्या,विधिनें ॥
केला होता निश्चय  पूर्वीं शापोनिही दयानिधिनें ॥२३॥
वसुवीर्य सेविल्यावरि  मास दहावा भरे अशा काळीं॥
सांपडली दाशांला  ती त्या यमुनेंत टाकिल्या जाळीं॥२४
चिरितां अपत्ययुग दे  मुक्ता-युग उकलितां जसी शुक्ति ॥
तत्काळ अद्रिका त्या  शापापासोनि पावली मुक्ति॥ २५॥
ते त्या उपरिचराला  आश्चर्यें दाश दाविती बाळें ॥
कन्या दाशांसि दिल्ही  सुत आपण घेतला धरापाळें २६
तो मत्स्यनाम राजा,  जी दाशपतीसि वोपिली कन्या॥
ती सत्यवती, धीवर-  सदनीं जी वाढली सती धन्या ॥२७
त्या कन्येच्या देहीं  मीनाचा गंध येत होता तें ॥
परि वपु निरुपम, रक्षी  यमुनातीरीं स्वतात-पोतातें ॥२८
त्यावरि ज्याच्या जन्में  होय वसिष्ठ स्वयें परमहर्षी ॥

---

१ ससाणा. २ मांस. ३ आकाशमार्गीं. ४ यमुनोदकांत. ५ कोळ्यांला. ६ होडी.

तीर्थाटन-प्रसंगें तेथें आला पराशर महर्षी ॥ २९ ॥
वंदुनि सत्यवतीनें बैसविला निजतरींत उतराया ॥
झाला प्रसन्न विनयें निरुपमरूपेंहि शक्तिसुत राया ॥३०॥
दिव्यज्ञान मुनि ह्मणे सुंदरि, मज अंगसंग दे, हरितें ॥
त्वद्रूप मन्मनातें, कामज्वर नुरवि तिळहि देह रितें ॥३१॥
ती त्यासि ह्मणे दोहीं तीरीं सर्वत्र विप्र आहेत ॥
दिवसा अशा प्रकाशीं तुमचा कैसा घडेल हा हेत ॥ ३२
करि अंधकार तेथें निर्मुनि तो योगिराज नीहार ॥
त्यावरुनि मनिं ह्मणे ती दुर्लभतर होय हा जनीं हार ३३
विनवुनि ती त्यासि ह्मणे गुरुजन देती वरासि कन्या, या॥
मार्गासि लंघितां मी प्रभुजी, होईन पात्र अन्याया ॥३४॥
तो मुनि हासोनि ह्मणे स्वपराच्या दूषणासि कवि टाळी ॥
हूं ह्मण, माग वर सुमुखि, कोणासहि साधुसंग न विटाळी३५
हाही दुर्गंध नसो ऐसा वर मागतांचि दे, हातें ॥
स्पर्श करुनि, करि विप्र क्षिप्र तिच्या दिव्यगंध देहातें ३६
योग्यत्व अंगसंगीं आलें कुदशा त्यजूनि तनु सरली ॥
योजनगंधा मुनिला जसि गंगा शंकरासि अनुसरली ॥३७
सद्‌यमुनिनें भवाध्व- श्रांताचें दुःख हरिलें रे, तें ॥
नच उरलें सुक्षेत्रीं कल्पद्रुमबीज पेरिलें रेतें ॥ ३८
वाटे सांडुनि जातां गर्भवती निरविलीच यमुनेतें ॥
वदली असेल तेंही विसरातें स्ववरदान न मुने, तें ॥३९॥

---

१ वसिष्ठपुत्र शक्ति त्याचा पुत्र पराशर. २ चार कोशपर्यंत जिच्या अंगाचा सुवास ती. ३ प्रपंचमार्गांत श्रमलेला. ४स्वाधीन केली. ५ धुकें.

यमुनाद्वीपीं झाली तत्काळ सुखप्रसूति सुतपातें ॥
हालों न दे, पहातां करि कौतुक शक्तिपुत्र सुतपा तें॥४०॥
प्रसवे, कन्याभाव न मळला, पळ लागलें न सुटकेला ॥
सत्यवतीकुक्षीनें लज्जित सद्रत्न-शुक्ति--पुट केला ॥ ४१ ॥
तो उपजतांचि झाला प्रौढ, मुनि स्वजननीस करि नमन
तीस ह्मणे येतों मी स्मरतां भेटोनि हृष्ट करिन मन॥४२॥
द्वीप अयन आश्रय त्या मुनिासि उपजतां, ह्मणुनि कवि त्यातें
द्वैपायन ह्मणति नृपा, अज्ञानमहातमिस्रसवित्यातें ॥४३॥
होतिल बहु कलिमलिन प्राज्ञजन न पावतील भव्यास ॥
यास्तव करी चतुर्धा वेदविभागांसि, ह्मणुनि तो व्यास४४
ऐसा भगवान् व्यास ब्राह्मणरूपें मुकुंद अवतरला ॥
जन ज्याच्या उपदेशें निजहित जाणुनि सुखेंचि भव तरला
त्या श्रीव्यासप्रभुला वंदुनि मी भारतेतिहासरस ॥
पाजीन तुह्मां श्रोत्यां अमृतरसाहूनि फार हा सरस॥४६॥
दितिज दनुज राक्षस बहु धरुनि मनुष्यादिरूप या महिला
पीडिते अधर्मभारें धरुनि सुरद्वेष मानसीं पहिला ॥४७॥
निजभरपरिहारार्थ प्रार्थी श्रीपद्मयोनिला अवनी ॥
तो देवांसि ह्मणे जा अंशें व्हा सिद्ध भूमिच्या अवनीं॥४८॥
इंद्रें विष्णु विनविला झाला वसुदेवपुत्र तो अंशें ॥
ज्याच्या उदयें लोकीं वरिलें सद्यश सुधांशुच्या वंशें॥४९॥
बळदेव शेष झाला, यादव देवांश, भीष्म वस्वंश ॥

---

१ यमुनाप्रवाहांतील एका बेटांत. २ उत्तम तप ज्याचें तो. ३ स्थान ४ अज्ञानरूप महान् अंधकाराचा सूर्य,. व्यास. ५ सुख. ६ ब्रह्मदेव ७ चंद्र ८ वसुनामक देवांचा अंश.

जेणें निजप्रतापें कुरुचा नाहीं बुडों दिल्हा वंश ॥ ५० ॥
मांडव्याच्या शापें झाला यमधर्म शूद्रयोनिजनी ॥
कुरुच्या वंशीं तेजें भीष्म विदुर हींच दिव्य दोनि जनीं ५१
सूर्यांशें कुंत्युदरीं कर्ण उपजला, तसाचि जो द्रोण ॥
तो अंश बृहस्पतिचा तैसा होता सुविद्यजन कोण ॥ ५२॥
तो रुद्रकाळकाम- क्रोधांशोत्पन्न भूमिपा, जाण ॥
जो द्रोणाचार्याचा अश्वत्थामा वहिश्वर प्राण ॥ ५३ ॥
रुद्रगणांशोद्भव कृप शकुनि नृपा, द्वापरांश विख्यात ॥
मरुदंशज कृतवर्मा द्रुपदाहि, शैनेय तोहि तज्जात ॥ ५४ ॥
गंधर्वपतिअरिष्टा- नंदन नामेंकरूनि जो हंस ॥
तो धृतराष्ट्र, सुयोधन कळि, केला ज्या खळें कुलध्वंस॥५५
दुर्योधनानुजन्मे पौलस्त्यं, तयां न साधु मानावें ॥
विस्तरभयें तयांचीं मी सांगेनाचि सर्वथा नावें ॥ ५६ ॥
पहिला दुर्योधननृप तदनुज दुःशासनाख्य तो दुसरा ॥
दुःसह दुःशल ऐसे शत झाले मकर कुरुकुळा सुसरा॥५७॥
वैश्यापुत्र युयुत्सु स्तुत्य शतां वेगळाचि तो त्यांत ॥
जैसें गुणें अधिक गज- मौक्तिक एकचि अनेकमोत्यांत ५८
अत्र्यंशं पांडुराजा त्याच्या दोघी सुलक्षणा भार्या ॥

---

१ शूद्रजातींत जन्म ज्याचें तो. २ महादेव व काळ यांच्या कामक्रोधांच्या अंशानें झालेला. ३ शरीराबाहेर फिरणारा प्राण. ४ मूर्तिमान् द्वापरयुगाचा अंश. ५ मरुद्गणाच्या अंशापासून झालेला. ६ सात्यकि. ७ दुर्योधनाचे भाऊ. ८ रावणादि राक्षस ९ उत्तम सरोवराला. १० अत्रिऋषि अंश.

त्यां सिद्धि–धृती कुंती माद्री झाल्या सुरांचिया कार्या ५९
त्यांच्या ठायीं झाले जे कुरुचा भूषवावया वंश ॥
सुत पांच धर्म-मारुतें- हरि- दस्रांचे प्रसिद्ध ते अंश ॥६०॥
शच्यंश द्रुपदसुता झाली, साध्वीजनीं जिची अर्चा ॥
कृष्णानुजोदरजजो अभिमन्यु सुधांशुपुत्र तो वर्चा ॥६१ ॥
कुरुगुरुशिरोऽबुजातें जो धृष्टद्युम्न धराने असि खंडी॥
तो अग्न्यंश नृपाळा, राक्षस तो,सुर मनुष्य न,शिखंडी६२
प्रतिविंध्य युधिष्ठिरसुत सुतसोम वृकोदरात्मज ख्यात ॥
श्रुतकीर्तिशतानीक- श्रुतसेनांचे क्रमें तिघे तात ॥ ६३ ॥
हे पांच द्रुपदसुता- कुक्ष्युद्भव अंश विश्वदेवांचे ॥
अवतरले अंश असे बहु सुखवायासि विश्व देवांचे ॥ ६४॥
जो विप्रचित्ति दानव तोचि जरासंधनृप महासत्व ॥
शिशुपाळ हिरण्यकशिपु, कंसाहि तो काळनेमि,हें तत्व ६५

---

१ अष्टसिद्धी पैकीं एक. २ तेरा मातृकांपैकीं एक. ३ वायु. ४ इंद्राणीचा अंश. ५ पतिव्रताजनांत. ६ पूजा. ७ कृष्णाची धाकटी बहीण सुभद्रा तिचे उदरांत झालेला. ८ बुध-ग्रह. ९ द्रोणाचे शिरःकमलास. १० खड्ग. ११ अग्नीचा अंश. १२ भीमपुत्र. १३ अर्जुन, नकुळ, सहदेव. १४ द्रौपदीच्या कुशीपासून झालेले.

# अध्याय. ९

## सारांश.

[ १–६ ] श्रीविष्णूपासून सूर्यचंद्रवंशांची उत्पत्ति. [ ७—६७ ] कचोपाख्यान— देवदैत्यांच्या युद्धांत मृत झालेल्या दैत्ययोद्ध्यांस संजीविनी विद्येच्या बळानें दैत्यगुरु शुक्राचार्य जीवंत करी. पण देवगुरु बृहस्पतीस ती विद्या माहीत नसल्या मुळें देवांचें फार नुकसान होत असे. पुढें देवांनीं. गुरुपुत्र कच यास शुक्राकडे संजीविनी विद्या साध्य करण्या करितां पाठविलें. कच ती विद्या साध्य करून शुक्राचार्यांची आज्ञा घेऊन परत येत असतां देवयानी त्यास आपला अंगीकार करण्या विषयीं प्रार्थिते तो तें अमान्य करितो. परस्परांस परस्परांचा शाप.

जनमेजयनृपति पुसे वैशंपायन कथी सविस्तर तें ॥
बहु, मी लेशंचि गातों, जग लेशेंही महर्यशें तरतें ॥१॥
श्रीकांत-नाभिपद्मीं प्रकटे विधि विश्वसर्जनीं दक्ष ॥
तद्दक्षांगुष्ठोद्भव विख्याततयशा प्रजापती दक्ष ॥ २ ॥

---

१ अल्प. २ थोरांचें चरित्र. ३ जगाची उत्पत्ति. ४ त्याच्या दक्षिणांगुष्ठापासून झालेले. ५ प्रसिद्ध कीर्ति ज्याची तो.

त्याची कन्या अदिती कश्यपभार्या महासती ज्येष्ठा ॥
तीचा पुत्र विवस्वा न्वैवस्वत ह्मणति तत्सुता श्रेष्ठा ॥ ३ ॥
त्या वैवस्वतमनुची सोमात्मजबुधवधू इला तनुजा ॥
तीचा पुरूरवा सुत पुर प्रतिष्ठान दे स्वयें मनु जा ॥ ४ ॥
तत्सुत आयु, तयाचा नहुष, तदात्मज ययाति जो अरिला
यमसम समरीं झाला शुक्रसुतेनें स्वयेंचि जो वरिला ॥ ५ ॥
झाला ययाति कविंचा जामाता तीच सत्कथा परिसा ॥
या चरितामृतपानें या लोकीं सर्व रसिक हो हरिसा ॥ ६ ॥
देवाचार्य बृहस्पति, कवि असुराचार्य, हे जगन्मान्य
शिष्याभिमान धरुनि स्पर्धा करिती सदा जसे अहित ॥ ७ ॥
देवांच्याही जे जे भट होती संगरांत असु-रहित ॥
संजीविनीबळें त्यां उठवि, करी काव्य नित्य असुर-हित ८
ती विद्या सुरगुरुला अवगत नव्हती ह्मणूनि समरांत ॥
बहु मरती तें पाहुनि न टिके उत्साह धैर्य अमरांत ॥ ९ ॥
ती विद्या साधाया देवांनीं सद्विचार आठविला ॥
शुक्राकडे स्वगुरुसुत कच विनवुनि कथुनि युक्ति पाठविला
शिष्यत्वें जाउनि कच सांगे गुरुदास्यकाम पद नमुनी ॥
प्रणतीं शत्रुसुतींही द्रवला तो सुप्रसन्नवदन मुनी ॥ ११ ॥

---

१ मनु. २ चंद्रपुत्रबुध याची स्त्री. ३ कन्या. ४ सोमवंशांतील राजाची राजधानी ही प्रयागाजवळ आहे. ५ देवयानीनें ६ शुक्राचा. ७ इंद्रासारखा. ८ जगांत मान्य. ९ युद्धांत. १० मृत. ११ मृताला सजीव करण्याची विद्या तिच्या बळानें: १२ शुक्र. १३ गुरुसेवेची इच्छा.

आराधिला कचें गुरु गुरुची कन्याहि देवयानी ती ॥
झाली प्रसन्न सत्वर, शिकविति तैशीच देव या नीती १२
असुर ह्मणति विद्येनें प्रबळ करायास देव या नीचें ॥
मन मोहिलें गुरूचें गुरुचित्ताहूनि देवयानीचें ॥ १३ ॥
गुरुगोरक्षण करितां देवद्वेषें करूनि असुरांनीं ॥
कचमांस मृगांसि दिलें वांटुनि भक्षावयासि असु रांनीं १४
गाई गृहासि आल्या मावळला रविहि कच न आढळला ॥
तेव्हां सोडुनि धृतिनग शुक्रसुताबुद्धिभूमिला ढळला ॥ १५ ॥
शुक्रसुता गहिंवरली न्हाणी तदुरःस्थलासि अश्रु तिचें ॥
कवणाला न प्रिय तें गुणमणिमय केलिमंदिर श्रुतिचें १६
तातासि ह्मणे आला नाहीं अद्यापि कच नसे अवधी ॥
लवं धीर बुद्धि न धरी माझी, ताता, सुनिष्ठुरा तव धी १७
येता मघांचि असता जरि कुशली, करिती खळ अघां, वरवी
शांति न दिसेचि कचाची, कुशलिजनविरह असा न घाबरवी
कच आजि न येतां मी प्राण त्यागीन न भरतां घटिका
आण तुझी जाण खरें केला निश्चय नव्हेचि हा लटिका १९
काव्य ह्मणे धीर धरीं आहे संजीविनीसुधाधारा ॥
उठवूनि आणितों कच चिंतुनि विश्वंभरा बुधाधारां ॥ २० ॥

---

१ श्वापदांला. २ असु वांटुनि ह्म० देहापासून प्राण वेगळे करून. ३ धैर्यरूप पर्वत. ४ देवयानीची बुद्धि ही-च भूमि तिला. ५ अल्प. ६ खुशाल. ७ पापाला. ८ सुखरूपजन-वियोग. ९ संजीविनीरूप अमृताची धार. १० सज्जनांस आधार.

मंत्रजप करुनि तो कवि ये रे, वत्सा कचा, असें वाहे ॥
भेदुनि वृकोदरें पल सर्व निघे त्यांत लेशहि न राहे ॥२१
होता तसाचि झाला उठला, आचार्यदेव तारी, ती ॥
शक्ति तशीच निरुपमा, भिन्ना गुर्वन्यदेवतारीती ॥ २२ ॥
कच येतां वहु हर्षे, धन्य ह्मणे मीच कन्यका, मातें ॥
वांचविला त्वांचि दिला, या देइल कोण अन्य कामातें ॥
पुसतां वधवृत्त कच स्वगुरुसुतेला समस्त आयकवी ॥
प्रार्थुनि ह्मणे उगी, हा स्वस्ति असो सर्वविप्रराय कवी ॥
त्यावरि गुरुकन्योक्तें पुष्पें आणावयासि जाय वना ॥
सांपडला त्या असुरां कच, जैसा वत्स एकला यवना २५
पुनरपि त्या पापांनीं सद्विप्रकुमार चरचरां चिरिला ॥
भय नधरिलें तिळहि त्या पापाच्या जोडितां महागिरिला
खण्ड तिळप्राय करुनि नेउनि केले निमग्न जळधींत ॥
नाहींच धर्म करुणा पापभय विचार लेश खळधींत॥२७॥
जो मुनि तयासि कन्या- प्रियकाम दयाळु काव्य तो तारी
रज गोळा करुनि घडी शिष्याची मूर्ति जेंवि ओतारी ॥
पुनरपि तो कच वधिला केला तद्देह दग्ध रुष्टांनीं ॥
शुक्रासि पाजिलें हो तद्भस्म सुरारसांत दुष्टांनीं ॥ २९ ॥
कच न दिसतां रडे सुर- यानी तीतें पिता ह्मणे कां गे ॥
वत्से रडसी ऐसें पुसतां तैसेंचि ती पुन्हा सांगे ॥ ३० ॥
शुक्र ह्मणे वत्से, मी वांचवितों परि पुनः पुनः मरतो ॥

---

१ मांस. २ गुरूहून अन्य देवतांची रीति. ३ हर्ष पावे.

आग्रह करूनि ह्मणसी प्रेतगतिंगतहि कच पुन्हा परतो ३१.
त्यज शोक मत्प्रसादें तुज काय उणें मुली, नकोचि रडों
दाटुनि माथां वाहुनि दुर्वह दुःखाद्रिला नको चिरडों ३२
ती तातासि ह्मणे कच गुरुभक्त कुलीन साधुकार्यकर ॥
जरि त्यासि सोडिलें जळ, तरि जळ सोडूं मलाहि आर्यकर
ब्रह्मघ्नां शिष्यांची भीड धरूनि साधु शिष्य मोकलिला ॥
ह्मणतिल न ऐकवे तें न स्वहित करीं असें गमो कलिला
स्वमनिं ह्मणे कविसत्तम मळवावें पण्डितें न यश, हाणी॥
प्राणांचीहि बरी, परि न यशाची, सांगती नय शहाणी॥
मग मेळवी महात्मा एकत्र समस्त असुर कोपानें ॥
खवळे प्रियपुत्रभसित- मिश्रित मधुच्याहि तज्ज्ञ तो पानें॥
असुरांसि ह्मणे कां रे नेणां अद्यापि मत्तपा, मरतो ॥
कीं वांचतो पतंग न भी जो ज्वलनासि मत्त पामर तो ३७
विप्र अवध्य ह्मणे श्रुति हाणोनि तिच्याहि लात हाकेला
कचहननें सुरगुरुचा न तुह्मीं माझाचि घात हा केला ३८
ब्राह्मण कणसा खुपतो तुमच्या नेत्रीं, न सोसवे काढा॥
युक्तचि मरणाराला हितपरिणामहि, नसो सवे काढा॥३९
धिक्कारुनि असुरांतें धर्मचि तो अमृतमयवचा शिकवी ॥
बाहे करुणा-विद्या- दिव्यतपस्याबळें कचाशि कवी ४०
जों गुरु वत्स कच ह्मणुनि एहि असें तो ह्मणावया योजी॥

---

१ प्रेतगतीला पावलेला. २ दुःखपर्वताला. ३ पित्याचा हात. ४ दुष्टाला. ५ ही सवे नसो. काढा. ह्म०ही सवय तुह्मांस नसावी.या करितां ती काढून टाका. ६ अमृतयुक्त वचन ज्यांतील असा धर्म.

तों विद्यासामर्थ्ये उपजूनि गुरूदरीं ह्मणे ओ जी ॥ ४१॥
उदरप्रवेश पुसता झाला तो पुण्यराशि शुक्रमुनी ॥
सांगुनि खळकपट ह्मणे येथ वसो काळ हा शिशु क्रमुनी४२
निर्भय वसेन काळ क्रमुनि पवित्रोदरीं असाचि सुखें ॥
न हित गुरूदरदारण, निघतां मज निंदितील साधुमुखें४३
शुक्र ह्मणे वत्से, कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर ॥
हा तरलाचि परि तुझें या कुव्यसनीं बुडेल माहेर ॥ ४४॥
सुरयानी त्यासि ह्मणे वदतां हें अशुभ काय हो तात ॥
व्हावे दोघेहि मला चिंतामणि हेचि पाय होतात ॥ ४५
तारुनि शिष्यासि तरो गुरु ह्मणत्यें पात्र कन्यकाऽन्या या
नोहे वरासि, वरदा, जाणासि तूं सुज्ञनायका न्याया॥ ४६
भीड सुतेची भारी विद्या संजीविनी कचा शिकवी ॥
गुरुलाहि वांचवाया योग्य करी सज्जना कचाशि कवी४७
गुरुकुक्षि विदारुनि कच बाहेर निघे परंतु बहु तो भी ॥
उठवुनि गुरु संकोचें नमुनि रडे कुलजकीर्तिचा लोभी४८॥
गुरुदक्षिणाविधीतें कच गुरुचा आप्त विद्यमान धनें ॥
देहें साधी, धन्यचि केला निज आप्तविद्य मानधनें ॥४९
कचघातकासुरांतें सुरयानीचा स्वयें जनक दापी ॥
कीं जो ब्रह्मद्वेष्टा कुशल न पावेल तो जन कदापी ॥ ५०
समजा बरें जसा मी विप्र गुरु तसाचि हा कच, पळाला
ब्रह्मांडांतुनि जरि रिपु, वधिन न देतांचि हाक चपळाला५१

---

१ गुरूचें पोट फाडणें. २ निजशिष्य आप्तविद्य व धन्यचि केला ३ मान हेंच धन ज्याचें तो शुक्राचार्य.

असुरांसि करुनि शिक्षा वाहु उभारुनि ह्मणे अहो कानीं
घ्यावें माझें हितकर मर्यादावचन साधुलोकांनीं ॥ ५२
जो विप्र आजिपासुनि मद्यप्राशन करील तो पापी ॥
ब्रह्मघ्नासम निश्चित असि मर्यादा स्वयें कवि स्थापी॥५३
वर्षें सहस्र होता कच गुरुसेवेंत मग तया भाज्ञा ॥
शुक्रें बहुसंतोषें दिधली जाया पित्याकडे आज्ञा ॥ ५४
कच सिद्ध होय जों तों शुक्रसुता सा मनोहरा उचिता
स्वकरग्रहार्थ विनवी बहु आवडली सुविद्यता शुचिता५५
जें गुरुचें तेंचि तिशीं पूज्यत्वाचें धरूनि कच नातें ॥
ठेवूनि दृष्टि धर्मीं तो न तिच्या मान्य होय वचनातें ५६
पडतां गळां ह्मणे कच भगिनीला वरुनियां न भाउ तरे
करितां अधर्म सद्यः[१] स्वपितृसुहृज्जनमुखप्रभा[२] उतरे ५७
मुख व्हावें तरि धर्मा- प्रति ह्मण, माथां वसें, नसें दूर ॥
पूजा कैंची लोकीं जरि दगड शिरीं धरी न सेंदूर ॥ ५८
धर्म अनंत असो परि तो करितां कीर्त न स्वसे वेंचे ॥
सांगें प्रकार याहुनि दुसरे कांहीं मज स्वसेवेचे ॥ ५९
ज्या उदरीं वास तुझा तेथें माझाहि हें असे नातें ॥
कैंवि करग्रहण करूं संमत धर्मासि जें असेना तें ॥ ६०
बहुदिवसांची आशा तत्काळ च्छेदितां कचें रुष्टा ॥
शुक्रसुता त्यासि ह्मणे रे कपटपटो भला भला दुष्टा ६१
ऐक कृतघ्ना जरि मी उठवाचि मदर्थ या हता शतदा ॥
ऐसें गुरुस न ह्मणत्यें कैसा उठतास तूं हताश तदा ६२

---

१ तत्काळ. २ आपले पितर व मित्र यांची मुखकांति.

मलिन कुटिल नीरस जड अजड पुनर्भवपणेंहि कच साच
धारिला शिरींहि न स्व- प्रकृतिगुण त्याजिसि नाम कच साच
न करीं विफळ मदाशा आशा भंगूनयेचि साधूंनीं ॥
जरि भंगिशील विद्या- सिद्धि नसो जीसि नेलि साधूनी ६४
कचहि ह्मणे गुरुवेदा- नुज्ञा नाहीं ह्मणोनि या कर्मा ॥
मान्य नसें, हूं शापीं, कीर्तिकराचि शाप, न चुकतां धर्मा ६५
पढवीन ज्यासि विद्या ही त्यासि फळेल, तूंहि घे शाप ॥
तुज कोणीही ऋषिसुत न वरील, फळो तुझें तुला पाप ६६
जातां स्वर्गीं मिरविति निजगुरुसुतरत्न देव यानीं तें ॥
वर्णिति दैसांतें किति, किति कावेतें, कितिक देवयानीतें ६७

# अध्याय १०

## सारांश.

---

[ १—३ ] संजीविनीविद्या साध्य झाल्यानंतर दैत्यांच्या पराभवाचा उपाय देव शोधितात. [ ४—२० ] इंद्र, दैत्यांचा राजा वृषपर्वा याच्या राज्यांत प्रवेश करितो. रम्य उपवनांतील एका सरोवरांत क्रीडा करण्याकरितां शुक्रकन्या देवयानी व वृषपर्वकन्या शर्मिष्ठा आपल्या सख्यांसह येतात व वस्त्रें कांठावर ठेवून सरोवरांत प्रवेश करितात. इंद्र वायुरूपानें तीं वस्त्रें विसकटून टाकितो. शा-

र्मिष्ठा चुकून देवयानीचें वस्त्र नेसते. त्यामुळें त्या उभयतांचा कलह होतो. देवयानीस कूपांत लोटून शर्मिष्ठा घरीं निघून जाते. [२१-२६] इतक्यांत ययातिराजा मृगया करून थकला असतां पाण्या करितां त्याच वनांत येतो. कूपांत देवयानीस पाहून तिला वरकाढून आपल्या नगरास निघून जातो. [ २७--५९ ] देवयानी रागावून तेथेंच राहते. शुक्र व वृषपर्वा तिची समजूत करितात. शर्मिष्ठा तिची दासी झाल्यावर ती परत घरीं येते. [ ६०--८२ ] पुनः देवयानी शर्मिष्ठेसह त्याच वनांत क्रीडार्थ गेली असतां येथें ययाति येतो. शुक्राज्ञेनें ययाति देवयानीस वरितो.

विद्यालाभ-मुदित सुर हरिसि ह्मणति विक्रमासि यासम या
पूर्वीं न पावलोंचि, प्रभुजी टाळूं नकाचि या समया ॥ १
आह्मां न दिसेचि दुजा सुखदायक शत्रु-नाश-सम यज्ञ
समर्यी पराक्रमातें करिते शुभयशोधनाश समयज्ञ ॥ २
वृषपर्वतडागाचा होऊं नेदी विनाश कविरोध ॥
पाडावा यांत यशः- संपज्जीवनाविनाशक विरोध ॥ ३
करुनि विचार असा हरि जेथें वृषपर्व-दैत्य-पति-राज्य ॥
त्या देशीं जाय, ह्मणे जरि मिळतें रंध्र लघुहि तें प्राज्य ४
तों रम्यवनीं शक्रें जळकेलिरता सखीयुता धन्या ॥
अवलोकिल्या कविसुता एक, दुजी सर्वदैत्यपति-कन्या ५

---

१ शुद्ध यश हेंच धन त्याची आशा करणारे. २ वृषपर्वा हेंच सरोवर. ३ शुक्राचार्य हाच बांध. ४ यश व संपत्ति हेंच उदक याचा विनाश करणारा. ५ इंद्र

विप्रा सुरवरकन्या पाहुनि हर्षे मनीं ह्मणे बलहा[1] ॥
भगवंत पावला या दोघींत प्रथम लावितों कलहा ॥
उदकीं क्रीडत होत्या त्यांचीं वस्त्रें सरस्तटीं होतीं ॥
मारुतरूपें शक्रें मिश्रित केलीं परस्परें होतीं ॥ ७
राजसुता शर्मिष्ठा जळकेलि करूनि त्या तटीं आली ॥
होती जलाशयींच श्रीमत्कवि-कन्यका तिची आली[2]
शर्मिष्ठा कविजांवर[3] नेसे झडकरि कळों न वासव[4] दे ॥
तों तीस देवयानी बोदुनि तत्परिहितात्मवास[5] वदे ॥ ८
असुरसुते मच्छिष्या होउनि मद्वस्त्र नेससी कां गे ॥
बहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप[6] हा सांगे ॥ १०
मर्यादा पाळावी, निजाशित्र गुरुचेचि पाय, रीतीतें ॥
सांडू नये ह्मणति कवि साधुपदाचीच पाथरी तीतें ॥ ११
शर्मिष्ठा तीस ह्मणे बैसावें जैं सभेंत मत्तातें ॥
त्वत्तातें व्हावें तें बंदी, तूं विसरलीस मत्ता तें ॥ १२॥
सिंहासनीं विराजे मद्गुरु, न सहस्रकरहि[7] परि सविता ॥
बैसे खालें त्वद्गुरु कवि कविता करुनि त्यासि परिसविता[8]
माझी न पाविजे त्वां मत्ताताची तुझ्या न सरि तातें ॥
जें जह्नुकन्यकेचें भाग्य न पावेल अल्पसरिता तें ॥ १४

---

१ बल दैत्यास मारणारा इंद्र. २ सखी. ३ देवयानीचें वस्त्र. ४ इंद्र. ५ तिनें नेसलेलें आपलें वस्त्र. ६ मर्यादाभंग. ७ सहस्र आहेत कर ज्याला तो सविता. ८ स्तुतिपाठक.

तों कन्या जो स्तुति- कर, याचक दान घे सदा त्याची
होती कन्या स्तव्यांची　भव्याची सर्वसेव्य दासाची ॥ १५
शाती महेंद्रनयनें　पाहुनि राजेश्वरा जया चकितें ॥
त्त्तातभाग्य कैचें　त्वत्ताता भिक्षुकासि याचिकि, तें १६
त्त्ताताची जी श्री　कीर्ति कवीला नयेचि भिक्षुकिं ती
अमृतरसाशीं व्हाया　सम माधुर्यें समर्थ इक्षु किती ॥१७॥
राजसुतेचें यश जें　तुज येइल काय गे दरिद्रे, तें ॥
हासि विकावया तूं　केशरमोल्यें कसें हरिद्रेतें ॥ १८ ॥
निर्भर्त्सना करी बहु　संपादी द्वेष पाप, गाढे कली ॥
करुनि कविजेसि कूपीं,　ती कोपाची महाऽऽपगा ढकली
मेलीच असें मानुनि　शर्मिष्ठा आपुल्या घरा गेली ॥
कूपीं कविजा होती　जैसी नागी मनांत रागेली ॥ २०
तों मृगयाश्रांत तृषित　तोयार्थ ययाति तेथ एकाकी. ॥
आला शर्मिष्ठा ज्या　कूपीं त्या देवयानिला टाकी ॥ २१
कूपीं पाहे सहसा　सत्कन्यारत्न तो ययाती तें ॥
कोणाची कोण असें　मंजु पुसे करुनियां दया तीतें २२
सांगे तज्जा मी, कवि　ह्मणति द्विजनायका ययाते ज्या ॥
नरवर ह्मणे प्रसवला तो भगवान् काव्य काय या तेजा २३
कविजा ह्मणे नरेंद्रा　स्वतपें तुझिया यशींहि तुज जाणें ॥
मज दक्ष करीं धरुनी वर घेउनि करुनि धन्य भुज जाणें२४

---

१ स्तुतीस योग्य. २ हे भिकारड्ये. ३ अत्यंत. ४ तंटा ५ मोठी नदी. ६ त्याची कन्या. ७ उदारा. ८ हस्ताचे ठायीं.

क्षुधितापुढें सुधेची पात्री दैवेंचि वाढिली वारेती ॥
झाली मनें, गुरुभुजें दक्षिणकर धरुनि काढिली वरि ती२५
भूप ह्मणे धिक् चित्तीं क्षत्रां[1] विप्रात्मजा न सेव्या ही ॥
तीहि ह्मणे नहुषेतर कविला चित्तीं जनीं नसे व्याही२६
नृप गेला, मग आली शोधाया घूर्णिका तिला आंगें ॥
जा सांग पित्याला क्यां त्यजिलें वृषपर्वपुर असें सांगें२७
वृत्त कथुनि कविसि ह्मणे ती निष्ठुरता पहा निरोपाची॥
छाया कराचि न करी अतिनिष्ठुर ताप हानि रोपाची२८
भेटोनि तितिक्षेचे[2] गुण सांगे साधु बाप तनयेतें ॥
कीं कोपाच्या संगें स्वविभागा[3] सर्वथा पतन येतें ॥ २९
शर्मिष्ठोक्त पित्यातें कथुनि ह्मणे तूं असाचि अससील॥
सोसुनि अपमान सुखें वाटे या दुर्जनांत वससील ॥ ३०॥
शुक्र ह्मणे विधि वदला मजला तूं विश्वसृष्टिपति[4], तनये,॥
स्वमुखें काय वदों मज पाहों तो शरण केंवि पतित नये
अज्ञ मुलें कलह करिति न वदावें तेंचि बोलती स्वैर ॥
तें चित्तांत धरुनियां प्राज्ञें पुरुषें करूं नये वैर ॥ ३२ ॥
सुरयानी गुरुसि ह्मणे वा नेणति थोरथोर कात्रे ज्यातें ॥
धर्माचें तत्व वरें जाणतसे हे सुबुद्धि कविजा तें ॥ ३३ ॥
धर्माऽधर्म-बळाऽबळ- वार्ता तों दुर्लभाचि अन्या या ॥
कन्या या पायांची जाणे न्याया तथैव अन्याया ॥ ३४
त्यांत पळहि न वसावें ज्यांत दुरितभीति[5] धर्म नय नाहीं॥

---

१ क्षत्रियाला. २ क्षमेचे. ३ आपल्या वांट्याला. ४ संपूर्ण सृष्टीचा मालक. ५ पापभय. ६ दाई.

गुणचरमुखें सुखें अव- लोकावीं खळमुखें न नयनांहीं॥३५
दुर्जन-सहवास सदा तापद हा काय नरक सामान्य ॥
होईल यासि दाटुनि मानधन प्राज्ञ नर कसा मान्य॥३६॥
वृषपर्व्यासि ह्मणे कवि मी विप्राचि कीं अविप्र, मत्तनया ॥
पीडावी हरिसि हंसति वाटे सोडुनि अविं प्रमत्त नया ३७
त्यजितों तुला अतिक्रम साहे ऐसा नव्हें पुरोधा मी ॥
वृत्यर्थ तापसा मज शाक पुरो वा नवा पुरो धामीं॥३८॥
असुरपति ह्मणे स्वामी आहें मी सर्वथैव अपराधी ॥
पहिली एकाचि असो या दास जनीं नसोचि अपरा धी ३९
जरि सिंधु जीवनाचीं क्षणहि न दे करुनियां दया दानें ॥
तरि वांचावें कैसें रक्षावे वा स्वयाद यादानें ॥ ४० ॥
त्यजितां मरेल हा जन न प्रभु-वर लाविला मळा सुकवी
स्वयशा अकृपत्वाच्या सहसा लागों न दे मळा सुकवी ४१
काव्य ह्मणे मी जातों व्यसनांत तुह्मी तरा बुडा लोलं ॥
आतां सुर येतील क्षिप्र पळाहो मला नसे बोल ॥ ४२ ॥
तुमचें प्रिय कन्येचें अप्रिय मज हा न दोष करवेल ॥
लावाल शत सुरांचे अर्जिरीं पारि ते न तोषकर वेल ४३
वृषपर्वा नमुनि ह्मणे श्रीचा माझाहि नाथ तूं देवा ॥
हो सुप्रसन्न आह्मां दासां पासूनि घे सदा सेवा ॥ ४४
शुक्र ह्मणे जरि ह्मणसी स्वश्रीचा आपुलाहि नाथ मला ॥

---

१ मेंढा. २ उपाध्याय. ३ उपजिविके करितां ४ मासे. ५ चंचळ ६ अंगणांत.

तरि कन्याचि मदात्मा प्रार्थूनि करा प्रसन्न जो अमल॥४५
राजा ह्मणे बहु बरें मग सुरयानीकडे तयासहित ॥
जाय कवि तदुक्त कथी जें तीस तया कृताश्रयास[1] हित॥ ४६
परिसुनि तातोक्ति ह्मणे ह्मणतो तुज आत्मवित्तनाथ मुखें ॥
राजा मज माग ह्मणो मग मी मागेन इष्ट काम सुखें॥४७॥
राजा ह्मणे गुरुसुते देतों जें मागशील तें नसुनी ॥
आह्मां तूं तसि पूज्या पूज्य जसा हा तपोनिधान मुनी४८
कविदुहिता त्यासि ह्मणे दश-शत-कन्या-युता तुझी तनया॥
शर्मिष्ठा मद्दासी व्हावी, कामासि इच्छितें मन या ॥ ४९॥
यावें मजसह मत्पति- सद्नासि त्यजुनि भाउ दासीनें ॥
दास्य करावें भावें न असावें मानसें उदासीनें ॥ ५० ॥
राजा धात्रीस ह्मणे हेंचि शिव, तुझीच आण, जागे हा॥
श्रीगुरु अस्मत्त्राणीं, कन्येला शीघ्र आण, जा गेहा ॥५१
धात्रीनें समजावुनि कथितां कन्येसि पितृमुखाज्ञा ती ॥
शिबिकेंत बसोनि निघे कीं पात्र असोत जयसुखा ज्ञाती॥
गुरुतनयेसि ह्मणे तुज देईल तुझा जयासि बा, धार्मी ॥
त्याच्याहि तुझी दासी येतें न गणूनि दास्य-बाधा मी५३
स्मित करुनि देवयानी राजवधूगल्ल व्हावया बोले ॥
टोले[2] शर्मिष्ठेच्या माथां हाणावया असें बोले ॥ ५४
मज्जनक तव पित्याचा बंदि स्थिति रीति हे असी,गाई[3]॥
घेतो याचक, माझी दासी होसील तूं कसी गाई ॥ ५५॥
शर्मिष्ठा उत्तर दे जी बहु आग्रह करील अज्ञा ती ॥

१ आपला आश्रय ज्यानें केला आहे तो. २अगाई. ३ दाई.

कुलजेनें व्यसनकरीं प्राणहि द्यावे परंतु न ज्ञाती ५६
सुरयानी गुरुसि ह्मणे विद्या-तेजें विवेकविज्ञानें ॥
बापा, सत्य निवालें निववूनि जना निवे कवि ज्ञानें ५७
चाला आला चित्ता आतां मुनिनायका पुरांवास ॥
वास तुझ्याचे यशाचा मधुर असा काय कापुरा वास॥५८
जाय पुरीं उत्सव दे मुनिशिष्या जेंवि अर्क राजीवा॥
वांटी मधुरा आंशी कवि,वृषपर्वाहि शर्करा जीवा ॥ ५९॥
त्यावरि एका समयीं त्याच वनीं शुक्रकन्यका गेली
संगीं सहस्र दासी शर्मिष्ठा काननीं करी केली ॥ ६० ॥
तेथें मृगानुसारी आला राजा ययातिहि तसाच
पूर्वीं जेणें केलें कूपोद्धारेंकरोनि हित साच ॥ ६१ ॥
दासी-सहस्र-मध्य- स्थित कन्या-द्वय विलोकुनी रुचिर
नरपति निववी नयनें तल्लावण्यामृतह्रदीं सुचिर ॥६२ ॥
पुसतां नृपें हराया निजमधुरोक्तें तदीय खेदासी ॥
सांगे मी शुक्रसुता माझी असुरेंद्रजाहे हे दासी ॥ ६३॥
राजसुता त्वद्दासी हें कैसें नृप पुसे ह्मणे कविजा ॥
पुससी काय जग असे वश कर्मा हस्त जोडिती कवि ज्या
त्यांहि कथावें मज निज कुळ नाम असें सती अकुत्सं वदे॥
नृप आपणहि तिला तें स्वमुखें सांगोनि फार उत्सव दे॥ ६

१ नगरीं राहणें. २ कमळाला. ३ हरिणाच्या मागें लागलेला ४ सहस्त्र दासींच्या मध्यें बसलेलें. ५ त्यांचें सौंदर्य हेंच अमृत, त्याचा डोह. ६ दैत्यपतिकन्या. ७ निंदारहित.

शशिकुलज नहुषसुत जन हा, नाम ययाति, येथ तोया मी॥
आलों मृगानुसारें आपृच्छे त्वां, तदहमितो यामि ॥६६ ॥
त्यासि ह्मणे सुरयानी परम मनोहर तुझें जगीं यश गा॥
सत्य सखा भर्ता हो झालें तुज मी मनोरमा वशगा॥ ६७॥
हे शर्मिष्ठा दासी दासी विंशतिशतेंहि कन्या या ॥
अंगिकारावें मज जाणतो तू धर्मपाळक न्याया ॥ ६८ ॥
नृपति ह्मणे सिंधूसि त्यजुनि दया करुनिही नदी नातें॥
लावील सरासीं तरि तें हित त्या शक्तिहीन-दीनातें॥ ६९॥
तुज व्हावें पात्र असीं कैचीं पुण्यें सहाय या तितुकीं ॥
विप्र-वरसुते क्षत्रिय उतरेल तुझ्या न हा ययाति तुकीं ॥
ब्रह्म-क्षत्र-विमिश्रित- तत्त्वें तूंही ऋषीच सन्महित ॥
वर्णाऽऽश्रमधर्माच्या अवनें लोकीं तुझेंचि जन्म हित॥७१ ॥
त्यांतहि मीच असें तुज ह्मणत्यें, नाहींच तुजकडे दोष ॥
मजवरि गुरुचा प्रेमा बहुतचि नकरील लेश तो रोष॥७२॥
शिवलासि मत्करा तूं शिवतां अन्याय या तिजा, माता
स्त्री, गुरु कीं तूं, साजे कविसि न अन्या ययाति जामाता७३
धरिला करीं कुलीनें जो तो त्या होय योग्य अत्यागा ॥

---

१ चंद्रकुळांत उत्पन्न झालेला. २ विचारितों. ३ तुला ४ नंतर मी येथून. ५ जातों. ६स्वाधीन. ७ वीसशें- दोनहजार.८ तुलनेस ९ ब्राह्मण व क्षत्रिय यांचे मिश्र झालेल्या वीर्यानें. चंद्रपुत्र बुध हा ब्राह्मण. यास क्षत्रियकन्या इला दिली होती. (आ. प. अ.९आ. ४ व ५ पहा.) १० नटाकण्यास.

कर सोडिसी कसा हा धर्मज्ञा न करितांहि असागा ७४
नृपति ह्मणे मज तुजही मान्य तुझा गुरु करील आज्ञा ते
वृष्टीभाते चातकसे करितांति गुरूक्तिलाचि आ ज्ञाते ७५
जेव्हां असा निजाशय नृपरत्नानें वधूसि जाणविला॥
धात्री धाउनि कळवुनि वृत्त, पिता सा वनांत आणविला ७६
कविनें येतांचि दिली पादप्रणता नृपासि रुचिराशी ॥
धर्माऽलोपवरासह मग विधिनें निजसुताहि रुचिराशीं ७७
बहु सत्कारुनि मुनिनें वृषपर्व्यानेंहि भूप बोळविला ॥
असकृन्नरूपें प्रयाणीं गुरु-पादरजांत मुकुट लोळविला ॥
गेला पुरासि घेउनि वसवूनि मनुष्यदेव यानीं तें ॥
श्रीतें पद्म तसें वर- सद्म सुखद होय देवयानीतें ॥ ७९ ॥
बहुपुण्यवंत रमतो जैसा सानंद देवलोकवनीं ॥
स्त्रीरत्नीं बहु रमला नृप सरसीं रसिक काय तो कवनीं ८०
सदनीं करी ययाती जे कांहीं सुखविलास तीसहित ॥
रायें स्वात्मा तैसा जेंवि हरें सुखविला सतीसहित ॥ ८१॥
कविजासुत यदु पहिला याचें गुरुलोचना मना तुंड ॥
निववी शशिबिंब जसें कारे कविचें मुदित धाम नातुंड ॥८२

१ अपराध. २ पायाचे ठायीं नम्र झालेला. ३ सुंदर आशीर्वाद. ४ धर्माचा लोप होणार नाहीं अशा वरासह ५ तेजःपुंज. ६ पतिगृह. ७नंदनवनांत. ८ पार्वतीसहित. ९वडिलांचे नेत्रांस.

# अध्याय. ११

## सारांश.

[ १--१६ ] पतिपुत्रसुखाच्या अभावा मुळें शर्मिष्ठा दुःखी होते. एका उपवनांत ययातीची व तिची गांठ पडते. राजा गांधर्वविधानें तिला वरितो. तिला त्या पासून पुत्र ( द्रुह्यु )होतो. [ १७--२४ ] देवयानीला तें वृत्त समजल्यावर ती रागावून शर्मिष्ठेला त्या बद्दल विचारिते. ऋषीपासून आपणास पुत्र झाला असें सांगून शर्मिष्ठा तिची समजूत करिते. [ २७--४९ ] अनु व पूरु शर्मिष्ठेचे पुत्र. यदु व तुर्वसु देवयानीचे पुत्र. [ २७--४९ ] नंतर एक दिवशीं देवयानी त्याच वनांत राजाबरोबर गेली असतां शर्मिष्ठेच्या पुत्रांस पाहते.देवयानीला ते राजाचेच असें समजतें.त्यामुळें ती रागावून शुक्राकडे जाते व झालेलें वृत्त त्यास कळविते [ ५०--६३] शुक्र राजास"जराग्रस्त होशील"असा शाप देतो.राजाच्या प्रार्थनेवरून"ज्याला जरा देशील त्याला जाईल"असा उच्छाप देतो. माझ्या पुत्रांपैकीं "जो जरा घेईल तो राजा होवो " असा ययाति वर मागतो. शुक्र तो वर मान्य करितो. [ ६४--७३ ) पांच पुत्रां पैकीं चौघांनीं नाकबूल केल्यावर पूरु जरेचा स्वीकार करितो त्याच्या तारुण्यानें राजा एक सहस्र वर्षें धर्मार्थकाम ह्या पुरुषार्थांचें सेवन करितो. नंतर पूरूला राज्याभिषेक करून आपली जरा घेऊन वनास जातो. [ ७४--८६ ] उग्र तपस्या करून तो स्वर्गास जातो. आत्मस्तुतीमुळें स्वर्गापासून भ्रष्ट होतो.इंद्राच्या वरानें त्यास सत्समागम घडतो. तेणें करून त्याचा उद्धार होतो.

होय ऋतुमती जेव्हां शर्मिष्ठा व्याकुळा वराधीनें ॥
चित्तीं ह्मणे सहावें किति दुःख कलेवरें पराधीनें ॥ १
प्रियतम सहाय नसतां यौवनहननें करोनि जो शीण ॥
तद्गणनीं कुंठितमति होईल सरस्वतीहि जोशीण ॥ २
शिशु पाळण्यांत घालुनि हालवितां निजवितां सुखें जो जो
धात्री ह्मणति, सखीला अमृतरसचि तो निघे मुखें जोजो
काय करूं एकांतीं जरि होती भेटि वाटतें मतिला ॥
विनवुनि वरितें पुत्र- प्राप्त्यर्थ तरी स्वयें सखीपतिला ४
न उपेक्षील कदापि क्षितिपति धर्मज्ञ शरण आलीला ॥
मजही व्हावे झाले कामद ते जेंवि चरण आलीला ॥ ५
नृपहि उपवनीं गेला एकांतीं तीहि दृष्टिला पडली ॥
न घडावीच कधीं परि दोघांची गांठि विधिबळें घडली
देतां दुर्लभ दर्शन एकांतीं करुनियां दया तीतें ॥
कळळा प्रसाद, मग ती विनवी मंजु स्वयें ययातीतें ॥ ७
द्वारीं मृगपतिहस्तां -- तूनि अहो वीरराय जी मुक्ता ॥
ती सेविजेल इतरें सिंहावाचून काय जी मुक्ता ॥ ८
नृपति ह्मणे जें वदसी जाणतसें मी यथार्थ सुंदरि तें ॥
सरस असोचि मधुप बहु मनिं जरिहि रसें करूनि कुंद रितें

१ पतिविषयकचिंतेनें. २ देहानें. ३ तारुण्याचा नाश ४ जो जो बाळा. ५ दाई. ६ जो शब्द. ७ इच्छा पुरविणारे. ८ दैवाच्या बळानें. ९ मधुरभाषणानें. १० सिंहाच्या हातांतून. ११ पडलेली. १२ मोतीं. १३ कुंदपुष्प नीरस असलें तरीही भ्रमर त्याविषयीं सरस ( प्रीतियुक्त )असतो.

तुज शयनीं न बहावें वदला कवि मज अलंघ्य आज्ञा ती
माझे तुझेहि न पुन्हा मुनिच्या क्षोभें ह्मणोत हा ज्ञाती १०
शर्मिष्ठा त्यासि ह्मणे गम्यस्त्रीविषयकानृतें पाप ॥
न शिवे धर्मज्ञाला आर्तजनाचा निवारिजे ताप ॥११
वरिलासि मत्सखीनें म्यांही वरिलासि तूं मनें, मातें ॥
पापापासुनि रक्षीं या माझ्या चालवूनि नेमातें ॥ १२
भूप ह्मणे व्रत माझें कोणी जन जें अभीष्ट मागेल ॥
तें द्यावें त्यासि असें मज तत्त्यागेंहि दोष लागेल ॥१३
ऐसें वदे नृपति मग द्याया त्या सुंदरीस मुदतिशय ॥
हांसे ह्मणे धरूंदे सुंदरि रंभोरु सुभ्रु सुदति शय ॥ १४
केली कृपा नृपानें प्रमथ स्वमनीं नमूनि त्या ऋषितें ॥
प्याली तीहि चकोरी पति-मुखचंद्रामृता मनें तृषितें १५
स्वप्रसवें सुख शोभा दे क्षितिस परांहि जेंवि सुक्षितिचा
प्रसवोनि सुतासि तसा सुख शोभा दे विशुद्ध कुक्षि तिचा
शर्मिष्ठेला झाला सुत नाम द्रुह्यु ठेविलें आहे ॥
ऐसें कळतां चित्तीं चिंतेला काव्यकन्यका वाहे ॥ १७॥
भेदुनि तिला ह्मणे हें कर्म उचित सुभ्रु काय गे, हातें ॥
विमळ कुळ मळविलें कीं लावियला अग्नि काय गेहातें १८

१ उपभोगास योग्य अशा स्त्रीविषयीं खोटें बोलणें. २ पीडित जनाचा. ३ इच्छित गोष्ट. ४ त्या व्रताच्या टाकण्यानें. ५ मोठा हर्ष. ६ केळीप्रमाणें जिच्या मांड्या ती. ७ सुन्दर भिवया जिच्या ती. ८ सुंदर दांत जिचे ती. ९ हात. १० आपल्या धान्यादिकांच्या उत्पन्नानें. ११ दुसऱ्यालाही. १२ उत्तम जमिनीचा (कुक्षि.) १३ कूस पक्षीं प्रदेश.

धवलांबरासि[1] कज्जल　तैसें जें शुचिकुळासि[2] पाप डसे ॥
तें धूतां श्रम बहु गुरु[3]　भाजति दुःखाग्निमाजि पापडसे १९
येरु[4] ह्मणे ऋषि आला　श्रुतिपारग[5] धर्मशील, वर दात्या ॥
प्रार्थूनि याचिला म्यां　ऋतुकाळीं पुत्र-काम[6]-वरदात्या २०
देवी ह्मणे खरें हें　जरि तरि शोभनचि मानलें मजला ॥
मज नाम सांग त्याचें　सुंदरि जो वरद ऋषि तुला भजला
दैत्यपतिजा ह्मणे ऋषि　गमला रविसाचे नामगोत्रास[8] ॥
कैंची शक्ति पुसाया　सांगों मी देवि काय तो त्रास[9] २२
राज्ञी ह्मणे बरें मज　नाहीं कोप त्वदीय[10]-सुत-लाभें ॥
जन न उतलें[11] जगीं जो　तो पावे नित्य भद्र[12], उतला भें २३
वदल्या दोघी प्रेमें　झाल्या साऽऽनंद हांसल्या आली ॥
आलिंगिलें परस्पर　मग निज-सदनास भार्गवी[13] आली २४
त्यावरि दुसरा झाला　तो तुर्वसु शुक्र-कन्यका-तनय ॥
अनु पूरु पुत्र दोवे　शर्मिष्ठेला, करी न घात नय　॥ २५
कविकन्येचे दोघे　शर्मिष्ठेचे तिघे सुत, नुरविते　॥
पितृचिंतातिमिर[14] सुहृन्[15]　नयनाब्जें सुखावते सुतनु रवि ते २६
एकासमयीं देवी　पतिसह गेली अशोकवनिकेला　॥
क्रीडावें तेथ सुखें　संकल्प असा तिनें स्वमनिं केला　॥ २७

---

१ पांढऱ्या वस्त्राला. २ शुद्ध कुळाला. ३ पितर. ४ ती शर्मिष्ठा (सर्वनाम) ५ वेदाध्ययन संपविलेला. ६ पुत्रप्राप्तीची इच्छा, पूर्ण होण्याचा वर. ७ ठीक. ८ नांव आणि कुळ. ९ भय. १० तुझ्या पुत्रप्राप्तीनें. ११ उन्मत्त झाला. १२ कल्याण. १३ शुक्रकन्या देवयानी. १४ पितरांचा चिंतारूप अंधार. १५ मित्रांचीं नेत्रकमळें.

शोभे सती उपवनीं पतिसह जशि शंभुची उमा रमणी ॥
तों देखिले तिनें सुर- गर्भ-सम[1]-प्रभ तिघे कुमारमणी २८
देवी राजासि पुसे सुरकलभाची[2] हिरोनि गति घेते ॥
कोणाचे शिशु जैसे देवांचे चालते नग[3] तिघे ते ॥ २९ ॥
दिसाति तुह्मांसम रूपें श्रीचे संकेतकुंज[4] ते जांचे ॥
काय रुचिर, काय सुचिर[5] झाले हे प्रकट पुंज तेजांचे ३०
पाचारुनि त्यांसि ह्मणे कोणाचे बाळहो तुह्मी धाम[6] ॥
कोठें तुमचें, सांगा कुळ तुमचें कोण काय हो नाम॥३१॥
अंकीं तुह्मांसि घेउन आलिंगुनि हृष्ट[7] कोण होतात ॥
कोणासि माय ह्मणतां तुमचा कृत-सुकृत[8] कोण हो तात३२
माता सांगुनि पुसतां, तानययातसि दाविती बोटें ॥
खोटें कर्म नृपाचें जाणुनि ती दुःख धरि मनीं मोटें॥३३॥
गेले शिशु जवळि परि न त्यांतें करुणा-सुधा-नदी-पति[9] घे
ते त्याक्षणींच रुचले स्वकुळाचे त्या बुधा[10] न दीप तिघे ३४
उत्सुक झाले होते अंकाऽऽरोहाऽर्थ[11] पुत्र पर तो न ॥
प्रभु घे, मग भीतभीत गेले रोदन करीत परतोन ॥ ३५ ॥
पति-कृत-कपटें पावे आणुनि नेत्रांसि वारि खेदासी ॥
तीस ह्मणे कांगे हे ऋषिसुत तारि नृपति सारिखे दासी३६

---

१ देवगर्भाप्रमाणें तेज ज्यांचें ते. २ देवांच्या हत्तीचा छावा. ३ कल्पवृक्ष. ४ नायकास भेटण्याचें सांकेतिक स्थलविशेष. ५ फार वेळानें. ६ घर. ७ संतुष्ट. ८ पुण्यवान्. ९ दयारूपी अमृताचा समुद्र. १० ज्ञात्याला. ११ मांडीवर बसण्याकरितां.

त्वां हा भूप भुलविला केला माझा दहांत अपमान ॥
बटिक लटिक तूं दुष्टे वद लंघ्य तुला मदीय तप मान ३७
राजसुताहि ह्मणे तूं कमळाला मधुकरी जशी तृषिता ॥
ज्या भाळलीस ऋषिजा त्या सत्पुरुषीं कशी नसे ऋषिता
जो त्वत्पति तो मत्पति देवि पहा धर्म मी तुझी आली ॥
त्वां म्यांहि मनें वरितां ऋषिता पतिता प्रभूकडे आली ३९
तूं ज्येष्ठा विप्रसुता राजसुता मी सये कनिष्ठा हो ॥
जैशी तुझी नृपपदीं माझीहि तशीच एकनिष्ठा हो॥४०॥
वदलें सत्यचि पूर्वी देवि पहातां ऋषीच पति तत्वें ॥
क्षोभों नको वृथा तूं हा जन दूषूं नकोचि पतितत्वें॥४१॥
जी स्मरहता पद-नता त्यजिल न शशिवंशसदनदीप तिलें
भेटेल नदी जीजी ती अनुकंप्यांचि नद-नदी-पतितें॥४२॥
शुक्रसुता पतिस ह्मणे हें विप्रिय काय उचित महिम्यातें॥
त्यजिलें आजि तुझें जें श्रीपद्महि सद्म शुचितमंहि म्यां तें
आरोपूनि स्वशिरीं दासीसंगें करूनि विटलीला ॥
पंडितवर परि नशके समजावाया ययाति विटलीला ४४
गुण वावडीस सुदृढ प्रेमाचि स्त्रीस आवरायाचा ॥
तो तुटतां यत्न नसे कांहीं, गेलाचि आव रायाचा ॥४५॥
जाय पित्याच्या सदना करुनि परित्याग बायको पतिचा
पुत्रांतेंहि न पाहे सांगावा उग्र काय कोप तिचा ॥४६ ॥

---

१ सत्यविचारानें. २ हाजन-ही शर्मिष्ठा. ३ भ्रष्टपणानें. ४ कामपीडित. ५ चंद्रवंश हेंच गृह त्यांतील दीप ययाति. ६ दया करण्यास योग्य. ७ नद व नद्या ह्यांचा पति समुद्र. ८ लक्ष्मीनिवासस्थान. ९ घर. १० अत्यंत शुद्ध. ११ जारक्रीडा.

नाहींच कांतवचना त्हृदयांत धरूनि ती असुखं वळली ॥
वाटे नृपासि धरितां सोडीलचि आपुले असु खवळली ४७
भूप ह्मणे तीस परिस माझें सुख-संपदे विनवणें, हो ॥
चित्तं सुवृत्तं न पावो विश्लेषें कंप देवि न वणें हो ॥ ४८ ॥
दावार्ता जेविं मृगी कासारीं जाय, ती स्वमाहेरीं ॥
पावे नृपाहि, ह्मणे जो नमुनि गुरुसि तापसोत्तमा हेरीं ॥४९॥
ताप दिल्हा जेणें तो हा कामी, तापसा हतांस दया ॥
उठवि तुझी, किंनि मारूं हाका मी ताप साहतां सदया५०
माझी दासी मजहुनि बहुमान्या यासि बा दया तीची ॥
तीन तिला सुत दिधले दोघे मज ती प्रिया ययातीची॥५१
स्वतपाच्या तीव्रत्वें लाजविता योगिराज जो पविला ॥
तो स्वातिक्रम कळवुनि सुरयानीनें क्षणांत कोपविला॥५२॥
वृंदावनासि मानिति अव्हेरिति मूर्ख मत्त पनसा हो ॥
तीच गतिं, अतिक्रम पर- तपं साहो, लवहि मत्तप न साहो॥
जेणें अधर्म घडला नाशो बळवीर्य आजि राया, तें ॥
वपुला आतांचि जरा ग्रासो, हा दंड साजिरा यातें ॥५४
भूप ह्मणे शाप दिला उग्राविपत्पातं तु, ह्मातारा ॥
झालों, पहा अहा जी जोडितसें हात हे तुह्मां तारा ५५॥

१ दुःख. २ प्राण. ३ माझें विनवणें सुखपत्तीस कारण होवो. ४ चित्त विश्लेषें (वियोगानें) कंप न पावो. ५सुवृत्त (सुयश) वणें(डागानें)कंप न पावो. ६ तळें. ७वज्राला. ८आपली अमर्यादा. ९ कंवडल. १० प्रकार. ११ दुसऱ्याचें तप. १२ दुःखांत पडण्यास कारण.

ऋतुदान धर्म कीं जी हा यास्तव हाय!काय शापावा ॥
कन्येकडे तरि पहा रक्षा मुनि नायका यशा पावा ॥५६॥
ह्मणतां सत्यचि देवा जें हें न विचारिलें तुह्मां चुकलों ॥
परि शापें तुमच्या प्रिय दुहितेच्या मी समागमा मुकलों ५७
करुणा करा सुतेवरि गुरुजी,प्रभुजी स्वशाप हा फिरवा ॥
मिरवा प्रसाद लोकीं, जिरवा मनिं रोष,मज इला निरवा
मी यौवनीं अतृप्तचि हीच्या, आतांचि भर विलासाचा ॥
शापमिषें त्वां तापचि आह्मां दोघांसि भरविला साचा५९
शुक्र ह्मणे नरनाथा नाहीं होणार शाप हा लटिका ॥
तेज पहा वचनाचें ज्यासि फळाया न लागली घटिका६०
परि मद्वरें तयाप्रति जाइल,देशील हे जरा ज्यातें ॥
येईल तुजप्रति जें याचें तारुण्यतेज राजा तें ॥ ६१ ॥
भूप ह्मणे दोघींला दिधले म्यां पांच तनय निर्जरेतें ॥
तो राजा होऊ जो देइल यौवनहि घेउनि जरेतें ॥ ६२ ॥
काव्य ह्मणे हेंहि दिलें जा परि होवोनि वीर्यमत्त नयां ॥
नउलंघीं धर्मातें रक्षीं दुखवीं पुन्हा न मत्तनया ॥ ६३ ॥
गुरुची आज्ञा कन्या घेउनि जाउनि गृहासि तो जीन ॥
आणी मनीं असें कीं यदुच्या देहीं जरेसि योजीन ॥६४

---

१ कन्येच्या. २ स्वाधीन करा. ३ शापरूपानें.,४ मदोन्मत्त.
५ नीतीला. ६ वृद्ध.

त्यासि ह्मणे स्वजरा घे यौवन दे, अयश अनुतं न यदो घे ॥
तो तें नकरी तुर्वसु- ही, तेंहि द्रुह्यु अनु तनय दोघे ॥६५॥
पूरूनें आज्ञेचा केला स्वीकार ते जरा याला ॥
स्पर्शे काव्य-वर-बळें याचें तारुण्यतेज रायाला ॥ ६६ ॥
करितां आज्ञा-भंग क्षोभाचें पात्र जाहले चवघे ॥
पूरु प्रसाद गुरुचा पावे सत्कीर्तिची सदा चव घे ॥६७ ॥
पूरूप्रति भूप ह्मणे वत्सा मत्सार्वभौमपदवीतें ॥
तूंचि सुपात्र, मज तुझें साधुत्व तव स्तवासि वदवीतें ॥
तूं धन्य अन्य न असा कैंची सर्वत्र साधु सुतरीती ॥
बापा प्रजा अशी जी पितरांसि भवार्णवांत सुतरी ती ६९॥
धर्मार्थकाम सेवी पुत्रवयें नृप सहस्त्र वत्सरं तो ॥
मग मनि ह्मणे पुरे हें या स्त्रीसंगीं मदीय वत्स रतो ॥
स्वल्पचि एकाहि स्रक्- चंदन-वनिताऽदि सर्व विषय मही
कळले मज हे भोगचि मारक,न व्याळ शस्त्र विष यमही७१
श्रीसेव्या सदलिमता वस राज्यसरीं निमज्जं राजीवा ॥
वत्सा बहु कष्टविलें त्वां स्वीकारूनि मज्जरा जीवा॥ ७२ ॥
जाय नृप श्रीकरवीं धरवुनियां पूरु-हस्त वनवासा ॥
नगमे प्रजांसि पति तो गुण-जित-सुर-भूरुहस्त वनवासा ७३

---

१ निंद्य. २ शुक्राच्या वराच्या सामर्थ्यानें. ३ चांगली नौका. ४ वर्षे. ५ राज्यश्रीशीं. ६ माळा. ७ पृथ्वी. ८ स्वल्पही भोग (विषय सुखें)मारक होतात. ९ सर्प. १० लक्ष्मीनें सेविण्यास योग्य. ११ सत् हेच अलि त्यांना मान्य. १२ राज्य हेंच सरोवर. १३ बूड. १४ हे कमळा. १५ गुणानीं जिंकिली कल्पवृक्षकीर्ति ज्यानें तो.

जाउनि तपोवनातें सेवी राजा महातपा पवना ॥
जाळी ज्ञानदवें तो चित्तगजाचा महात पापवना ७४
गेला स्वर्गासि अमित सुकृतें जोडोनि राय, तें नाकीं ॥
होय सदुःसह शक्रा जैसें बाळासि रायतें नाकीं ॥ ७५
एका समयीं सुरपति त्याचेंचि महत्त्व तन्मुखें वदवी ॥
ऋजुभावें नृप नेणे कीं आत्म-स्तोत्र कुगतिची पदवी ७६
स्वतपें तूं कवणाशीं तुल्य, असें हरि पुसे ययातीतें ॥
त्यातें नाहुष राजा सत्याचि सांगे मनें भयातीतें ॥ ७७ ॥
देवेंद्रा कोणीही स्वतपें मत्तुल्य जन असेना कीं ॥
काय वदों नर ते किति न महर्षिजनीं असा नसे नाकीं
शक्र ह्मणे बहु भास्वरें रविसम ज्यांचे तपोगुणें काय ॥
त्वत्तुल्य त्वदधिकही आहेत तपोनिधी उणे काय ॥ ७९
हें काय उचित तुजला साधु न कोणासही अव्हेरीती ॥
अभिमानें स्व-तपःक्षय केला कीं हे बरी नव्हे रीती ८०
झाला सर्व तपःक्षय पावें प्रक्षीणपुण्य तूं पतन ॥
बहु तप करिता तापस धन्य नव्हे, धन्य करिल जो जतन
नाहुष ह्मणे स्वपर्तना ऽ वसरीं प्रार्थूनि नाकपाळाला ॥
हा जन संतांत पडो जरि आलें पतन या कपाळाला ८२

१ मोठी तपस्या ज्याची तो. २ ज्ञानरूप वणव्यानें. ३ भोळेपणानें. ४ नहुषपुत्र ययाति. ५ भयाला मागें टाकिलें ज्यानें तें अर्थात् निर्भय(मन) ६ तेजस्वी. ७ ज्याचें पुण्य संपलें तो. ८ आपल्या पडण्याच्या वेळीं. ९ स्वर्गाचा पालक इंद्र. १० दैवाला.

इंद्र ह्मणे तुज राया संतांत घडेल पात, कमळाला ॥
रविसे हर्ष तुला ते देतील, हरूनि पातक-मळाला ॥ ८३
पडतां स्वर्गासि पुन्हा गेले घेवोनि संत राजाला ॥
नृप अष्टक प्रतर्दन वसुमन शिबि—नायक स्व-आज्याला ॥
तरला ययाति राजा दर्शन होतांचि संतरायांचें ॥
सद्दर्शनाचि सुदर्शन करि गट चट कटक अंतरायांचें[2] ८५
जें दुरित-तृण तया दव यादव यदुचे, हरी अरि-गजांचें ॥
त्या पूरुचेहि पौरव पौर वदति नाक-गोष्टिहि न ज्यांचे ८६

# अध्याय १२

## सारांश.

---

[१-७] पूरुकुलोद्भव दुष्यंत राजा मृगयेस गेला असतां तेथें अरण्यांत कण्व'काश्यप' ऋषीचा आश्रम पाहतो. [८-३६] कण्व-कन्या शकुन्तला त्याचें आतिथ्य करिते. दुष्यन्तानें विचारिल्या वरून, कौशिका (विश्वामित्रा) पासून आपलें जन्म मेनकेच्या ठायीं झालें, व कण्वानें संरक्षण केलें असें आत्मवृत्त सांगते [३७-४८] दुष्यन्त शकुन्तलेस गांधर्व विधीनें वरितो. मागून सेना पा-

---

१ शर्मिष्ठेची कन्या माधवी तिचे पुत्र. २ विघ्नांचें. ३ ज्यांचे पौर ह्म० नगरजन नाकगोष्ठी ह्म० स्वर्गाच्या गोष्ठी बोलत नसत.

ठवून तुला घेऊन जाईन असें तिला वचन देऊन आपल्या नगरास निघून जातो. [४९-६०] कण्वाचा शकुन्तलेस वर. शकुन्तलेस पुत्र 'भरत' होतो. कण्व आपले शिष्य बराबर देऊन तिला राजाकडे पाठवितो [६१-८९] राजा तिचा स्वीकार करीत नाहीं, तेव्हां ती परत जावयास निघते. आकाशवाणी होते. राजा तिचा स्वीकार करितो. भरतास राज्याभिषेक. [९०-९८] भरताचें वृत्त व त्याच्या कुलांतील राजे.

श्रीमद्ययातिनंदन- पूरुकुळीं भूप जन्मले शतशा ॥
श्रवणें सत्कीर्ति हरिति ताप, सुधांच्या नद्या न लेश तशा
त्या पौरवांत झाला राजा दुष्यंत धर्मपर महित ॥
स्वगुणें करी प्रजांचें अनुदिन तो मूर्त धर्म परमहित २
तो एकदा वनाला जाय कराया यथेष्ट मृगयेतें ॥
बल-कोलाहल परिसुनि कुलनाश-व्यसन ह्मणति मृग येतें
वधिले व्याघ्र वृक खग श्वापद, धरिले प्रमत्त-गज रानीं
चिरिले किरि, लेशहि धृति मृगयूथीं नुरविलीच गजरानीं
एका हरिणामागें एकाकी भूप धांवतां श्रमला ॥
जातां दूर श्रीम- त्कण्वाश्रम रम्य पाहतां रमला ॥ ५
तें सत्यलोक-तुल्यचि आश्रमपद ज्यांत अण्वघ न साच॥
तेथील तापस शिखी चातकसे, त्यांत कण्व घनसांच ॥ ६

१ ययातिपुत्र पूरु त्याच्या वंशांत. २ मान्य. ३ प्रतिदिवशीं ४ सैन्याची ओरड. ५ कुलाचा नाश करणारें संकट. ६ राजानें युद्धावांचून गज मारूं नये असें शास्त्र ह्मणून धरिले, असें ह्मटलें. ७ डुकर. ८ ब्रह्मलोकासारखें. ९ अल्पही पाप. १० मेघासारखा.

श्रीमालिनीतटीं तो त्या सिद्धाश्रमपदांत शिरला हो ॥
चित्तांत ह्मणे काश्यपं- पद-पद्मरजःप्रसाद शिर लाहो ७
मुनि अश्रमांत नव्हता त्याची कन्या शकुंतला होती ॥
पूजी नरदेवातें करि तेव्हां स्ववपु दीपकज्योती ॥ ८
अवलोकितांचि आधीं भुलला लावण्य-कल्पलतिकेला ॥
त्यांत तिणें उचितादर सस्मितमधुरोदितेंहि अति केला ९
चित्तीं ह्मणे नृपति हे जातीची सस्मिताहि कलिका मी
होईन काय चुंबुनि ईतें सफळेच्छ तृप्त अलि कामी १०
मग तीस पुसे सुंदरि चतुरे तूं कोण सत्य सांग मला ॥
तुज या वयांत हित हा उग्र तपोनियम-ताप कां गमला
कण्वसुता मी ह्मणसी परि न गमे सत्य, सत्य वद नातें ॥
दे मत्कर्णतृषाहर- वृत्तसुधाचषकता स्ववदना तें ॥ १२ ॥
त्वत्तात ऊर्ध्वरेता कण्व तयाची सुता कशी? बोल ॥
हा पौरव दुष्यंत त्वद्वृत्ताकर्णनीं असे लोल ॥ १३
ती त्यासि ह्मणे पूर्वीं एके मुनिनें विचारिलें होतें ॥
जें त्यातें मत्तातें कथिलें मज्जन्म सांगतें हो तें ॥ १४
विश्वामित्र तप करी केलें कोणींहि तेंवि तप नाहीं ॥
तापे मुनितेजें जग जैसें कल्पांतकाळतपनांहीं ॥ १५
उग्रतपःसामर्थ्यें विश्वामित्र प्रभु स्वपद हारितो ॥
ऐसें शंकूनि ह्मणे धरुनि करें मेनकाकरा हरि तो ॥ १६

१ त्रिकालज्ञानी अशा कण्व ऋषीच्या आश्रमांत. २ कण्वाच्या पदकमलाची धूळ हाच प्रसाद. ३ मनुष्यरूप देव असा राजा. ४ आपलें शरीर. ५ दीपप्रकाश. ६ सौंदर्याची कल्पवल्ली शकुन्तला. ७ योग्य सत्कार. ८ हास्ययुक्त मधुर भाषणानें.

स्वःश्री[1]भोग बहुत जरि केला परि तो गमे न केला हो
ह्मणुनि इं[3]द्रा हा[4] कौशिक-मुनिहि तुझा भोग मेनके लाहो
स्व-पद-हर गमे सकळां मजला[2]चि प्रियतमे न केवळ तो
न वळेल उपायशतें, तुजचि मुनी नियत मेनके वळतो १८
तूं पात्र गाधि[5]जाला सदुपा[6]यन करुनि देह नु[7]तितें हो ॥
हरि वारंवार असें स्वकरेंचि धरुनि वदे हनु तितें हो १९
भ्रू[8]धनु वोढुनि कज्ज[9]ल- विषदिग्ध कटाक्ष[10]-शर वरा[11]रोहे ॥
सोडुनि लुटीं तपोधन सौभाग्यश्री तुझी भरा[12]रो हे ॥ २०
ती अप्सरा ह्मणे तो भस्म करिल मज महातपा शापें ॥
जाइल कवण यमाच्या जोडूनि बळेंचि हात पां[13]शापें २१
मी अबळा भीरु कशी साहों त्या गाधि[14]तनयतेजातें ॥
भ्यालासि असा दुःसह मानुनियां तूंहि सुरपते ज्यातें २२
गातात कीर्ति ज्याची मुनिसुतहन[15]न-त्रिशंकुरक्षण जा ॥
ब्रह्मसमत्वचि दे नव- सृष्टीचा दिव्य अंकुर क्षण जा २३
जें दुष्कर पुरुषवरा तुजहि, कसें करिल काज रामा तें ॥
सदमृततरु तो मुनि परि कपटें होईल काजरा मातें ॥२४
करिल कसें माजर, जें दुष्कर हरि-हननकाज वाघास ॥
नशकति आग्नि विधु कसा दिनमणिचा करिल काजवा घास

१ स्वर्गातील संपत्तीचा उपभोग. २ या सम्पत्तीचा. ३ इन्द्र. ४ खचित, ५ विश्वामित्राला. ६ उत्तम नजराणा. ७ स्तुति. ८ भिवई हेंच धनुष्य. ९ काजळ हेंच विष त्यानें माखलेला. १० नेत्रकोणानें पाहणें हाच बाण. ११ सुंदर कटिभाग जिचा ती. १२ वृद्धि पावो. १३ पाशांजवळ. १४ गाधिराजाचा पुत्र विश्वामित्र त्याच्या तेजाला. १५ वसिष्ठाचे शंभर पुत्र मारणें.

त्या मुनितें मोहाया   हा जन काय प्रभुं[1], प्रभो परि तें ॥
तेज पहाया जातें   परिजन-गतें[2] नाथतेज[3] जय करितें ॥ २६
जातें तव आज्ञेचा   कोण सुधी जन करील अवमान ॥
परि मन्निकट असावे   मज साह्य वसंत-काम-पवमानें[4] २७
शक्र ह्मणे सर्वहि सुर   आहों तुजला सहाय कार्य करीं ॥
आज्ञा दे मग गेली   आणाया तूर्ण तोहि आर्य करीं २८
जेथें करीत होता   दारुण तप तो तपोनदीन[5] मुनी ॥
तेथें जाउनि खेळे   तन्निकट प्रथम तत्पदीं नमुनी ॥ २९
होती करीत कंदुक-[6]   केलि मधुर गान मोहिनी, तीतें ॥
स्पर्शे प्रथम वसनहर[7]   पवन, मग त्यजुनि तोहि नीतीतें ३०
सुरतरसांत बुडाला   जाणों स्त्रीरत्नशीत-नवसर[8] तो ॥
तप्त मतंगज[9] रतला   शक्र ह्मणे बहु करोनि नवस रतो ३१
झाली गाधिजसंगें   हे कन्या मालिनीतटीं ठेवी ॥
स्वर्गासि जाय तेथुनि बहु   निष्ठुर चित्त करूनि ते देवी ३२
संरक्षिली वनीं मधु   पाजुनि मातेविना शकुंतांनीं ॥
असतां विधिकवच नव्हे   काळाच्याही विनाश कुंतांनीं[10] ३३
स्नानार्थ मालिनीतें   गेलों तों कळविलें इच्या रुदितें ॥
आणुनि उटजीं केलें   म्यां पालन लालन स्वयें मुदितें ३४

---

१ समर्थ. २ सेवकाचे ठायीं असलेलें. ३ धन्याचा पराक्रम. ४ वायु. ५ तमाचा समुद्र. ६ चेंडूचा खेळ. ७ वस्त्र उडविणारा. ८ स्त्रिरत्न हेंच शीतळ नवीन सरोवर, ९ हत्ती. १० भाल्यांनीं.

झाले शकुंत पालक म्हणुनि असे मज शकुंतलानाम ॥
ठेवुनि वागविलें हें रत्न गळां जेंवि मालती-दाम[1] ॥ ३५
ऐसी तात मुखें श्रुत निज जन्मकथा शकुंतला कळवी ॥
पळवी स्मित करुनि नृपति मनिंची स्वालभ्यताऽन्यथा[2] पळवी
नृपति म्हणे तरि सुंदरि सुदति मुदतिशय तुला मलाहि घडो
सत्कृतिशीं[3] रसिकांची तुजशीं माझी तशीच गांठि पडो ३७
कुलशीलगुणांहीं तूं योग्या नृप कन्यका महोदारा ॥
घे राज्य सर्व, नाहीं त्वदधिक मज अन्य काम, हो दारा
हांसुनि तीहि म्हणे हो प्रार्थावें प्रणतपारिजातातें[4] ॥
देवा स्वयें वहावें या निज-कारुण्यवारिजा[5] तातें ॥ ३९॥
मजकरवीं न तुम्ही बुध गुरुमर्यादाऽतिपात[6] करवा हो ॥
सत्पात्रीं स्वधनातें चिंतामणिकण्वतातकर[7] वाहो ॥ ४० ॥
भूप म्हणे गांधर्वें तुजशीं होईन शीघ्र अन्वित[8] मी ॥
नाहींतरि अदय स्मर-शर-हत[9] झालों बुडेन तन्वि[10] तमीं ॥ ४१
अन्या धन्या कन्या अन्याय न्याय जाणत्या मागें ॥
गांधर्वेंचि वरातें भजल्या, तद्गुरुहि न भरले रागें ॥ ४२
गुरुदेवताप्रसादा हो भाजन, आपुल्याचि देहातें ॥

---

१ माळ. २ आपल्यास प्राप्त होण्यास अशक्य अशी चिंता. ३ सुंदर काव्य. ४ नम्र झालेल्यास कल्पतरु. ५ दया हेंच उदक त्यांत कमळ-शकुंतला. ६ बापाच्या मर्यादेचें उल्लंघन. ७ चिंतिलें देणारा कण्वाचा हात. ८युक्त. ९काम बाणानीं पीडित. १०हे सुंदरि.

सत्कीर्ति जगीं व्हाया सत्पात्रीं आपुल्याचि दे हातें ४३
सुत युवराज असो हा वरुनि वर निका शकुंतला आली
झाली करांत याच्या मधुपवरनिकाशकुंतला आली ४४
तेव्हां तदैव ह्मणे योग्य तुला न नर अन्य केलीला ॥
श्री विष्णुशीं तशी तूं याशिं करीं कण्वकन्यके लीला ४५
राजा दुष्यंत ह्मणे लब्धमनोरथ प्रियंवदे विरहा ॥
मीही भ्याडचि सेना पाठवितों तों अशीच देवि रहा ४६
दे मज निरोप हंसें वद विस्मरिजेल काय देवि सर ॥
भिन्न दिसो एकचि वपु हें कोणासहि न काय दे विसर ४७
गेला निरोप घेउनि परि मनिं कण्वासि भूप तो भ्याला॥
चिंतीं ह्मणे अहा मुनिशापिल मज परमविषयलोभ्याला ४८
आला कण्व मुहूर्तें फळ पुष्प समित्कुशांसि आणूनी ॥
झाला प्रसन्न भगवान् दिव्यज्ञानेंकरूनि जाणूनी ॥४९
कण्व ह्मणे वत्से त्वां केला निश्चित आजि तातकर ॥
नधरीं संकोच नव्हे गांधर्वविधि स्वधर्मघातकर ॥५०॥
तुज सुत होईल भला निववील यशोमृतें कुलीनमनें ॥
त्यासि मदाशीर्वादें करितील समस्त नृप मुलीं, नमनें ५१

१. भुंगा सारखे केश जिचे ती. २ बापाचा हात. ३ हे वत्से शकुंतले.

तातातें नमुनि ह्मणे म्यां दुष्यंतासि वाहिलें काय ॥
भवदाश्रमीं[१] अतिथिचें न०हतां प्रिय उचित राहिलें काय
त्यावरि कृपा करावी द्या हा वर योग्य होय कन्या या॥
कण्व ह्मणे हेंहि दिलें कां भीसी न करुनीहि अन्याया ५३
झाला शकुन्तलेला सुत, सुतपा[२] त्यासि कण्व परिपाळी ॥
गृहधर्माचीं कुतुकें दे तो भगवान् विरक्त परि पाळी ५४॥
भरवी मृगाऽर्भकां[३] मग तो भरवी कां न नातवा घांस ॥
झाला असा शिशुपणीं बद्ध करी काननांत वाघांस ५५॥
तो आश्रमवृक्षांशीं शार्दूल-वराह हस्ति-हरि-सेना ॥
बांधी सा वर्षांचा शिकवी कण्वोक्त युक्त परिसेना ५६
सर्वदमन त्यासि ह्मणति करिति सदा सुवरवृष्टि[४] जलद-मुनी
निरुपम सुख प्रजांला हा सुख देईल सर्व खल दमुनी ५७
कण्व ह्मणे मुलि झाला राज्योचित सुत मलाहि लाभ वनीं
जा पतिगृहासि, शोभे स्त्रीजन पतिच्याचि राहिला भवनीं ५८
राज्यसुख पहा पतिची सेवा करिं मज उदास मुनि नमनीं
पतिसह वृद्धपणीं ये जरि हें वन सिंधुनीरपुलिन मनीं ५९
आज्ञापिले स्वशिष्य स्वसुता नेत्रें पुसोनि पाठविली ॥
साश्रु-मुनिजनीं कण्वें शतवार तदीय-भक्ति आठविली ६०
दुष्यंतसद्मपद्मीं[५] ते स्त्री श्री[६] कण्वभानु[७]शिष्यकरीं[८] ॥

---

१ आपल्या आश्रमांत. २ चांगली तपस्या ज्याची तो. ३ हरिणबालकें. ४ उत्तम वरांची वर्षाव. ५ दुष्टांताचें घर हेंच कमळ. ६ ती स्त्री हीच श्री. ७ कण्व हाच सूर्य. ८ शिष्य हे कर.

नेली पुत्रसुगंधा[1] सह धर्मनयांऽनुपूर्ण[2] नगरसरीं[3] ॥ ६१ ॥
पतिला ह्मणे मुनिसुता द्यावें पुत्रासि यौवराज्य नृपा ॥
स्मृति आहे कीं केली पूर्वीं जी काश्यपाश्रमांत कृपा॥६२
राजा ह्मणे कवण तूं कोणाचा पुत्र काय गे वदसी ॥
काच[4] स्मृतिरपि तापसि मैवं प्रलपात्र भूभुजःसदसि ६३
साध्वी ह्मणे अहो नय धर्मज्ञ तुह्मी नरेंद्र पौरव कीं ॥
वदतां असें कसें हो करितां विश्वासघात रौरव[5] कीं ६४
मृगयेचिये प्रसंगीं हरिणामागें वनांत लागोनी ॥
आलासि मालिनीच्या तीरीं कण्वाश्रमासि भागोनी ६५
सिद्धाश्रमांत नव्हता तात तुला म्यांचि पूजिलें वन्यें[6] ॥
जागें काय करावें निपट[7] कपट-निद्रिता[8] जना अन्यें ॥६६
मज्जन्मवृत्त पुशिलें त्वां, मग म्यां मेनकाऽप्सरा माय ॥
कौशिक बाप, असें तुज कथिलें तें विसरलासि तूं काय
सुत-यौवराज्य-वर[9] मज देउनि गांधर्वविधिकरोनि भला ॥
वरुनि नजाणें ह्मणसी पूरुकुळीं तूंचि सुज्ञ साधु भला ६८
स्त्रीस ह्मणति जायाँ[10] सुत रूपें पति तदुदरांत[11] जन्मति तें

---

१ पुत्र हाच सुगंध. २ धर्म व न्याय ह्या उदकांनीं भरलेलें. ३ नगर हेंच सरोवर. ४ कोणती स्मृति!हे तापसी, अशी वडबडूं नको येथें राजसभेंत. ५ नरक. ६ वनांतील फलपुष्पांनीं. ७ केवळ. ८ कपटानें निजलेला. ह्म. झोंपेचें ज्यानें ढोंग केलें आहे. ९ तुझ्या पुत्रास राज्य देईन असा वर१० जिच्या ठायीं पति, पुत्ररूपानें उत्पन्न होतो ती.११ तिच्या उदरांत.

सतिवचन तुज असावें ठावें, परि मान्य होय सन्मतितें[१] ६९
मी जाया सत्कार्या[२] आत्माचि तुझा कुमार हा राया ॥
झाला प्राप्त परि गळां न धरिसि अद्यापि रत्नहारा या
भूप ह्मणे भग्नव्रतें[३] तात तुझा, मायही तुझी असती ॥
नसतीस तत्सुता तूं लज्जा कांहीं तरी तुला असती ॥ ७१
सा वर्षांचा ह्मणसी इतुक्यांतचि येवढा कसा गे हा ॥
स्वीकारुनि तुज लावूं डाग कसा मूढलोकसा गेहा ॥ ७२ ॥
साध्वी ह्मणे मिळविलें ज्ञान-तपःकीर्ति-भाग्य मत्तातें ॥
केचें तुझ्या कपाळीं नीचा अति-तुच्छ-भाग्य[३]-मत्तातें ७३
जी ब्रह्मयोनि[४] देवी मन्माता मेनका सुरास मता ॥
नीचा तुझीच माता करिल सुधेची कसी सुरा समता ७४
जरि मुख्य-सत्य-धर्म[५] च्युत आपण विश्वनिंद्य[६] जन नीचा ॥
निंदिसि कसें पदातें मत्तातच्या मदीयजननीच्या ॥ ७५
पौरव-रौरव-गौरव[७] कर्ता भर्त्ता[८] भला मला गमसी ॥
समशीलबुद्धि[९] होउनि नीतीनें आजि बोलुं लाग मसीं ७६

---

१ सज्जनाला. २ सत्कारास योग्य. ३ भंग पावलें व्रत ज्याचें तो. ३ अतिशय क्षुल्लक ऐश्वर्यानें उन्मत्त झालेला. ४ ब्रह्मदेवा पासून उत्पत्ति जीची ती. ५ श्रेष्ठ व सत्य अशा धर्मा पासून भ्रष्ट. ६ सर्व. ७ पौरव राजां करितां नरकांचें गौरव करणारा. ८ राजा. ९ पक्षपातरहित स्वभाव व बुद्धि ज्याची तो.

बहुधा तुझें कपाळ न साहे सुत-रत्न-सन्निधानातें ॥
हतभाग्य नघे देतां दाटुनि आणूनि सन्निधानातें ॥ ७७ ॥
क्षितिपति मत्सुतचि असो तेजाचा मूर्तिमंत हा निकर ॥
हा निकर मांडिला तूं देशील कर स्वकीर्तिहानिकर ७८
ऐसें वदोनि उठली जाया तों जाहली नभोवाणी ॥
दुष्यंता काय करिसि समजावीं आपुली सती राणी७९॥
त्वां हे विधिनें वरिली या साध्वीचें विशुद्ध जनु रागें ॥
पुरराष्ट्रभस्म नकरो समजावीं सुतवतीस अनुरागें ॥८०॥
पुत्राचें भरण करीं भाग्यें तुज लाधला भर तयातें ॥
ह्मणतील आजपासुनि भुवनीं जन सर्वही भरत यातें ८१
स्वकुळ-पुरोहित ऋत्विग् मंत्री आचार्य साधु जे होते ॥
राजा ह्मणे परिसिलें ह्मणती सारेचि एकदां हो ते ॥ ८२
मत्सुत मद्वानिता हे मी जाणें परि जनास कळवाया ॥
ऐसें निष्ठुर वदलों तुमची शंका अशेष पळवाया ॥ ८३॥
कळवुनि असें समस्तां हृदयीं सप्रेम बाष्पभर तातें ॥
आलिंगिलें गुरु-सुहृ- त्सचिवाऽनुमतें करूनि भरतातें ८४
कण्वसुतेसि ह्मणे नृप दयिते साध्वा क्षमा करीं भीरू ॥

---

१ पुत्ररत्नाच्या सहवासाला. २ दुर्दैवीमनुष्य. ३ उत्तम प्रकारचा रत्नादिकांचा ठेवा. ४ राशि. ५ अनर्थ. ६ आपल्याकीर्तीची हानि करणारा असा कर ह्म. राजग्राह्य भाग तुझा द्यावा लागेल. ७ जन्म. ८ प्रीतीनें. ९ पात्र. १० स्वीकार कर.

त्वत्क्षोभा भ्याला सति हा जन बहु पावका जसा भीरू
असकृत् विरहद तापद परि मित्रीं काय सुमुखि भीरु सती
दयिते नलिनी न धरुनि चित्तीं स्वप्रेम-भंग-भी रुसती ८६
माझी कीर्ति श्री तूं बोलाया वद न कोरडें जा ये ॥
तत्कंठ कां न दाटे येऊं देऊं नको रडें जाये ॥ ८७ ॥
वदलों शुद्ध्यर्थ असें भीतों बहु मानसांत डागातें ॥
निंदिल हंसवर कसा रस सेवुनि मानसातें डागातें ८८॥
स्त्री सुखवुनि दुष्यंतें गुरु-सेवा-पुण्य-कीर्ति-लाभ-रत ॥
युवराज पुत्र केला कविनीं तो सुबहु कीर्तिला भरत ८९
दुष्यत जधीं राजा झाला रिपुनृप तधींच नक्षत्रें ॥
भरत तरि रवीच, परी तें यश केलें कधींच न क्षत्रें॥ ९०
कण्वें भरता करवीं बहुदक्षिण यज्ञ कराविले शतशा ॥
याचा प्रताप मिरवी छवि पाताळींहि न रवि लेश तशा ९१
गोवित्तें वाजिमेधीं ब्राह्मणपूजाद्यनंतलाभरतें ॥
दिधल्या सहस्रपद्में कण्वाला धेनु दक्षिणा भरतें ॥ ९२ ॥

---

१ वारंवार. २ विरह देणारा. ३ मानससरोवराला. ४ गुरूंची सेवा, पुण्य व कीर्ति हीं मिळविण्यांत तत्पर. ५ वर्णिला. ६ राजा, पक्षीं चंद्र ७ पुष्कळ दक्षिणा ज्यांत दिली ते. ८ तशा छवीला ह्म. कांतीला रवि लेश न मिरवी. ९ गाई हेंच धन, १० अश्वमेध. ११ ब्राह्मणांची पूजा इ. पुष्कळ लाभांविषयीं तत्पर.

केली कीर्ति शशिकुळीं भरतें नाशूनि भूमिभार तता[1] ॥
ह्मणवूनि पौरवांच्या ठायीं नांदे प्रसिद्ध भारतता॥ ९३ ॥
भरत-सुत भुमन्यु नृपति, तत्सुत सूहोत्र, तत्तनय हस्ती ॥
तत्तनय तो विकुंठन. ह्मणति सदा साधु अस्तु ते स्वस्ती
नंदन विकुंठनाचा अजमीढ, जगत्पवित्र यत्स्मरण ॥
पुत्र चतुर्विंशतिशत त्याचा[2] कुळकर[3] तयांत संवरण ९५
संवरणाचा सुत कुरु त्याचा नंदन विहार मतिशाली ॥
त्याचा तनुज अनश्वा स्त्री अमृता मागधी तया झाली९६
तत्पुत्र परीक्षिन्नृप तन्नंदन भीमसेन भूमिपती ॥
त्याचा परिश्रवा सुत त्याचा तनुज प्रतीप शुद्धमती ९७
अमृतप्रतिम चरित्र प्राशावें श्रवणकरुनि आर्यांनीं ॥
गाईल रामकरुणा-[4] घनभक्तमयूर तेंचि आर्यांनीं ॥ ९८ ॥

# अध्याय १३ वा.

## सारांश.

[ १-८ ] इक्ष्वाकुकुलोत्पन्न महाभिष राजा व गंगा हीं दोघें ब्रह्मदेवाचे सभेत गेलीं असतां राजा गंगेस पाहून मोहित होतो.

---

१ विस्तृत. २ अजमीढाचा. ३ वंशधर. ४ राम हाच करुणेचा मेघ त्याचा भक्त मयूर.

ब्रह्मदेव रागावून, “ तूं मनुष्य लोकीं विषयसुख भोगून मग स्वर्ग पावशील ” असा शाप देतो. महाभिष प्रतीप राजाच्या उदरीं येतो. [ ९–१६ ) गंगा ब्रह्मसभेंतून परत येत असतां मार्गांत तिला वसुनामक देव भेटतात. व “तुह्मी योनिसंभव व्हाल”असा आपणांस दिलेला वसिष्ठाचा शाप तिला कळवितात. “ तूं मानुषी होऊन प्रतीपपुत्र शांतनु राजाची स्त्री हो. तुझ्या उदरीं आह्मी येऊं. उपजतांच उदकांत बुडवून आमचा उद्धार कर. आह्मी प्रत्येकाच्या तेजाच्या अष्टमांशानें झालेला एक पुत्र राजास देऊं”असें तिला सांगतात. [ १७-२६ ] तें मान्य करून ती गंगाद्वारीं प्रतीपराजा तप करीत असतां त्याकडे जाते. “ मी तुझी स्नुषा होईन” असें वचन देते. [ २७- ३५ ]· प्रतीपास शांतनु ( महाभिष ) पुत्र होतो. तो वयांत आल्यावर त्यास राज्याभिषिक्त करून गंगेचें वचन सांगून तपोवनास जातो. [ ३६ ४४ ] शांतनु मृगयेस जातो. स्वप्नांत त्यास गंगा भेटते. “ मीं केलेल्या कामास तूं दोष दिला असतां मी निघून जाईन” अशा करारानें गंगा त्याची स्त्री होते. [ ४५-५६ ] गंगा सात पुत्र उदकांत बुडविते. आठवा बुडवीत असतां राजा निषेध करितो. ती रागावून जावयास निघते. “ आपव ( वसिष्ठ ) ऋषीची कामधेनु द्युनामक वसूनें हरण केल्या मुळें,मनुष्यलोकीं जन्म घ्याल इ.’ वसिष्ठानें अष्टवसूंस शाप दिला. तेच माझे पुत्र झाले.

त्वकर उद्धार होण्याकरितां मी त्यांस गंगेंत टाकिलें, असें आत्मवृत्त राजास सांगते. आठवा पुत्र घेऊन निघून जाते. [ ९७–७०] नंतर एकेदिवशीं शांतनु मृगयेस गेला असतां गंगा पुत्रासह त्यास दर्शन देते. पुत्रास ( देवव्रत ) त्याच्या स्वाधीन करून निघून जाते [ ७१—१०० ] देवव्रतास यौवराज्याभिषेक. राजा यमुनातीरीं गेला असतां सत्यवतीस पाहतो. तिच्या स्वरूपास मोहित होतो. राजा तिच्या पित्याकडे जाऊन आपला हेतु कळवितो. तो हिच्या संतस राज्य असावें असें कळवितो. त्यामुळें खिन्न होऊन राजा परत येतो. हें देवव्रतास समजल्यावर तो त्याच्या अटी कबूल करून बापास सत्यवती आणून देतो. देव संतुष्ट होऊन त्यावर पुष्पवृष्टि कारितात व त्यानें नांव "भीष्म" असें ठेवितात. शांतनु संतुष्ट होऊन "तूं स्वच्छंदमरण होशील" असा आशीवार्द देतो.

**इक्ष्वाकुवंशज महा- भिष राजा सांगराजसूयशतें ॥**
**हयमेधसहस्त्रेंही जोडी दुर्लभ सुरांहि जें यश तें ॥ १ ॥**
**तो नृप झाला स्वर्गी बहुमान्य सुरांसि सुकृत साधूनी ॥**
**ब्रह्मसभेसि वसविला होता तत्रत्य[1]सर्व साधूंनीं ॥ २ ॥**
**विधिदर्शनार्थ गेली ब्रह्मसभेप्रति सरिद्वरा[2] गंगा ॥**
**तों तदुरोंचल[3] उडवुनि मारुत उघडें करी तिच्या अंगा ३**
**सर्व अधोमुख झाले पाहे नृप तो तसाचि गंगेतें ॥**

१ तेथील. २ नद्यांत मुख्य. ३ तिच्या हृदयावरील पदर.

जाणे द्रुहिंण महाभिष मन तद्रूपीं क्षणार्ध रंगे तें ॥४॥
ब्रह्मा ह्मणे नृपा नर- लोकीं जा घे सुजन्म, थापटुनी ॥
भुज, जिंकिलें न कोणी ज्ञानाऽसि-विनाचि मन्मथा पटुनी
जाणूनि अहित केवळ ज्यांहीं त्यजिलेंचि विषय-मद्यजनीं
ते साधु सत्यलोकीं राया होताते योग्य मर्द्यजनीं ६ ॥
भोगुनि विषय विटोनि स्वर्गातिला पावसील विषयमते ॥
राया कळो तुज अमृत अनुग्र, कीं विषयँ उग्र विष यम ते
स्वमनीं ह्मणे महाभिष आत्मा शुद्ध प्रतीपभूपाचा ॥
व्हावें तत्सुत,आश्रय योग्य पयोराशिचा न कूपाचा ८
परते तेथुनि गंगा त्याचि नृपातें मनांत रेखूनी ॥
मार्गीं पुसे वसूंतें तद्वृत्त, तयां सखेद देखूनी ॥ ९ ॥
वसु ह्मणति वसिष्ठातें नमन नकेलें ह्मणूनियां शाप ॥
व्हा योनिसंभव असा दिधला अत्यंत पावलों ताप १०॥
तूं देवि मानुषी हो आह्मां त्वत्कुक्षिमाजि जन्म हित ॥
अन्योदरवास नसो भगवति भवदुदरंवास सन्माहित ११

---

१ ब्रह्मदेव. २ ज्ञानरूप खड्गा वांचून. ३समर्थांनीं. ४विषय हेंच मद्य. ५ माझ्या पूजेला. ६ विषयासक्त बुद्धि ज्याची अशा राजा. ७विषय हे उग्र विष व यम आहेत. किंवा अनुग्र अमृत आहेत हें तुज कळो. ८ मोठा जलसंचय.९ तुझ्या उदरां-त १० तुझ्या उदरांत राहणें. ११ सन्मान्य.

गंगा पुसे तयांला तुमचा होईल कोण हो कर्ता ॥
वसु सांगती प्रतीप- क्षिति-पति-सुतशांतनु क्षमाभर्ता १२
गंगा ह्मणे करीन प्रिय तुमचें त्याहि नृपतिचें इष्ट ॥
धर्मयशस्कर जें जें कर्म स्वीकारितीच तें शिष्ट ॥ १३ ॥
वसु ह्मणती जो होइल तो तो सुत निजजळांत बुडवावा
त्वां क्षिप्र विप्र-सत्तम- दत्ताऽस्मच्छाप-ताप उडवावा १४
स्वःसिंधु ह्मणे वसु हो ऐसेंचि असो, परंतु मत्संगा ॥
पावुनि नृप न निवाला या पात्र न अपयशासि हो गंगा१५
वसु ह्मणति सर्व देऊं स्वाष्टमतेजोंऽश एक सुत राया ॥
होईल सेतु केवळ नष्टात्मज-शोक-सिंधु उतराया ॥ १६ ॥
ऐसा निश्चय केला गंगाद्वारीं मग प्रतीपातें ॥
पाहे गंगादेवी मूर्तिमती पूरु-वंश-दीपातें ॥ १७ ॥
नृप जप करीत होता तों त्याच्या ती हळूच निष्पंकीं ॥
अतिरुचिरांगी गंगा बसली जाऊनि दाक्षिणीं अंकीं ॥१८
तीतें कल्याणि तुझें प्रिय काय करूं असें पुसे राजा ॥
गंगा ह्मणे करावा स्वीकार, त्याग न करिजे माजा ॥१९
भूप ह्मणे हें न घडे असवर्णा तूं शुभांगि परदारा ॥

---

१ पृथ्वीपति. २ द्विजश्रेष्ठ वसिष्ठानें दिलेला आमचा शाप त्याचें दुःख. ३ आह्मांपैकीं प्रत्येकाचा आठवा तेजाचा अंश यांहीं करून झालेला. ४ मृत पुत्रांचा जो शोक त्याचा समुद्र. ५ पापरहित. ६ फारसुंदर शरीराची. ७ परजातीय.

मज ठावें नरकाच्या जातोचि परांगनेच्छु नर दारा २०
गंगा ह्मणे अनिंद्या दिव्या मी, मत्प्रसंग न विटाळी ॥
भज मज, येतां असुलभ वस्तु करा त्यांसि कोण कवि टाळी
नृपति ह्मणे तरि ह्मणतों स्वकरा हा दिव्यलाभ याना मी
अंकीं जरि कल्याणी प्रथमचि तूं बैसतीस या वामीं २२
अंक स्नुषा-सुतांला दक्षिण, योग्य स्त्रियांसि वाम हित ॥
सोसूनि विलंबातें हो सूनचि, पथ नव्हे नवा माहित ॥२३
गंगा ह्मणे बहु बरें तुमचा आत्मा कुमार जो भावी ॥
त्याच्या तरि वामांकीं हे सून यथाभिलाष शोभावी २४
पावेल पति सुगतिला वर्तेन असेंचि साधु बहुधा मी
पा( साधुअसाधु किमपि न ह्मणावें, हित करीन बहु धामीं
ह्मणतां अवश्य झाली गुप्त सती क्षिप्र, ती परायास ॥
प्राप्त्यर्थ न करितांचि स्वमुखें प्रार्थी प्रतीपरायास ॥ २६
पुत्रार्थ यज्ञ केले आर्जविले अमर विप्र, ती परते ॥
त्यापासून तपीं स्त्री सह कुळ-सारसरवि प्रतीप रते २७
पोटासि महाभिष नृप आला, झाला कुमार बहु रुचिर ॥
बहु वृद्धपणीं फळला विधिं करितां परम उग्र तप सुचिर

---

१ त्या वस्तूला. येथें वस्तुशब्द नपुंसक लिंगी समजावा. २ डाव्या. ३ बरें वाईट. ४ फार प्रयत्न. ५ तेव्हांपासून. ६ कुळ हेंच कमळ त्याचा सूर्य. ७ दैव. ८ फार वेळ.

कुळ शांत जाहलें तें जन्मुनि विस्तारिलें ह्मणूनि सुता ॥
शांतनु ऐसें ठेवी नृप नांव[१] यशें दुधाचियाहि उता २९ ॥
धन्य प्रतीप राजा भासे जोडाचि शांतनु रवीतें ॥
होतें शोकतम मनीं कीं झाला वंश शांत, नुरवी तें[२] ३०॥
सुत यौवनस्थ होतां पूर्वकथा भूप त्यासि तो कानीं ॥
सांगोनि ह्मणे तैसी स्वप्नींहि न पाहिलीच लोकांनीं ३१
भेटेल तुला तनया धन्य कराया स्वयेंचि ती महिला[३] ॥
मजपाशीं वर वरिला आहेचि, तिला भजें दुज्यां[४] महिलां[५]॥
जें ती करील तें त्वां सर्व सहावेंचि रुक्ष[६] न वदावें ॥
प्रेम तुटतांचि जाइल तेंचि[७] करीं तीस नित्य नव दावें[८] ३३
हा वाल्हीक अनुज हें राज्य तुझें घे करीं, करीं अवन ॥
भवन हित नव्हे आह्मां हित कुरुकुळजांसि या वयांत वन
समजावुनि शांतनुला जाय जसा ज्येष्ठपुत्र देवापी[९] ॥
किति राज्य दे तपस्या सुख अमृताचीहि तें न दे वापी
बहु महिमा शांतनुचा स्पर्शे ज्या ज्यास तो सकारुण्य ॥
त्या त्या जीर्णांसि[१०] पुन्हा तत्काळ प्राप्त होय तारुण्य ३६
तो मृगयाशीळ नृपति एकाकी सुरसरित्तटीं धन्वी[११] ॥

---

१ नाम, पक्षीं दोष. २ तें शोकतम. ३ स्त्री. ४ दुसरीला. ५ पृथ्वीला. ६ कठोर. ७ प्रेमच. ८ दावें. ९ देवापि, शान्तनु व बाल्हीक हे प्रतीपाचे तीन पुत्र. १० ह्मातारा. ११ धनुर्धर.

होता तों एकांतीं तेणें दूरूनि देखिली तन्वी ॥ ३७ ॥
सेविति आमरण सदा यतिपति जे परम शांत नुसतीतें
निरुपम तनु प्रकटितां कां हो न भुलेल शातनु सतीतें ३८
नृपति ह्मणे तूं कोण त्रिभुवन-सौंदर्य-मूर्ति रुचिरतमी ॥
रूपीं लुब्ध चकोरचि झालों त्वन्मुखसुधांशु-रुचि-रत मी
वद सुदति या वनीं कां मी तों भूप प्रतीप-सुत धन्वी ॥
भ्रमतों असाचि मृगया--शीळ वनीं सांग कोण तूं तन्वी४०
वर मागतों तुला तव शृंगारामृतरसांत मज्जाया ॥
दे दान हें उदारे हो होउनि सुप्रसन्न मज्जाया ॥ ४१ ॥
गंगा स्मित करुनि ह्मणे राया होईन मी तुझी भार्या ॥
परि अप्रिय न करावें दूषुनि माझ्या शुभाऽशुभा कार्या ॥
विप्रिय करितांचि नृपा जाईन, असें रुचेल तर हे मी ॥
स्त्रीरत्न योग्य अंकीं बसवावें जेंवि रत्नवर हेमीं ॥४३॥
तें मान्य करी राजा जेव्हां दे यास दान वपु राणी ॥
या त्यांत रस जसा मन रसिका दे त्या सदा नव पुराणीं
झाले सुत आठ तिला त्यांत उपजतांचि बुडविले सात ॥
त्यागभयें नृप साहे जरि संततिचा असा करी घात॥४५॥

---

१ प्रवाहरूपिणी अशा गंगेला. २ अतिसुन्दर. ३ तुझें मुख हाच चन्द्र त्याचा कान्ति तींत मग्न. ४ बुचकळ्या मारण्यास. ५ माझी स्त्री. ६ उत्कृष्ट रत्न. ७ स्वर्णावर. ८ आपला त्याग करील या भयानें.

सुत आठवाहि होतां नृप पावे पुत्र-शोक-कष्ट महा ॥
नकरीं कुळघात ह्मणे एकतरि असो कुमार अष्टम हा ४६
त्वां न सुत, पति बुडविला, झालों सुत-शोकं-पावकीं तप्त॥
यासिहि बुडविसि काय क्रूरे ते बुडविले जसे सप्त ॥४७॥
देवी ह्मणे नृपा तुज पुत्र प्रिय, मी नव्हें प्रिया युक्त ॥
हा सुत घे, जातें, त्वां विप्रिय केलें न रक्षिलें उक्त ॥४८॥
विप्रिय करूनि माझें त्वां मत्सहवास-समय सम्पविला ॥
ऐसें वदोनि गंगा- देवीनें तो नृपाळ कम्पविला ॥ ४९ ॥
मग कथिलें मी गंगा, सुत हे वसु, आपवें दिला शाप ॥
केले विमुक्त, नाहीं केलें त्वत्सुत वधूनि म्यां पाप ॥५०॥
वसुशापाचें कारण पुसतां गंगा ह्मणे असें झालें ॥
एका वसुच्या चित्तीं स्वस्त्रीचें दुष्ट बोलणें आलें ॥५१॥
हरिली वसिष्ठमुनिची धेनु श्रीनन्दिनी स्व-बळ-दर्पें ॥
मग शापिलें डसावें पुच्छ तुडवितां पदें जसें सर्पें ॥५२॥
जन्मा मनुष्यलोकीं ऐसा सर्वांस शाप, त्यांत नृपा ॥
सत्वर सुटाल जन्मुनि असि केली कवळितांचि पाय कृपा
जेणें केलें मुनिचें धेनु-हरण तो द्युसंज्ञ हा याला ॥
ऋषिचा वरप्रसाद प्रणति करुनि विनवितां असा झाला
राहेल हा द्युनामा नरलोकीं बहुतकाळ, परि हार ॥
होईल सज्जनांचा प्रणतार्तींचा करील परिहार ॥ ५५ ॥

१पुत्रशोक हाच अग्नि. २ वरुणपुत्र वसिष्ठानें. ३ द्यु या नांवाचा वसु. ४ शरणागतांची पीडा.

शास्त्रनिपुण धर्मात्मा पितृभक्त ब्रह्मचर्यपर महित ॥
होइल लोकीं जोडुनि कीर्ति, कुळाचें करील परम हित५६
नेतें शिशुला, मग हा येईल त्यजिल न वसु धामातें ॥
वसु भुलविला पति ह्मणुन हे देउं शाप न वसुधा मातें ॥
दायिता गेल्यावरि तो हस्तिन-पुर-नाथ शान्तनु भाज्य ॥
क्रतु दान धर्म साधी श्रीरामासारिखें करी राज्य ॥५८॥
वेदांनीं कथिलीं तीं करि कर्में ब्राह्मणांसि दे दानें ॥
वर्षें छत्तीस नृपति कण्ठी गंगा-वियोग-खेदानें ॥ ५९ ॥
गंगातटासि मृगया- व्यासंगें जाय एकदा भूप ॥
तों स्तब्ध अल्पाहि दिसे तोय, ह्मणे कां इचें असें रूप॥
भूप ह्मणे जाणविला प्रियविरह क्लेशहेतु दुष्करसा ॥
गंगाहि माद्वियोगें झाली मत्तुल्य काय शुष्करसा[1] ॥६१॥
करुनि विचार पहातां सर्वत्र कुमार पटु धनुष्पाणी[2] ॥
दिसला, यत्कृतमार्गण-[3] सेतूस्तत्र तें तसें दिसे पाणी ६२॥
झाला अदृश्य सत्वर दिव्याकृति जेधवां कुमारमणी ॥
सुतआठवुनि नृपें ती विनविलि जसि शंकरें उमा रमणी ॥
दुर्लभ दर्शन तनयहि द्याया ती आपणासि[4] तरुनि करें ॥
सुत धरुनि ये, जिचें यश गावें सन्तानकादितरुनिकरें[5]६४॥
आली निववायाला सस्मित देवी जसी नवसुधा हो ॥

---

१ शुष्क झाला रस जीचा ती. २ हातांत धनुष्य घेतलेला. ३ ज्यानें केलेल्या बाणांच्या सेतू मुळें. ४ आपल्या प्रवाहाला. ५ सन्तान या नांवाचा वृक्ष ज्यांत मुख्य अशा देववृक्षांच्या समूहानें.

दर्शन होतांचि दिसों सहसा दे वीजसी न वसुंधा हो ॥
गंगा ह्मणे अहो जी तुमचा हा पुत्र आठवा याला ॥
न्या स्वगृहीं मज समयीं यातें पाहूनि आठवायाला ६७॥
हा शिष्य वसिष्ठाशीं भृगुरामाशीं हि सम, न वेदांत ॥
शास्त्रांत उणा, आधीं या आले वेद मग नवे दांत ॥
गुरु शुक्र नीतिशास्त्रीं पटु भटपाति शक्रसम रवि खरा या
लाजे, कीं सुकुशळ हा बहु शरकरें करुनि समर विखरा या
म्यां देवव्रत ऐसें याचें अन्वर्थ ठेविलें नाम ॥
ने पुत्ररत्न शोभे येणें कुळदीपकें तुझें धाम ॥ ७० ॥
देऊनि सुतरत्न करीं घेऊनिपतिचित्त चित्त ती गेली ॥
नेत्रोदकें तियांच्या गंगा गंगातटीं नवी केली ॥ ७१ ॥
पुत्रासि पुरीं नेऊनि शान्तनु दे यौवराज्यपद त्यातें ॥
सामात्य पौर झाले वश त्या प्रिय, पथ्य, सत्य,वदत्यातें
सत्पुत्रें सर्व भर स्वशिरीं घेतां प्रतीपसुत हर्षें ॥ ॥
नेता झाला घटिका चार तशीं चार उपरि त्या वर्षें७३
यमुनातीरवनीं तो गेला होता सुभूषित सुवासा ॥
तेथें नृपासि मारुत भेटे न्हाऊनि आणुनि सुवासा ॥७४॥
सत्यवतीनिकट नृपा नेलें गंधें तदंगसम्भूतें ॥
जैसें तपोबलें मन वेधूनि उमासमीप शम्भूतें ॥ ७५ ॥

१ पृथ्वी. २ शर हेच कर. ३ पसरण्यास. ४ देवाप्रमाणें ज्याचें व्रत तो. ५ अर्थास अनुसरून. ६ उत्तमवस्त्र परिधान केलेला.

चेतो-हर-गंधाढ्या ती ह्मणतों दिव्य पद्मकलिका मी ॥
घेउनि सुवास धांवत गेला जो रसिक तोहि अलि कामी
यमुनातीरीं कन्या सत्यवती सुतनु देखिली भूपें ॥
गमली ती भूमिगता साक्षाद्देवीच अद्भुतें रूपें ॥ ७६ ॥
पुसतां सांगे कन्या रत्न न वद्वे त्रपाभरें तरि तें ॥
धर्मार्थ वाहतें पितृ वचनें मी दाशपतिसुता तरि तें ॥ ७७
चित्तीं ह्मणे नृप अहा चवरी ती झाडणीच कीं केली ॥
मोळविक्यानें काष्ठें फोडाया असिलता वनीं नेली ७८
भरली मनांत नवरी मागाया दाशपतिकडे गेला ॥
मग त्यास स्वमनींचा अर्थ श्रुत आपुल्या मुखें केला ७९ ॥
दाशपति ह्मणे आहें जातीनें मी नव्हें नवा हीन ॥
द्यायाचीच सुता वर- रत्नपदीं तीस कां न वाहीन ८०
परि आहे मच्चित्तीं तो राया एक काम पुरवा हो ॥
सद्वर-लाभ-सुखाऽमृत- पूरीं माझें प्रकाम पुर वाहो ८१ ॥
वद काम काय देऊं भूप ह्मणे, दाशपति वदे वाचा ॥
तुजमागें नृप हो जो होईल इला कुमार देवांचा ॥ ८२
स्मर-हत जरि नृप निर्मळ परि मेळविलें मळों न दे यश तें
गेला पुरासि कीं तो न सुता देइल वळोन देयशतें ८३

१ मनोहर सुगन्धानें सम्पन्न. २ लज्जातिशयानें. ३ उत्तम वराच्या लाभापासून जें सुख हेंच अमृत त्याचा पूर. ४ राजाचा. ह्म. तुझा ५ शम्भर देणग्यांनीं. ६ कोळयांचा राजा.

भूप ह्मणे हा करितो मृग न धरुनि भीड काम यांमातें
सुखवील तीच मात्रा नाशुनि त्हृत्पीडकामया मातें ८४॥
गांगेय पित्यासि पुसे दिसतां कृश हरिण काय हो तात
कारण चितारोगें जन ऐसे क्षीर्णकाय होतात ॥ ८५ ॥
चिंता काय जया तुज धरुनि शिरीं सर्व भूप पादरजा ॥
भावें उपासिती सुर शक्रासि तसे सदैव सादर जा ८६॥
व्याधि कळोंद्या त्याची क्षिप्र करीन प्रतिक्रिया देवा ॥
अस्वस्थ सर्व झाले तुमची स्वर्वल्लि ज्या जना सेवा ८७॥
राय ह्मणे काय वदों वत्सा देवव्रता तुज पहातों ॥
तेंव्हांचि पावतों तट चिंतापूरीं सदैवहि वहातों ॥ ८८ ॥
एक अपत्य जया तो अनपत्यचि त्यांत नित्य तूं शस्त्री
लोकहि अनित्यवाटे करिजे रक्षावया स्वदेश स्त्री ८९ ॥
जें पूर्वजीं मिळविलें करिसिल तूं वाढवुनि जतन यश तें
तूं स्वसमचि बा ध्यावें कुशळें एकाहि तूज तनय-शतें ९०
काळप्रवाह दारुण नेणो होईल चलन सेतूतें ॥
हें दुःखाचें कारण गांगेया पाठिबळ नसे तूतें ॥ ९१ ॥
पितृवचन श्रवण करुनि देवव्रत पितृसखा अमात्यातें ॥
गुरु-चिंताहेतु पुसे तो सांगे सर्व सत्तमा सातें ॥ ९२ ॥

---

१ प्रहराला. २ हृदयास पीडा करणारा रोग त्यास. ३ पांडुरवर्ण. ४ कृशशरीरी. ५ निवारणोपाय. ६ कल्पलता. ७ शस्त्र धरणारा. ८ आपल्या सारखा. ९ पित्याचे मित्र. १० अधिक सज्जनाला.

वृद्धाऽमात्यें कथितां तातप्रिय दाशपतिकडे तूर्ण ॥
सार्य नदीसुत गेला कार्य पित्याचें करावया पूर्ण ९३
लंघी जेंवि गयेच्या बुध तो गुरु-चित्त-रंजनाश पथा ॥
दाशवरोक्त शिरीं घे करि तत्संदेह-भंजना शपथा ॥ ९४
पुनरपि दाशपति ह्मणे त्वदपत्याचें परंतु भय वाटे ॥
कीं राज्यलोभ दारुण या ग्रीष्मीं स्नेहनीतिनद आटे ९५
गांगेय ह्मणे त्याजिला स्त्रीसंग सशंक दाशवर ज्यांत ॥
अनृत वदेन तरि गळो हें न रणमखीं कदा शव रजांत ९६
करितां अशी प्रतिज्ञा दाशपति ह्मणे दिली सुता साधो
या धर्में त्वाञ्चिंतित सर्वहि पितृभक्त संस्तुता साधो ॥ ९७
त्या समयीं ऋषि-सुर-गण करुनि कुसुम-वृष्टि ह्मणति हा भीष्म
हा विषय-वासना-सरि- दंतकतेजाचि केवळ ग्रीष्म ९८॥
तो सत्यवतीस ह्मणे चाल असो तात-चित्तमहिं, माते ॥
वर्णिति नभीं पहा ऋषि देव तुझा अतुळ-भाग्य-महिमा ते
दिधली सुदुर्लभा त्या सत्पुत्रें त्या पित्यासि सत्यवती ॥
स्वच्छंदमृत्यु हो असि आशी तातेंहि त्यासि सत्यवंती १००

---

१ अमात्यादि आर्यजनासह. २ पित्याचें मनोरंजन इच्छिणारा. ३ त्याचा संशय जाण्या करितां. ४ या राज्यलोभरूपी ग्रीष्मांत. ५ स्नेह व नीति हींच उदकें त्यांचा नद. ६ उत्तम स्तविलेला. ७ विषयवासनारूपनदीचा नाश करणाऱ्या तेजाचा. ८ उत्साह दे. ९ खरी. १० कोळ्यांचा राजा.

# अध्याय १४वा.

## सारांश.

[ १-१९ ] शांतनूचे सत्यवतीपासून झालेले दोन पुत्र चित्रांगद व विचित्रवीर्य ह्यांपैकीं पहिला गंधर्वाबरोबर लढत असतां मरण पावल्यावर विचित्रवीर्य राजा होतो. काशीराजकन्या अंबिका व अंबालिका यांशीं त्याचा विवाह. अतिविषयसेवनानें क्षयरोग होऊन तो मृत्यु पावतो.

सत्यवतीसुत पहिला चित्रांगद जेंवि रात्रिकांत नव ॥
सुखकर दुसरा झाला त्या नांव विचित्रवीर्य शांतनव १
शांतनुनृप भीष्माच्या हातीं तें पुत्रयुग्म दे हानें ॥
गेहातें देवाच्या जातां काळांचिया स्वदेहातें ॥ २
भीष्में राजा केला चित्रांगद तो अतीव अभिमानी ॥
काय कथा मनुजांची असुरांसि दिवौकसांसिहि न मानी
यातें गंधर्वाधिप चित्रांगद कपटपाटवें मारी ॥
तीरीं सरस्वतीच्या वर्षत्रय युद्ध करुनियां भारी ॥ ४

१ चंद्र. २ शांतनुपुत्र. ३ याचा संबंध 'हातीं' या शब्दाकडे आहे. ४ देवांस. ५ गंधर्वांचा राजा चित्रांगद. ६ कपटयुक्तीनें.

शांतनवें मातृमतें  विधिनें देवोनि पितृपद भ्राता ॥
बाळा विचित्रवीर्या  दिधली नयशक्तिही अदभ्रां[1] त्या ५
होतां विवाहदीक्षा-  योग्य भ्राता नदीज[2] तो कानीं ॥
काशिपसुतास्वयंवर[3]  परिसे कथितां स्वदूत लोकांनीं ६
वाराणसीस जाउनि  काशिपतिसुता तिघीहि भीष्म हरी
कन्यार्थि-[4] युयुत्सु-[5]समर-  निपुण[6]नृपति-कुंजरांत[7] होय हरी ७
बहु भूप भग्न[8] केले  परि मागें शाल्व लागला एक ॥
जाणों महोरगावरि[9]  गेला धांवोनि मातला भेक ॥ ८ ॥
तो विरथ मात्र केला आवरिला घातकाम[10] हात रणीं ॥
तेजचि खद्योताचें  हरिल, करिल घात कां महा तरणी ९
भगिनी सुता सुनाशा  त्या नेल्या निजगृहासि शांतनवें
त्याचें जन्मापासुनि  सदय विमळ चित्त न प्रशांत नवें १०
लग्नोपक्रमसमयीं[11]  ज्येष्ठा अंबा ह्मणे मला न वरा ॥
नवराजीवाक्षहि[12] हा  नलगे मज,शाल्व मानला नवरा ११
माझा मज्जनकाचा  शाल्वाचाही विचार हा निकर[13] ॥
क्षय मन्मनोरथाचा  करितां हें कर्म धर्महानिकर ॥ १२

---

१ पुष्कळ. २ नदीपुत्र भीष्म. ३ काशीराजाच्या मुलींचा विवाह. ४ कन्या इच्छिणारे. ५ युद्ध करण्यास इच्छिणारे. ६ युद्धकुशल. ७ राजे हेच गज. ८ पराजित. ९ मोठ्या सर्पावर. १० घात इच्छिणारा. ११ विवाहारंभाच्या वेळीं १२ नवीन कमळासारखे नेत्र ज्याचे तो. १३ निश्चय

पाठविली माघारी अंबा कथिलें तसेंचि साधूंनीं ॥
बंधूस अंबिकेसह दिधली अंबालिकाहि साधूनी ॥ १३
नृप कामात्मा झाला लावण्य प्रेम अतुल दोघींचें ॥
वाहे शृंगाररसीं तन्मानस जोंवि पुष्प ओघींचें ॥ १४॥
स्त्रीविषय सात वर्षें रात्रदिवस भोगितां न तो धाला ॥
झाला वश कामाच्या अहिता न हिता स्वकीय बोधाला
देहज यक्ष्मा त्याला खाय, जसा आश्रयाश आहुतिला॥
जी राजकांति होती लेशहि नुरवीच रोगराहु तिला १६
न चुकेचि भावि, चुकतें तरि मृत्यु न व्हावयासि कामरणं
करिताचि भीष्म, येतें मग त्या मध्यम वयांत कां मरण१७
सत्यवती साऽश्रु ह्मणे गेला टाकुनि सकार्य गेहा हा ॥
लोकांत मंदभाग्या मीच करूं यत्न काय गे हा हा ॥ १८
चिंताशोकव्याकुळ भीष्माहि मुकला क्षण स्वभावाला ॥
करवूनि पारलौकिक कारि सद्गति समुचित स्वभावाला१९

# अध्याय १५ वा.

## सारांश.

[ १-१८ ] सत्यवती भीष्मास वंशोत्पत्ती करितां विवाह कर-

---

१ साध्य करून. २ रोग. ३ अग्नि. ४ राजाचें तेज,पक्षीं चंद्राचें तेज. ५ घोर युद्ध. ६ सदेह. ७ उत्तर क्रिया. ८ योग्य. ९ स्वबंधूला.

ण्यास सांगते. तो तें अमान्य करितो व परशुरामानें निःक्षत्र पृथ्वी केली असतां क्षत्रियांच्या स्त्रियांनीं ब्राह्मणांपासून वंशवृद्धि केली, तोच मार्ग विचित्रवीर्याच्या स्त्रियांनीं स्वीकारावा असें सांगतो [ १९-५८ ] सत्यवती आत्मवृत्त सांगून भीष्माच्या संमतीनें व्यासास विचित्रवीर्याचे स्त्रियांस पुत्र देण्यास सांगते. व्यासापासून अंबिकेला धृतराष्ट्र, अंबालिकेला पांडु व त्यांच्या एका दासीला विदुर असे तीन पुत्र होतात. [ ५९-७८ ] विदुर यमधर्माचा अवतार. त्याची कथा. मांडव्यशाप. [ ७९—२३ ] भीष्म पाण्डूला राजा करितो. गांधारदेशचा राजा सुबळ याची कन्या गांधारी व धृतराष्ट्र यांचा विवाह.

दीना होउनि देवी सत्यवती पुत्रशोकतापानें ॥
भीष्मासि ह्मणे साधो रक्षावें कुळ तुवां अपापानें ॥ १
धर्मे त्वन्माता मी धर्मज्ञा धर्मसेतु रक्षाया ॥
कथितें तें मान्य करीं स्त्रीकारीं स्त्री, स्वधर्म रक्षाया २
मी गुरु मदुक्तिनें या स्त्रीस्वीकारीं नसे तुला पाप ॥
आपद्धर्म[1] असे हा बा पद गुरुचें वरीं हरीं ताप ॥ ३ ॥
स्वजना हो तृप्ति तुझ्या ठायीं, जैसी शिलीमुखां[2] बकुळीं
कुरुकुळगृह न खचावें याला आधार तूंचि खांब कुळीं ४
भीष्म ह्मणे माते त्वां धर्मचि कथिला परि प्रतिज्ञा ते ॥

---

१ महासंकटाच्या वेळचा धर्म. २ भुंग्यांना.

असाज्य, भीति सत्य भ्रंशासि, न बहु अरीप्रति ज्ञाते ॥ ५
भ्यां ब्रह्मचर्यसुव्रत- नियम स्वसुखें त्वदर्थ जो केला ॥
देह त्याज्य परि न तो त्याज्य,न सेवील सुज्ञ ओकेला॥६॥
त्यजितील पंचभूतें स्वगुणांसि, रवि च्छेवीस सोडील ॥
शीतत्वातें चंद्रहि शक्रहि करातिक्रमासि तोडील ॥७॥
उष्णत्व त्यजिल दहन मर्यादेतेंहि सिंधु सोडील ॥
धर्मपर धर्मराजाहि सद्धर्मप्रीतिलाहि तोडील ॥८॥
परि हा शांतनव तुझा सुत केवळ कृपण मान, सत्य जितां
मेल्याहि न टाकील प्राणांसि न भीतमानस त्यजितां॥९॥
देवी ह्मणे खरें हें सांगाया योग्य होय मी नातें ॥
गंगेचें माझें सम जाणें तुज, सत्यतोयमीनातें ॥ १०॥
भीष्म ह्मणे मज नाशिवे सत्यभ्रष्टत्व, वंश यश राहे ॥
ऐसा विचार शिष्ट- श्रुति-मान्य विचारशील तरि आहे
पूर्वी पितृवध-कुपितें रामें स्वीकारुनी स्वगुरुकेली ॥
वधुनि सहस्र-भुजाऽर्जुन असकृत् निःक्षत्रिया धरा केली
क्षत्रिय- वंश बुडाले वधिले जे जे प्रसिद्ध योधे रणीं ॥
पाठीं शिशुहि नुरविले राम ह्मणे क्षत्रहीन हो धरणी १३

---

१ कांतीला. २ बाहुपराक्रमाला. ३ यम. ४ समज. ५ भ्यालेलें मानस ज्यांचे ते. ६ सत्यरूप उदकांतील मासा. ७ सहस्रार्जुनानें जमदग्नीचा वध केला त्यामुळें रागावलेला परशुराम. ८ पितृरंजन. ९ योद्धे.

संतानार्थ शरण मग विप्रांसि क्षत्रियस्त्रिया गेल्या ॥
ज्या केवळचि बुडाल्या संतति, त्यां प्रकट मागुती केल्या
गुरुशप्त[1] उतथ्याचा सुत ममता[2]-कुक्षि-जात दीर्घतमा ॥
होता प्रकाश[3]-मैथुन- दोषी परि आश्रय प्रतोष-शर्मा[4] १५
स्त्रीपुत्रांनीं तो ऋषि त्या दोषें जाह्नवींत वाहविला ॥
संतानाऽर्थ बलिनृपें प्रार्थुनि तो निजगृहांत राहविला१६
या पासूनि सुदेष्णा- राज्ञीला पुत्र जाहला अंग ॥
दुसरा कलिंग, पुंड्रहि, सुह्महि, तैसाचि पांचवा वंग१७॥
ऐसा आपद्धर्म- व्यवहार असे ह्मणोनियां क्षिप्र॥
कोणी विचित्रवीर्य[5]- क्षेत्रीं संतान वाढवू विप्र ॥ १८॥
देवी ह्मणे हित वदसि तूं बा सद्बुद्धिच्या अगारा या ॥
माझ्याहि हितगुजांचें श्रवण करीं सज्जना अगा राया
लज्जा वदों नदे परि चिंतिति ज्याचे पवित्र पाय कवी ॥
श्रीमत्पराशराची पुण्यकथा स्वानुभूत आयकवी ॥ २०॥
व्यासजनन कथुनि ह्मणे प्रदक्षिणा पुत्र मज करी नमुनी
जातां वदे असें कीं स्मरतां येउनि सुखी करीन मुनी २१
येइल तुझ्या मना तरि त्याला या संकटांत बाहेन ॥
संतति-चिंता[6]-शमन प्रार्थुन त्या मुनिवरास पाहेन ॥ २२

---

१ बृहस्पतीनें शापिलेला दीर्घतमा. २ उतथ्याची स्त्री ममता तिच्या उदरांत झालेला. ३ दिवसा स्त्रीसंग करणारा यामुळें दोषी. ४ संतोष व शांति यांस. ५ विचित्रवीर्याचे स्त्रियांचे ठायीं. ६ वंशवृद्धीविषयीं जी चिंता तिचें शमन.

भीष्म वदे पडतां तें कानीं नमुनि वरदास, विश्वासं ॥
धाया स्मर, रक्षिल तो कानीन मुनिवर दासं-विश्वास २३
स्मरतांचि दर्शन दिलें मातेला ईश्वरें पराशरजें ॥
वाहति माथां ज्याच्या चरणांचीं शुद्धधी पराशं रजें २४
येतांचि धांवला हो पाहत होताचि वाट पान्हा तो ॥
जाणों ह्मणति मिथःस्तन- दृष्टि क्षीरें न आटपा न्हातो २५
शिंपुनि कमंडलु-जळें मग आधीं दर्शनेंचि निववीली ॥
शोकवियोगदवार्ता त्या अमृतघनें पळांत जिववीली २६॥
माता पूजुनि सुखवी पुत्रातें तोहि नमुनि मातेतें ॥
विश्व पदरजीं लोळे परि तिलमात्रहि न तेज मातेतें २७
मातेसि पुसे इच्छा वरद श्रीव्यास जेंवि संतान ॥
मागे विचित्रवीर्य- क्षेत्रीं कुरु-कुळ-शिवार्थ संतान ॥२८॥
ताताकडील भीष्म व्यासा मातेकडील तूं शिष्ट ॥

---

१ जगाला. २ लग्नापूर्वीं झालेला पुत्र. ३ दासानें ठेविलेला विश्वास. ४ पराशरपुत्रव्यासानें. ५ निष्पाप बुद्धीचे जन. ६ ईश्वरपदाची आशा करणारे. ७ पान्हा धांवला ह्म० स्तनांतून दुग्धधारा निघाल्या. ८ व्यास मातृपदीं नमन करीत असतां सत्यवतीचे स्तन आणि दृष्टि हीं मिथःह्म० परस्पर ह्मणतात कीं क्षीरें ( दुग्ध, पक्षीं उदकें ) नआटपा. व्यास न्हातो आहे. ९ शोक आणि वियोग हाच दव ह्म० वणवा त्यानें पीडित. १० उन्मत्त होई. ११ कल्पवृक्ष. १२ कुरुवंशाचे कल्याणार्थ.

मृतबंधुचें करावें धर्मार्थ तुह्मीं असेल जें इष्ट ॥ २९ ॥
असतां समर्थ तूं सुर[1]- तरु-गुरुवरचरण-रेणु देवरं[2] हा ॥
या त्वत्प्रजावर्तीनीं[3] न ह्मणावें स्वजननींस, दे वर हा ३०
व्यास ह्मणे धर्मज्ञे माते आज्ञा तुझी शिरोधार्या ॥
सांगेन तें करूंदे व्रत वर्षभरी त्वदात्मभूभार्या[4] ॥ ३१ ॥
काली[5] ह्मणे अहा वा होईल अराजकप्रजालोप[6] ॥
आर्तमनांसि[7] महाश्रय आम्रतरूचें लहानसें रोप ॥ ३२ ॥
कौशल्या[8] गर्भातें पावो आतांचि वा विलंब कसा ॥
साहों, अधर्म टपतो लोका मीना गिळावया वकसा ३३
व्यास ह्मणे माते तरि कौशल्या माद्विरूपता[9] साहो ॥
माझी करू प्रतीक्षा ऋतुकाळीं सुव्रता सुवासा[10] हो ॥ ३४
ऐसें सांगुनियां श्री- सत्यवतीच्या पदांऽबुजीं नमुनी॥
तो योगिनृप ईश्वर झाला अंतर्हित[11] क्षणांत मुनी ३५॥
सांगे मुनेसि देवी कुरुकुळ तारावयास भाव्यासीं[12] ॥
वोल, रम, सुतार्थ जशीं रमत्ये बोधार्थ सत्सभा व्यासीं ३६

---

१ कल्पवृक्षाचा मुख्यगुरु आहे, पायांचा रजःकण ज्याचा असा व्यास. २दीर. ३ भावजयांनीं. ४तुझ्या पुत्राची स्त्री. ५सत्यवती. ६ राजा नसल्यामुळें प्रजेचा नाश. ७ श्रमलेल्यांच्या मनास. ८ अंबिका. ९ माझें विलक्षण रूप. १० उत्तमवस्त्रें धारण करणारी. ११ गप्त १२ दिराशीं

झालीच मनें प्रांजळ ती पुत्रास प्रसू[1]न शे[2]य नातें ॥
मोडिति करूनि अंजळि नेतां सून प्रसूनशयनातें[3] ३७ ।
सासूनें शुचिशयनीं सून निजविली धरूनि हनु, कंपा ॥
पावे चित्तीं भीष्मा ये मुनिहि करावयासि अनुकंपा[5] ३८
मुनि-वररवि[6]च्या उदयीं ते कैरविणी[7]च अंबिका झाली
अत्युग्र[4] रूप पाहुनि झांकी तत्काळ लोचनें भ्याली ३९.
त्या साध्वीवरि करुणा केल्यावरि सूनुला[8] पुसे माता ॥
होईल पुत्र कैसा सांग मला सर्व जाणसी ताता ॥ ४०
व्यास ह्मणे होइल सुत नागाऽयुतबळ[9] सभाग्य विदितनय[10]
राजर्षि साधुसत्कृति[11] त्यासहि होतील शत बळी तनय
परि मातेच्या दोषें होइल जात्यंध येवढेंचि उणें ॥
चंद्रीं अंक तसें हें परिपूर्ण परंतु सर्व-साधु-गुणें ४२ ॥
माय ह्मणे माझें मन, जाणुनि होणार नृप अचक्षु[12], भितें ॥
योग्य दुजा सुत द्यावा लंघावें त्वां न हें वच क्षुभितें ॥
मान्य करुनि मुनि गेला अंधचि सुत अंबिकेसि मग झाला
धृतराष्ट्र असें भीष्में संस्कारुनि नाम ठेविलें त्याला ४४
अंबालिकेसिही मग विनवी गेला ह्मणूनि सुतपा हूं ॥

---

१ माता. २ हात. ३ पुष्पशय्येला. ४ भयंकर. ५ दया. ६ ऋषिश्रेष्ठ व्यास हाच सूर्य. ७ चंद्रविकासी कमल. ८ पुत्राला. ९ दशसहस्र हस्तींचे बळाचा. १० नीतिज्ञ. ११ सज्जनांचा सत्कार करणारा. १२ अंध.

त्वांहि न भ्यावें, सिंहा- ऽऽसन-गत बाई तुझाचि सुत पाहूं
तींहि भ्याली मुनिला झाली पांडु क्षणांत कातरता ॥
स्त्रीगुणचि असो दोष न पुरुषाहि त्या भीतिदायका तरता
कृष्ण ह्मणे भ्यां दिधला संप्रति सुंदरि कुमार तुजला जो
तद्वर्ण पांडु नामहि शुचे कर्पूरप्रसूहि तुज लाजो ४७
तेंही पुसतां कथिलें पांडुत्व ह्मणूनि धरुनियां हनुतें ॥
माय ह्मणे वा तिसरा द्यावा त्वां कल्पतरुसमूहनुतें ४८
लाजे हांसे पाहे पायांचिकडे प्रसन्नवदन मुनी ॥
अंब श्रुतिराज्ञा ते ऐसें वोलोनि जाय पद नमुनी ४९ ॥
झाला पांडु तयावरि पहिलीला वासवी तदेव पुन्हा ॥
सांगे आजि मुनिकडे जा येइल मुदित होउंदे वपु न्हा
*ते सांगे दासीला आपण चित्तांत फार भीईस ती ॥
व्यालीसीच गमे मुनि- तनु, रक्षी सासुचीहि भीड सती ५१
त्या प्रभुला टकाव असें कोणीहि न कर्म ठक वि नटलीला
तारात्रया भजे हो, भुलला न सुकर्मठ कवि नटलीला ५२

---

१ भित्रेपणा. २ कापुराला प्रवसणारी. ३ कल्पवृक्षसमूहानें स्तविलेला. ४ हे माते, तुझी आज्ञा मला वेदवचन आहे. ५ वसुकन्या सत्यवती. ६ तेंच. ७ लज्जायुक्त. ८ सर्पीणशी. ९ नटा सारखी लिला. १० अलंकृत झालेलीला.

न्हाया प्रसन्न जोडुनि सजलोत्थितरोम[1] हात पारं[2] मला
दावा ह्मणे भवाचा, तरिच तिसीं तो महातपा रमला ९३
गुरुवरसेवालाभें झाली लोकत्रयीं उजळ दासी ॥
पंक झडोनि गळाला अनुसरतां त्या सु-पुण्य जळदासी
सेवाधर्मं पूजुनि भव-सागरसेतु[3] सुखविला साचा ॥
संपादिला प्रसाद प्रभुचा जो हेतु सुखविलासाचा ॥ ९५
मुनिराज ह्मणे तीतें भावें झालीस आनतं[4] पदासी ॥
तरलीस यावरि न तूं दासी ऐसें न आन[5] तप दासी ९६
होइल सुत धर्मात्मा सर्व-सुमति[6]-पति महायशा, शील ॥
गातिल कवि, महिला कुरु-पतिं[7] करूनि तया सहाय शाशील
केलें मद्वचन हे प्रसवेल सुमेरुतुल्य सुत राई[8] ॥
ऐसें मातेसि कथुनि गेला होउनि मुनींद्र उतराई ॥ ९८
मांडव्याच्या शापें झाला दासीकुमार यमधर्म ॥
विदुर असें नाम तया ठेवुनि गांगेय दे सुबहु शर्म ॥ ९९
शापाचें मूळ असें मांडव्य महर्षि तरुतळीं उग्र[9] ॥
तप करि निजाऽऽश्रम-पद- द्वारींच उभा दिसे स्वयें उग्र[10]
कृश तेजस्वी मौन-व्रत ऊर्ध्वभुज प्रशांत पात्यातें ॥

१ घर्मजलासहित उत्पन्न झाले आहेत रोमांच ज्यांवर ते. २ परतीर. ३ संसारसागराचा सेतु ज्यास. ४ नम्र. ५ अन्य. ६ सर्व ज्ञांत श्रेष्ठ. ७ कुरुपति, तया सहाय करूनि महिला शाशील. ८ मोहरी. ९ भयंकर, १० शंकर.

पातें लावुनि होता ह्मणती मुनि सुर महातपा यातें ६१
कोणा एका नर-पाति- नगरीं चोरी करूनि चोरांनीं ॥
पळतां आश्रम केला आश्रय वांचावयासि तो रानीं ६२
मागोनि लाग लावित नृप-बळ येउनि पुसे तया तपत्या
सांगेल काय मौनी ध्यानस्था एक ठावुकें तप त्या ६३
त्या आश्रमींच तस्कर सांपडतां मुनिहि मानिला चोर ॥
बांधुनि नेतांहि न तो डगमगला शांति साधुची थोर ६४
राजाज्ञेनें शूळीं मुनिहि चढविला परंतु न क्षोभे ॥
तेथेंहि तपस्तेजें एकलतालाग्रगार्कसा शोभे ॥ ६५ ॥
होता तसाचि शूळीं तिळहि न धैर्यप्रताप डळमळला
न ज्ञानदृक्-शतांशहि येउनि देहात्मतापडळ मळला ६६
तापसजनास त्याचा ध्यानीं वृत्तांत तो सकळ कळला
मग खगरूपें रात्रौ येउनि पाहुनि तयास कळकळला ॥
मुनि ह्मणति बा अहा हें काय, प्रख्यात तूं ऋषी वळसा
हा कां क्षेत्रीं सुकृतचि पिकविशि कीं शालितें कृषीवळसा
मांडव्य ह्मणे मुनि हो सुविचारें यासि दंड-कर हा तो

---

१ तप करणाराला. २एकल्या ताड वृक्षाच्या अग्रावर असलेल्या सूर्या सारखा. ३ज्ञानदृष्टीचा शतांश देखील. ४ देहममतारूप आवरण. ५ पक्षिरूपाने. ६ शेतकऱ्या सारखा. ७ दंड करणारा. ८ राजा. ९ तर.

मुख्य न, कृतं भोगावें शांतीशीं, तरिच दंडकें रहातो६९॥
तें वध्य-स्थळ-रक्षकें- वदनें परिसोनि भूप कर जोडी ॥
अभयवरद मुनि उतरुनि मग मूळीं शूळ न निघतां तोडी
तत्प्राणांचा न करी जरि अंतर्गतहि ती अणी कवळ ॥
होता स्वस्थ तपाचें सांगावें काय हो अणीक बळ ॥ ७१
त्याचें प्रख्यात अणी-मांडव्य असेंचि जाहलें नाम ॥
होय परशुराम जसा परशूच्या धारणामुळें राम ॥ ७२
संयमनीप्रति जाउनि धर्मासि ह्मणे मुनींद्र म्यां पाप ॥
काय कधीं केलें रे आलें फळ ज्यास हा असा ताप ॥ ७३
तत्वज्ञ आपणाला ह्मणविसि वद तत्व शीघ्र पितृपा, हूं
मग मत्तपावेळ पहा बोल तुझें आजि सुज्ञपण पाहूं ॥७४
धर्म ह्मणे भगवंता मन ठेवुनि कुतुकसाधनीं तुच्छीं ॥
वा घातली सुई कां बाळपणीं त्वां पतंगिकापुच्छीं ॥७५

---

१कृतकर्म.२मर्यादा.३ वधस्थानरक्षण करणाऱ्या पुरुषांच्या मुखानें. ४ शूल न निघतां मूळीं तोडी ह्म० तो पोटांत शिरलेला शूळ सगळा निघाला नाहीं.तेव्हां तो शूल मुळांत तोडून टाकिला व त्याचें अग्र पोटांत राहिलें. ५ अग्र. ६ ग्रास. ७ संयमनी ही यमाची राजधानी. ८ हे पितृपते यमा. ९ कौतुक करण्यांत. १० मधुमक्षिकापुच्छात,

अपराध अल्प असतां त्वां केला दंड हा असा धूसी[1] ॥
बहुधा असेंचि जीवा, शिक्षावें म्यांचि तुज असाधूसी ७६
हो मानुषदासीसुत हाचि उचित दंड, पूस नय मातें ॥
जें अज्ञपणीं घडलें अघ, आणावें मनांत न यना तें ७७
ऐसा मुनिनें दिधला दासीपुत्रत्वहेतु[2] हा शाप ॥
तो धर्म विदुररूपें संरक्षी कुरुकुळीं जसा बाप ॥ ७८
धृतराष्ट्र पांडु विदुर भ्राते सूर्येंदुवह्नि[3] जेंवि हित ॥
झाले प्रजांसि करिती सर्व सुखें कर्म जास जें विहित ७९
द्वापरं[4] कृतयुग झालें आलें यांतचि समृद्धिचें कथन ॥
ज्ञात-ज्ञेय[5] तिघेही कर्त्यांचें[6] यशचि शत्रुचें मथनं[7] ॥ ८०
धृतराष्ट्र अंध, शूद्री- सुत विदुर, ह्मणोनि राहिले दोघे ॥
भीष्में केला राजा पांडु तदाज्ञा-बळेंचि[8] पद तो घे ॥८१
एका समयीं हर्षें भीष्म ह्मणे स्वाशिवाद्रिच्या[9] भिदुरां[10] ॥
साधो धर्म-रहस्यं-[11] ज्ञान-निधे वासरीं[12] सख्या विदुरा ८२

---

१ धुवून टाकितोस, अर्थात् शिक्षा करून निर्दोष करितोस. २ दासीपुत्र होण्यास कारण. ३ सूर्य, चंद्र, अग्नि. ४ द्वापर कृतयु झाले. ह्म० धृतराष्ट्र, पाण्डु, विदुर हे द्वापरयुगांत जन्मल्या मुळें त्या युगास कृतयुगाची योग्यता आली. ५ जाणलें आहे, जाणावयाची वस्तु ज्यांनीं ते. ६ पराक्रमी पुरुषांचें. ७ नाशक. ८ भीष्माच्या आज्ञेच्या सामर्थ्यानें. ९ आपलें अकल्याण हाच पर्वत. १० वज्र. ११ धर्माच्या सूक्ष्मज्ञानाचा समुद्र. १२ हे वत्सा.

हें कुळ सत्यवतीनें व्यासानें मीहि रक्षिलें कुरुचें ॥
कुळयश वाढवुनि तुह्मीं सुखवा मन या कुळाचिया गुरुचें
म्यां ऐकिलें असें कीं यदुकुळजा कुंतिभोज-नृपकन्या ॥
सुबळसुता, मद्रेश्वर- तनया या सुकुळजा वधू धन्या ८४
संतानार्थ कुळाच्या भार्या तव अग्रजांसि या उचिता
अस्मत्संबंधी ते नृप त्यांची विदित मज असे शुचिता
आल्या मनासि माझ्या, तूं सांग स्वमत, वृद्धिला गोत्र ॥
म्यां त्यांहि पाववावें, योग्यचि तूं हें नव्हे वृथा स्तोत्र ८६
विदुर ह्मणे शिशु आह्मी, तूं माता तात गुरु, करीं हित तें
स्वकुळकथा काय, मुदित जग केलें वा तुझ्या यशें वितते
त्रिप्रमुखें भीष्माला कळलें आराधुनें स्मरहरातें ॥
गांधारी सुबळसुता झालीसे पात्र शत-सुतवरातें ॥ ८८ ॥
धृतराष्ट्रार्थ वराया गांधारीतें नदीसुतें जवनें ॥ ९
त्या गांधारपतिकडे पाठविला दूतवर जसा पवन ८९
वर अंध ह्मणुनि कांहीं पहिली पडली विचारणा परि तो
आला मना, कलंक न चंद्राच्या गुणगणा वृथा करितो
गांधारी स्ववराच्या जाणुनि नेत्रांत अंधकारा ती ॥

---

१ यदुकुळांत उत्पन्न झालेली. २ फार कुलीन. ३ वृद्धी करिता. ४ पसरलेलें. ५ सेवा करून. ६ शंकराला. ७ त्वरेनें जाणारा. ८ अंधत्वाला.

बांधी निजनयनांतें भावी अंधाहि अंधकाऽराती ॥ ९१ ॥
नागपुरीं भगिनीचें शकुनी पूजूनि सूरि दान करी ॥
नगरपथातें पंकिल करिती तद्दत्तं भूरिदानं करी ॥ ९२ ॥
गांधारीनें स्वगुणें गुरुजन पति पोष्यवर्ग तोषविले ॥
नाहींच घेतलें पर- पुरुषाचें नाम परि न रोषविले ॥ ९३ ॥

# अध्याय १६ वा.

## सारांश

[ १—८ ] शूरनामक राजानें, आपला मित्र व आतेभाऊ जो कुंतिभोज यास आपली कन्या दत्तक दिली. तिनें तेथें असतां दुर्वासा ऋषीची सेवा केली. तेणें करून तो प्रसन्न होऊन त्यानें सूर्य, यम, वायु, इंद्र, अश्विनीकुमार या पांच देवांचे मंत्र दिले. व मंत्रजप करितांच मंत्रदेवता साक्षात् प्रकट होऊन पुत्र देईल असें सांगितलें. मंत्राची प्रतीति पाहण्या करितां कुंतीनें सूर्यमंत्राचा जप केला. तत्काळ सूर्य प्रकट होऊन तिला पुत्र झाला. कुमारवयांत पुत्र झाल्यामुळें तिनें लाजेनें तो गंगेच्या स्वा-

---

१ अंधकनामक राक्षसाचा शत्रु शंकर. २ हस्तिनापुरीं. ३ ज्ञाता. ४ चिखलानें युक्त. ५ शकुनीनें दिलेले. ६ ज्यांस मद फार आहे ते. ७ आश्रित, सेवक इ०.

धीन केला. तो अधिरथनामक कोळ्यास सांपडला. त्यानें त्याचें पोषण करून वसुषेण असें त्याचें नांव ठेविलें. [ १८-३९ ] पुढें कुंतीनें पाण्डु राजास वरिलें. मद्रदेशचा राजा शल्य याची भगिनी माद्री ही पाण्डूला भीष्मानें दुसरी स्त्री करून दिली. नंतर पाण्डुराजा दिग्विजय करून हिमवान्पर्वतावर विहारार्थ गेला. भीष्मानें देवक राजाची कन्या पारसवी हिच्याशीं विदुराचा विवाह केला.

---

केला होता शूरें प्रथमांऽपत्य-प्रदान-पण सत्य ॥
स्वइष्ट कराया स्व-जनकें- भगिनी-सुत कुंतिभोज अनपत्य १.
वसुदेवाच्या जनकें पहिली कन्या दिली सख्यास पृथा॥
कीं साधुनें प्रतिज्ञा जाऊं देऊं नये कदापि वृथा ॥ २ ॥
ती कुंती पितृसदनीं कासारीं पद्मिनी जसी वाढे ॥
तों दुर्वासा तेथें ये ज्याचे जाच कडु जसे काढे ॥ ३ ॥
त्या मुनितें ती सेवा करुनि करी सुप्रसन्न देवि द्या ॥

---

१ पहिलें मूल कुंती, इला दत्तक देण्याचा निश्चय. २ आपल्या बापाचा भाचा. ३ संततिरहित. ४ मित्र-कुंतिभोज यास. ५ कुंती. ६ कुंतिभोजाचे घरीं. ७ सरोवरांत. ८ सूर्यविकासिनी कमलिनी-पक्षीं-उत्तम स्त्री. ९ येथें यमका करितां ह्रस्वता स्वीकारिली आहे.

वर मज, असें न मागे, परि तो तीस स्वयेंचि दे विद्या ४
मुनि कुंतीस ह्मणे या मंत्रें ज्या ज्या सुरा बहाशील ॥ ॥
त्या त्या सुरप्रसादें वत्से तत्पुत्र-सुख पहाशील ॥ ५ ॥
सर्व-भविष्य-ज्ज्ञ मुनि- प्रवर असी करुनियां द्या गेला ॥
मग कौतुकें पृथेनें सूर्यागमनार्थ मंत्रजप केला ॥ ६ ॥
एकांतीं गंगेच्या तीरीं जपतांचि दिव्य-मंत्रास ॥
दिसला दिनकर येतां होय चमत्कार हर्ष संत्रास ॥ ७ ॥
येउनि निकट रवि ह्मणे सुंदरि पाचारिलेंशि कां मातें ॥
काय करूं इष्ट तुझें तूं कोणा इच्छितेस कामातें ॥ ८ ॥
कुंती ह्मणे प्रभो मज सेवापरितुष्ट विप्रवर विद्या ॥
देता झाला कुतुकें मी वदलें जरि असेल वरवि द्या॥९॥
विद्याबळ जाणाया पाचारुनि पाहिलें तुह्मां देवा ॥
चुकलें, क्षमा करा हें विद्येचें कृत्य, किति इचा केवा१०
भानु ह्मणे वरदाता दुर्वासा गुरु तुझा मला कळला ॥
फळला कल्पद्रुम तो तद्वर न कधींहि अपयशें मळला ११
भीरु भय त्यजुनि मिठी घालीं माझ्या गळ्यांत वाहूंनीं ॥
दर्शन अमोघ माझें तुज उचित न हा नकार वाहूंनीं१२
बंधुजनापासुनि तूं मुग्धे चित्तीं भिऊं नको मळता ।

१ मंत्रविद्या. २ बोलाविशील. ३ भय. ४ सेवेनें संतुष्ट झालेला. ५ चांगली. ६ पाड. ७ हृ मित्र. ८ फुकट न आधारें. ९ हे सुंदरि

जन कारें बहुकर होतो कां झाणसि आमुचो न कोमळता १३
सत्य प्रिय हित बोलुनि योजुनि अंकीं निवास रमणीतें ॥
घेउनि देउनि अधरा- ऽमृत भोगी रत्न वासरमणी तें १४
झाला सहज-कवचं-मणि- कुंडल-धर तत्क्षणीं रुचिर बाळ
तीहि कुमारी झाली आली जाणो प्रसूतिची आळ १५
रात्रि गेल्यावर तो सुत गंगेच्या घातला तिनें पदरीं
केलें कठिन मन असो पुत्र-फळ,त्याग-मति नव्हे बदरीं १६
तें पुत्ररत्न दिधलें गंगेनें अधिरथासि तद्भार्या ॥
राधा त्यातें पोषी, यास्तव राधेय ह्मणति त्या आर्या १७
त्यांहीं वसुषेण असें पुत्राचें नाम ठेविलें विधिनें ॥
झाला शूर उदार स्तविलें ज्याच्या यशा सुधानिधिनें १८
कुंतीनें पांडु नृपति नृपवृंदांत स्वयंवरीं वरिला ॥
जैसी वरिती झाली देवसमूहीं पुलोमजा हरिला ॥ १९ ॥
दुसरा विवाह व्हावा पुत्राचा हें मनांत आणूनी ॥
मद्रपतिकडे गेला आपण गांगेय योग्य जाणूनी ॥ २० ॥
सच्चरितें सुजनाच्या हृदयीं अमृतेंचि शत्रुच्या शल्यें ॥
सद्विज सामात्य सबळ तो भरतश्रेष्ठ पूजिला शल्यें ॥ २१

---

१ सूर्य. २ जन्माबरोबर उत्पन्न झालेलीं कवच व रत्नकुंडलें धारण करणारा. ३ बोरीचें फळ. ४ अधिरथ हा सूत होता. ५ चंद्रानें. ६ पुलोमा एक ऋषि. त्याची कन्या इंद्राणी. ७ शस्त्रकंटकादिकांचे सूक्ष्म अंश. ८ भरतकुळांत श्रेष्ठ भीष्म.

भीष्म ह्मणे राया वच सप्तर्षींचें जसें करि हिमाद्री ॥
करिं तूंहि या ऋषीचें आहे जरि एक, दे तरिहिमाद्री २२
शल्य ह्मणे कुरुनाथा अढळ कुळाचार जोंवि हेमाद्री ॥
ठावा असेल तुजला द्यावी म्यां शुल्कदासि हे माद्री २३
भीष्म ह्मणे कुलधर्म- त्याग नव्हे उचित,मान्य मज आहे
सत्कुलजाचेंचि सदा स्वकुलाचाराकडेचि मन वाहे २४
ऐसें मान्य करुनि दे कन्याशुल्कार्थ भूषणें वस्त्रें ॥
रत्नें कनकें वाजी हस्ती रथ आणि चांगलीं शस्त्रें २५
शल्य मग नदीजाचा अनुजेनें अंक शोभवुनि उजवा ॥
प्रार्थुनि ह्मणे पुरा न्या प्रेमरसें लोभवूनि इस उजवा २६
त्या लावण्यवतीला आला घेऊनि भीष्म, मग लग्न ॥
झालें पांडुसुहृन्मन हर्षीं दुःखीं अमित्रमन मग्न २७ ॥
कुंतीशीं माद्रीशीं करुनि सुखविहार एक मासभरी ॥
भीष्मादिगुरुमतें तो पांडु प्रस्थान भूजयार्थ करी २८
पवनातें तेजातें ग्रासुनि निःशेष न करि अहिं तरणी ॥
न तसा पांडु महाबळ याच्या उरला न एक अहित रणीं

---

१ स्वर्णमयपर्वत. मेरु. २ शुल्कद ह्म० मोल देणारा त्यास. ३ चांगल्या कुलांत जन्मलेल्या पुरुषाचें. ४ विवाहित करा. ५ शत्रु. ६ पृथ्वी जिंकण्या करितां ७ अहि पवनातें (वाऱ्याला) आणि तरणी तेजातें ग्रासुनि निःशेष नकरी. ८ शत्रु.

अरि[1]नाग पांडुहरि[2]च्या केले शतचूर्ण सायकरदांनीं[3] ॥
त्यजुनि दुराभिमान स्व- प्रियहित वरिलें न काय करदांनीं[4]
आहित अहि, तयां झाला विवरें[5] विवर[6] सांपडों दिल्हें न रणीं
महित[7] महितळीं[8] झाले नमुनि न मुनिसुत हठीं द्विषन्मरणीं[9]
करद परें[10] दमुनि[11] केले, धनदमन[12] दरिद्रें[13] आपणा मानी ॥
ऐसीं वित्तें घेउनि अक्षय आला पुरासि तो मानी ॥ ३२॥
बहु मानिला नदीजें पांडु, जसा शंकरें स्वसेनानी[14] ॥
तैं वेष्टुनि केलें गज- पुर लंकाद्वीप-तुल्य सेनांनीं ॥ ३३ ॥
शोभे स्थळस्थळीं तें राशीकृत[15]-रत्न-कनक नगर मला ॥
वाटे गमलें लोकां कीं येथें रत्न-कनक-नगें[16] रमला ॥३४॥
भीष्मादिकांसि तें धन दिधलें वांटूनि जेंवि धनदानें ॥
केलीं आश्रित-याचक- हृदयें संतुष्ट भूरि-धनदानें[17] ॥३५॥
एकच्छत्रा[18] कंटक[19]- रहिता स्ववशा करोनियां अवनी ॥
भवनीं रमोनि पांडु क्रीडे तुहिनाऽद्रिदक्ष-पार्श्व-वनीं[20] ३६

---

१ शत्रु हेंच गज. २ पाण्डु हाच सिंह. ३ बाण हेच दांत. ४ कर देणारांनीं. ५ पक्षिश्रेष्ठ गरुड. ६ छिद्र. ७ सन्मान्य. ८ पृथ्वीवर. ९ मुनिसुत हठीं. ( हठयोगांत. ) व द्विषत् ( शत्रु ) मरणांत महित न झाले. १० शत्रु. ११ जिंकून. १२ कुबेराचें मन. १३ निर्धन. १४ आपला पुत्र कार्तिकस्वामी. १५ ढीग केले आहेत रत्नांचे व स्वर्णाचे ज्यांत तें १६ पर्वत. १७ पुष्कळ द्रव्य देण्यानें. १८ एकच राजच्छत्र जींत ती. १९ शत्रुरहित. २० हिमालयपर्वताच्या दक्षिणभागींच्या वनांत.

घेउनि गेला संगें कुंतीतें आणि त्याहि माद्रीतें ॥
गंगागौरीगुरुसा आश्रय कारे पांडु त्या हिमाद्रीतें ३७
धाडी धृतराष्ट्र सदा साहित्य वनांत आदरें पुरतें ॥
अनुकूळ-दार-संगें कां हो नगमेल पांडुला पुर तें ॥ ३८ ॥
पांडु वनीं असतां सुर- सिंधुज विदुरार्थ आणवुनि बरवी
द्वेवकमहीपतीची पारसवी कन्यका तिला वरवी ॥ १९

# अध्याय १७ वा.

## सारांश.

[१—६]व्यासानें गांधारीला शतपुत्र होतील असा वर दिला होता. पण प्रथम कुंतीला पुत्र झाला. या मुळें गांधारीला वाईट वाटलें व आपणास लौकर पुत्र व्हावे ह्मणून तिनें गर्भिणी असतां आपल्या उदरावर मुष्टिप्रहार केले. त्यामुळें उदरांतून एक मांसाची पिशवी पडली. पुढें व्यासानें शंभर घृतकुंभ तयार करविले व ती पिशवी थंड पाण्यानें शिपण्यास सांगितलें. कांहीं दिवसांनीं त्या पि-

---

१ गंगा आणि गौरी यांचा गुरु-पति शंकर त्या सारखा. २ सुरसिंधु-देवांची नदी गंगा तिचा पुत्र. ३ शूद्रीचे ठायीं ब्राह्मणापासून झालेली कन्या. ४

शवीचे १०१ भाग झाले व ते घृतकुंभांत टाकिले. त्यांपासून दुर्योधन दुःशासन इ० शंभर पुत्र व एक कन्या दुःशला हीं उत्पन्न झालीं. शिवाय धृतराष्ट्रास दासीपासून एक पुत्र युयुत्सु झाला.

एके समयीं क्षुधित श्रांत श्रीव्यास मंदिरा आला॥
गांधारीनें सादर तुष्टविला सुप्रसन्न तो झाला ॥ १ ॥
वर माग असें ह्मणतां मुनिच्या पायांसि ती सती लागे॥
शतपुत्रवर हरा जो मागितला तोच त्यासही मागे २ ॥
मग गर्भवती झाली होती तैसीच दोन अब्द सती ॥
कुंतीस पुत्र झाला ऐसें परिसोनि होय खिन्न-मती ॥ ३ ॥
दुःखें निजोदराला ती गांधारी स्वमुष्टिनें ताडी ॥
गर्भासि बलात्कारें भवितव्यबळेंहि संकटीं पाडी ॥ ४ ॥
लोहाची कांडीशी पडली पेशीच एक मांसाची ॥
चित्तीं ह्मणे सुबळजा हे त्यागावीच दुःखदा साची॥ ५ ॥
तों तें जाणुनि येउनि मुनि साहसकारिणीस सा वारी ॥
वरदा श्वशुरासि ह्मणे मग ती आणूनि लोचनीं वारी ॥
दिधलें मज शत-सुत-वर- दान तुह्मीं, वरदराज माजी ॥
झाली पेशी वर्ष- द्वय हे तनु पावली श्रमा माजी ॥
झाला सुत कुंतीला परिसुनि मज दुःख वाटलें मोठें ॥
मग म्यां उदर बडविलें स्वामीपाशीं वदोंनये खोटें ॥८ ॥

---

१ वर्ष. २ गर्भाची पिशवी. ३ उदक. ४पाशी.

व्यास ह्मणे गे वत्से लोकीं सर्वज्ञतेसि मी पात्र ॥
जाणें सर्वहि तिळहि न जाणें लटिकें वदावया मात्र ॥९॥
शतघृतकुंभांत[1] रवे[2] पेशीचे घाल कन्यके, शीतें ॥
उदकें शिपावी[3] तें सद्यः[4] शतधा करील पेशी तें ॥ १० ॥
केलें तसेंचि तेव्हां कन्येचा काम मानसीं आला ॥
श्रीमन्मुनिप्रसादें भाग अधिक एक त्या शतीं झाला ११
घृत-कुंभ-रक्षणाचा विधि अविधिहि कथुनि कृष्णमुनि गेला
झाला प्रथम सुयोधन तेणें खरशब्द उपजतां केला १२॥
गांधारी-सुतकृतरव[5] परिसुनि गोमायु[6] गृध्र खर काक ॥
हाक स्वयेंहि देतीं धृतराष्ट्राच्या मनीं शिरे धाक ॥१३॥
भूदेव भीष्म विदुर स्वगृहीं आणूनि आंबिकेय[7] वदे ॥
व्यासेश्वरप्रसादें झाला सुत पारि मना न उत्सव दे ॥१४॥
राजसुत युधिष्ठिर तो राजाचि स्पष्ट तो कुळज्येष्ठ ॥
हाहि नृपति त्या मागें भवितव्य वदा बरें तुह्मी श्रेष्ठ१५
ह्मणति भविष्यज्ज्ञद्विज बुडवाया जाण हा निदान[8] कुळा॥
त्यागावाचि, न भुजगें पोसावें प्राणहानिदा[9] नकुळीं[10] ॥१६
विदुर ह्मणे त्यागावी अहिदष्टा[11] तत्क्षणींच आंगोळी ॥

---

१ शंभर तुपाच्या घागरींमध्यें. २ तुकडे. ३ तें शिपणें इ०. ४ तत्काल. ५ गांधारीच्या पुत्रानें केलेला शब्द. ६ कोल्हा. ७ आंबिकापुत्र धृतराष्ट्र. ८ आदिकारण. ९ प्राणांची हानि देणारा. १० मुंगूस. ११ सर्पानें चाविलेली.

मारक कळतां ग्यावी   उग्रविषाची बळेंच कां गोळी ॥ १७
एकोनशत-सुतांशीं   एक कुपुत्र त्यजूनि नांदावें ॥
व्याकुळ व्हाया फुंकुनि   भाजों द्यावें स्वगेह कां दावें ॥ १८
झाला कुळकीर्तीच्या   आप्तजनाच्या कुपुत्र हा निधना ॥
सज्जिति यशोधन देहहि,यश रक्षिति ह्मणति होउ हानि धना
उग्रनिमित्तें सर्वहि   भ्याले, एकचि न अंध तो भ्याला ॥
होय मरणहेतूल्का-   मुखभूतीं सुनिधिबुद्धि लोभ्याला २०
पितृ-सुर-तृप्तिप्रद जग-   दाह्लादक तापहर सुवृत्त शुची ॥
शशिचें मण्डळ कुळही   तेथ हरिण अंक येथ हा पशुची ॥
ज्या दिवशीं दुर्योधन   झाला कुन्तीस भीम ते दिवसीं ॥
स्वगुणें एकें तमें   एकें केलीं सुत्दन्मनें हिंवसीं ॥ २२ ॥
धृतराष्ट्राला झाले   शत सुत कन्याहि एक वरदानें ॥
जैसें कथिलें होतें   श्रीमद्व्यासें अभीष्टवरदानें ॥ २३ ॥

---

१ एक उणा ज्यांत असें शत. २ नाशाला. ३ भयंकर दुश्चिह्नानें. ४ मरणास कारण असें उल्कामुख ( ज्वाला ज्याच्या मुखांत तें ) भूत. ५ उत्तम धनाचा ठेवा अशी बुद्धि. ६ पितर व देव यांस तृप्ति देणारें-चंद्राच्या कला पितर व देव भक्षण करून तृप्त होतात असें ह्मटलें आहे. ७ जगास तृप्त करणारें. ८ दुःख-पक्षीं उष्मा-हरणारें. ९ वर्तुलाकार-पक्षीं-उत्तम आचरणाचें १० शुभ्र-पक्षीं शुद्ध. ११ दुर्योधन. १२ थंडगार.

अन्तर्वत्नी[1] असतां गान्धारीनें स्वयेंचि सनयेला[2] ॥
दिधला सद्वेश्येच्या निज-पति-सेवाऽधिकार तनयेला २४
वेश्या सेवादक्षा प्रज्ञाचक्षुहि[3] कृतज्ञ भजलीला ॥
दे पुत्रफळ गमे सुर- तरुची प्रभुचीहि तुल्य मज लीला २५
नाम युयुत्सु तयाचें एकाधिक-शतकुमार यासकट ॥
सर्वांत साधु वेश्या- नन्दन होईल तें पुढें प्रकट ॥ २६ ॥

# अध्याय १८ वा.

## सारांश.

[१-१००] किंदमऋषि पत्नीसह हरिणरूप घेऊन वनांत यथेच्छ रतिसुख अनुभवीत असतां, पाण्डुराजानें त्यावर बाण सोडिले. तेणें करून तो मरण पावला. मग ऋषीनें प्रकट होऊन पाण्डुराजास शाप दिला, कीं स्त्रीसंग करशील तेव्हां मृत्यु पावशील. त्या शापा मुळें त्यास पश्चात्ताप होऊन स्त्रियांसह वनांत तपश्चर्या करून काल क्रमूं लागला. पुढें आपणास पुत्र नाहीं, ह्मणून पाण्डुराजाला चिंता उत्पन्न झाली. तेव्हां कुंतीनें दुर्वासापासून

---

१ गर्भवती. २ नीतिमतीला. ३ ज्ञान हेच चक्षु ज्याचे तो.

आपणास झालेली मंत्रसिद्धि सांगितली. मग त्याच्या आज्ञेनें मंत्रजप केल्यावर कुंतीला. धर्म, भीम, अर्जुन असे तीन पुत्र झाले व एक मंत्र माद्रीला दिला तेणें करून तिला नकूल व सहदेव असे दोन पुत्र झाले. हे पांच पुत्र पाण्डव होत.

---

होता महावनांत स्त्रीसह नृप पाण्डु तत्कथा परिसा ॥
अरि-सामन्तनमितपद[1] तो मृगयार्थें फिरे वनीं हरिसा[2] ॥
तेणें मैथुनसमयीं हरिणीसह हरिण देखिला पुष्ट ॥
वधिला पंचशरांनीं स्त्रीसकट अदुष्ट तो जसा दुष्ट ॥
तो ऋषिपुत्र तपोधन भार्येसीं काननांत मृगरूपें ॥
रतिकेलिसक्त होतां वधिला सहसा मृगभ्रमें भूपें ॥ ३ ॥
किंदमनामा तो ऋषि भूमिवर पडोनि पांडुला गांजी ॥
कर जोडुन नृपहि ह्मणे भ्रमलों, मृगरूप घेतलें कां जी॥४
किंदम ह्मणे अरे म्यां व्हावा सुत ऋष्यशृंगसा मातें ॥
हें मात्र वांछिलें रे मन वश होऊं दिल्हें न कामातें ॥ ५
जनलज्जेस्तव मृगतनु घेउनि रमतां वनीं मृगीसहित ॥
केला कसा तुवां वध केलें नसतांहि लेश म्यां अहित ६

---

१ शत्रुभूत जे माण्डलिक राजे त्यांनीं नमिलें पद ज्याचें तो. २ सिंहासारखा.

मृगयाधर्म तुज मजहि आहेताचि विदित परि सुरतशर्म[1] ॥
अनुभवुनि कसें केलें हनन, अरे काय हें उचित कर्म॥ ७
ब्रह्मवधें दुरित नसो नकळत घडला परंतु तूज नृपा ॥
सुरतसुखज्ञा तुजला यावी आली कसी न लेश कृपा ८
दुष्टोचितशासन कीं सोसावें काय तापसानें हें ॥
कां निरपराध वधिला राया वद काय पाप सानें[2] हें ॥९
घे शाप तापसाचा तुजही करितां मनःप्रियासंग[3] ॥
मृत्यु घडो या माझ्या शापांऽशनिचा[4] कधीं नहो भंग १०
शापवचन मलिन तया करि कज्जल जेंवि पांडुरमणींतें[5] ॥
मुनि गेल्यावरि येउनि तें कळवी साऽश्रु पांडु रमणींतें ११
व्यसनें तात[6] बुडाला मीही, भोगील काय मंद[7] रसा[8] ॥
झालों स्वगुरुसुहृज्जन- हृत्सागरमथनहेतु[9] मंदरसा[10] १२ ॥
कामोंचि बुडविलें जग हें ऐकावेंहि न व्यसन कानें ॥
इतर किति पाविजेलचि विषयें भय नित्य नव्य[11] सनकानें[12]
झालों विचित्रवीर्य- क्षेत्रीं मी पांडु कृष्णसुत[13], पाला॥

---

१ रतिसुख. २ लहान. ३ मनाला आवडणाऱ्या स्त्रीचा संग. ४ शापरूपी वज्राचा. ५ पांढऱ्या मण्यांला. ६ पिता विचित्रवीर्य. ७ भाग्यहीन. ८ पृथ्वी, ९ आपले पितर व मित्र ह्यांच्या हृदयरूप सागराचें मथन करण्यास कारण. १० मंदर पर्वतासारखा. ११ नवीन. १२ हा ब्रह्मदेवाचा एक पुत्र आहे. हा जनलोकांत राहतो; हा विष्णूचा सहचारी होय. १३ व्यासपुत्र.

भक्षीन, करीन सुखें होउनि संगीं वितृष्[1]ण सुतपाला॥१४
मी नाठवीन राज्य स्वजन स्त्री शयन वसन अन्न मनें ॥
जा हस्तिपुरास तुह्मी सांगा भीष्मादिकांसि मन्नमनें १५
ह्मणती स्त्रिया करूं तप आह्मीही अधिक काय सन्यासीं
येथें तपोनि भोगा स्वर्गीं सुख कुंतिमद्रकन्यांसीं ॥ १६ ॥
भार्या न त्यागाव्या विरहज्वलनांत या न भाजाव्या ॥
अंतीं स्वर्गासि तुह्मां सह तेजें शोभवुनि नभा जाव्या
दारोदारो[2]क्ति करी मान्याचि कीं प्रेम शुद्ध निष्कपट ॥
काढी अंगद[3]कुंडल[4]- कटक[5]युगलमौलि[6]रत्ननिष्क[7]पट[8] ॥१८॥
तीं भूषणें सुवस्त्रें अर्पुनि विप्रांसि तो ह्मणे स्वामी ॥
जाउनि नागपुरीं हें सांगावें मागतों वरा या मी ॥ १९
वल्कल नेसोनि ह्मणे दासांसि पुरासि जा सखे खग हा॥
जळला शापदवें[9] हा आश्रय सर्वांसि भीष्म सन्नगं[10] हो२०
दुर्दैवग्रीष्मानें गेला आटोनि पांडुकासार[11] ॥
जा भीष्ममानसा[12]प्रति दासमधुप[13] हो विचार हा सार[14] २१
भीष्म धृतराष्ट्र विदुर स्वद्रुम[15] तुमचे तदाश्रयें वर्ता ॥

---

१ विरक्त. २ स्त्रियांचें उदार भाषण. ३ बाहुभूषणें. ४ कर्णभूषणें. ५ दोन कडीं ६ मुकुट. ७ उरोभूषण. ८ वस्त्र. ९ शापरूप वणव्यानें १० उत्तम वृक्ष. ११ पाण्डु हेंच सरोवर. १२ भीष्म हेंच मानससरोवर. १३ दास हेच भ्रमर. १४ श्रेष्ठ. १५ कल्पवृक्ष.

हा पांडु आजपासुनि झाला यति,भूमिचा नव्हे भर्ता २२
सस्त्रीक पांडु गेला पूर्वी राघव तपोवना जेवीं ॥
वाढनि शोकविष समय तो सकळांच्या ह्मणे मना जेवीं
सेवकजन बहु रडला समजावें कोंवि त्या अनाथानें ॥
पांडुपदें जसि त्याच्या शिशुच्याहि न तृप्ति तासि मना थानें
त्यांनीं नागपुरीं ती नेली बहु शीघ्र तापदा वार्ता ॥
अंगारवृष्टिनें तासि केली सर्व प्रजा तिणें आर्ता ॥ २५ ॥
आजी माय बहु रडे भीष्म विदुर फार जाहले कष्टी
धृतराष्ट्र ह्मणे विधिनें कोंवि पळविली अचक्षुची यष्टी २६
तो पांडु हिमगिरीतें लंघुनियां गंधमादनीं गेला ॥
इंद्रद्युम्नसराप्रति जाउनि शतशृंगपर्वतीं ठेला ॥ २७
तेथें पांडु तप करुनि पावे सुमहर्षितुल्यता सुकृती ॥
काय न साधील पथा साधूंच्या अनुसरोनि सासु कृती
तेथील महर्षिनिकर अन्योन्यातें ह्मणे उठा चाला ॥
श्रीब्रह्मदेवदर्शन घ्यायास्तव सिद्ध एकदा झाला २९ ॥
पांडु ह्मणे मी येतों मुनि ह्मणती वायु कीं महर्षिजन ॥
जाया समर्थ न इतर विधिलोकपथीं करावया व्रजन ३०
समजे पांडु तदाशय कीं झालों जरिहि अनृण इतरांचा

१ दुःखदायक. २ अग्नीच्या वर्षावानें. ३ पीडित. ४ अंधाची. ५ काठी. ६ हा पर्वत मेरूच्या पूर्वेस आहे. ७ शंभर शिखरांच्या पर्वतावर. ८ पुण्यवान्. ९ जीवंत मनुष्य. १० कुशल. ११ गमन.

तरिहि अनपत्यतेस्तव आहेंच ऋणी समस्तपितरांचा ३१
पितरांच्या फेडाया न समर्थ करुनि महा तप ऋणा मी
घडतां अधःपतन मज पुण्यें देतिल न हात परिणामीं ३२
त्यांस ह्मणे स्वामी हो तारावा संकटांत हा भक्त ॥
अनपत्यत्व स्वर्ग- द्वारानिरोधासि[1] हेतु हें व्यक्त[2] ॥ ३३ ॥
जेंवि पितृक्षेत्रीं[3] मी मत्क्षेत्रींही तसेंचि संतान ॥
होतें तरि तरतों हा काम पुरविते तुह्मीचि संतान[4] ॥३४॥
मुनि ह्मणति भारता हा काम तुझा देवता-प्रसादानें ॥
होईल पूर्ण ऐसें दिसतें आह्मांसि पाहतां ज्ञानें ॥ ३५
मुनि गेल्यावर पांडु ज्येष्ठस्त्रीतें ह्मणे प्रिये कांहीं ॥
कथितों तें मान्य करीं तुज तों अमृतहि मदुक्त्यधिक[5] नाहीं
मद्वचनें संपादीं सन्मुनिपासूनि शुद्ध-संततिला ॥
संततिलाभचि लाभ स्वर्निःश्रेणीच[6] ह्मणति संत तिला ३७
शरदंडायनभार्या[7] पतिच्या आज्ञेकरूनि सन्मुनितें ॥
भजली पूर्वीं, तरी सदपत्यत्रय[8] तयांसि जन्मुनि तें ॥
कुंती ह्मणे तुह्मी मज कथितां ज्या काय आजि कार्यातें॥
व्युषिताश्व[9]-कथा जाणुनि मग मान्य करील कोण आर्यातें

---

१ स्वर्गाचें द्वार बंद करण्यास. २ स्पष्ट. ३ पिता विचित्रवीर्य त्याच्या स्त्रीच्या ठिकाणीं. ४ कल्पवृक्ष. ५ माझ्या वचनाहून अधिक. ६ स्वर्गास चढण्याची शिडी. ७ शरदंडायन हा एक राजा होता. ८ उत्तम तीन अपत्यें. ९ व्युषिताश्व हा एक राजा.

व्युषिताश्वभूप मेला त्याची भद्रा वधू सती पतिचें ॥
शव आलिंगूनि करी विलाप बहु नगणि मत सुहृन्मतिचें
स्वपदीं दृढ भाव तिचा जाणोनि नभांत बोलिला वाणी
सोडीनाचि शवाला संततिचा काम धरुनि जैं राणी ४१
नकरीं विलाप सति ये वर-ऋतुकाळीं तुवां मदंगातें ॥
रक्षुनि ध्यावें शयनीं देईन अपत्य-हेतु-संगातें ॥ ४२ ॥
भद्रा तैसेंचि करी झाले तिस शाल्व मद्र सुत सात ॥
हें ऐकिलें असेल व्युषिताश्वचरित तुह्मींहि विख्यात ४३
शापप्रतिबंध खरा परि असमद्भावभाग्यपुण्यबळें ॥
स्वामी तुह्मीच कल्प- द्रुम द्याल स्वस्त्रियांसि पुत्रफळें ॥
तेंवि मनःसंकल्पें दिव्य तपोयोगसिद्धिमंतानें ॥
माझ्या ठायीं देवा निर्मावीं त्वांचि शुद्ध संतानें ॥ ४५॥
पांडु ह्मणे गे साध्वी व्युषिताश्व जसा तसा नसे अन्य
तो साक्षाद्देवोपम लोकीं सन्मान्य योगनिधि धन्य॥४६॥
मज आहे श्रुत ऐसें कीं कामविहारिणी स्त्रिया स्ववशा
पूर्वी होत्या, भजती भलत्यासि जशा वनीं गजास वशा४७
उद्दालकमुनिपुत्रें रीति तयांची विलोकिली खोटी ॥
केली हे मर्यादा जे आतां चालती जगीं मोटी ॥ ४८ ॥

---

१ मित्रबुद्धीचें. २ आमची भक्ति, दैव आणि पुण्य ह्यांच्या सामर्थ्यानें. ३ उत्तम तपस्येची सिद्धि ज्याला झाली तो. ४ इच्छेस येईल तसें वागणाऱ्या. ५ स्वतंत्र. ६ हत्तिणी.

उद्दालकपत्नीतें   एक ब्राह्मण धरी करीं कामी ॥
क्रीडों चाल ह्मणे जरि   देखत होता तिचा पती धामीं४९.
तें पाहुनि उद्दालक-   मुनिसूनु ह्मणे तयासि कर सोडा ॥
भव्यार्थ आजिपासुनि   या दुष्टा दंडकासिं कर जोडा ५०
तात ह्मणे वत्सा हे   रीति पुरातन, तुवां न कोपावें ॥
स्त्री प्रियकामविहारी   विघ्न किमपि तूं करूं नको,पावें५१
तें मात्र वचन न करी   मान्य श्रीश्वेतकेतु बापाचें ॥
स्पष्ट ह्मणे हें कारण   होइल नरकप्रदोग्रपापाचें ॥ ५२
यावरि ती भ्रूणघ्नी[3],   परपुरुषाला भजेल जी असती ॥
भ्रूणघ्न सतीत्यागी   पुरुषहि, नरकीं घडो तया वसती ५३
पुत्रोत्पत्त्यर्थ धवें[4]   आज्ञा देतांहि जीहि आज्ञा ते ॥
न करील तसीचहि ती,   भंगितिल न धर्मसेतु हा ज्ञाते५४
असि मुनिकृत मर्यादा   लोकीं अद्यापि चालते कांते ॥
जाणसि मदुद्भवासहि[5],   मान्य करीं वचन कनक[6]निभकांते
कल्माषपाद[7]पत्नी   मदयंती, जाणताति संत तिला ॥
ती पावली वसिष्ठा-   पासुन गतिकीर्तिहेतुसंतति[8]ला ५६
त्वांहि तसेंचि करावें म्यां रचिला आजि सफळ अंजलि हो

---

१ कल्याणार्थ. २ चालीस. ३ गर्भहत्या करणारी. ४ पतीनें. ५ माझ्या उत्पत्तीला. ६ सुवर्णा सारखी कांति जिची ती. ७ मित्रसह-नामक राजा. ८ मोक्ष व कीर्ति होण्यास कारण अशा संततीस.

मन्नाम पुत्रवंतां- माजि यमामात्यपाणिकंज लिहो ५७
जनमेजयासि सांगे मुनि कीं वाणीसही करुनि पण जी ॥
जिंकूं शके सु-भाषणें- निपुणत्वें ती वदे तुझि निपणजी ५८
मत्पितृसदनीं होता श्रीदुर्वासा महोग्र, पारि चरण ॥
ज्यां अर्चिले, सदाही केलें साहोनि कष्ट परिचरण ॥५९॥
तेणें प्रसन्न होउनि मंत्र मला एक शिकविला आहे ॥
पुत्रार्थसुराऽकर्षण कथिलें वेळाहि पातली त्यां हे ॥६० ॥
श्रीगुरु-दत्त-मनु-बळें सांगाल तया सुरासि बाहेन ॥
परपुरुषाला तुमच्या वचनें पुत्रोद्भवार्थ पाहेन ॥ ६१ ॥
पांडु ह्मणे धर्मातें वाहें, वाहें तयासि हें काय ॥
तज्ज न सज्जन-मत-पथ सोडिल, अगुणें सुविग्रहें काय ६२
पतिस नमुनि गुरुचरण-स्मरण करुनि मंत्रजप करी विधिनें
तत्काळ दिल्हें दर्शन धर्में मंत्राहृतें दयानिधिनें ॥ ६३ ॥
पीरसुनि धर्म वदे अयिं सतिं कुंति मतं ददामि किं ते तें

१ यमाचा प्रधान चित्रगुप्त. त्याचें करकमल. २ उत्तम भाषणाच्या चातुर्यानें. ३ सेवा. ४ देवांच्या आकर्षणाला. ५ गुरु दुर्वासा ह्यानें दिलेल्या मंत्राच्या सामर्थ्यानें. ६ त्यधर्मापासून झालेला. ७ अगुण ( गुणरहित ) असून सुविग्रह (सुंदर)अशा पुत्रानें काय फायदा. ८ मंत्रानें आणिलेला. ९ अगे. १० हे साध्वी. ११ इष्ट. १२ देऊं. १३ काव्य. १४ तुला.

परिसुनि ह्मणे पृथा जें सुतरत्न हरील सर्व चिंतेतें ॥ ६४॥
धर्में तसाचि दिधला सुत करुणा करुनि पांडु भूपाळीं ॥
इर्ष-शुक्ल-पंचमी-तिथि होती तज्जनन होय ज्या काळीं ६५
तो उपजतांचि झाली वाणी अशरीरिणी असी व्योमीं॥
हा करुकुळीं युधिष्ठिर हित सकळां अमृतरस जसा सोमीं ६६
हा पांडुपुत्र सत्य- व्रत सुज्ञ अजातशत्रु भूतरणी ॥
हा मूर्त धर्म भूपति यति यश जोडील परम पूत रणीं ६७
सुतमुखशशिरुचिं सेवुनि पांडु निवाला परंतु एकानें ॥
तृप्ति नसेचि जसा मरु- तरुप सकृत्प्राप्तवारिसेकानें ॥६८॥
पुनरपि ह्मणे तिला बळ- शाली सुत आणखी असावा गे॥
सबळचि वीरखळ-वळीं विपिनीं समरुद्दवा असा वागे ६९
कुंती मंत्रजप करुनि चिंती मनि कीं समीरदेवा यों ॥
तोही तसाचि आला त्यासि ह्मणे ती सुपुत्र दे वायो ७०
पवनापासुनि झाला सुत बळ-निधि भीमसेन तज्जननीं ॥

---

१ आश्विनशुद्ध पंचमी. २ शरीरसंबंधी नव्हे ती ह्म० दिव्य. ३ ज्याला कोणी शत्रु असें वाटत नाहीं तो. ४ पृथ्वीवरील सूर्य. ५ इंद्रियें जिंकून स्वाधीन ठेविणारा. ६ पवित्र. ७ पुत्रमुख हाच चंद्र त्याची कांति. ८ मारवाडांतील मोठा वृक्ष. ९ एकदां मिळालेल्या उदकाच्या वर्षावानें. १० वाऱ्यासह वणवा. ११ यावें.

होय गगनगी, हर्षे भूमिहि, केवळ न एक तज्जननी॥७१
हा बळजलधि खळांचा समरीं उतरील सर्व हा रेंच ॥
चूर्ण करील शिळा दृढ शत्रुशिरें मुष्टिच्या प्रहारेंच ॥७२॥
अंकीं निजला असतां व्याघ्रभयें ती पृथा उठे तूर्ण ॥
तों घनसा भीम पडे होय तनुभरें तळीं शिळा चूर्ण ७३
तिसराहि पुत्र लोक- श्रेष्ठ असावा असें मनीं आणी ॥
उग्र तप करी राजा पांडु, तदुक्तें तसीच ती राणी॥७४॥
आराधिला सुरेश्वरें भेटोनि ह्मणे तयासि माग वर ॥
पांडु ह्मणे दे मजला आत्मसम कुमार भूरिभाग-वर ७५
इंद्र ह्मणे मत्सम तुज पुत्र दिल्हा सर्व-वीरवर होतो ॥
हो तूंहि पुत्रिवर बहु- गुण सुजनीं अर्पिला सुवर होतो७६
हरि गेल्यावरि पांडु स्त्रीस ह्मणे एक वर्ष तपलीस ॥
ज्या अर्थें तूं देवी स्वव्रतनियमास फार जपलीस ॥ ७७ ॥
तें तप फळलें तुज सुत देणार हरी ह्मणूनि गुरुदत्ता ॥
विद्या तुवां जपावी जीची साची जगत्त्रयीं सत्ता ॥७८॥
कुंतीनें शुभदिवशीं एकांतीं इष्टकाम जाणविला ॥
आत्रेय-दत्त-विद्या- दूती योजून शक्र आणविला ॥७९॥
इंद्रापासुनि अर्जुन होतां सद्गुण मनोरम नभोगी ॥

---

१ आकाशवाणी. २ इंद्र. ३ महाभाग्यवंतांत श्रेष्ठ. ४ पुत्रवंतांत श्रेष्ठ. ५ उत्तम वर. ६ अत्रिपुत्र दुर्वासा त्यानें दिलेली विद्या हीच दूती. ७ आकाशवाणी.

वर्णी तच्छ्रुश्रवणें सुख  वहु कुंती-पांडु-साधु-मन भोगी८०
हा रंजवील गुरुजन-  चित्तातें श्रुतिरहस्य कवळील ॥
दुग्धाब्धि-फेन-धवळें स्वयशें कुरुच्या कुळासि धवळील८१
लीलेनें सुर-दुष्कर  कर्म करिल संगरीं न आटेल ॥
फाटेल भयें याच्या  द्विपदुरं हा मूर्तकाळ वाटेल ॥ ८२ ॥
हा तोषवील युद्धीं  त्यासहि जो काळ-कंपद पिनाकी ॥
धावेल पाशुपत ही  ज्या पात्र नजरि कुती तदपि नाकी८३
किंबहुना विष्णु जसा  सुखद अदितिला तसाचि हा तुजला॥
धन्यासि कुंति पांडो  त्वत्क्षेत्रीं कल्पवृक्ष हा रुजला ॥८४॥
ऐसी अंबरवाणी  झाली शुभकुसुमवृष्टि बहु मोटी ॥
वाद्यध्वनि वहु झाले  आले आदित्य-रुद्र-मुनि कोटी ८५
पावे दशरथ-गृह जें  यश पांडूटजाहि जिष्णु-जननीं तें ॥
बहुमानिलें सतींनीं  कुंतीतें जेंवि विष्णु-जननीतें ॥ ८६ ॥
पाण्डु पुन्हाही प्रार्थी  त्यातें कुंती ह्मणे पुरे, लोभें ॥
होईन बंधकी मी  क्षोभें न मनीं, इहींच बहु शोभें॥८७॥
माद्री पतीप्रति ह्मणे  झाले माझ्या कुमार जावेला ॥

---

१ वेदांचें सार आत्मज्ञान. २ देवांस करण्यास कठीण. ३ शत्रुहृदय. ४ काळास कंप देणारा. ५ शंकर. ६ पुण्यवान आहसे. ७ आकाशवाणी. ८ पांडूची पर्णकूटिका. ९ अर्जुनाच्या जन्मामध्यें. १० जारिणी.

सुख गमलें, ह्मणतें मी वृद्धीतें यापरीस जा वेला[1] ॥८८॥
दोघी वंध्या होतों परि फळला सत्प्रसाद एकीला ॥
झाला तुह्मांसि संतति- लाभ जसा वृष्टिलाभ केकीला ८९
मी मात्र मंदभाग्या सांत्वुनि ह्मणतां रहा सुखें न रहें ॥
परि मुनि-शाप-वृकें या हरिणीचें कवळिलें सुखें नरहें ९०
मत्संतानार्थ तुह्मी दयितेला भीड घालितां तरि ती ॥
आज्ञा न मोडिती या सवतीवरि हीं सती दया करिती ९१
पांडु ह्मणे माझ्याही चित्तीं आहे असोंचि, पदर तिला ॥
पसरीन, करील वचन भंगील न ती मदीय-पदे-रतिला[2] ९२
कुंतीस ह्मणे देवी त्वद्भजनीं सादरा तुझी आली ॥
माद्री त्वां तारावी हेचि न दुःखाब्धिच्या तटा आली ९३
यश बहु वाढेल तुझें हेंचि भल्यांनीं जपोनि सांचविलें ॥
सर्वस्व वेंचिलें परि एक भलेपण जगांत वांचविलें ॥९४॥
आज्ञा स्वीकारुनि ती मंत्रजप करुनि ह्मणे तिला जावें॥
पुत्रार्थ सकृत्[3] दैवत चिंतावें, त्वां सये न लाजावें ॥९५॥
ती दस्त्रांतें[4] चिंती तों ते पावोनि ह्मणाति हे माद्री ॥
द्यावें काय वद तुवां स्वाऽवयवें जिंकिलाचि हेमाद्री ९६॥
माद्री हांसोनि ह्मणे जाणुनि हृद्रोग त्यासि अगदानें[5] ॥
दूर करा जी,रोगी न निवे कनकाचियाहि अर्ग-दानें[6] ९७

---

१ हे वंशरूप वेला. २ मत्पदप्रीतीला. ३ एकवार. ४ अश्विनीकुमारांना. ५ औषधानें. ६ पर्वतदानानें.

त्यांपासुनि ती पावे　अत्यंतमनोरमांऽग यमलांतें ॥
नकुळ सहदेव ते बहु　सुखविति त्या पांडु-नेत्र-कमलांतें ९
कुंती बोले माझा　उपमर्द करील ती असें गमतें ॥
द्वंद्वाह्वानें पुत्र-　द्वंद्व जिणें सहज साधिलें स्वमतें ॥ ९९ ॥
अणखी माद्रीविषयीं　पांडु प्रार्थी पृथेसि एकांतीं ॥
मान्य न करी गमे ती　वृष्टि उघडली मयूरकेकांतीं १०० ॥

# अध्याय १९ वा.

## सारांश.

[१—२६] वसंतऋतूंत एके दिवशीं पांडु राजा माद्रीसह वनशोभा पहात फिरत असतां अत्यंत कामातुर झाला. एकांत असल्यामुळें काममोहित होऊन व ऋषिशाप विसरून त्यानें माद्रीशीं समागम केला. तेणें करून तो तत्काळ मृत्यु पावला. पुढें माद्री पाण्डूबरोबर सती गेली. कुंती पांडवांसह हस्तिनापुरास गेली. नंतर व्यासवचनावरून सत्यवती आपल्या दोघी सुनांसह वनांत तपश्चर्या करून परलोकास गेली.

---

१ जुळया मुलांस. २ दोघांस बोलावण्यानें. ३ मोराच्या टाहो नंतर.

झाले पांच सुरद्रुम- सम सुत आनंद पांडुचा पिकला ॥
पिक[1] लाभला बहु दिसां आम्राला,सुरभि[2] ज्यामध्यें टिकला
त्यावरि वसंतकाळीं एकांतीं रम्य-नंदनाभ[3]-वनीं ॥
माद्रीं अनुसरली जसि सेवी त्या पूरुनंदना[4] भवनीं[5] ॥ २ ॥
होता विरक्तिभस्मा[6]- च्छादित कामाऽग्नि पांडुहृत्कुंडीं[7]
फुंकिला सुरभि-वन-श्री- धमनी[8] काळें धरूनियां तुंडीं ३
पावे स्मराग्नि जागा होतां स्त्रीदृष्टिसर्पिराहुतिला[9] ॥
लोपे विवेकशशिरुचि[10] मुनिशापचि होय दर्पि[11] राहु तिला.
धृति नव्हति काय मुनिचा नव्हता तो विदित काय कोप तिला
पारि होणार चुकेना वारूं नशकेचि बायको पतिला ५ ॥
स्मरकाळमूढ[12] पांडु प्रेमें आलिंगुनी स्वरामेला[13] ॥
सुरतीं प्रवर्तला जों झाला मुनिशाप तों खरा मेला ॥ ६ ॥
दृङ्मीलन[14] निश्चळता पांडूची प्रथम भासली सुरतें ॥

---

१ कोकिल. २ सुवास. ३ नंदनवनासारखें. ४ पूरुकुलांतील पुत्र पांडु, त्याला. ५ घरामध्यें. ६ विरक्तिरूप भस्मानें झांकलेला. ७ पांडूचें हृदय हेंच कुंड. ८ वसंतवनशोभा हीच फुंकणी. ९ स्त्रीदृष्टि हेंच सर्पि ( घृत ) त्याच्या आहुतीस. १० विचाररूप चंद्राची कान्ति. ११ उद्दाम. १२ मदन हाच काळ त्यानें मोहित केलेला. १३ स्वस्त्रीला. १४ डोळे झांकणें.

मग मरण समजलें हो झालें वपु शीत कांतिभासुर तें७॥
माद्री हा प्राणेश्वर हा देव असे करी विलाप वनीं ॥
ते नेउनि भेटविले क्षिप्र तिचे शब्द कुंतिला पवनीं ॥८॥
ससुता कुंती तेथें जाय ह्मणे हाय माद्रि हें काय ॥
शाप विदित असतां त्वां स्पर्शों द्यावें पतीस हें काय ९
क्षणसुखलोभें मूढे एकांतीं कांत भुलविला साचा ॥
केला घात कसा गे या व्यसनीं काम तुज विलासाचा १०
माद्री ह्मणे न म्यां नर- देव नियतिनेंचि भुलविला साचा
बाइ हरि पुढें दिसतां आठवहिं करेंणु करि विलासाचा ११
दीपकळिकेसि धावुनि आलिंगी आग्रहें पतंग जसा ॥
पडला गळांचि माझ्या रंभेच्या दीप्तमद मतंगजसा १२
कुंती ह्मणे पतीसीं मी जातें, ऊठ तूं मुलें पाळीं ॥
माद्री ह्मणे मला दे आज्ञा माझ्याचि हें असो भाळीं १३
तूंचि मुलें रक्षाया दक्षा यादवि न मी, तुझी ममता ॥
सर्वत्र तुल्य आहे, राहेल न मन्मतीं असी समता ॥१४॥
दे मज अग्नि, स्वर्गीं पतिसह सुकृतें तुझ्याचि जाईन ॥
बाई न दया टाकीं तेथें मी त्वद्गुणांसि गाईन ॥ १५ ॥
कुंतीनें माद्रीची सफळा सहगमनकामना केली ॥

---

१ कांतीनें शोभमान. २ दैवानें. ३ सिंह. ४ स्मरण. ५ हत्ती. ६ केळीच्या. ७ हस्ती सारखा.

नियतिमनां ये त्यांच्या सवतीच्या ये न कां मना केली
शतशृंगवासि मुनिजन झाला तेथें समस्त एकवट ॥
आश्रय मुलांसि बुडतां कुंतीसहि होय तोचि एक वट १७
त्या पाडुकुटुंबातें ते साधु महर्षि गुह्यकवनांत ॥
उघडें पडों न देती सुकवि जसे वेदगुह्य कवनांत ॥ १८ ॥
पांच सुतांसह कुंती- प्रति समजावूनि आपुल्या संगें ॥
संस्कार घडायास्तव त्या दोघांचीहि आणिती अंगें॥१९॥
येउनि पुरासि केलें मुनिनीं तें स्वांऽघ्रि-शुद्धि-वृत राष्ट्र ॥
भेटाया आणविले सत्यवती-भीष्म-विदुर-धृतराष्ट्र ॥२०॥
वृत्त कथुनि बाळ पृथा भेटवुनी दाखवूनि अस्थि रहा ॥
धैर्य-नगें धर्मपथीं मुनि ह्मणति असाचि अर्थ अस्थिर हा२१
मुनि गेले झालें तें पांडुमरण-वृत्त धृतिनगीं भिदुरें ॥
करवी उत्तरकार्य प्रज्ञाचक्षुर्मतें सुधी विदुर ॥ २२ ॥
विद्युक्त पारलौकिक झाल्यावर पुत्र पांडुचे गेहीं ॥
गेले गमले शिरले ते पंचप्राण टाकिल्या देहीं ॥ २३ ॥
त्यावरि मातेसि कथी व्यास कुरु-कुळीं अनर्थ जो भावी
धाडी तपोवनीं कीं ती स्वर्गीं तप करूनि शोभावी २४॥

---

१ दैवाच्या मनाला. २ आपल्या पायांच्या शुद्धीनें व्याप्त. ३ धैर्यरूप पर्वतावर. ४ वज्र. ५ धृतराष्ट्राच्या मतानें.

दोघी सुनाहि घेउनि भीष्मासि पुसोनि जाय ती न टिके
त्यजिले आप्तजन तसे स्वप्नींचे अर्थ ते जसे लटिके ॥ २९
गेल्या तिघीहि उत्तम-लोकीं त्या धरुनि कांस योगाची ॥
पडली गळांचि त्यांच्या निःसीम समृद्धि दिव्यभोगाची

# अध्याय २० वा.

## सारांश.

पांडव अल्पवयांत महापराक्रमी झाले. त्यांत भीम महाबलाढ्य. तो कौरवांस प्रत्येक खेळांत पराजित करी. दुर्योधनास तें आवडलें नाहीं. तो जलक्रीडेच्या मिषानें एके दिवशीं गंगातीरीं प्रमाणकोटि ह्या ठिकाणीं पांडवांसह गेला. तेथें दुर्योधनानें भीमास विषयुक्त अन्न चारिलें व तो बेशुद्ध झाल्यावर त्यासगंगेत बुडविलें. भीमास नागांनीं नागलोकीं नेलें. भीम नाहींसा झाल्यामुळें कुंती व पांडव यांनीं बहुत शोक केला. विदुरानें त्यांचें समाधान केलें. वासुकीनें भीमास आठ दिवस ठेवून घेऊन त्याचा सत्कार करून त्यास भूलोकीं पाठविलें.

पांडुसुतांचीं झालीं उपनयनें ते श्रुतिस्मृती पढले ॥
अल्प वयांतचि पांचहि बंधु महत्त्वीं हळूहळू चढले १
भीम बळी त्यापासुनि होती धृतराष्ट्रपुत्र परिभूत ॥
मंत्रज्ञ सहज पाहे पावति अत्यंत ताप परि भूत ॥२
ज्या त्या क्रीडेंत मुलें भीमापासोनि पावती भंग ॥
सन्माणिक्यमणिपुढें गोमेदाचा फिका पडे रंग ॥ ३ ॥
भीमाच्या साहजिकें तेजें ते भंग पावती क्षुद्र ॥
ऋक्षांत[६] शशि तसा तो त्यांत महात्मा पशूंत कीं रुद्र ॥४ ॥
चढति फळार्थ नगीं ज्या तन्मूळीं भीम निजपदें ताडी ॥
लीलेनें तत्फळदळ- कुसुमांसह त्यांसि भूतळीं पाडी ५॥
शशिरंकुपुढें[१] कैसे होतील न भग्नगर्व काळाविट ॥
भीमबलोत्कर्षें ते खळ धरिति मनांत सर्वकाळ विट ६
स्पर्धा करूनि साधूं- जातां भलतेंहि काज वेगमती[२] ॥
न पुरे तो भीम शशी भासे ते सर्व काजवे गमती ॥७
मारुति[३]-सिंह वधावा कपटें तद्बंधु हेहि अविचारी ॥
बांधावे ऐसें हें योजी दुर्योधनाख्य अविचारी ॥८॥
जळकेलीचें करवी साहित्य मग प्रमाणकोटींत ॥
वरि दावी प्रेम असें कीं नाहीं तत्प्रमाण कोटींत ॥ ९
ने पांडवांसि तेथें अद्भुत भला भासला न वंचकसा ॥

---

१ चंद्रावरील हरिजापुढें. २ त्वरेविषयीं बुद्धि ज्याची तो. ३ मरुत्पुत्र भीम. ४ मेढें. ५ त्याचें माप. ६ नक्षत्रांत.

कळलाचि न संसर्गी योग्यचि तो मूर्त-पापपंचकसा ॥१०॥
गेले प्रमाण-कोटि- स्थानीं गंगातटीं वरोपवनीं ॥
तेथपटगृहीं शोभा केली होती जसी महाभवनीं ॥ ११ ॥
धृतराष्ट्र-पुत्र पांडव त्या सदुपवनीं जया जसें इष्ट ॥
गंगा-तट पट-सदनीं ते भक्षिति अन्न विविध जें मिष्ट १२
दुर्योधनें विषान्नें वाढविलीं भीम जेविला भावें ॥ ॥
आदर तसा करी खळ बहुदिवसां मित्र जेंवि लाभावें १३
इष्टार्थाची निश्चित सिद्धि ह्मणे तो मनांत खळ केली ॥
मग ते सूर्यास्तावधि करिती श्रीजाह्नवींत जळकेली १४
आले कुमार तीरीं यांत बहु श्रांत भीम गरळानें ॥
तो व्यापिला ह्रद जसा तैलाच्या बिंदुनें सुतरळानें १५
जळकेलींत श्रमला प्रथमाहि सविषान्न जेविला तिपट ॥
निजला शांत-पट-गृहीं तीरीं येतांचि मोहिला निपट १६
दुर्योधनें विषाकुळ मारुति केला निबद्ध वल्लींनीं ॥
पंकजवद्दुर्जातें करिजेतो घात भृंगवल्लींनीं ॥ १७ ॥
दुर्योधनें बुडविला तो गंगेंत त्यजूनि अनुकंपा ॥

---

१ सहवासाला. २ ब्रह्महत्या, सुरापान, स्वर्णस्तेय, गुरुस्त्रीगमन व हीं चारी पापें करणाराशीं समागम, हें पापपंचक. ३ सुंदर बागेंत. ४ तंबूमध्यें. ५ अत्यंत चपलानें. ६ कमलसदृश दुष्टानें. ७ भुंग्याप्रमाणें लीन ह्म० नम्र झाला, त्याच्या ठायीं.

ऐसें अघ करितां सा पापांची पावली न तनु कंपा ॥१८॥
पाषाणसा बुडाला खळसंगें घात हा असा घडला ॥
नागकुमारांवरि तो जाउनि नगालयांतरीं पडला ॥१९॥
वरि पडतां डसले ते दैवें तो त्यासि होय हित दंश ॥
विष उतरलें अहिविषें उरला नाहींच लेशहि तदंश ॥२०॥
स्वज्ञानातें पुनरपि पावे तो जेंवि अंध नेत्रांतें ॥
दैवें तद्वळ त्याला झालें तोडोनि बन्धनें आतें ॥ २१ ॥
बन्धन तोडुनि भीमें डसले होते तनूसि जे सर्प ॥
गरुडें जसे तसे ते दूर उडविले हरूनियां दर्प ॥ २२ ॥
नाग-कुमार-मुखें श्रुत होतां आश्चर्य-वृत्त तो राजा ॥
वासुकि पाहों आला कुन्तींचा आर्यकाख्यही आजा ॥
आर्यकनाग प्रेमें भेटे भीमासि कीं कळे नातें ॥
आर्यांचें दूरत्वें नसतां सहवासहीं मळेना तें ॥ २४ ॥
वासुकि ह्मणे करावें याचें प्रिय काय आर्यका सारें ॥
श्रान्ताला निववावें इच्छितसे हेंचि कार्य कासारें ॥२५॥
आर्यक ह्मणे प्रभो प्रिय करिसी जरि सुप्रसन्नचित्तानें ॥
बहुलाभ काय याला दिधल्या मणि-कांचनादिवित्तानें ॥
आहे सहस्रगजबळ ज्या रसकुण्डीं प्रतिष्ठित प्राज्ञा ॥
जितुका रुचेल जो रस तितुका सेवू असी दिजे आज्ञा ॥

---

१ दुष्टाची. २ सज्जनांचें. ३ नातें. ४ उत्तम. ५ सरोवर.

ऐसें अघ करितां सा पापांची पावली न तनु कंपा ॥१८॥
पाषाणसा बुडाला खळसंगें घात हा अघा वडला ॥
नागकुमारांवरि तो जाउनि नगालयांतरीं पडला ॥१९॥
वरि पडतां डसले ते दैवें तो त्यासि हाय हित दंश ॥
विष उतरलें अहिविषें उरला नाहींच लेशहि तदंश ॥२०
स्वज्ञानातें पुनरपि पावे तो जेंवि अंध नेत्रांतें ॥
दैवें तद्वळ त्याला झालें तोडोनि बन्धनें आतें ॥ २१ ॥
बन्धन तोडुनि भीमें डसले होते तनूसि जे सर्प॥
गरुडें जसे तसे ते दूर उडविले हरूनियां दर्प ॥ २२ ॥
नाग-कुमार-मुखें श्रुत होतां आश्चर्य-वृत्त तो राजा ॥
वासुकि पाहों आला कुन्तीचा आर्यकाख्यही आजा ॥
आर्यकनाग प्रेमें भेटे भीमासि कीं कळे नातें ॥
आर्यांचें दूरत्वें नसतां सहवासहीं भळेना तें ॥ २४ ॥
वासुकि ह्मणे करावें याचें प्रिय काय आर्यका सारें ॥
श्रान्ताला निववावें इच्छितसे हेंचि कार्य कासारें ॥२५॥
आर्यक ह्मणे प्रभो प्रिय करिसी जरि सुप्रसन्नचित्तानें ॥
बहुलाभ काय याला दिधल्या मणि-कांचनादिवित्तानें ॥
आहे सहस्रगजबळ ज्या रसकुण्डीं प्रतिष्ठित माझा ॥
जितुका रुचेल जो रस तितुका सेवू असी दिजे आज्ञा॥

---

१ दुष्टाची. २ सज्जनांचें. ३ नातें. ४ उत्तम. ५ सरोवर.

रस-सेवनार्थ आज्ञा वासुकिची होय दाविलें कुण्ड ॥
सुपरिश्रान्तें भीमें त्या रसकुण्डासि लाविलें तुण्ड॥२८॥
केलीं एकोच्छ्वासें एक असीं रिक्त आठ रसकुण्डें ॥
पात्रें स्वल्पजळाचीं जैसीं तृपितें गजें ।निहिंतशुण्डें ॥२९॥
अंश जगत्प्राणाचा ह्मणवुनि रस तो महातपा प्याला ॥
सुकृत अमित नसतें तरि लावूं देते न हात पाप्याला३०॥
एकान्तीं सुखशयनीं पाण्डव निजला पिवोनियां सुरसा॥
रूपें बळें गुणें तो सकळां नागांसि भासला सुरसा ॥३१॥
इकडे धर्म पृथेला जातांचि गृहीं पुसे पुढें आला ॥
भीम नयेतां दिसला केला बहु शोध काय तो झाला३२
कुन्ती ह्मणे अहा हा दैवा हे रीति काय गा वरवी ॥
ती प्रिय-पुत्र-गति जशी तिस पतिगतिही तशी न घाबरवी
कुन्ती विदुरासि ह्मणे भावोजी भीम भेटवा धुण्डा ॥
तद्रहिता हे सन्तति न हिता जैसी विपुष्करा शुण्डा ३४॥
दुर्योधन साहेना त्यासि जसा शिशु कणासि नयनींच्या ॥
वाटे वधिला तेणें अन्यायचि आवडे न नय नीचा ३५॥
विदुर ह्मणे यावरि हें येवूं देवूं नकोचि तोंडास ॥
रक्षीं शेष, नघे द्विप- दाहि मौनास्तिकभक्ति तों डास॥३६

१ घातली आहे सोंड ज्यानें तो. २ वायूचा. ३ पुष्कर ह्मo अग्र तेणेंकरून रहित. ४ बाकीचे चार पुत्र. ५ शत्रु हाच सर्प. ६ मौनरूप आस्तीकऋषीचे भक्तांच्या ठिकाणीं.

रस-सेवनार्थ आज्ञा वासुकिची होय दाविलें कुण्ड ॥
सुपरिश्रान्तें भीमें त्या रसकुण्डासि लाविलें तुण्ड॥२८॥
केलीं एकोच्छ्वासें एक असीं रिक्त आठ रसकुण्डें ॥
पात्रें स्वल्पजळाचीं जैसीं तृषितें गजें ।निर्हितशुण्डें ॥२९॥
अंश जगत्प्राणाचा ह्मणवुनि रस तो महातपा प्याला ॥
सुकृत अमित नसतें तरि लावूं देते न हात पाप्याला३०॥
एकान्तीं सुखशयनीं पाण्डव निजला पिवोनियां सुरसा॥
रूपें बळें गुणें तो सकळां नागांसि भासला सुरसा ॥३१॥
इकडे धर्म पृथेला जातांचि गृहीं पुसे पुढें आला ॥
भीम नयेतां दिसला केला बहु शोध काय तो झाला३२
कुन्ती ह्मणे अहा हा दैवा हे रीति काय गा वरवी ॥
ती प्रिय-पुत्र-गति जशी तिस पतिगतिही तशी न घाबरवी
कुन्ती विदुरासि ह्मणे भावोजी भीम भेटवा धुण्डा ॥
तद्रहिता हे सन्तति न हिता जैसी विपुष्करा शुण्डा ३४॥
दुर्योधन साहेना त्यासि जसा शिशु कणासि नयनींच्या ॥
वाटे वधिला तेणें अन्यायाचि आवडे न नय नीचा ३५॥
विदुर ह्मणे यावरि हें येवूं देवूं नकोचि तोंडास ॥
रक्षीं शेष, नघे द्विष- दाहि मौनास्तीकभक्ति तोंडास॥३६

१ घातली आहे सोंड ज्यानें तो. २ वायूचा. ३ पुष्कर ह्म० अग्र तेणेंकरून रहित. ४ बाकीचे चार पुत्र. ५ शत्रु हाच सर्प. ६ मौनरूप आस्तीकऋषीचे भक्तांच्या ठिकाणीं.

त्वत्सुत दीर्घायु असें जें वाक्य महर्षिचें न तें विसरें ॥
होय सदाशीर्वचनें[1] अमृताच्याही भलें न तेंवि सरें[2] ॥ ३७ ॥
येईल शीघ्र कीं तो साध्वाशीर्वादपात्र[3] शिवशील[4] ॥
निवशिल सुतस्पर्शें चिन्तेला न गणरात्र[5] शिवशील ॥ ३८ ॥
करुनि समाधान असें गेला विदुर स्वमंदिरा मग तो ॥
आठ दिन निजोनि उठे प्राणव्यसनींहि[6] पुण्यवान् जगतो
आर्यकमतें अहींद्रें सुखवाया कुन्ति-कुळ-पताकेला[7]
त्या स्थानींच वृकोदर बहुसत्कारूनि पाववता केला ॥ ४०
भीमें माता भ्राते क्षिप्र निववविले तसे न घनसारें[8] ॥
तच्चित्तचातकासुख[9] नाशी रस-पान-वृत्त-घन[10] सारें ॥ ४१ ॥
धर्म ह्मणे दुर्योधन- चित्तास प्रेम नित्य नव दावा ॥
भीष्मा विदुरा वांचुनि हा अर्थ तुह्मीं परासि न वदावा
विश्वास खळीं न बरा सावध व्हा भय घडे अनवधानें[11] ॥
हा राज्यलुब्ध लेशहि लाजेल न गुरु-सुहृज्जन-वधानें ४२

---

१ साधूंच्या आशीर्वादानें. २ सरोवरानें. ३ साधूंच्या आशीर्वादाला पात्र. ४ कल्याणकारक स्वभाव ज्याचा तो. ५ बहुत दिवस. ६ प्राणसंकटांत. ७ कुंतिभोजाच्या कुळाला शोभादायक पताका जी कुंती तिला. ८ कापुरानें. ९ माता व बंधु ह्यांचें चित्त हाच चातक त्याचें दुःख. १० नागलोकीं केलेलें रसपान त्याचें वृत्त हाच घन. ११ बेसावधपणानें.

पांडव सावध झाले त्याले दुर्भेद्य विदुरमतं[1]-कवचा ॥
साहति सुदुःसहाही[2] दुर्योधनं[3]-कर्ण-शकुनि-हतक-वचा ४४

# अध्याय २१ वा.

## सारांश.

[ १—१२ ] गोतमऋषीचा पुत्र शरद्वान् हा मोठा धनुर्वेद-निपुण होता. तो उग्रतपस्या करित असतां इंद्रास भय उत्पन्न झालें. व त्यानें जानपदीनामक अप्सरा त्यास मोहित करण्यास पाठविली. तिचें तें अप्रतिमलावण्य पाहून त्याचें वीर्य शर ह्या नांवाच्या गवतांत पडलें. तेथें एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें उत्पन्न झालीं. तीं अपत्यें शांतनु राजा मृगयेस गेला असतां त्याच्या दृष्टीस पडलीं. त्यानें त्यांचें पालन करून मुलाचें कृप व मुलीचें कृपी असें नांव ठेविलें. पुढें शरद्वान् ऋषीनें त्यास धनुर्वेद पढविला. हाच कृपाचार्य होय. पुढें भीष्मानें कौरवपांडवांस धनुर्वेद शिकविण्याकरितां कृपाचार्याच्या स्वाधीन केलें.

---

१ विदुराचें मत हेंच कवच त्याला. २ सोसण्यास फारच कठीण. ३ दुर्योधनादि जे हतक ह्म० दुष्ट त्यांच्या वचनाला.

गोतमपुत्र शरद्वान्  चाप-श्रुति[1]-निष्ट जो स्वभावानें ॥
पूर्वी वज्री[2] भ्याला  त्याच्या दारुण-तपः प्रभावानें ॥ १ ॥
पाठविली सुरकन्या  जानपदी स्व-स्तडाग[3]-नक्रानें ॥
त्याच्या उग्रतपाला  विघ्न[4] करावा ह्मणूनि शक्रानें ॥ २ ॥
तो बाणधनुष्पाणी[5]  मुनि जानपदी-कटाक्ष-शर-पातें[6] ॥
वातें तरुसा कांपे  धैर्य मनें चाप सोडिलें हातें ॥ ३ ॥
प्रथम सशर चाप गळे  त्यावरि तद्वीर्यही गळे क्षिप्र ॥
होतां विघ्न स्वाऽश्रम  सोडुनियां जाय तो महाविप्र ॥ ४ ॥
मुनि-वीर्य शरस्तंबीं[7]  पडतां होय द्विधा सुता सुत तें ॥
गर्भाऽशयीं न वसतां.  दिव्याकृति- लाभ सत्कृतें सुततें[8]
मृगयागतशांतनुच्या[9]  तें मिथुन चमूचरें[10] अरण्यांत ॥
अवलोकिलें मुनीच्या  स्थानांत, ख्यात जो शरण्यांत[11] ६ ॥
दर्भासन-कृष्णाऽजिन[12]-  वल्कल-शर-चाप-साहचर्यानें[13] ॥
तें मुन्यपत्ययुग[14] हें  निश्चित केलें सुबुद्धिवर्यानें[15] ॥ ७ ॥

---

१ धनुर्वेदनिपुण. २ इंद्र. ३ स्वर्ग हेंच सरोवर त्यांतील सुसर इंद्र त्यानें. ४ हा शब्द संस्कृत पुल्लिंगी आहे. ५ बाण व धनुष्य हातांत ज्याच्या तो. ६ जानपदीच्या कटाक्षरूप बाणांच्या प्रहारानें. ७ शरनामक गवताचा समूह. ८ अतिविस्तृत असें सत्कृत ह्म० पुण्यकर्म त्यानें. ९ शिकारी करितां आलेल्या शांतनु राजाच्या. १० सैन्यांतील मनुष्यानें. ११ शरणागतांवर दया करणारांमध्यें. १२ कृष्णह्म० काळवीट त्याचें अजिन ह्म० कातडें. १३ जवळ असण्यानें. १४ ऋषीचीं दोन मुलें. १५ बुद्धिमतांत श्रेष्ठ.

भेटाविलें शांतनुला तेणें मुनि-वीर्य-जात जाणोनी ॥
परिपाळिलें कृप कृपी नामें ठेवुनि गृहासि आणोनी ॥ ८
येउनि निजाश्रमातें तोहि शरद्वान् महामुनि ज्ञानी ॥
जाणे शंतनु-सदनीं स्वाऽपत्याच्या स्थितीप्रति ध्यानीं ९
भेटोनि कृपसुताला[1] तो स्व-धनुर्वेद दाय[2] दे तात ॥
पुत्रासि जोडलें धन जेंवि सुखें बाप माय देतात ॥ १०
गुरुच्या अनुग्रहें कृप अभ्यासें फार न पडतां खेदीं ॥
परमाचार्यत्वातें[3] पावे तो स्वच्छधी धनुर्वेदीं ॥ ११ ॥
भीष्में कौरव पांडव शिष्यत्वें त्यासि अर्पिले विधिनें ॥
ते बाळ धनुर्वेदीं सर्व पढविले कृपें कृपानिधिनें ॥ १२ ॥

# अध्याय २२ वा.

## सारांश.

भरद्वाजऋषि गंगाद्वारीं स्नानास गेला होता. तेथें घृताचीनामक अप्सरा त्याच्या दृष्टीस पडली. तेणें करून तो मोहित झाला. व त्याचें वीर्य पतन पावलें. तें त्यानें द्रोणकलशांत ठेविलें. तेथें पुत्र उत्पन्न झाला. यास्तव त्याचें नांव

१ कृपनामक पुत्रास. २ विभागार्ह असें वडिलोपार्जित धन. ३ गुरुवर्यांच्या योग्यतेस. ४ ऋषीच्या वीर्यापासून झालेला.

द्रोण असें ठेविलें. भरद्वाजाचा शिष्य अग्निवेश ह्यानें त्यास वेदवेदांगें व आग्नेयास्त्र हीं पढविलीं. भरद्वाजाचा मित्र पृषत राजा ह्याचा पुत्र द्रुपद हा द्रोणाचा सहाध्यायी होता. भरद्वाज व पृषत हे परलोकास गेल्यावर द्रुपद पांचाळ देशाचा राजा झाला. द्रोणानें पितरांच्या आज्ञेनें कृपीशीं लग्न केलें. ती पासून त्यास अश्वत्थामा हा पुत्र झाला. पुढें द्रोण श्रीपरशुरामाकडे गेला. व तेथें अस्त्रविद्या शिकून तींत मोठा प्रवीण झाला.

जाय भरद्वाज मुनी　गंगाद्वारीं करावया स्नान ॥
होय घृताचीदर्शन　तेथें तों तेंचि लागलें ध्यान ॥ १ ॥
सौंदर्यगुणोत्कर्षें　फारचि शोभे जसी रति घृताची ॥
तद्रूपें हृदयाची　होय जसी पावकें गति घृताची ॥ २ ॥
पावे कामविकारें　तत्काळ अमोघ रेत जें पतन ॥
द्रोणकलशंमखपात्रीं　मुनिनें तें तेज ठेविलें जतन ॥ ३ ॥
स्वात्युदकें शुक्तिपुटीं　होताहे जन्म जेंवि मोत्याचें ॥
मुनिवीर्यें मखपात्रीं　मुनिजन्म द्रोण नाम हो त्याचें ॥
पढला सांग श्रुति तो निजपितृशिष्याग्निवेशमुनिजवळी ॥
अग्न्यस्त्रासि शिके जें　रिपुसि कलिसि रामनामसें कवळी
मित्र भरद्वाजाचें　पृषतनृप, तसें तदात्मज द्रुपद ॥

१ द्रोणकलशनामक यज्ञपात्रांत.

द्रोणाचें, अध्ययनीं गुरुचें आराधितां सुरेंद्रु[1] पद ॥ ६ ॥
जाय भरद्वाज मुनि स्वर्गातें पृषतही मग प्राज्य[2] ॥
उत्तरपांचाळांचें द्रुपद करी धर्मनीतिनें राज्य ॥ ७ ॥
तप करितां पितरांची आज्ञा झाली ह्मणोनि तो द्रोण ॥
विधिनें वरी कृपीतें न करील गुरूक्त जाणता कोण ॥८॥
प्रसवे कृपी सुतातें शब्द करी उपजतां तयापरि तो ॥
उच्चैःश्रवा सुरांचा हय हेषे[3]तें जयापरी करितो ॥ ९ ॥
अश्वत्थामा ऐसें नाम तया ठेविलें असें झालें ॥
त्यावरि त्या द्रोणाच्या कर्णाप्रति परशुरामयश आले ॥
कीं तो यथेष्ट देतो सद्विप्राकारणें स्वधन कांहीं ॥
दैन्य उरों देत नसे संप्रति बहुमूल्यरत्नकनकांहीं ॥११॥
दिव्यास्त्रांचा दाता मूर्तधनुर्वेद नीतिशास्त्रज्ञ ॥
जेणें अगणित केले स्वभुजबळें सांग रणमहायज्ञ॥१२
ऐसें परिसुनि जाय द्रोण महेंद्राऽचळीं तया भेटे ॥
ज्याचे विशिख[4] क्षत्रीं व्याघ्रीचे अविकुळीं[5] जसे पेटे॥१३॥
सांगोनि नाम गोत्र प्रांजळि वंदूनि तत्पदें राहे ॥
वाग्युद्धदानशूर प्रभु राम द्रोणमुनिकडे पाहे ॥ १४ ॥
सर्वस्वें प्रिय पोष्य ब्राह्मण ज्या अद्भुतप्रभा वपुसे ॥
वद इच्छा काय असे द्रोणाला तो महाप्रभाव पुसे ॥ १५
तो भारद्वाज ह्मणे इच्छितसें मी अनंत धन दाया ॥

---

१ कल्पवृक्ष. २ मोठें. ३ खिंकाळण्याला. ४ बाण. ५ मेंढ्यांच्या समूहांत.

व्हावी तुझ्या प्रसादें तुज मज पाहोनि लाज धनदा त्या
राम ह्मणे विप्रजना दिधलें सर्वस्व, कश्यपा अवनी ॥
अस्त्रें शरीर आहे अन्य किमपि राहिलें नसे भवनीं ॥ १७
यांत तुला सत्पात्रा द्यावें म्यां काय बोल आशु कसा ॥
द्या दिव्याऽस्त्रेंचि असें द्रोणद्विज मंजु बोलिला शुकसा
अस्त्रें समग्र दिधलीं स-रहस्यें व्रत दिल्हा धनुर्वेद ॥
केला स्वरूपेंचि परि च्छात्रें भक्त्यर्थ उरविला भेद ॥१९

# अध्याय २३ वा.

## सारांश.

द्रोण, आपला गुरुबंधु द्रुपदराजा ह्यास भेटावयास गेला असतां द्रुपदानें त्यास ओळख न देतां अपमान केला. तें मनांत ठेवून तो हस्तिनापुरास गेला. व गुप्तरूपानें कृपाचार्याच्या घरीं राहिला. तेथें त्यानें गुप्तरीतीनें अर्जुनास अस्त्रविद्या पढविली. एके दिवशीं कौरव पांडव नगरा बाहेर येऊन विटीदांडूचा खेळ खेळत होते. त्यांची विटी विहिरींत

---

१ शीघ्र. २ गुप्तमंत्रांसह. ३ आत्मतुल्य.

पडली. ती त्यांस काढितां येईना. त्यांच्या दृष्टीस एक ब्राह्मण पडला. त्यास त्यांनीं विटी काढण्याविषयीं विनंती केली. ब्राह्मणानें मंत्रबळानें ती विटी काढिली. तेव्हां सर्व मुलांस मोठा विस्मय झाला. मुलांनीं ती गोष्ट भीष्मास सांगितली. हें अद्भुत सामर्थ्य द्रोणाचेंच असेल असें समजून भीष्म त्या ब्राह्मणाच्या भेटीस गेला. तो द्रोणच होता. मग त्याचा सत्कार करून भीष्म त्यास आपल्या घरीं घेऊन आला. भीष्मानें आगमनाचें कारण विचारिलें असतां द्रोणानें आपलें सर्व वृत्त त्यास सांगितलें. भीष्मानें त्यास आपले घरीं ठेवून घेतलें. अस्त्रविद्यासिद्धि झाल्यावर तुह्मीं माझें एक कार्य करावें असा करार करून घेऊन द्रोणाचार्यानें कौरवपांडवांस अस्त्रविद्या शिकविण्यास आरंभ केला.

मग भेटोनि द्रुपदा द्रोण ह्मणे मी तुझा सखा पहिला ॥
दे क्षोभ शब्द तो त्या दंड जसा स्पर्शतां खळा अहिला ॥१॥
पार्षत[1] ह्मणे दरिद्रा[2] तूं राजाचा सखा कसा मुग्धा[3] ॥
मित्र सधन सधनाचें साजे गोदुग्ध मित्र गोदुग्धा ॥ २ ॥
नकरुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस,ख्यातें ॥
विद्वत्वें सधनत्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें ॥ ३ ॥
झालें जीर्ण[4] विसर जें कोण तया मंदनायका[5] पुसतो ॥

१ पृषताचा पुत्र द्रुपद. २ भिकारड्या. ३ मूर्खा. ४ जुनें. ५ हे मूर्खशिरोमणे.

गतरंगसुगंध[1] जुना पावे सन्मान काय कापुस तो ॥ ४
श्रोत्रियसख[2] अश्रोत्रिय शूरसख क्लीब[3] सुकविसख[4] अकवी॥
आह्मां असें नसे श्रुत हंससख न मानसस्थही बक वी[5] ॥
बहु बडबडे असें दे मद्य तसें त्यासि भाग्य मत्तत्वं[6] ॥ ६
मुनि मनिं ह्मणे न करितां परिभव न कळेल यासि मत्तत्वं[7]
मुनि त्या अपमानातें घोंटी जेंवि त्रिलोचनें[8] गरातें ॥
किमपि विरुद्ध नवदतां गेला तो हस्तिनाह्वनगरातें[9] ७
राहे गुप्त कृपगृहीं द्रोण तदात्मज सुशीळराशि कवी ॥
पार्थास कृपानंतर अस्त्रें कोणासि नकळतां शिकवी ८
ते कुरुकुमार करितां नगरा बाहेर जाउनी क्रीडा ॥
निरुदककूपपतितनिज-[10] वीटोद्धृत्यपटु पावले व्रीडा[11] ९
ते वृद्ध कृश श्याम द्रोण ब्राह्मण अदूरं[12] पाहोनी ॥
निजवीटोद्धारार्थ प्रार्थिति भंवते उभेचि राहोनी ॥ १० 
द्रोण ह्मणे त्यांसि तुह्मी भरतकुळज कीं कृतास्त्र[13] कीं तरिती
वीटा नानिघे धिग् धिग् गुण तेचि स्वेष्टसिद्धि जे करिती
वीटा तसी स्वमुद्रां[14] टाकुनि मी काढितों इषीकांहीं[15] ॥

१ रंग व सुगंध ज्याचा गेला तो. २ वेदवेत्त्या ब्राह्मणाचा मित्र. ३ नपुंसक, भ्याड. ४ ज्ञात्याचा मित्र. ५ पक्षी. ६ उन्मत्तपणा. ७ माझें सामर्थ्य. ८ शंकर ९ हस्तिना ह्या नांवाचे नगरांत. १० जलरहित विहिरींत पडलेली आपली विटी ती वर काढण्यास असमर्थ. ११ लज्जा. १२ समीप. १३ अस्त्रविद्यानिपुण. १४ आपली आंगठी. १५ इषीका हें गवत आहे. त्यास कसई ह्मणतात. त्या गवताच्या कांड्यांनीं.

साहित्य परि करावें प्रेमें मद्भोजनाविषीं कांहीं ॥ १२
धर्म ह्मणे अस्मद्गुरु कृप, तदनुमतें तुह्मांसही भिक्षा ॥
शाश्वत मिळेल दावा, वीटा काढूनि अद्भुता शिक्षा ॥ १३
हास्य करूनि द्रोणें त्या शशिकुळजांसि द्यावया तुष्टी ॥
कूपांत इषीकांची अभिमंत्रण करुनि सोडिली मुष्टी १४
एकीचें मुख शिरलें वीटेमध्यें तिला दुजी जडली ॥
तिसरी तीस चतुर्थी तिजला ऐसी परंपरा घडली ॥ १५
बाहेर काढिली ती वीटा तत्काळ जेंवि पात्र गळें ॥
स्वरभंग यांतें वरिला या पार्थांच्या मुहूर्तमात्र गळें १६
अभिमंत्रित शर सोडुनि मुद्राच्छिद्रांऽतरीं तया शिरवी ॥
वरि अंगुलीयकातें ओढी किरणें जसें पयाशि रवी १७
त्या मंत्रचमत्कारें प्रमुदित होउनि कुमार ते प्रणती ॥
करुनि प्रेमें सांगा निज नाम ग्राम कुळ असें ह्मणती १८
द्रोण ह्मणे सांगा हें भीष्माला ज्ञानभर्गनदीपाला ॥
जाणेल तोचि लोकीं विदित नसे काय गगनदीपाला १९
बाळमुखें तें कळतां भीष्म ह्मणे परशुराम कीं द्रोण ॥
आला असेल भाग्यें लोकीं तिसरा असा कृती कोण २०
श्रीगुरुसम गुरुबंधु प्रेमें भेटोनि निववला भीष्में ॥
जैसा मयूर मेघें जो तापविला सुदुःसहें ग्रीष्में ॥ २१

---

१ गहिंवर. २ त्या मुलांत. ३ कंठानें. ४ आंगठीच्या छिद्रांत ५आंगठीला. ६ ज्ञानरूप ऐश्वर्याचा सागर ७ सूर्याला.८कुशळ. ९ गुरु परशुराम त्या सारखा.

आणूनि राजसदनीं　पूजुनि होऊनि साऽनुरागं मनीं ॥
भीष्में तयासि पुसिलें　कीं सांगा हेतु कोण आगमनीं २२
द्रोण ह्मणे पारिसावें　त्वां, सांगावें तुलाचि सभ्यास ॥
द्रुपदास मजहि करवी　चापीं गरुअग्निवेश अभ्यास ॥ २३
गुरुबंधु सखे आह्मी　होतों गुर्वाश्रमांत वीरमणे ॥
तेव्हां मजला ऐसें　पांचाळ द्रुपद गौरवूनि ह्मणे ॥ २४
जेव्हां काय मज सख्या　द्रोणा देईल राजपद तात ॥
तेव्हां तद्भोक्ता तूं　आण तुझी कुळज सत्य वदतात ॥२५
गेला पढोनि झाला　नृप तो, झालों गृहस्थ मी राया॥
फळली सुत-रत्नफळें　त्यावरि माझी कृपी सती जाया२६
धनिकापत्यकृतपयः- प्राशन पाहोनि पुत्र पय मागे ॥
पिष्टोदकें ठकवितां　तें माझ्या शल्य काळजा लागे　२७
पिष्टोदक-पान-मुदित　सुत धनिकसुतांत चपळपद नाचे
मोहिति मज क्षण क्षण　त्यांच्या उपहासशब्द वदनाचे
बहु धन असो नसो परि　एक असावें गृहींगृहीं द्रुभतें ॥
घ्यावें सुतार्थ शुद्धा　पासुनि गोदान सन्मतें शुभ तें　२९
फिरलों बहु कीं संतति　पडु तासि गोदा नदी न ताराया

---

१ प्रीतियुक्त. २ वीरांत श्रेष्ठ अशा हे भीष्मा. ३ फलद्रूप झाली. ४ पुत्ररत्न हेंच फळ तेणें करून. ५ श्रीमंतांच्या मुलांनीं केलेलें दुग्धप्राशन. ६ पिष्टयुक्त उदकाच्या प्राशनानें संतुष्ट. ७ गृहस्थाचे घरीं.

परि विधि मज दे मिळवूं जातां गोदान दीनता राया ३०
स्मरलें स्वसखद्रुपद- स्नेह-वचन मज ह्मणोनि मग राहो
यत्नांतर,करुनि असा निश्चय गेलों तदीयनगरा हो ३१
भेटोनि तया वदलों पूर्वीचा मी सखा असें नातें ॥
जें तद्दत्तोत्तर तुज सांगाया योग्यसें असेना तें ॥ ३२
परि न कथितां भल्याला हृत्ताप उणा नहोय शांतनवा ॥
तें ऐकुनि साहेसा कोण असा सज्जन प्रशांत नवा ३३
धिक्कारिति अज्ञ जसे मागतया भिक्ष सर्वदा भणगा ॥
मज धिक्कारी, हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण गा॥ ३४
वदला असें असें कीं मी सख्याऽनर्ह मंद राहो तें ॥
स्मरतां बहु दुःख मनीं भीष्मा खळ-जलधिमंदरा होतें ३५
नायक वीरांचा श्री द्रोण द्रुपदोक्त सर्व आयकवी ॥
हाय कवी तोहि ह्मणे ज्याच्या मातोशि शंभुसायक वी ३६
देईन अन्न एका दिवसांचें मात्र पाहिजे तरि घे ॥
हें शेवटीं वदे तों कोपाऽग्नीं मदीय चेत रिघे ॥ ३७

१ आपला मित्र द्रुपद त्याचें स्नेहयुक्त भाषण. २ दुसरी खटपट. ३ त्यानें दिलेलें उत्तर. ४ मागणाऱ्याला. ५ भिकाऱ्याला. ६ स्नेहास अयोग्य. ७ शत्रुसमुद्राचें मथन करणाऱ्या मंदरपर्वता, हे भीष्मा. ८ विष्णु. शंकरानें, त्रिपुरविजयाच्या वेळीं अग्नि, चंद्र व विष्णु ह्यांचा बाण बनविला होता. ९ क्रोधाग्नीमध्यें.

द्रुपद-कृतघ्नत्वाची येतांचि प्रत्ययासि पुष्कलता ॥
त्यजिली सभा तयाची म्यां,मधुपें जेंवि घर्मशुष्क[1] लता ३८
आलों त्वन्नगरा मी जोडाया अर्थ शिष्य यश कांहीं ॥
कर्ण विटविले माझे द्रुपदाच्या विरसवचनमशकांहीं[2] ३९
भीष्म ह्मणे राज्य तुझें ज्याच्या प्राप्त्यर्थ देव नवसावे ॥
ते कुरुभाग्यें आले हे पाय क्षणाहि दूर न वसावे ॥ ४०
सिद्धचि झालें सर्वहि कर्तव्य असें तुह्मी मनीं आणा ॥
बाणा[3]ऽसन विज्य[4] करा कौरव दासाऽनुदाससे जाणा ४१
प्रार्थुनि भीष्में द्रोण प्रासादीं[5] स्थापिला महेश्वरसा[6] ॥
केला मान असा कीं मानी तो सत्य होय हे स्वरसा[7] ४२
स्वपदीं कुमार सर्वहि शिष्यत्वें वाहतांचि शांतनवें ॥
शिकवी धनुःश्रुतिहृदय[8] व्हाया यश करुनि शत्रु शांत नवें
शिष्यांसि द्रोण ह्मणे येतां तुमच्या कृताऽस्त्रता[9] आंगा ॥
मच्चिंतित कार्य तुह्मी सिद्धीप्रति पाववाल कीं सांगा ४४
त्यांत ह्मणे अर्जुन मी युष्मच्चिंतित[10]-समस्त-कार्य-कर ॥
दुःसाध्य काय असतां या माथां विजय-दायका[11]ऽर्यकर
प्रेमें रडे पडे गुरु पार्थ गळां त्या तशा उदारपणें[12] ॥
आर्य प्रसन्न होती नुसत्याहि हितोक्तिच्या उदारपणें ४६

१ उन्हानें सुकलेली. २ अप्रियभाषणरूपी चिलटांनीं. ३ धनुष्य. ४ दोरीनें रहित. ५ राजवाड्यांत ६ शंकरासारखा. ७ आपली पृथ्वी. ८ धनुर्वेदाचें रहस्य. ९ अस्त्रविद्यासिद्धि. १० तुह्मीं चिंतिलेलीं सर्व कार्यें करणारा. ११ यशोदायक आपला हात. १२ उदार अशा प्रतिज्ञावचनानें.

# अध्याय २४ वा.

## सारांश.

द्रोणाचार्यानें अर्जुनास अस्त्रविद्येंत प्रवीण केलें. ही त्याची कीर्ति ऐकून पुष्कळ राजपुत्र द्रोणाचार्यांचे शिष्य झाले. अर्जुनाचें चातुर्य व गुरुभक्ति पाहून द्रोण फार संतोष पावला. त्यानें त्यास सर्व विद्या शिकविली, व असा वर दिला कीं, तुझ्या सारखा दुसरा धनुर्धर ह्या लोकांत होणार नाहीं.

सुवर्णधनु हा एक कोळीजातीचा राजा होता. त्याचा पुत्र एकलव्य. त्यानें आपणास विद्या शिकविण्याविषयीं द्रोणाची प्रार्थना केली. ती द्रोणानें मान्य केली नाहीं. तेव्हां एकलव्यानें अरण्यांत मातीचा गुरु ( द्रोण ) करून त्यावर भाव ठेवून विद्या संपादिली. त्याचें चातुर्य अर्जुनाहून अधिक पाहून द्रोणाचार्यानें त्याच्या उजव्या हाताचा आंगठा गुरुदक्षिणार्थ मागून घेतला. तेणें करून एकलव्याच्या विद्येस न्यूनता येऊन अर्जुनाचें श्रेष्ठत्व कायम राहिलें.

या प्रमाणें अर्जुन निःसीम गुरुभक्त असल्यामुळें त्यावर द्रोणाचार्यांची मोठी कृपा असे. शेवटीं एका प्रसंगीं द्रोणानें अर्जुनास ब्रह्मशिरोस्त्र हें श्रेष्ठ अस्त्रही दिलें.

दिव्याऽस्त्रमानुषाऽस्त्रें पार्थाशिष्यासि पढवितां यश तें
ऐकुनि राजसुतांचीं त्यागुरुचे वरिति भव्य पाय शतें १
गुरुच्या प्रसाद-पदवी- प्रति शिक्षोत्कर्ष[१] साधुनी चढतां॥
दुर्योधन- सख कर्ण स्पर्धा पार्थासवें करी पढतां ॥ २
श्रीगुरु एका समयीं सूक्ष्ममुख[२] कमंडलु स्वशिष्यकरीं
उदक भरुनि आणाया दे पुत्रासहि ह्मणे तसेंचि करीं ३
जळ आणाया गुरुनें पुत्राच्याही करीं दिल्हा पर तो॥
विस्तीर्ण-मुख[३] कमंडलु होता कीं शीघ्र एक हा परतो ४
उपदेशावें कांहीं पुत्रासि रहस्य नकळतां अन्या ॥
केली युक्ति असी कीं द्यावें भक्ता विचक्षणा धन्या ॥ ५॥
ऐसें गभीरतर[४] जें स्व-गुरु-मनोगत अगम्य तर्कशतें ॥
जाणे अर्जुन, मन कीं लवाहि न गुरु-चरणविरह-कर्कश[५] तें
तत्काळ वारुणाऽस्त्रें भरुनि स्व-कमंडलूंत तो पाणी ॥
गुरुला गुरुपुत्रासह जोडी तद्दास्यकृतिकृती[६] पाणी ॥ ७
याहि शहाणपणें तो अर्जुन गुरुच्या मनांत शिरला हो
ऐशा गुरुप्रियांचें पदरज एकहि कुळांत शिर लाहो ॥ ८॥
कथिली रहस्यविद्या दोघांसाहि, अधिक काय संतानें[७]॥

---

१ शिक्षेचें आधिक्य. २ बारीक तोंडाचा. ३ मोठ्या तोंडाचा. ४ फार खोल. ५ गुरुचरणांच्या वियोगाविषयीं कठोर. ६ गुरु-सेवेच्या कृत्यांत दक्ष. ७ पुत्रानें.

संतानें पुरवावी संश्रितें-वांछा तसीच संतानें ॥
त्या अर्जुनीं कराया उपदेश करूनि सूपंकारातें ॥ ९ ॥
सांगे एकासमयीं गुरु पाचारूनि सूर्पकारातें ॥ १० ॥
जाईल जरि कदाचित् दीपक भीर्मानुजाऽशनावऽसरीं ॥
तरि आणतां ह्मणावें अन्न नवाढीन या तमःप्रसरीं॥ ११ ॥
ग्रास मुखीं नपडेल श्रमसील तमांत जेवशील कसा ॥
कोणीं कथिलें ह्मणतां वद कीं आहेचि लौकिर्काऽर्थ असा
झालें तसेंचि दैवें दीप कदाचित् प्रभंजनें गेला ॥
अशन करीतचि होता अर्जुन, तों तर्क तन्मनें केला ॥१३॥
अभ्यासें जातो तिळहि न चळतो मुखींच पाणि तमीं ॥
होईन शब्दवेधी तिमिरांतहि, हें मनांत आणित मी ॥१४॥
तेव्हांपासुनियां तो स्वापसुखाची करूनि कुत्सा हे ॥
ऐसें मनीं धरुनि शर- संधान करी मनांत उत्साहें ॥१५॥

---

१ साधूनें. २ दासाची इच्छा. ३ कल्पवृक्षानें. ४ चांगल्या उपकाराला. ५ आचाऱ्याला. ६ भीमाचा अनुज ह्म० पाठचा भाऊ अर्जुन त्याच्या जेवणाच्या वेळीं. ७ निबिड अंधकारांत. ८ लोकांतील चाल. ९ वाऱ्यानें. १० भोजन. ११ दृढाभ्यासानें. १२ हात. १३ पदार्थ प्रत्यक्ष दिसत नसून केवळ शब्दाच्या धोरणानें त्या पदार्थाचा वेध करणारा. १४ निद्रासुखाची. १५ तिरस्कार.

बाण-गुणं-झणत्कार- श्रवण करुनि शयन सोडुनी द्रोण ॥
चित्तीं ह्मणे अहो शर- संधान तमांत करितसे कोण १६॥
पाहे तों तो अर्जुन आहे एकाग्र-बाण-संधानीं ॥
आलिंगिला भुजांनीं प्रोष्यागत पुत्र जेंवि अंधांनीं ॥ १७
आचार्य ह्मणे वत्सा स्वयश यमाचाहि नायको दण्ड ॥
लोकीं असें करीन त्वद्धनुला अन्य काय कोदण्ड ॥१८॥
तुजसम दुजा धनुर्धर लोकीं कोठेंहि आढळेनाची ॥
करिन असें मी, मद्वर- शब्द ध्रुव होय हा ढळेनाची॥१९॥
गुरुच्या सद्वर देतां आवारिति न हात पादुका, नातें॥
तैसेंचि तें, समर्पी शिष्यासि महातपा दुकानातें ॥ २० ॥
झाला तो गुरुसमचि प्रथम गुणें जरिहि होय बिंदु, पण॥
दुग्धाऽब्धि-परिष्वंगीं त्याचें राहेल? तोय-बिंदु-पण ॥२१॥
कोणी एक निषादें क्षितिपति होता सुवर्ण-धनु नामें॥
तत्पुत्र एकलव्य द्रोणाप्रति ये धनु-र्निगम-कामें ॥ २२ ॥
सर्वत्र सर्वे सदयें गुरुनें त्यामात्र एकलव्याला ॥
केलें नाहीं जैसें विधिनें श्रुतिपात्र एकलव्याला ॥ २३ ॥

---

१ बाण व धनुष्याची दोरी ह्यांच्या शब्दाचें श्रवण २ प्रवासाहून आलेला. ३ धनुष्य. ४ स्थिर. ५ शस्त्रास्त्रविद्येचें भांडार. ६ दुधाच्या समुद्राचे आलिंगनानें. ७ कोळी. ८ धनुर्वेद शिकण्याच्या इच्छेनें. ९ श्रुति ह्म० वेद, पक्षीं, कान. त्याला योग्य. १० एकव्या सर्पाला.

गुरुनें आश्रय न दिला परि तो नैषादि नविटला चित्तीं॥
जों जों दुर्लभ तों तों सस्पृह वित्तेच्छु होतसे वित्तीं॥२४॥
जाउनि वनांत मृन्मय गुरु करुनि धरूनि भावसारा धी ॥
ताराऽधीश-चकोर- न्यायें तो साधु त्यास आराधी॥२५
पुरवी इष्ट सकळही न गुरुध्यानप्रभाव नाचारी ॥
इच्छाफळें न तैसीं कल्पलता जेंवि भावना चारी ॥२६॥
जें तो मृन्मय गुरु दे सत्यहि गुरु दे न अर्जुना फळ तें ॥
तद्भावचि सद्गुरु पटु धन्य कराया जना असें कळतें ॥२७
होउनि सुविद्य कुरु-कुळ- नंदन गेले करावया मृगया॥
गुर्वाज्ञा कीं सत्वर माघारें बहु न मारितां मृग या॥२८॥
मृगया करितां शिरला शश-मृग-हननार्थ काननीं कुतरा॥
नैषादीप्रति पाहुनि भुंके जाणो ह्मणे धनू उतरा ॥ २९ ॥
श्वा बहु भुंके पसरुनि तुंडा मांसास्थिवल्लभा, त्यांत ॥
तो सप्त एकलव्य स्वशर भरी जेंवि भल्ल भात्यांत ॥
पाहुनि पांडव ह्मणती ज्याचें श्वमुखांत सप्त शर भारी ॥

---

१ निषादपुत्र एकलव्य. २ भाव ह्म० भक्ति हेंच सार ह्म० सामर्थ्य जिचें ती. ३ चंद्रचकोरन्यायानें. ४ गुरूचे ध्यानाची शक्ति. ५ ना ह्म० नाहीं ह्या शब्दास धरून वागणारा. अर्थात् नाहीं ह्मणणारा. ६ भावना चारी ह्म० भक्ति इच्छाफळें चारित्ये. ७ धनु उतरा ह्म० धनुष्याची दोरी उतरा. ८ मांस व हाडें प्रिय ज्याला तें. ९ अर्धचंद्राकृति बाण.

आहे कृती असाही  तरि मग कां हो नसेल शरभाऽरी[1] ३१
क्षत तिळहि न होतां शर  भरिले श्वमुखांत जेंवि भात्यांत
ऐसा लाघव-शिक्षा-  निधि[2] जो भुज अतुळ वीर्यभा[3] त्यांत
विस्मित होउनि पांडव  शोधुनि भेटोनि त्या निपादास ॥
पुसती वृत्त,श्रवणें  पावाया दुःसहा विपादास ॥ ३३॥
तो निज वृत्त कथी, तों अर्जुनमुख उतरलें विषादानें[4] ॥
मोहचि पावो पाहे  त्या अपकर्षें[5] जसें विपादानें[6] ॥ ३४ ॥
येउनि पुरासि अर्जुन  एकांतीं स्वगुरुला ह्मणे गुरुजी ॥
स्मरती स्ववरोक्ति तुह्मां  मत्पंच-प्राण-पन्नगा[7] गुरु जी ३५
होसील तूंचि माझ्या  शिष्यांत विशिष्टतर अ-सामान्य ॥
दुसरा कोणीहि जगीं  छात्र न होईल तुजअसा मान्य ३६
ऐसा वर देउनि कां मदधिक लोकाऽधिक स्व-शिष्य दुजा
केला निपाद-पति-सुत  सत्य असावा जगांत बोल तुजा
कौतुक विलोकिलें तें  तैसें आम्हीं वनांत हो तात ॥
शुष्यद्ध्रद[8] मीन तसे  विकळ मनोरथ मनांत होतात ॥३८॥
राहे उगाचि संकट-  हर युक्ति वरी मनांत पाहूनी ॥
जाय वनातें गुरु जो  श्रित-तापाऽपह[9] अनातपाहूनी[10] ३९

१ शरभाचा शत्रु. २ हस्तचापल्ययुक्त विद्येचा सागर. ३ पराक्रमाचें तेज. ४ खेदानें. ५ अप्रतिष्ठेनें. ६ विपाचें आदान ह्म० सेवन तेणें करून. ७ माझे पंचप्राणरूप सर्पाला. ८ शुष्क होणारा डोह ज्यांचा. ९ आश्रितांचें दुःख दूर करणारा. १० छायेपेक्षां.

साऽर्जुन भारद्वाज प्रेक्षाया त्या पदानता[1] पावे ॥
पाहुनि ह्मणे छळें हे ऐसे नैष्ठिक[2] कदा न तापावे ॥४० ॥
गुरु-चरण-व्रत-निष्ठा शर-मोक्षाऽभ्यास सारखा यामीं[3] ॥
ऐसा फार बरा हा आलों व्हायासि पारखा या मी ॥ ४१
ऐसें मनांत बोलत जाय गुरु, तया निषाद-तनयानें ॥
वंदुनि पूजुनि केलें सर्वस्व-निवेदनादि विनयानें ॥ ४२ ॥
द्रोण ह्मणे तूं माझा जरि शिष्य दिजे मदीय वेतन[4] हो ॥
केवळ विफळचि दावुनि नम्रत्व ऋजुत्व[5] मात्र वेत न हो
नैषादि ह्मणे स्वामी जें मज सांगाल तें निवेदीन॥
प्रकटीकृत-गुर्वर्थे[6] शिष्य, जसा बहुधनें निवे दीन ॥ ४४॥
द्रोण ह्मणे साधुजनीं कांहीं वेचोनि आंग[7] ठावा हो ॥
हा दक्षिण पाणि तुझा मच्चरणीं आजि आंगठा वाहो ४५
दारुण-तर वचन असें परिसे परि सेकें नवसुधेचाची ॥
भावी, तद्यश सन्माति-चाहि हरी ताप न वसुधेचाची[11] ॥४६
जों गुरु ह्मणे मदिष्ट प्रतिपाळूनि स्ववाक्य साच करीं ॥
तोंचि च्छेदुनि घे तो स्वांगुष्ठ व्याळ-दष्टसाच[12] करीं ४७

---

१ पदाचे ठायीं नम्र झालेला. २ भक्तिमान्. ३ रात्रीं. यामि-शब्दाची ही सप्तमी. ४ गुरुदक्षिणा. ५ सरळपणा. ६ प्रकट केले-लें गुरूचें कार्य. म्ह० आपलें कोणतें कार्य करावें तें गुरूनें शि-ष्यास सांगीतलें असतां. ७ शरीराचा अवयव. ८ प्रख्यात. ९ सिंचन. १० मानी. ११ पृथ्वीचा. १२ सर्पानें चाविलेला असा.

साहे छळ आनंदें  वाहे अंगुष्ठ वरि न तो पाहे ॥
राहे उगाचि जाणो  देउनि अत्यल्प लाजला आहे ॥४८॥
केली सत्कीर्ति दुणी  झाली संधानशीघ्रताचि उणी ॥
तो काय घात ह्मणती  कीर्तिविघातासि आत्मघात गुणी
शिष्यांतरींहि होतें  प्रेम तदपि फाल्गुनींच एकीं तें ॥
कवि ह्मणति चातकांतें  घन भक्त जसे तसे न केकींतें ५०
सर्व-रहस्य-ज्ञाता  गुरुपुत्र रणे-प्रवीण-धर्म सदा ॥
असिधर गुरुसम ह्मणती  भीम सुयोधन धरील कोण गदा
सर्वत्र जिष्णु गुरुसा  त्या गुरुशिष्यांत एकमात्र उणें ॥
वृद्धत्व क्षत्रत्व  त्यजुनि पहातां समान सर्वगुणें ॥ ५२ ॥
हरुनि सकळ तम जोडा  होउनि सर्वा॒ऽर्थ-भासक रवीला
गुरुनें एक तरुशिरीं  शिष्यपरीक्षार्थ भाँस करवीला ५३॥
तेव्हां एक उतरला  अर्जुन भेदुनि शिरींच भाँसं कसा ॥
सर्वांत मुख्य पार्थ  ग्रहनक्षत्रांत विश्वभासकसा ॥ ५४ ॥
द्रोणाच्या जंघेला  ग्रासी गंगेंत एकदा याद ॥

---

१ मोरांना. २युद्धांत निपुण झालेल्या वीरा सारखे गुण ज्याचे तो. ३ सर्व वस्तु प्रकाशित करणारा. ४ गृध्रपक्षी. शिष्यपरीक्षार्थ द्रोणानें शिल्प्या कडून एक गृध्रपक्षी करविला व तो कोणास न कळतां वृक्षाग्रावर ठेवविला. ५ कसोटीला. ६ सर्व जनास प्रकाशित करणारा सूर्यसा. ७ नक्र.

तैं रक्षी जिष्णु, ह्मणे गुरु माझा हाहि[1] एक दायाद॥
होतें ब्रह्मशिरोस्त्र- द्रविणं[3] द्रोणें जपोनि सांचविलें ॥
तें जिष्णुला दिल्हें कीं तेणें प्राणाऽत्ययांत[2] वांचविलें ९६

# अध्याय २५ वा.

## सारांश.

द्रोणाचार्यांनीं एके दिवशीं सभेंत भीष्मधृतराष्ट्रादि मंडळी जमवून आपल्या शिष्यांकडून शस्त्रास्त्रांचे खेळ खेळविले. त्यांत भीमदुर्योधनांनीं गदेमध्यें आपलें निपुणत्व दाखविलें. अर्जुनानें धनुर्विद्या व शस्त्रास्त्रविद्या ह्यांतील चमत्कार दाखविले. कर्णानें ही धनुर्विद्येचे चमत्कार दाखविले. कर्णाचें तें अद्भुत कर्म पाहून दुर्योधनास फार संतोष झाला. त्यानें कर्णास अंगदेशाचें राज्य दिलें.

---

१ अर्जुन सुद्धां. २ प्राणसंकटांत. ३ द्रव्य.

गुरुनें एका समयीं रंगीं भीष्मादि सर्व मेळविले ॥
शिष्यांकरवीं तेथें शिक्षित शस्त्राऽस्त्र-खेळ खेळविले ॥१॥
रचिते झाले रंगीं शिल्पिवर विचित्र मंच रायाचे ॥
गमति विमान उतरले क्षितिवरि गगनांत संचरायाचे ॥२
स्त्री-पुरुष-रत्नशोभित बहु मोठा रंग काय वर्णवतो ॥
भासे व्यक्त खवळला यादोमणिकोटि-कोश-अर्णव तो॥३
द्रोणदुशिष्य-रश्मि स्व-गुण-सुधा प्रकट करुनि दाखविती
प्रेक्षक लोक चकोर- व्रातांकरवीं यथेष्ट चाखविती ॥ ४ ॥
झाले कुतुकफळांचे श्रीधर्मादिक सुयोध-नग दाते ॥
आले घेउनि बळ-जळ राशि वृकोदर सुयोधन गदा ते५
सव्याऽपसव्य मंडल गति दोघे भ्रमति, हे मन गदांनीं ॥
हर्षविति देखत्यांचें अधनाचें जेंवि हेम-नगदांनीं ॥ ६ ॥
जन ह्मणति होय जैसा परिवेश भ्रमवितां अलातातें ॥
भीमगदेचाहि तसा, केला अभ्यास बहु भला ताते ॥७॥
दुर्योधनाहि भंवता होय गदेचा तसाचि परिवेष ॥

---

१ सभेमध्यें. २ बैठकी ३ जलचर व रत्नें यांच्या कोटी त्यांचा कोश ह्म० भांडार असा समुद्र. ४ द्रोणरूपी चंद्राचे शिष्यरूपी किरण. ५ समूह. ६ उत्तम योद्धे हेच वृक्ष. ७ बलरूप जलाचे सागर. ८ स्वर्णपर्वताच्या दानानें. ९ तेजोमंडल. १० कोलिताला, जळत्या लांकडाला. ११ श्रेष्ठ अशा भीमानें.

रविमंडल-मध्यगहरि- सम ह्मणतों यासि भिन्न परि वेष८
गांधारीला सांगे पुत्रविचेष्टित पृथा, नृपा क्षत्ता॥
भीमोत्कर्षोक्ति तया लागे दोघांसही जसी लत्ता ॥ ९ ॥
ह्मणती साधु वृकोदर साधु सुयोधन असें तई कोणी ॥
रंगस्थितिच च केवळ गडबडली तद्विचेष्टितें क्षोणी ॥१० 
गुरुवचनें गुरुसुत त्या दोघांच्या क्षिप्र राहवी खेळा ॥
ते पूर्वपश्चिमाऽब्धी जाणों द्रोणात्मजोक्ति ते वेळा ॥ ११॥
मग राहवूनि वाद्यें द्रोण ह्मणे सूनुहूनि नो मजला ॥
प्रियतर चकोर होउनि गुरुशस्त्राऽस्त्राऽमृतांशुला भजला
जो जिष्णुविष्णुसा या रंगीं यावा तयासि बोलावा ॥
भीष्मादि गुणज्ञ जन प्रेक्षुनि तद्भुजविलास डोलावा १३
गुरुचित्तज्ञ धनंजय ये तनुधर चापवेदसा रंगीं ॥
नुरवी भान स्वगुणें गीतें गीतज्ञ जेंवि सारंगीं ॥ १४ ॥
भेदी सूक्ष्म कठिन चल लक्ष्यें पळतां बसोन तो यानीं ॥
निववि जनांसि गुणांनीं मेघ जसा चातकांसि तोयांनीं१५

---

१ सूर्यमंडलाच्या मध्यभागीं असलेल्या विष्णूसारखा. २ धृतराष्ट्राला. ३ सूत (विदुर. ) ४ भीमदुर्योधनांचे कौशल्यानें. ५ पृथिवी. ६ समुद्रमर्यादा. ७ गुरूचीं शस्त्रास्त्रें हाच चंद्र त्यास. ८ मूर्तिमान्. ९ सारंगी ह्या तंतुवाद्यांतील.

अग्न्यस्त्रप्रमुखाऽस्त्रें प्रकट करुनि वारुणादिकें शमवी ॥
अर्जुन गुरुप्रसादें प्रेक्षकजनचित्तवृत्तिला रमवी ॥ १६ ॥
होय अदृश्य प्रकट क्षणभरि अणु धरि शरीर पर्वतसें ॥
जनदृष्टिला मिळालें नाहींच कधींहि हर्षपर्व तसें ॥ १७ ॥
तों त्या रंगद्वारीं तलताडितबाहुशब्द दुःसहसा ॥
झाला जसा अशनिचा होतो पडतां शिळातळीं सहसा १.
ते अल्प मयूराचे शब्द करिति चकित धिंमद भुजगा जे
दचके मनांत रंगीं जन जेव्हां तो प्रचंडभुज गाजे ॥१९
द्वाराकडेचि सारे पाहति तों मूर्त राशि तेजाचा ॥
कर्ण शिरे रंगीं भुज- रव पविरव ह्मणति लोक ते जाचा
शत्रुमर्दाचा कर्णा पासुनि व्हायासि अंत रंगांत ॥
अवकाश दे सुयोधन साऽनुज तोषोनि अंतरंगांत ॥२१॥
वाटे रंगाऽब्जवनीं आला प्रेमासि अर्क राखाया ॥
जनदृष्टि उड्या घालिति बहुमाशा जेंवि शर्करा खाया२२
भानु नसो तो तेजें, स्वस्तोत्र हिमांशु कीं दिवा करवी ॥
भीमार्जुन तेजस्वी, वृष नसतां, कीं तया दिवाकर वी२३
कर्ण द्रोणासि नमुनि बंधुत्व न जाणतां निजा अनुजा ॥
जिष्णासि ह्मणे चमत्कृति दाखविल्या त्वां धरूनियां धनु ज्या

---

१ गर्वरहित. २ वज्राचा शब्द. ३ रंग ह्म०सभा हेंच कमल-
वन. ४ चंद्र. ५ अर्जुनाच्या गर्वाचा.

त्या दावितों चमत्कृति- तटिनीशततातमेरुपर्वत मी ॥
भ्रमसी वृथा पृथाप्रिय- पुत्रा कां तूं शिरोनि गर्वतमीं २५
द्रोण ह्मणे दावावे त्वांहि चमत्कार बोल राहों दे ॥
तव शस्त्रास्त्रचमत्कृति- रसपूरीं सर्व रंग वाहों दे ॥ २६ ॥
कर्णें तसेंचि केलें कर्म, सुविद्या नता न कां पावे ॥
सुर शेष डोलिले मग नर[2]मस्तक कां तदा न कांपावे २७
द्रवलें दुर्योधनमन पाहुनि शस्त्रास्त्र-[3]यान-पटुतेला ॥
अंतर्मलिन द्रवतें चक्षु जसें पाहतांचि कटुतेला ॥ २८ ॥
भेटुनि ह्मणे सुयोधन बहु यश वाढोनि तें तगो[4] कर्णा ॥
बापा भला भला गा कार्मुक[5]-वेदत्रिनेत्र-गोकर्णा ॥ २९ ॥
हें राज्य तुझें भोगीं भोग जसा चन्दन[6]द्रु भुजगांनीं ॥
आह्मीं वरिलासि तुझे गाऊंदे हे गुणाढ्य भुज गानीं ३०॥
कर्ण ह्मणे परि आहे एक मनीं काम तो करीं पूर्ण ॥
वाटे मजसीं तिसऱ्या पार्थासीं द्वन्द्वयुद्ध हो तूर्ण ॥ ३१ ॥
कलि[7]पुरुष ह्मणे कर्णा [8]अरि-मूर्ध-महत्त्व-कक्ष-दव डावा ॥

---

१ चमत्काररूप नद्यांचे शतकांचा पिता मेरु, असा मी. २ येथें मस्तक शब्द पुल्लिंगी आहे. ३ गति. ४ टिको. ५ धनुर्वेद हाच शंकर त्याचें वसतिस्थान जें गोकर्णक्षेत्र तद्रूप हे कर्णा. ६ चंदनवृक्ष. ७ कलीच्या अंशानें उत्पन्न झालेला पुरुष दुर्योधन. ८ शत्रुशिराचें महत्त्व हेंच गवत त्यांत वणव्यासारखा.

त्वच्चरण हो, दिगंतीं त्वां रिपु-जन-मद समूळ दवडावा ॥
जिष्णु ह्मणे न वहातां जाताति महाजनांत दाटूनी ॥
बोलतिहि न बोलवितां ते घडिले मूर्ख-कोटि वाटूनी ३३
कर्णा दंडकं रुचला तुज फार तुझा परन्तु हा नीच ॥
सावध हो नाहीं तरि होईल प्राण-कीर्ति-हानीच ॥ ३४ ॥
कर्ण ह्मणे काय तुझें येथें हा रंग सर्व-सामान्य ॥
न वदें वहु तुज वहुधा प्राणपरिचयहि न गर्वसा मान्य३५
यावरि कटु वदतां शिर उडवीन शरें जसाचि चेंडु करें
आदि-वराहै-परिभव न करिजेल स्व-कुळें-नुति-वचें डुकरें
ऐसें कर्ण वदे तों गुर्वाज्ञेसह धनुर्लता पार्थ ॥
स्वीकारी तेजस्वी लोकीं वर्त्ते यशःप्रतापार्थ ॥ ३७ ॥
पांचहि पाण्डव उठले भरला उत्साह अन्तरंगांत ॥
उठले कौरव शतही ह्मणाति तदा सन्त हन्त रंगांत॥ ३८
दैवानें दाखविले समरांडम्बर वृथा न नाश तदा ॥
परि सुत-कलहाऽऽरंभीं हाय असें ये पृथाननां शतदा ३९
बुडवि पृथा-पृथिवीला जेव्हां मोहांऽवुनिधि महा खोल ॥
तिस उद्धरी गुरुसुमति- दंष्ट्रेनें विदुर कवि महाकोल ४०
झाले पांडवपक्षी द्रोण कृपाचार्य भीष्म उत्साहें ॥

१ रीते. २ गर्व मान्य नाहीं. तसा प्राण परिचय मान्य नाहीं असें वाटतें. ३ अवतारी वराहाचा पराभव. ४ आपुल्या कुळाच्या स्तुतिवचनानें. ५ युद्धाचे आवेश. ६ पृथारूपी पृथ्वीला. ७ मोहसमुद्र. ८ महाबुद्धिरूप दाढेनें ९ महावराह.

थोरांसि नावडे श्रित- साधुसार्गे घडेल कुत्सा हें॥४१॥
जों नाहींच सुतांचे अन्योन्याऽस्त्र-ह्रदीं शर विराले॥
बंधुत्व त्यजुनि सुत- स्नेहें रिपुसे सुरेश रवि झाले ॥४२॥
कृप कर्णासि ह्मणे हा नृपसुत करणार तुजसवें युद्ध ॥
जे द्वन्द्वयुद्धकर्ते वीर असावे कुळादिकें शुद्ध ॥ ४३ ॥
गौरव हातें वाणी देवीहिं लिहो शकेचिना ज्यांचें ॥
गौर वहातें लोकीं यश गांगस्रोतसेंचि राजांचें ॥ ४४ ॥
ते पूर्वज याचे हा कौरव गौरवपदेंदुकुळजात॥
जाणे विश्व, तुवांही सांगावे साऽन्वय प्रसू तात ॥ ४५॥
कोणाचें कुलभूषण तूं कर्णा प्रथम हेंचि कळवावें ॥
भलत्यासींच नृपसुतें द्वन्द्व करुनि शस्त्र यश न मळवावें४६
वृप-वदन उतरलें, जे कृपवाक्-शर काळजांत खडतरले ॥
सर्प उचडितां मानीं पुरुष बुडाले त्रपेंत, जड तरले ॥४७
अंधसुत ह्मणे गुरुजी ज्याचा बहु सोसितो हिरा जाच ॥
न्यायें तो सत्कुळजहि सैन्यपतिहि शूर तोहि राजाच ॥
जरि जिष्णु युद्ध न करी तरि देतों राज्य अंगदेशाचें ॥

१ परस्परांचे अस्त्ररूप डोहांत. २ सरस्वती. ३ गंगाप्रवाहासारखें. ४ मोठेपणाचें स्थान जो चंद्रवंश त्यांत झालेला. ५ वंशासहित. ६ माता. ७ सत्कुळज ह्म० कुलीन, सैन्यपति ह्म० ज्याजवळ पुष्कळ सैन्य आहे;व जो शूर हे तीन पुरुष राजेच समजावे. ८ कर्ण राजा नसल्या मुळें जर अर्जुन त्याशीं युद्ध करीत नसेल तर मी त्यास अंगदेशाचें राज्य देऊन राजा करितों.

या कर्णाचें यश हो झालें तें जेंवि अंगदेशाचें[1] ॥ ४९ ॥
ऐसें वदोनि करवी रंगीं राज्याभिषेक तो कर्णा ॥
भरिला सुहृदीं क्षण शिशु- तृप्तिद[2] पीयूषरसा[3]चि गोकर्णा[4] ॥
कर्ण ह्मणे राज्य दिल्हें ऐसें तुज राजनंदना काय ॥
द्यावें सांग गुणज्ञ- प्रीत्यधिक[5] गमे न चंदना काय॥५१॥
भूप ह्मणे अत्रुटिता[6] धारा सरळा जसीच तैलाची ॥
यावज्जीव असावी त्वन्मैत्री स्थिति धरूनि शैलाची[7] ॥
दिधला सुयोधनाला सख्यवर सुतें तसाचि सवित्याच्या[8]॥
अतुळोदारत्वातें गाती व्यासादि सर्व कवि त्याच्या॥५३
आला तशांत तेथें अधिरथ, त्यातें करी नमन कर्ण॥
तेव्हांचें कुतुक कथुनि रसिकां प्रमुदित करीन मन कर्णा॥
अधिरथ सूत, तदात्मज वृष, कळतां भाव तो तसा रंगीं॥
भीम वदे, जो कर्णीं विभय[9] जसा सिंहपोत[10] सारंगीं[11] ॥५५
कर्णा वर्णाऽधम[12] तूं सूत तुला युद्धमृति[13] नव्हे उचिता ॥
परगति[14] पावों पाहसि परि पदरीं फार पाहिजे शुचिता ॥
उचित प्रतोदधारण[16] तुज चापग्रह नव्हे उचित रंगीं ॥
पावनता निजधर्मीं गंगेच्याहि न तसी शुचितरंगीं[15] ॥ ५७

---

१ अंगदनामक वानराचा स्वामी रामचंद्र. २ मुलांस तृप्तिदायक. ३ दुग्धरस. ४ लहान मुलांस औषध पाजण्याचें एक पात्र आहे, त्यांत. ५ गुण जाणणाराच्या प्रीतीहून अधिक. ६ अखंडित. ७ पर्वताची. ८ सूर्याच्या. ९ विशेष भय. १० सिंहाचा बाल. ११ हरिणाचे ठायीं. १२ नीच जातीचा. १३ युद्धांत मरण. १४ उत्तम गति. १५ शुभ्रवर्ण लाटांमध्यें. १६ चाबूक धरणें.

अंगविषयं[1]राज्यपदीं अनुचित तूं रे नराऽधमा उतरें ॥
पात्र पुरोडाशाला[2] झालें आहे कधींतरी कुतरें ॥ ५८ ॥
उपहास असा परिसे परि सेनानी[3]पितातसा साहे ॥
किंचित्[4]प्रस्फुरिताऽधर कर्ण व्योम[5]स्थरविकडे पाहे ॥ ५९
कल्यंश[16] ह्मणे भीमा या बोलें मानितील विषम दहा ॥
न वदावें कटु पटुनें बोले भुजवीर्यगर्वविषमद[6] हा ॥
जे जे कोणी क्षत्रिय त्यांसि बळ ज्येष्ठ हेंचि सन्मत रे ॥
अबळ न अहितोदधिला[7] घेउनिही क्षत्रियांत जन्म तरे ॥
जेथें बळ गुण तो गुरु, शूर बळा मानिती, न कुळशीला
गुणहीन शाल्मलि[8] वृथा लघु न ह्मणति भजति साधु तुळशीला
शूराच्या तटिनीच्या[9] ठेविति सुगुणीं न मन कावि प्रभवीं[10] ॥
भजति स्वगुरुत्वेंचि न पाहति कुलशील कनकविप्रभवीं[11] ॥
उदकापासुनि झाला वैश्वानर[12] कृत्तिका[13]सुत[14]स्कंद ॥
मंद प्रताप त्याचा ह्मणेल तो मूर्खतालता[15]कंद ॥ ६४

---

१ देश. २ यज्ञभोक्ते देवांस अर्पण करून राहिलेला यज्ञांतील अन्नाचा अंश. ३ सेनानी, कार्तिकस्वामी. त्याचा पिता शंकर ( विषदाह सोसितो तसा. ) ४ किंचित् थरथरतात ओंठ ज्याचे तो. ५ आकाशांतील. ६ बाहुबलाचा गर्व हेंच विष, त्याचा मद ह्म० अंमल. ७ शत्रुरूप समुद्रास. ८ सावरीचें झाड. ९ नदीच्या. १० जन्मांत. ११ सुवर्ण व ब्राह्मणपुत्र ह्यांचे ठायीं. १२ वडवाग्नि. १३ कृत्तिका ह्या नांवाचीं सहा नक्षत्रें आहेत. १४ कार्तिकस्वामी. १५ मूर्खपणा हीच वेल, तिचा कांदा. १६ दुर्योधन.

असुरांसि जो स्वतेजें घूकांला अर्कसाचि तापवितो ॥
झाला दधीचिमुनिच्या अस्थींपासूनि जन्मता पवि तो६५
ज्याच्या यशोऽमृतरसें झाली आहे सदैव धौत मही ॥
विश्वामित्र क्षत्रिय- पुत्र शरस्तंबजात गौतमही ॥ ६६ ॥
द्रोण गुरुहि कलशोद्भव तुमचाहि प्रभव मज असे कळला॥
सांग स्वयोनिदोषें तेजस्वीयांत कोण तो मळला ॥६७॥
सर्व सुलक्षणमंडित सुकवचकुंडल जगीं असामान्य ॥
तेजोराशि उपजला वद दुसरा कोणरे असा मान्य॥
प्राकृत योषा याची जननी हें तों नयेच युक्तींत ॥
पिकतें मौक्तिक मुक्ता- शुक्तींतचि तें न अन्यशुक्तींत ॥
प्रसवे व्याघ्रास मृगी काय उकिरड्यांतही हिरा पिकतो॥
जरि वाढला कुळीं ही काकाच्या काक काय रे पिक तो
स्वल्पा न अंगराज्या समुचित हा सार्वभौमपदवीतें ॥
आज्ञा करा मज असें कर्णाचें भाग्य भावि वदवीतें ॥७१
हें ज्याला मानेना तेणें ह्मणतील जीअति ज्ञाते ॥
अत्युग्रा करूनि असी सिद्ध करावी रणीं प्रतिज्ञा ते ॥७२
शत्रु उठावा आह्मां देखत लावूनि अंघ्रि चापातें ॥
आह्मांसि वधू कीं हो हतमस्तकें अस्मदंघ्रिच्या पातें ॥
ऐसी रंगीं वदला धृतराष्ट्रकुमार तो यदा वाणी ॥

---

१ घुबडांना. २ धुतलेली, स्वच्छ. ३ लोकोत्तर. ४ नीच. ५ स्त्री. ६ मोत्यांच्या शिंपल्यांत. ७ कोकिल. ८ पाय. ९ ठार मारो. १० ताडिलें मस्तक ज्याचें तो. ११ आमच्या पायांच्या. १२ प्रहारानें.

हाहाकारें गर्जति  तों रंगीं लोक तोयदावांगीं ॥ ७४ ॥
व्हावा रण, परि जाउनि अस्ता तो समय साधु रवि टाळी
क्रुद्धेक्षगांसि देउनि  तेज जगद्बांधवत्व न विटाळी ॥ ७५
किति ह्मणति रंजवाया  वारुण्यबलेसि अर्यमा वळला ॥
किति ह्मणति कलि न व्हावा  ह्मणवुनि तेजस्विवर्य मावळला
अक्षत गृहासि गेले  सर्व करी कुशळ अर्क, राहो तें ॥
ज्ञातसुतपृथेसि तसें  होय जसें त्यजुनि शर्करा होतें ॥

## अध्याय २६ वा.

### सारांश.

कौरवपाण्डव शस्त्रास्त्रविद्येंत निपुण झाल्यावर पूर्वसंकेताप्रमाणें द्रोणानें त्यांकडे गुरुदक्षिणा मागीतली. ती ही कीं, द्रुपद राजास कैद करून माझ्या कडे आणावें. तें मान्य करून त्या कार्यास प्रथम कौरव गेले. त्यांचा द्रुपदानें पराभव करून त्यांस हाकून दिलें. मग भीमार्जुननकुलसहदेव गेले. तेव्हां अर्जुनानें मोठा पराक्रम करून द्रुपदास जिंकिलें. व त्यास मुसक्या बांधून गुरूजवळ आणिलें. तेव्हां द्रोणानें त्याचें अर्धराज्य घेऊन त्यास सोडून दिलें.

---

१ मेघांसारखे. २ क्रोधयुक्त नेत्र ज्यांचे ते. ३ जगाचें मित्रत्व. सूर्यास जगद्बंधु ह्मणतात. ४ वारुणी ह्म० पश्चिम दिशा हीच अबला, तिला. ५ सूर्य. ६ सुस्वरूप. ७ जाणिलें आहे पुत्राला ( कर्णाला ) जिनें त्या पृथेला.

द्रोण ह्मणे शिष्यांसि द्रविण किती वाहती असु ज्ञानी ॥
गुरु पूजूनि सुखविला सुज्ञांनीं दुखविला असुज्ञांनीं ॥१॥
द्या दाक्षिणा असी कीं द्रुपदाचा सर्व गर्व खाणावा ॥
युद्धीं भग्न करावा मग बांधुनि मत्समीप आणावा ॥ २ ॥
तें मान्य करुनि सर्वहि शिष्य,रथीं प्रथम बैसवुनि गुरुला॥
चढले स्वरथीं स्वर्गी तर्पाया सद्यशोऽमृतें कुरुला ॥ ३ ॥
साऽनुज सुयोधन पुढें धांवे त्या पांडवांसि सोडोनी ॥
व्हायास कर्ण आपण धन्य द्रोणार्थ कीर्ति जोडोनी ॥४
शिरले द्रुपदपुरींतहि गमलें जयमूळ काळ तो साचें ॥
जिष्णुमतें गुरु राहे अंतर सोडूनि अर्धकोसाचें ॥ ५ ॥
जिष्णु ह्मणे पावति गति इतर पशु न त्या पिनाकिच्या पशुची
गुरुजी पात्र शुचियशा या शिष्याचाचि एक चाप शुची॥
द्रुपद बळी, हे दुर्बळ, नाहीं येणार यांसि यश कांहीं ॥
श्येन कसा जिंकावा पक्षित्वमदें करूनि मशकांहीं ॥ ७
होतील भग्न कौरव मग आह्मी दाखवूं निज बळाला ॥
आधीं प्रबळपरकरें दुष्टाचा पाहिजे मद गळाला ॥ ८ ॥

---

१ किती ज्ञानी द्रविण वाहती व किती असु वाहती. ह्म०कित्येक शाहणे लोक गुरूला द्रव्य देऊन संतुष्ट करितात, व कित्येक प्राण ही देऊन संतुष्ट करितात. २ द्रुपद हा काळासारखा असून कौरवांस तें जयाचें मूळ असें वाटलें. ३ योग्यता. ४ शंकराच्या. ५ बलाढ्य शत्रूच्या हातानें. ६ मूर्खांनीं

मंत्र मना आला मग पांचां पांडवांसह द्रोण ॥
मागें राहे, शिशुचें ह्मणुनि नघे सूक्त जाणता कोण॥९॥
निज-देह-परिष्वंगीं मानावे अमृत-गोळसे तातें ॥
ह्मणुनि द्रुपदपुरातें पीडिति ते जेंवि टोळ सेतातें ॥ १० ॥
पारि अरि सकळ पळविले द्रुपदें समरांगणांत भेटोनी ॥
जेंवि वृकव्याघ्रादि श्वापद दहनें वनांत पेटोनी ॥ ११
अरिबळभयार्त निर्भग्न केलें तें आपुलें पुर द्रुपदें ॥
अभय दिलें भीतांतें द्रोणें दासांचिया सुरद्रुपदें ॥ १२ ॥
धर्मासि गुरुसमीप स्थापुनि घेऊनियां तदाज्ञा ते ॥
गेले द्रुपदनृपावरि त्याच्या उतरावया मदा ज्ञाते ॥१३ ॥
रथचक्ररक्षणीं यम योजुनि तत्काळ वैरितापार्थ ॥
झाला द्रुपदद्रुमदातें स्वशरशिखिमुखांत वैरिता पार्थ ॥१४॥
भीम गदेतें घेउनि धांवे हो एकशृंग पर्वतसा ॥
गजमद जसा हरिपुढें त्याहिपुढें शत्रुसैन्यगर्व तसा ॥
भीमगदेतें अरिबळ जैसें मंडूककटक उरगीतें ॥
भी, मग दे तें पाठ व्योम भरिति तैं प्रसन्नसुरगीतें॥१६
पांचाळबळास न भी शिरतां तो जेंवि सागरा मकर ॥

---

१ हितकारक भाषण. २ आपल्या देहाच्या आलिंगनाच्या वेळीं. ३ कल्पवृक्षतुल्य पद ज्याचें त्यानें. ४ जुळे मुलगे, नकुल व सहदेव. ५ आपले बाण हाच अग्नि, त्याचे मुखांत. ६ अर्पण करणारा. ७ बेडकांचें सैन्य. ८ सर्पिणीला. ९ तें द्रुपद सैन्य.

वाटे द्विजाऽपराधें　आलासे धरुनि राग रामकर[1] ॥ १७
वेदांतीसा अर्जुन　रिपुभट गौतमनयज्ञसे,[2] नाशा॥
तद्बळ पावे, पूर्णा　होय जयाची न यज्ञसेनाशा[3] ॥ १८ ॥
श्रीगुरुवराच्युतोद्धृत-[4]　फाल्गुनगोवर्धनीं द्रुपदशक्र[5] ॥
वृष्टि करी परि झाले　कौरवगोपाळरोमहि[6] न वक्र ॥१९
खंडुनि शस्त्राऽस्त्रांतें　लीलेनें अर्जुनें अहीनकुळें[7] ॥
क्षीणमद[8] द्रुपद धरा-　धव[9] धरिला हो जसा अही नकुळें॥
अर्जुन-गरुडें[10] गुरु-वर-[11] कार्मुक-पक्षोत्थ-शस्त्र-वात-बळें ॥
उडवुनि वळाऽब्धि धारिला　भग्नमद द्रुपद[12]-दंदशूक पळें २१
गिरिवर हरिसा चढला　क्षिप्र रथीं पांडुपुत्र करवाळी[13] ॥
द्रुपदासि धरी जैसा　दशवदना[14] तन्मदान्तकर[15] वाळी २३॥

---

१ परशुरामाचा हात. २ गौतम ह्यानें न्यायशास्त्र रचिलें. तें शास्त्र जाणणाऱ्यां सारखे. वेदांताचे सिद्धांतां पुढें न्यायशास्त्रांतील सिद्धांतांचें बळ टिकत नाहीं, तसें अर्जुनापुढें द्रुपदसैन्य टिकलें नाहीं. ३ द्रुपदाची आशा. ४ श्रीगुरूचा वर हाच कृष्ण त्यानें उचललेला अर्जुन हाच गोवर्धनपर्वत, त्यावर. ५ द्रुपद हाच इंद्र. ६ कुरुकुलोत्पन्न पांडव हेच गोपाळ, त्यांचा केशही. ७ श्रेष्ठकुलोत्पन्न अर्जुनानें. ८ गर्वहीन. ९ पृथ्वीपति. १०अर्जुनरूप गरुडानें. ११ गुरूचा वर आणि कार्मुक ( धनु ) हे दोन पंख, त्यां पासून निघालेला शस्त्ररूप वारा, त्याच्या बलानें. १२ द्रुपद हाच सर्प. १३ खड्गधर. १४ रावणाला. १५ त्याचा गर्व हरणारा.

मग तो भीमासि ह्मणे अर्जुन देऊनि दुरुनि हाकेला ॥
न वधावें कटक वृथा परतावें, भूप भग्न हा केला ॥२३॥
तें राजरत्न दुर्लभ परि नकरुनि फारसा उपाय नंतें ॥
पार्थें आणुनि गुरुच्या चरणयुगीं अर्पिलें उपायन तें २४
द्रोण ह्मणे द्रुपदातें तूं माझा मी तुझा सखा पहिला ॥
आतांतरी ह्मणों कीं आक्रमिलें एतदर्थ या महिला ॥२५
द्रुपदा तुज अभय दिलें यावरि पावो तुझी न तनु कंपा
आह्मां ब्राह्मणतेजा नविसंबे क्षांति शांति अनुकंपा २६॥
गुरु-कुळ-वासी होतों परि सख्य क्षीण जाहलें मग तें ॥
ह्मणुन असुख अनुभविलें बहु म्यां भवदीय-दर्शनोपगतें २७
भूप सखा भूपाचा कवि कविचा धनिक तोचि धनिकाचा
ऐसें वदलासि तुझ्या गमला हा द्रोण विप्र मनिं काचा ॥
उत्तरपांचाळ-पती मी निज-तेजें न तोंड वासूनी ॥
दक्षिण-पांचाळ-पती तूंही होसील आजिपासूनी ॥ २९॥
पांचाळ-राजतूंही मीही सख्यासि योग्य समशील ॥
आहे कीं नाहीं गा वद, वदतां मज उदार गमशील॥३०
सख्याला लोभी मी परि राजपणाविणें घडेना तें ॥
ह्मणवुनि राजा झालों कीं न उपायांतरें घडे नातें ॥ ३१

---

१ नम्र झालेल्या पार्थानें. २ नजराणा. ३ दया. ४ गुरुगृहीं राहणारे. ५ तुझ्या दर्शनार्थ आलेल्यानें. ६ कच्चा. ७ आपल्या पराक्रमानें. ८ तुल्यस्वभावाचा. ९ दुसऱ्या उपायानें.

द्रुपद ह्मणे ब्रह्मर्षे तुमच्या जोडा नसेचि अनुभावा ॥
अतनु मदपराध तदपि पूर्वस्नेह स्मरोनि तनु भावा ३२
देऊनि राज्यार्ऽर्ध नृप द्रोणें सत्कार करुनि वोळविला ॥
आहि सोडिला जसा पय पाजुनि मनि मणि हरूनि-पोळविला
राज्यार्ऽर्ध समग्र यश द्रोणें हरिलें ह्मणूनि तो मानी ॥
पावे ताप असा जो लेशहि न निवेल लक्ष सोमांनीं ३४
आपण घट, परि पुत्रा-करवीं द्रोणाऽब्धि आटवायाला ॥
शोधी वरदा ऋषिला स्वयश जगीं अतुळ वाढवायाला३

## अध्याय २७वा.

### सारांश.

धृतराष्ट्रानें धर्मराजाला युवराज केलें. मग भीमार्जुनांनीं पराक्रम करून वहुत राजे पादाक्रांत केले. पांडवांचें ऐश्वर्य वाढत चाललें. तेव्हां धृतराष्ट्रास स्वपुत्रांविषयीं चिंता उत्पन्न झाली. त्याचा प्रधान कणिक हा राजनीतिनिपुण होता. त्यास राजानें स्वहिताचा उपाय विचारिला. तेव्हां कणिकानें एका कोल्ह्याची गोष्ट सांगून राजास उपाय सुचविला.

---

१ प्रभावाला. २ मोठा. ३ अल्प. ४ माना. ५ चंद्रांनीं. ६ वर देणाऱ्या ऋषीला.

सद्गुण-सिंधु युधिष्ठिर धृतराष्ट्रें यौवराज्यभाक्[1] केला ॥
वारिला श्रीनें देउनि घेउनिहि गळां पडोनि भाकेला[2] ॥१
जे पांडुला न वठले[3] ते केले करद्[4] जिष्णुनें स्वांऽरी[5] ॥
भीमानेंही केली तसि जसि विजयार्थ विष्णुनें स्वारी २
ह्मणती गजपुरवासी याच्या लुटिला धनेश[6] कटकांहीं ॥
आले नव्हतेचि असे मागें भरिले धनें शकट कांहीं ॥३॥
वृद्धीस पांडु-संतति बहु पावे जेंवि वह्निची कणिका ॥
स्व-सुत-हितोपाय पुसे अंध नृपति नयविशारदा कणिका ४
धृतराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक ॥
वणिक[7] ग्राहकं-हस्तीं[8] देतो विषसर्पिशर्करा[9] कणिक ॥ ५
राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ असेंचि बोलिला कणिक ॥
तत्कथितजंबुककथा मात्र कथिन कौतुकें न मी अणिक ६
कोठें[10] व्याघ्र वृक नकुळ जंबुक मूषक सखे वनीं होते ॥
बहु जपले परि एका मृगकुळपतिला[11] न पावले हो ते ७ ॥
जपति जसे पाडाया व्यसनीं सुजनासि सर्वकाळ विटें[12] ॥
तेहि तसेचि परि करी विफळचि तद्यत्न सर्व काळविट ८॥

---

१ राजा असतां, कारभार करण्याचा व राजा नंतर गादीवर बसण्याचा अधिकारी. २ वचनाला. ३ वश झाले. ४ कर देणारे. ५ स्वशत्रु. ६ कुबेर. ७ वाणी. ८ गिऱ्हाइकाच्या हातांत. ९ विषयुक्त सर्पि (तूप) व साखर, कणिक. १० कोणे एके ठिकाणीं. ११ काळविटाला. १२ लुच्चेलोक.

चिंता करितां जंबुक त्यांस ह्मणे आचराल जरि सारे ॥
सांगेन सुयुक्ति, तुह्मी स्वेष्टफलप्रद मदुक्ति परिसा रे ॥ ९
या आंखुनें करावा क्षत-खुर जेह्वां असेल तो सुप्त ॥
व्याघ्रें मग मारावा मृगवर, पर मंत्र हा करा गुप्त ॥१०॥
करितां तसेंचि कोल्हा त्यांसि ह्मणे स्नान करुनि या खाया
लोंवरि सावध बसतों येथें मी या मृगास राखाया ॥११॥
तो स्वार्थ-पंडित असें सांगे तें जोंवि अंबु कमळाला ॥
त्यांच्या मना रुचे, दे न दिसों कपटींद्र जंबुक मळाला १२
न्हाउनि येउनि पाहुनि दीन पुसे व्याघ्र वद नवा वाला ॥
पडलासा कां दिससी सांगे तो म्लान-वदन वाघाला १३
फेरु ह्मणे परिसावें वदला जें किमपि आखु खोटा तें ॥
धिग् व्याघ्रातें माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें १४
व्याघ्र ह्मणे हें नलगे घालिन मृग-यूथपीं नवा घाला ॥
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि पीन वाघाला ॥ १५॥
गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडोनी ॥
तों आला आखु तया फेरु ह्मणे साध्य भावें जोडोनी १६
वदला व्याघ्रामिष विष तुज खाऊंदे असेंचि मुंगस, खा
ऐसें कसें ह्मणों मी लघु पारि तूं मेरुहूनि तुंग सखा॥१७॥
हें ऐकतांचि वंचक- वचनें शरण जाय तो विळाला हो॥

---

१ उंदरानें. २ तो काळवीट. ३ उदक. ४ कोल्हा. ५ हरिणांच्या कळपाचा नायक. ६ पुष्ट. ७ वस्तु, गोष्ट. ८ वाघाचें मांस. ९ उंच. १० कोल्ह्याचें भाषण. ११ निजलेला.

चित्तीं ह्मणे न मेलों हाचि महालाभ मज मिळाला हो १.
वृकही आला साला फेरु ह्मणे मज मृगासि रक्षाया ॥
ठेवुनि गेला व्याघ्र स्त्रीसह येणार सर्व भक्षाया ॥ १९ ॥
वांच, मरसि कां लोभें मांसाशा शीघ्र सांड गा जा गा
हें ऐकतांचि निसटे झाला तत्काळ लांडगा जागा ॥ २०
मग मुंगसासहि ह्मणे आखु वृक व्याघ्ररायही नकुळा ॥
म्यां जिंकोनि पळविले तेथें तुज काय लाभ हीनकुळा२१
युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे कवळ खाया ॥
मी श्वापद-वर आहें परि तुज नाहीं विवेक वळखाया २२
नकुळ ह्मणे आखु वृक व्याघ्रहि जिंकोनि पळविले जेणें॥
तेणेंसीं न झगडणें येणेंचि भलें, न या मृतें एणें ॥ २३ ॥
ऐसे मंत्रवळें वृक- नकुळव्याघ्राखु मोहुनी चवघे ॥
जंबुक निर्भय चित्तें मृग-मासाची वनीं सुखें चव घे॥२४॥
ऐसेंचि कृतप्रज्ञें साधावें आत्मकार्य नैपुण्यें ॥
अघ-शमनाऽर्थ करावीं होईल स्वार्थ-सिद्धि तैं पुण्यें ॥२५
विस्तरभयास्तव कणिक- नीत्यंतर्गत कथाचि असि कांहीं
लिहिली ईच्या श्रवणीं आदर करिजेल साधु-रसिकांहीं
पांडुसुतोच्छेदेच्छा येतां बुद्धींत नीति कणिकाची ॥
भेटे व्यभिचारेच्छा धरितां जसि कामिनीस गणिकांची२७

---

१ ग्रास. २ हरिणानें. ३ ज्ञानसंपन्न पुरुषानें. ४ वेश्यांची.

परि जाणे द्रोण-विदुर भीष्म-कृप-व्याळ-सन्निधानातें ॥
बहु भी अंध खणाया त्या पांडु-कुमारसन्निधानातें २८॥

# अध्याय २८ वा.

## सारांश.

धर्मराजाचे सद्गुणांनीं प्रजा फार सुख पावली. लोक धर्मराजाचे गुण गावूं लागले. हें दुर्योधन, दुःशासन, शकुनि व कर्ण यांस आवडलें नाहीं. ते एकांतीं धृतराष्ट्राजवळ गेले तेव्हां आपली मसलत त्यांनीं त्यास कळविली. धृतराष्ट्रानें पाण्डवांस वारणावतनामक नगरास यात्रेच्या निमित्तानें पाठविलें. तेथें दुर्योधनानें पुरोचननामक एका यवनाकडून पांडवां करितां लाक्षादि शीघ्रज्वालाग्राही पदार्थांचें गृह तयार करविलें. त्यास आग लावून पांडवांचा नाश करावा असा दुर्योधनाचा बेत विदुरास माहीत होता. त्यानें त्या गृहास एक गुप्त विवर करविलें व त्याच्या द्वारें त्या अरिष्टांतून पांडवांची सुटका केली.

---

१ समीपतेला. २ उत्कृष्ट द्रव्यादिकांच्या ठेव्याला.

सद्गुण युधिष्ठिराचे सर्वत्र सदैव सर्व पौर वदे ॥
कीं हा आह्मांसि तसा पूर्वीं कोणीं न हर्ष पौरव दे ॥१॥
अरि-गज विदारुनि रणीं वहु लाजविलें द्विपारिजातातें
अर्थि-मनोरथ पुरवुनि केलें गतगर्व पारिजातातें ॥ २ ॥
भू-रक्षण-भर जेणें भीष्माच्या उतरिला शिरावरिला ॥
लंघुनि धृतराष्ट्रा जो राज्यश्रीनें स्वयें हिरा वरिला ॥ ३
सा पांडुचा युधिष्ठिर सुत कुरुपति योग्य अर्क राज्यातें ॥
ज्या सा न दुजा ग्रह जें यश अमृतीं ये न शर्करा[2]ज्यातें ४
राज्याभिषेक आह्मी यासि करूं सुख न ज्या सुखा परतें॥
सुप्रभु ताट सुधेचें कुप्रभु वान्तान्नपूर्ण[3] खापर तें ॥ ५ ॥
पौर-स्तुत-धर्म-गुण- श्रवणें दुर्योधनादि खळ मळती ॥
हरिगुण-सद्गीत जसें श्रवणीं शिरतां पिशाच तळमळती ६
करिति कुमंत्र सुयोधन दुःशासन कर्ण शकुनि हे चवघे ॥
साधु-द्वेषें उग्र- व्यसनांत बळें बुडावया अवघे ॥ ७ ॥
दुर्योधन एकांतीं मग गांठी निजपित्यासि भोंदाया ॥
सुतरूपी दुर्विधि[4] तो इच्छी व्यसनाननांत कोंदाया ॥ ८ ॥
ऐसें ह्मणे पित्याला परिसा विज्ञापना अहो तात ॥
जे लोक-शब्द कर्णीं तप्तायःशंकु[5]तुल्य होतात ॥ ९ ॥
धृतराष्ट्र अंध, राज्या- नर्ह[6], अनघ[7] पांडु आमुचा भर्ता ॥

१ सिंहसमूहाला. २ शर्करायुक्त घृताला. ३ ओकलेल्या अन्नानें भरलेलें. ४ दुर्दैव. ५ तापलेल्या लोखंडाच्या खिळ्या सारखे. ६ राज्यास अयोग्य. ७ निष्पाप,

परि जाणे द्रोण-विदुर भीष्म-कृप-व्याळ-सन्निधानातें ॥

बहु भी अंध खणाया त्या पांडु-कुमारसन्निधानातें २८॥

# अध्याय २८ वा.

## सारांश.

धर्मराजाचे सद्गुणांनीं प्रजा फार सुख पावली. लोक धर्मराजाचे गुण गावूं लागले. हें दुर्योधन, दुःशासन, शकुनि व कर्ण यांस आवडलें नाहीं. ते एकांतीं धृतराष्ट्राजवळ गेले तेव्हां आपली मसलत त्यांनीं त्यास कळविली. धृतराष्ट्रानें पाण्डवांस वारणावतनामक नगरास यात्रेच्या निमित्तानें पाठविलें. तेथें दुर्योधनानें पुरोचननामक एका यवनाकडून पांडवां करितां लाक्षादि शीघ्रज्वालाग्राही पदार्थांचें गृह तयार करविलें. त्यास आग लावून पांडवांचा नाश करावा असा दुर्योधनाचा बेत विदुरास माहीत होता. त्यानें त्या गृहास एक गुप्त विवर करविलें व त्याच्या द्वारें त्या अरिष्टांतून पांडवांची सुटका केली.

---

१ समीपतेला. २ उत्कृष्ट द्रव्यादिकांच्या ठेव्याला.

सद्गुण युधिष्ठिराचे सर्वत्र सदैव सर्व पौर वदे ॥
कीं हा आह्मांसि तसा पूर्वी कोणी न हर्ष पौरव दे ॥१॥
अरि-गज विदारुनि रणीं बहु लाजविलें द्विपारिजातातें[१]
अर्थि-मनोरथ पुरवुनि केलें गतगर्व पारिजातातें ॥ २ ॥
भू-रक्षण-भर जेणें भीष्माच्या उतरिला शिरावरिला ॥
लंघुनि धृतराष्ट्रा जो राज्यश्रीनें स्वयें हिरा वरिला ॥ ३
त्या पांडुचा युधिष्ठिर सुत कुरुपति योग्य अर्क राज्यातें ॥
ज्या सा न दुजा ग्रह जें यश अमृतीं ये न शर्कराज्यातें[२] ४
राज्याभिषेक आह्मी यासि करूं सुख न ज्या सुखा परतें॥
सुप्रभु ताट सुधेचें कुप्रभु वान्तान्नपूर्ण[३] खापर तें ॥ ५ ॥
पौर-स्तुत-धर्म-गुण- श्रवणें दुर्योधनादि खळ मळती ॥
हरिगुण-सङ्गीत जसें श्रवणीं शिरतां पिशाच तळमळती६
करिति कुमंत्र सुयोधन दुःशासन कर्ण शकुनि हे चवघे ॥
साधु-द्वेषें उग्र- व्यसनांत बळें बुडावया अवघे ॥ ७ ॥
दुर्योधन एकांतीं मग गांठी निजपित्यासि भोंदाया ॥
सुतरूपी दुर्विधि[४] तो इच्छी व्यसनाननांत कोंदाया ॥ ८ ॥
ऐसें ह्मणे पित्याला परिसा विज्ञापना अहो तात ॥
जे लोक-शब्द कर्णीं तप्तायःशंकुतुल्य[५] होतात ॥ ९ ॥
धृतराष्ट्र अंध, राज्या- नर्ह[६], अनघ[७] पांडु आमुचा भर्ता ॥

१ सिंहसमूहाला. २ शर्करायुक्त घृताला. ३ ओकलेल्या अन्नानें भरलेलें. ४ दुर्दैव. ५तापलेल्या लोखंडाच्या खिळ्या सारखे. ६ राज्यास अयोग्य. ७ निष्पाप,

तैसाचि युधिष्ठिरही न पर घनाचि चातकव्यथाहर्ता १
लोकाऽनुराग ऐसा त्वांहि दिल्हें यौवराज्य अहिताते ॥
निज सुत शताहि बुडविले पोसून गृहांत पांच अहि तातें ११
कुरुपति असें जनें तूं असतां राष्ट्रांत पांडवा गावें ॥
आह्मीं सेवकभावें धरुनि करीं चाप कांडं वागावें ॥ १२
पर-पिंड-भक्षणास्तव निज-राज्य-पद-च्युतीस्तव ज्ञाती ॥
लवतील न प्रजाही नरकगति बरी नव्हे अवज्ञा ती ॥१३
दुर्गति-महा-पिशाची निज-संतानासि झडपणी न करी ॥
ऐसा मंत्र जपावा यूथ उपेक्षील धडपणीं न करी ॥ १४
कैसें करूं असा तूं आधि नरेंद्रा धरूं नको लेश ॥
क्षम असती तारायाः संततिस क्षितीस, जेंवि कोलेश १५
हे वारणावताप्रति द्वडावे युक्तिनेंचि, देवा तें ॥
काम तुझें, नयनीं कण कुशळ मुखाच्या उरों न दे वातें॥१६
युक्ति-लहरी-शतें त्वां उडवावीं तीं दयानदा यादें ॥
कां राज्य वृथा देसी कोणासहि यश दिल्हें न दायादें १
आह्मी स्वपदीं होऊं नीतिबळें बद्धमूळ मग राया ॥
करितील काय पांडव आलेहि जरी फिरोनि नगरा या॥
प्रज्ञाचक्षु ह्मणे मज हें रुचलें कर्म परि महाखोटें॥
भीष्म-द्रोणाविदुर-कृप- पौरांचें भय पुढें दिसे मोटें ॥ १९ ॥

---

१ लोकप्रीति. २ शत्रूला. ३ बाण. ४ दारिद्र्यरूप मोठी पिशाची. ५ मनोव्यथा, काळजी. ६ महावराह.

नत लोटितां पदें अप- कीर्ति जगीं सह्य[1] न प्रभवज्ञा[2] ॥
लोकां हें नघडेही ग्रहवृंदा[3] ग्रहपति-प्रभावज्ञा[4] ॥ २० ॥
हरितील अस्मदसुधन[5] धर्मप्रिय पौर एकसरतील[6] ॥
पार्थाहिपुढें[7] तुमचे निःशेषहि यत्न-भेक सरतील ॥ २१ ॥
दुर्योधन बोले हें भय न धरीं द्रौणि[8] मजकडे आहे ॥
गुरुहि मिळेल मलाचि प्रिय-पुत्र-वियोग[9] कोण हो साहे २२
त्यजिजेल कृपाचार्यें निज-सर्वस्वहि[10] सुखें परि न भाचा ॥
भीष्महि मध्यस्थ[11] सदा ढंग[12] याचा जयापरि नभाचा[13] २३
पांडव-विवासनातें[14] जरि असति समर्थ पौर वाराया ॥
मी वश करीन दानें मानें सर्वांसि पौरवा राया ॥ २४ ॥
आहेत कोश हातीं लोकांचें रंजवीन मन दानें ॥
विश्व-वशीकरणाचा घ्यावा नलगेचि मंत्र धनदानें ॥ २५
हे आह्मी काय दिवे, तेजस्वी काय हा रवि[15], दुरापें[16] ॥
न दुजा परि, या कार्या नेई नच कीर्ति-हार[17] विदुरापें[18]

---

१ सहन करण्यास योग्य. २ पराक्रम जाणणाऱ्यास. ३ ग्रहांचा समूह. ४ सूर्याच्या तेजाचा अपमान. ५ आमचे प्राण व द्रव्य. ६ एकवटतील. ७ अर्जुनरूपी सर्पापुढें. ८ द्रोणपुत्र, अश्वत्थामा. ९ अश्वत्थाम्याचा वियोग. १० अश्वत्थामा. ११ दोन्ही पक्षांस समान. १२ रीति. १३ आकाशाचा. आकाश सर्वांस सर्वदा सारखेंच असतें. १४ बाहेर घालवून देणें ह्या कृत्याला. १५ विदुर. १६ दुष्प्राप ( कार्यें ) १७ कीर्ति घालविणारा. १८ विदुरापाशीं.

ऐसें वदोनि मोही त्यास प्रतिकूळ काळ सुतरूपें ॥
हतभाग्य अशुभचिंतन कां न करी पारिजात-सुतरूपें २७
आर्त-जन-मुखें कळवी पशुपतिची वारणावतीं यात्रा ॥
कीं ती सेवावीच प्राज्ञें भव-रोग हर महामात्रा ॥ २८ ॥
विदुरास उमजलें कीं बुडवाया कीर्ति सुतप दादानें ॥
केला मंत्र व्यसनीं पाडाया पांडुसुत पदादानें ॥ २९ ॥
धर्म ह्मणे राजा कीं जा ह्मणतो वारणावता, रचितो ॥
कांहीं घात सुयोधन मदांध-दिग्वारणाऽवतारचि तो ३०
पांडवहि ह्मणति पाहूं वाहूं वंदूनि शंकरा बेल ॥
रावति, सुर भजनीं मग कोण न होउनि विशंक राबेल३
तें आप्त-मुखें कळतां धृतराष्ट्र ह्मणे तयांसि बाळक हो ॥
जा वारणावता जरि जाणार तुह्मी गुरूक्ति-पाळक हो३२
पशुपतिचा यात्रोत्सव आतृप्ति पहा रहा वहा रत्नें ॥
देव-ब्राह्मण-चरणीं धनवस्त्रान्नें जनासि द्या यत्नें ॥ ३३ ॥
तेथें कांहीं काळ स्वर्गीं सुरसे सुखें वसा मग या ॥
पितरां बहु सुख देते केली आज्ञा जसी तसी न गया ३४
धर्म ह्मणे बहु बरवें ताता हा तारक त्वदुपदेश ॥
झाला गुरु-वाक्यादर्त पूरु महात्मा स्वयें यदुपदेश ॥३५॥

१ कल्पवृक्षनामक उत्तम वृक्षापाशीं. २ यथार्थभाषण करणाऱ्या लोकांकडून. ३ शंकराची. ४ राज्यपद घेण्यानें. ५ मदमस्त दिग्गजाचा अवतार. ६ तृप्ति होईपर्यंत ७ केलेली ह्म० मान्य केलेली. ८पित्याचें वचन मानिलें ज्यानें तो. ९यदूच्या पदाचा अधिकारी. ( आदिपर्व अ० ११ आ. ६४--७२ पहा. )

पशु-पर्ति-पाद पहाया पाहूं तें वारणावत नरां जे[2] ॥
आपण होतात करुनि संकट-विनिवारणा वतन राजे ३६
जाणार पांडुसुत तों खळ दुर्योधन पुरोचना यवना ॥
आधींच पुढें धाडी करावया प्राणनाशका भवना[3] ॥३७॥
सानुज युधिष्ठिर निघे मग जाया वारणावता राजा ॥
आलिंगूनि ह्मणे त्या भू-भार-निवारणाऽवतारा[4] जा ॥३८॥
भीष्मादि-गुरुजनांतें नमुनि ह्मणे अढळ[5] आप्तता राहो ॥
व्हा विरहाऽब्धींत मला सेतु तुह्मी सर्व आप्त तारा हो ॥
कुन्तीसहित निघाले पांडव तेंव्हां तयांसि पाहोनी ॥
विप्रादि पुरस्थ ह्मणति आह्मां सुख काय येथ राहोनी ॥
अंध परि धूर्त लोकीं नाहीं दुसरा असा धुतारा[6] या ॥
आह्मां बुडवाया क्षम होय नव्हे हा असाधु ताराया ॥४१
आंतहि अंधचि गारा बेंचुनि टाकील कां कवि हिऱ्यातें
गंगा टांकुनि जाइल अज्ञचि जळ ज्यांत टांक[7] विहिऱ्यातें ॥
देवा विश्वपते या पांडुनृप सुतांसि पाच कपटानें ॥
खळचि बुडावे व्हावे भस्मचि बांधोनि पावक पटानें ४३
जऱ्हि कोंडिला तरि हिरा स्तविलाचि शिरीं चढे न शिरगोळा[9]

---

१ हे अर्जुना. २ जे पाय. ३ घराला. ४ भूमीच्या भाराचें निवारण करण्याकरितां अवतार ज्याचा अशा हे धर्मा. ५ स्थिर. ६ लोकांस भोंदून ठकवितो तो. ७ बिंदु. ८ झरा. ९ हा एक जातीचा दगड आहे.

तो हारवील निजशिर जो खळ करणार साधु-शिर गोळा
धर्म ह्मणे भवदाशी- र्वाद खरे स्वर्द्रुचे सखे दानें ॥
देतील इच्छिलीं, कां करिजेल मनीं निवास खेदानें ॥४९
म्लेंच्छाच्या भाषेनें विदुर महात्मा हितोपदेश तदा ॥
धर्मासि करी त्याच्या धृतिला मतिलाहि तोष दे शतदा
कथिलें पुरोचनाला तुमचे अग्नींत काय होमाया ॥
सावध व्हा साधूंची स्वार्थ- पर खळासि काय हो माया
गृह करविलें असें तें दहनौषध-मय तयांत उतरा हो ॥
दावा विश्वास खळा कोपविषाचा मनींच उतं राहो ४८॥
करिल सुरंगपथ तुह्मां जाया माझा सखा सुखनक वनीं
अवनीं तुमच्या मज जें रसिकांच्याहि रसिका सुख न कवनीं
तेथुनि रात्रौ ठकवुनि विश्वासें तो चला भय वनातें ॥
जातां त्यजा गृहा द्या अग्नि, घडो तोच लाभ यवनातें५०
मृतिहर मंत्र असा तो सन्मतिचा साधु सोयरा शिकवी॥
परते परि पांडु-तनय-विरहौर्वा होय तोयराशि कवी ५१ ॥
कुंती पुत्रास ह्मणे वदला तुजशीं रहस्य काय कवी ॥
धर्म तिला संक्षेपें विदुरोक्तांतिल रहस्य आयकवी ॥ ५२

---

१ तुमचे आशीर्वाद. २ कल्पवृक्षाचे. ३ ज्वालाग्राही पदार्थ-युक्त. ४ कड. ५ मृत्युनिवारक. ६ वियोगरूप वडवानळाला. ७ समुद्र.

मग वारणावतीं नृप वनसा पुरजनहि होय चातकसा ॥
ह्मणाति भले तरिच नसे येथ न लाजेल पारिजात कसा९३
स्तविति नृपा पौर जसे चातक, सेवूनि तोय वनदास ॥
स्थापी लाक्षासदनीं दावुनि बहु भाव तो यवन दास९४
जाताचि धर्म त्या शत-दुष्टांचें कृत्य मतहि अंधाचें ॥
भीमादिकांस कळवी, करवुनियां ग्रहण भिंत्तिगंधाचें ९५
सांडुनि हे कण, घेसी पदरीं तनुजा तुषा अगा राया ॥
ते उचित प्रासादा पांडुतनय जातुषा अगारा या ॥९६॥
ऐसें पांडव ह्मणती धृतराष्ट्रा आठवूनि हळहळती ॥
चिंतामणि हारवि जो तत्सुत्दृदांची तसीच हळहळ ती९७
ह्मणती जाणविली या कर्मैं निज-नरक-निष्ठता तातें ॥
साक्षाद्धर्म ह्मणावें न ह्मणावें नर कनिष्ठ-तातातें ॥ ९८ ॥
करुनि दृढ मंत्र मनही होते विश्वस्तसेचि त्या भवनीं ॥
यवनीं दयाचि दाविति पाहति मृगयामिषेंचि मार्ग वनीं९
भेटे विश्वास-निधि स्नेहार्थी विदुर-सचिव तो खनक ॥
धर्म ह्मणे संरक्षीं आह्मां तूं, रक्षितो जसा जनक ॥१००॥
विवर जतुगृहांत करी कळवी करितो पुरासि खंदकसें ॥
जाणेल विदुर-मंत्रित तें तो सज्जन-वधेच्छु मंद कसें ॥१०१॥

---

१ मेघास. २ भक्ति. ३ भिंतीच्या वासाचें. ४ धान्यकण. ५ पुत्राला. ६ कोंड्याला. ७ दुर्योधनादि. ८ लाखेचें. ९ नरकप्राप्तीविषयीं तत्परता. १० विदुराला. ११ विश्वास पावलेल्या मनुष्या सारखे. १२ मित्र. १३ मसलत. १४ यवन.

बिलमार्ग सिद्ध होतां धर्म ह्मणे स्वानुजांसि हा यवन ॥
सां जीव अन्य घालुनि करुनि स्वकरें प्रदीप्त हें भवन ६२
रात्रौ पळोन जाऊं, विप्राराधन-मखा विलंब करा ॥
बकराजसा जपे परि ठकला खळ, काय हरिपुढें बकरा ६३
कुंतीचें व्रत कांहीं व्हावी तत्सांगता असें छद्म ॥
करुनि ब्राह्मण-भोजन केलें जैं जाळणार तें सद्म ॥६४॥
पौरवधू आणविल्या न्हाणविल्या गौरवूनि लेवविल्या ॥
देवविल्या सदलंकृति सूर्याऽस्तावधि समस्त जेवविल्या६५
अन्नार्थी जे आले त्यांसि ह्मणे धर्मराज जेवा या ॥
तों आली पंचसुता एक निषादीहि तेथ जेवाया ॥ ६६ ॥
जेवुनि यथेष्ट पुत्रां सह मद्याहि सेविलें निषादीनें ॥
काळें आदर दावुनि देतां, प्यावें न कां विषा दीनें॥६७
मद्यें भुले निषादी पडले तत्सुतहि पासले शवसे ॥
कोणाच्याही हृदयीं देह-स्मृतिचा न वास लेश वसे ६८
ज्यासि पृथा भी, जैसी व्याघ्राच्या सावधान प्राय वना ॥
त्या भवना जो राखे ये नीज अघाचिया नया यवना६९
विश्वास-घात यवना न घडो, हो सुख, न आपदा सांस
ऐसें विचारितां तें साधूंच्या काय पाप दासांस ॥ ७०॥
विघरीं शिरले भवन-द्वारीं लावोनि वीतिहोत्रातें ॥
पळतां वनांत तिमिरीं बहु भीतांचेहि भीति हो त्राते ७१

१ सहा. २ श्रेष्ठ बकासारखा. ३ सहा जणांस. ४ अग्नीला ५ भीतांचे त्राते भीति ( भ्याले. )

वाहे पृथेसि पृष्ठीं हस्तीं धरि भीम अग्रजा अनुजा ॥
यमलांसि कडेवरि घे तोचि गमे ह्मणति अंजनाजनु जों
तेज न साहति त्याचें गहनीं व्याघ्रादि काननौकें तें ॥
दे लाज विमानातें, मग दे तो भीम कां न नौकेतें॥७३॥
सत्संगें लाजेला भीमबळें तेंवि तूर्ण अटवीला ॥
तरले मुमुक्षुसे ते तो खळ षड्वर्गसाचि फटवीला ॥ ७४
विदुराप्तपुरुष भेटे दावी सांगोनि नाम नावेला ॥
ते ह्मणति कळे बाला देवाच्या जोंवि कामना वेला ७५॥
विदुर-प्रेषित-तरिनें तरले गंगेसि ते सुखें क्षिप्र ॥
हरि-दत्त-विरक्ति-बळें तरति महासिद्धिला जसे क्षिप्र ७६

# अध्याय २९ वा.

## सारांश.

पाण्डव लाक्षागृहांतून निघून एका वनांत आले.तेथें हिडिम्बासुर राहत होता.त्याची बहीण हिडिम्बी.एकदा त्यानें तिला वनांत मनुष्यांचा शोध करण्यास पाठविलें. ती वनांत इकडे तिकडे फिरून पाहते तों पाण्डव तिच्या दृष्टीस पडले. भीमाचें सुंदर रूप

१ जुळ्यांला ह्म० नकुलसहदेवांला. २ अंजनेपासून जनु(जन्म ) ज्याचें तो मारुति. ३ अरण्यांत. ४ वनचरें. ५ अरण्याला. ६ बापाला (विदुराला.) ७ लतेला. ८ विदुरानें पाठविलेल्या नौकेनें. ९ ईश्वरानें दिलेल्या वैराग्याच्या शक्तीनें. १० ज्याला.

पाहून हिडिम्बी मोहित झाली. तिनें भीमास आपला वृत्तांत सांगितला. व आपला स्वीकार करण्या विषयीं त्यास विनंती केली. बहिणीस येण्यास वेळ लागला. ह्मणून हिडिम्बासुर तिला शोधीत तेथें आला. तिचें तें वर्तन पाहून त्यास राग आला. व तो तिला मारण्यास धांवला. तेव्हां भीमानें त्याशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें. मग धर्माच्या आज्ञेनें भीमानें हिडिम्बीचा अंगीकार केला. त्यास एक पुत्र झाला. त्याचें नांव घटोत्कच.

गृह जळतां पौर ह्मणति हा! कळलें त्यांसि कर्म फटकळतें
गुप्त करो, सदसत्कृत तत्काळ दहा जणांत अटकळतें ॥ १
अग्नि विझवितां करितां शोध पुरजनीं शिरोनि खनकानें
बिळ भस्में भरिलें बुध भरि सूचक-वदन[1] जेंवि कनकानें॥
ते सा प्राणी पाहुनि पौर ह्मणति हाय! काय हें कर्म ॥
हा! धृतराष्ट्रा पांडव- घातीं त्वां कोण देखिला धर्म ॥
यंत्रना युक्तचि तुज हें, नविलंब फळासि साधु-हानीच्या ॥
जा नरका, कां वधिले वदान्य[2] विश्वस्त साधु हा! नीचा॥
तें ऐकोनि ससुत धृत- राष्ट्र रडे ह्मणुनि विदुर तोहि रडे॥
कीं अंधें अमृतफळें टांकुनि पदरांत घेतले हिरडे ॥ ५ ॥
करवी क्रिया नृप रडे पुत्राहि दुर्योधनादि सोंगाळ[3] ॥
विदुर नये न ह्मणाति जळ द्या खळ दुर्योधना दिसों गाळ[4] ६
दुःख तिहीं अनुभविलें जें कोणींही कधींहि न वनीं तें ॥

१ बहाडखोराचें तोंड. २ दानशूर. ३ ढोंगी. ४ गयाळ.

अति सुकुमार शरीरें त्यांचीं जैसीं नवीन नवनीतें ॥ ७ ॥
दक्षिणदिशेसि जातां रवि उगवे मावळे वनीं पळतां ॥
भय बहु कीं खळ येइल दैवें जगला असलें जरि पळतां ८
सायाह्नीं माय ह्मणे, तग न निघे, तोय पाज सुतराया॥
बा, तूंचि सेतु आह्मां या तृड्-व्यसनाऽब्धिलागिं उतराया
धांवे तरु मोडित तो सुटला गिरिवरुनि थोर पाथरसा ॥
श्रमतां त्या गुरुभक्ता दे विद्याज्ञानसेंचि पाथ रसा १०॥
पात्र नसे ह्मणवुनि घे भिजवुनि तो उत्तरीयवास वनें ॥
वास वनव्याघ्रा दे भय त्याचा, तेंवि अरिस वासव न११
धांवत ये पाहे तों श्रमनिद्रा लागली स्वमातेतें ॥
वातें दर्वाऽर्चिसें त्या दैन्यें गहनांत दुःख मांते तें ॥१२॥
निजला साऽनुज धर्महि कल्पुनि सुख-शयन भूमितळ मळला
तें पाहुनि शुष्क ह्रदिं मीनतसा भीम फार तळमळला१३
चोळी खळान्तकर कर, करकर रद खाय, हाय हाय करी
गुन्ते गुर्वाज्ञेनें पंकीं पडला करील काय करी ॥ १४ ॥
अश्रु पुसोनि ह्मणे रे दुष्टा दुर्योधना कुलकलंका ॥
पोपू भू तव संगें दशवदनाच्या जसी पुलकें लंका॥ १५॥
तुमचा पिताचि पुरु-कुळ-विपिनाचा आग्नि, हो त्रपा प्याला

१ तृषारूप संकटाच्या समुद्राला. २ धोंड्यासारखा. ३ उदक. ४ पृथ्वी. ५ पांघरावयाचें वस्त्र. ६ उदक. ७ इंद्र ८ वणव्याच्या ज्वाळेसारखें. ९ वनांत. १० मातें. ११ करून. १२ दुष्टांचा नाश करणारे, असे कर. १३ दांत. १४ रोमांच. १५अरण्याचा.

लोभ्याला तेजस्वी बन्धु नको, अग्निहोत्र पाप्याला॥१६॥
शोकीं अयशीं नरकीं केला कीं मग्न दुष्ट हो तात ॥
अनिचारितोक्त करितां बालिश[2] हो. आर्य रुष्ट होतात॥
गजही साहूं नशकति ज्यांच्या स्व-मदान्त-तत्परा[3] गन्धा ॥
ते केले दुर्विधि-हृत-[4] मति शशकांनीं हरी[5] परागन्धा[6]१८॥
काका, ते तुज रुचले करिति महत्त्वास भस्म रासभ जे ॥
नगुणज्ञ तूं, धरि शिरीं विधु[7] न उमावल्लभ[8] स्मरासं[9] भजे॥
ऐसें जों भीम वदे चिंती कृष्णा भयांऽपहा,[10] जागे ॥
भगिनीस हिडिंब ह्मणे ते कोण मनुष्यसे पहा जा गे२०॥
ती राक्षसी हिडिंबा धांवे कीं चरचरा नरा खावें ॥
रक्षील व्याघ्री क्षण परि पळहि जिणें जिणें न राखावें॥
भुलली वनीं हिडिंबा भीमाची पाहतांचि सुंदरता ॥
तत्काळ सुन्दरी ती होय जसी दिव्ययोनि-सुन्दरता[11] ॥
भीमासि ह्मणे कां जी शिरलां या काननांत तापससे ॥
येथें जन बहु पावति मृग-राज-बिळांत[12] जेंवि ताप ससे ॥
माझा हिडिंब राक्षस सोदर[13] तुमचा करील वध, मातें ॥
तेणेंचि धाडिलें, परि तुज वश मी या त्यजूनि अधमातें
स्वीकार करीं साधो, स्मर बाधो न मज, मीहि टाळीन॥

१ विचार नकेलेलें वचन. २मूर्ख हो. ३आपल्या मदाचा अंत करण्या विषयीं तत्पर अशा गंधाला. ४ दुर्दैवानें हरिली बुद्धि ज्यांची ते. शशक. ५ सिंह. ६ देशांतरवासी. ७ चंद्र. ८ शंकर. ९ मद-नास. १० भय हरणाऱ्याला. ११ सुंदनामक दैत्याचे ठिकाणीं रत झालेली अप्सरा, तिलोत्तमा. १२ सिंहांच्या गुहेंत. १३ बंधु

मरणा, पळविन तुजला वरुनि, सतीव्रत न तें विटाळीन
हो मत्पाति, ये स्कंधीं बैस, विमानीं अमर्त्यसा धावें ॥
त्वांही म्यांही रक्षुनि अन्योन्यातें स्वकार्य साधावें ॥२६॥
मग भीम ह्मणे निद्रित माता भ्राते त्यजूं वनीं, तुजला ॥
जोडूं, तोडूं प्रीति, स्त्री-संग-सुखासि कोण गे सुजला २७
साधावा स्वार्थ असें भय दावुनियां भयातुरा मातें ॥
समयीं देईलचि दे जेंवि यशो-लाभ यातु रामातें ॥ २८ ॥
तों ती ह्मणे पळवित्यें सर्वांसि करा तुह्मी व पारे जागे ॥
भीम ह्मणे सुखसुप्तां उठवींना, करिल काय अरि, जागे ॥
तो अंधकार, मी रवि, तो रावण, मीहि पुष्कराक्ष, ससा
तो, हरि मी, तन्मुख मी करिन पळामाजि शुष्क राक्षससा
हें उर हे बाहु पहा त्याचा आह्मांसि काय गे लेखा ॥
जा त्याला ह्मण त्यांचे धाकेंचि गळोनि कार्य गेले, खा॥
होतां विलम्ब राक्षस ये पाहे स्व-स्वसा-चरित्रास ॥
कोपोनि ह्मणे दुष्टे, तुज नाहीं मृत्युचा परित्रास ॥ ३२ ॥
काळें मति तुज दिधली मर्त्याऽपसदास अनुसरायाची ॥
वांचेल कसी या सां- सकट तुझी आजि तनु, सरायाची
ऐसें वदोनि धांवे सर्वांचाही करावया कवळ ॥
भीमें दटाविला तो करितां रदशब्द निद्रितां जवळ ३४॥
परि भगिनीस वधाया धांवे तो यातुधान कोपानें ॥

---

१ देवसा. २ राक्षस. ३ गणना. ४ देह. ५ खावे. ६ नराधमाला. ७ सहा जणांसह. ८ दांताचा शब्द. ९ राक्षस.

तों सासुबाइ कोपी मद्भ्राता धांवला उतावेळ ॥ ४४ ॥
आधीं माझे घ्याया मग तुमचे प्राण मूर्त अंतकसा ॥
धांवे परि, मत्पति तव सुत असतां तो करील अंत कसा४५
तुमची सुखनिद्रा क्षण मात्रहि मोडूंनयेचि त्या अहितें ॥
या भावें मत्पतिनें दूर तया पक्षिपति जसा अहितें॥४६॥
नधरील काय जी खग- पतिनखकरवाळ लाज,सापाला॥
सर्पादि न वधितां,चुरिला असता खळ वाळला जसापाला४७
ते दोघे झगटति परि मत्पति मारील राक्षसाऽपसदा ॥
गरुडापुढें तृणचि तो इतरीं जरि असुहरांक्ष साप सदा४८
ऐसें ऐकुनि सायुध चवघेही बंधु धांवले सहसा ॥
जिष्णु ह्मणे वद आर्या,जरि अरि भासत असेल दुःसहसा
तरि आज्ञा दे वधितों तुझियेचि दयेकरूनि यातूतें ॥
श्रमलासि पथीं व्हावा न श्रम बहुअस्मदाश्रया तूतें ५०॥
भीम ह्मणे होतो सुर- सुदतीचा शस्त्रमथित नवरा कीं ॥
भुजयुद्धींच मरो खळ सोडावा त्वां स्व-विशिख न वराकीं॥
मज यातु तसेंचि जसें अमृतीं विजयाशतक, तुच्छा दा॥
वधिन कुतुकें, करिल जरी यावरी आंगें शतक्रतु च्छाया५२

१ दुष्टानें. २ गरुड. ३ सर्पाला. ४ गरुडाचीं नखें हीच तरवार. ५ तत्काल. ६ राक्षसाधमाला. ७ प्राणहारक नेत्र ज्याचे तो. ८ राक्षसाला. ९ आमचा आधार. १० देवांगनेचा. ११ शस्त्रानें मारिलेला. १२ आपला बाण. १३ तुच्छ राक्षसावर. १४ अमृतीं विजयाशतक ह्म० अमृतावर जय मिळविण्यास इच्छिणारें ताक. १५ इंद्र.

भीम ह्मणे भू याच्या रक्ताच्या आज तृप्त हो पानें॥३॥
पांडव रागें मागें त्या पापाच्या महानगां ढकली ॥
द्वात्रिंशद्धस्तांवरि करिति महागजसमान गाढ कली ॥
त्यांच्या युद्धध्वनिनें जागी झाली पृथा सुतांसहित ॥
तों निकट देखिली स्त्री लावण्य जिचें जगीं तुळारहित ३७
कुन्ती तिला पुसे तूं कोणाची सांग बाइको, पातें ॥
न लवेचि तुज पहातां, पुसिल्याच्या नधरिं बाइ कोपातें॥
तूं काय अप्सरा, कीं वनदेवी, वद किमर्थ आलीस॥
कां एकली, पतिकडे पाठविलें सुमुखि काय आलीस ३९॥
कुन्तीस ह्मणे ती मी रात्रिचरी, या वनींच मद्वसती॥
येथें प्राणी कोणी अस्मत्त्रासें करूनियां नसती ॥ ४० ॥
स्वाऽग्रजहिडिंबवचनें आलें मारावया तुह्मांला जों ॥
भुललें नवहेमाभा एका मी, काय? हो तुह्मां लाजों॥४१॥
वरिला मनें तुझा सुत न्यावा येथूनि शीघ्र पळवावा ॥
मद्भाव असा कीं हा स्वविचार तुह्मांसही न कळवावा ४२
तुमची संगति सोडुनि तो वश झाला मला न वीरमणी ॥
आश्चर्य थोर हें कीं प्रार्थी परि नावडे नवी रमणी ॥४३॥
मज लागला परोपरि वहुत विनवितां तुझ्या सुता वेळ॥

---

१ मोठ्या पर्वताला. २ बत्तीस हात अंतरावर ३ तुमुल ४ युद्ध. ५ सखीला. ६ राक्षसी. ७ माझा वडील बंधु हिडिंब त्याच्या आज्ञेनें. ८ नव्या स्वर्णाप्रमाणें कांति ज्याची त्या भीमाला.

तों सासुवाइ कोपी मद्भ्राता धांवला उतावेळ ॥ ४४ ॥
आर्धीं माझे घ्यावा मग तुमचे प्राण मूर्त अंतकसा ॥
धांवे परि, मत्पति तव सुत असतां तो करील अंत कसा ४५
तुमची सुखनिद्रा क्षण मात्रहि मोडूंनयेचि त्या अहितें ॥
या भावें मत्पतिनें दूर तया पाक्षिपति जसा अहितें॥४६॥
नधरील काय जी खग- पतिनखकरवाळ लाज,सापाला॥
सर्पादि न वधितां,चुरिला असता खळ वाळला जसापाला४७
ते दोघे झगटति परि मत्पति मारील राक्षसाऽपसदा ॥
गरुडापुढें तृणचि तो इतरीं जरि असुहराक्ष साप सदा४८
ऐसें ऐकुनि सायुध चवघेही बंधु धांवले सहसा ॥
जिष्णु ह्मणे वद आर्या,जरि अरि भासत असेल दुःसहसा
तरि आज्ञा दे वधितों तुझियेचि दयेकरूनि यातूतें ॥
श्रमलासि पथीं व्हावा न श्रम बहुअस्मदाश्रया तूतें ५०॥
भीम ह्मणे होतो सुर- सुदतीचा शस्त्रमथित जरा कीं ॥
भुजयुद्धींच मरो खळ सोडावा त्वां स्व-विशिख न वराकीं॥
मज यातु तसेंचि जसें अमृतीं विजयाशा तक, तुच्छा दा॥
वधिन कुतुकें, करिल जरी यावरी आंगें शतक्रतु च्छाया५२

१ दुष्टानें. २ गरुड. ३ पाला. ४ गरुडाचीं नखें हीच तरवार. ५ तत्काल. ६ राक्षसाधमाला. ७ प्राणहारक नेत्र ज्याचे तो. ८ राक्षसाला. ९ आमचा आधार. १० देवांगनेचा. ११ शस्त्रानें मारिलेला. १२ आपला बाण. १३ तुच्छ राक्षसावर. १४ अमृतीं विजयाशतक ह्म० अमृतावर जय मिळविण्यास इच्छिणारें ताक. १५ इंद्र.

ऐसें वदोनि भीम   श्रित-पीडांच्या[१] निवारणारांनीं ॥
वाहूंनीं करि अरिला   व्यसु[२], जैसा सिंह वारणा[३] रानीं ५३
विजयी भीम ह्मणे या   खळ-भगिनीचाहि वध करावा, हें
वृंदावनं[४] भोग्य नव्हे   काय पहातोसि रे करां[५] वाहें ॥५४॥
धर्म ह्मणे रे बावा   रक्षीं बलिनायका यश, स्त्रीतें ॥
न वधीं, जें कर्म नव्हे   सन्मत[६] करितील काय शस्त्री[७] तें ५५
खचरी[८] ह्मणे पृथेला   जाणसि दुःखासि तूंहि सासूया ॥
नकरीं मदुपेक्षा सति   मति कुळजाची नसेचि सासूया ५६
आर्यें, लोक-द्वय[१०]-हित   सुताचि नव्हे काय वद नवा सूनं[११] ॥
काय मरावें क्षुधितें   कल्पलतेजवळि वदन वासून ॥५७ ॥
जो निस्पृह संसारीं   वहु विटला तो यमी[१२] न संग मनीं ॥
जरि धारि तरि तळमळतां   यत्न करिल तोय मीन[१३]संगमनीं
स्मरतां भेटेन पथीं   विषमीं पृष्ठीं तुह्मांसि वाहेन ॥
सेवा करितां तुमची   मी आत्म-सुखाकडे न पाहेन ॥५९॥
धर्म ह्मणे दिधलें जें   मागसि वंदुनि पदासि खेचरि[१४], तें ॥
परि आमुचे करावे त्वां प्रमुदित-मति सदा सखे[१५] चरितें ६०

---

१ आश्रितांच्या दुःखांचें निवारण करणाऱ्या बाहूंनीं. २ प्राणरहित. ३ हत्तीला. ४ कंवडल. ५ भीम हातास ह्मणतो, हे करा, वाहें ह्म० या दुष्टस्त्रीवर धांव. ६ सज्जनांस मान्य. ७ शस्त्रधर. ८ राक्षसी. ९ असूयायुक्त. असूया ह्म० गुणांच्या ठायीं दोषारोप करणें. १० इहपरलोकीं हित करणारा. ११ सून हा नवा सुत ह्म० पुत्र नव्हे काय? १२ इंद्रियनिग्रह करणारा. १३ मत्स्यांच्या समागमाविषयीं. १४ हे राक्षसी. १५ बन्धु.

क्रीडार्थ दिसां ने परि सांजे या स्व-प्रियावहा आण ॥
रक्षीं सत्य निशाचरि, घात करीना असी वहा आण ६१
खचरी ह्मणे चुकेना गुरुभजनीं देहहा निभावो जी ॥
वचनाऽतिक्रम करितां क्षिप्र घडो देहहानि भावोजी ६२
गुरुवचनें मारुति जें एकचि सदपत्य-रत्न दे तीतें ॥
तन्नाम घटोत्कच, दे सुख पितरां शतहि सुत न देती तें ६३
कार्पटिकांचा वेष स्वीकारुनि पांडुपुत्र ते जातें ॥
मिरवावेंचि, परि अरि- त्रासें आच्छादिती स्वतेजातें ६४

# अध्याय ३० वा.

## सारांश.

१–६९ पाण्डव वनांतून जात असतां त्यांस व्यास भेटले. त्यांनीं पाण्डवांचें समाधान केलें.व त्यांस एकचक्रानगरींत राहण्यास सांगितलें. तेथें ते तापसवेषानें एका ब्राह्मणाचे घरीं गुप्तरूपानें राहिले. त्या नगरीस बकराक्षस फार त्रास देत होता. त्यास प्रत्येक घरांतून दररोज एक रेडा, एक मनुष्य व साळीच्या तांदळांचा पुष्कळ भात पाळीप्रमाणें द्यावा लागत असे. एके दिवशीं

१ दिवसा. २ तुझें प्रियकरणारा. ३ मारुताचा ह्म० वायूचा पुत्र भीम. ४ उत्तम अपत्य हेंच रत्न. ५ तीर्थयात्रा करीत फिरणाऱ्यांचा.

त्या ब्रह्मणावर ती पाळी आली. तेणें करून तो मोठ्या काळजींत पडला. तेव्हां त्या ब्राह्मणास आश्वासन देऊन भीम स्वतः त्या राक्षसा कडे गेला. व बाहुयुद्ध करून त्यास त्यानें ठार मारिलें.

स्कंधीं पृथेसि वाहुनि लंघुनि मत्स्यादि देश दूरवर ॥
गेले तापस वेष स्वीकारुनि पांडुपुत्र शूरवर ॥१॥
त्या व्यसनांत निरखिला दर्शन देऊन तापहृ व्यासें ॥
जो त्रिस्ती साधुजनीं संपत्ति सदा न ताप हव्यासें ॥ २ ॥
चिंतामणि अधना जें धन्वंतरि जें गदाकुळा देतो ॥
भेटोनि अकस्मात् सुख तें त्या कुरुच्या तदा कुळा दे तो
पौत्रांसि ह्मणे मज हें कळलें होतें, परंतु जळधीतें ॥
मिळतां बळें नदीतें फिरविल, कोणही बळी न खळधीतें४
हा बालद्रुम हो कां खेद तुह्मीं मी सुधाढ्य आवाल ॥
पावाल वृद्धि पुष्कळ दुष्टग्रीष्मासि लाज लावाल ॥ ५ ॥
प्रार्थावें नलगे मज जें तुमचें हित करीन आधीं तें ॥
भेटेन एकचक्रा- नगरींत रहा हरीन आधींतें ॥ ६ ॥
जातां देवूनि अभय निज-जनकाचा पिता, महाज्ञाते ॥
त्याचि नगरीं द्विज-गृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा ते ७

---

१ दुःखनाशक. २ रोगग्रस्ताला. ३ बालद्रुम हो, हा खेद कां ४ अमृतानें संपन्न. ५ अळें. ६ दुर्जनरूप उन्हाळा. ७ पिता-मह व्यास, त्याच्या आज्ञेला.

सिद्धान्न मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी ॥
भीमासि अर्ध देती अर्धाचे पांच भाग साधु करी ॥ ८ ॥
होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला[२] मुदित ॥
ता कुंती परिसे त्या आश्रयद-ब्राह्मणाऽऽलयीं[३] रुदित॥९
भीमासि ह्मणे रडतो दुःखें सकुटुंब विप्र, बापा, हें ॥
मज बहु दुःसह झालें आले नेत्रासि अश्रु बा पाहें ॥१० ॥
आह्मी पक्षी, हें गृह- नीडं, घरीं देव आश्रयागम हा ॥
दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति[७], होय हाचि याग महा॥
भीम ह्मणे शोध करीं जा स्वमुखें विप्र-नायका पूस ॥
वारीन दुःख सर्वहि दहना अतिभार काय कापूस ॥१२॥
द्विज-रुदित पुन्हा तप्त श्रुति करि भेटोनि यादवीची तें ॥
मोहें मन जोंवि विप्रा-ऽबुधिच्या भेटोनि याद वीचीतें १३
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासराकडे मोहें ॥
करितां विलाप बोलत होता निज दुःख तेधवां तो हें १४
जाये वदलीस पर- स्थळ-गमन-विचार सर्वथा राहो ॥
माहेर तेथ आहे वोळखिती लोक सर्व थारा हो ॥ १५ ॥
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राण-संकट प्रमदे ॥
स्व-कुटुंब-व्यसन जसें देतें न तसें बुधा विष भ्रम दे १६॥

---

१ सिद्धान्नभिक्षा. २ भिक्षेच्या स्थितीला. ३ आपणास आश्रय देणाऱ्या ब्राह्मणाच्या घरीं. ४ घरटें. ५ ब्राह्मण. ६ आधारभूत अगम ( वृक्ष. ) ७ उलट उपकार. ८ कुंतीची. ९ लाटेला

जरि दान तुझें द्यावें कांते मज भासतें तसें तरि तें ॥
सिंधूदरीं विकात्रें स्वहितार्थ तितीर्षुनें जसें तरितें ॥१७॥
पुत्रचि अधिक न कन्या अन्यास गमे, मला न लोभ्याला॥
नयन-युगांतुनि एकहि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला१९
देतों निज-वपु पारि तूं भीरु कसी साहसील विरहातें ॥
स्वर्गीहि दुःसहचि जें ह्मणसील मज स्मरोनि चिर हा! तें
प्राणांचा त्याग बरा तुमचा न बरा कसा न तो पापी ॥
कूपांत वळें अबळा घालुनि ठकवूनि दोर जो कापी २०
तों ब्राह्मणी ह्मणे हो कवि साधु तुह्मीं करूं नका शोक॥
यन्मूळ[3] आपदर्थे तो शंकरसाचि आठवा श्लोक ॥ २१
अजि आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि, श्लोकीं ॥
तेंच्चि करा हो न बुडों द्या हो मज निजमतीसही शोकीं
पतिपूर्वी स्त्रीस मरण तें लग्नाहूनि काय हो ऊन ॥
नरहांवाचि सतीनें पळभराहि विरूप-काय होऊन ॥ २३
रक्षाल तुह्मीच मुलें अबळा वाहील भार जीवा हे ॥
रक्षील कशी आल्या नवपूरीं भीरु फार जी वाहे ॥ २४
जाईन मीच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे ॥

---

१ तरण्यास इच्छिणारानें. २ नौकेला. ३ ज्याचें मूळ " आपदर्थे " असें आहे तो श्लोक. आपदर्थे धनं रक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि ॥ आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ॥

दैवें स्त्री ह्मणुनि दया येतां मत्प्राण कां न वांचावे ॥२५ ॥
मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं ॥
तो स्त्री मीच ह्मणा जी, मागें साहूनियां नकारा हूं ॥२६॥
ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे, अयि तें॥
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते ॥ २७॥
परिसे असें पृथा जों तोंचि ह्मणे त्यासि कन्यका मातें ॥
द्या, द्यायाचीच सुता हे किमपि नयेचि अन्य-कामातें२८
आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ, जिला॥
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला २९
कन्या रक्ष्य तिघांतुनि एका तुज हो ह्मणेल कां टाकीं ॥
बापा, काद्यानेंचि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं ॥३०
ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे तशांत जवळून ॥
खवळूनि उठे बालक बोले हस्तें तृणासि कवळून ॥ ३१ ॥
समजावुनि त्यांसि ह्मणे ऐसें लात्तिलचलासि मालीन ॥
कां ललतां आललतां पलतां मी सांगलांत तालीन ३३॥
हांसविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघेंहि बाळ-शब्दानें ॥

---

१ जी, नकारा मागें साहूनियां हूं ह्मणा. अयि ते. २ कथं एवं अदयं उक्तं ह्म० हे स्त्रिये, तूं कसें हें निष्ठुर भाषण बोललीस ३ दयिते, अयं तत् अनुष्ठितुं क्षमः किम्? ह्म० हे प्रिये, हा मी तें करण्यास समर्थ आहें काय?

अब्दानें[1] ग्रीष्म-दवा-[2] ऽकुळ-बर्हि-कुळें जसींच अब्दानें[3] ३३
तेंव्हांचि पृथा देवी भेटे अभयोक्ति जी वदे त्यांतें ॥
संजीवनीच जाणों ती रोगें करुनि जीव देत्यांतें ॥ ३४ ॥
रोदन-कारण पुसतां विप्र ह्मणे अंब तापसि, श्रवणें ॥
घ्यावें शिव, अशिवाच्या व्यर्थचि कां तूंहि तापसि श्रवणें
या राष्ट्रा वक-राक्षस अजयूथा[4] लांडगा जसा पाळी[5] ॥
तद्वेतन-दानाची आलि असे आजि मजकडे पाळी ॥ ३६
एक महिष एक पुरुष शाल्योदनराशि[6] त्यासि भक्षाया ॥
द्यावा असें असे या व्यसनीं मज कोण दक्ष[7] रक्षाया ३७
विरह-भयें एकासहि राक्षस-हस्तीं न देववेचि, तसें ॥
धनहि न पुरुष मिळेसें, स्वकुळाचि मी भूमिदेव[8] वेचितसें ३
सहज गजगंड[9] भेदी हरिचा नव्हता कळा शिकत करंज[10]॥
अकृतघ्नत्वार्थचि[11] दे शुचिता मळल्या जळासि कतकरज[12]॥
तैसा कुलीन जन पर- दुःख-ध्वंसी पटु स्वभावानें ॥
संकट हरि अरिचेंही हरिना कां प्रार्थितांचि भावानें[13] ४०
कुंती ह्मणे दिल्हा तुज एक स्वसुत द्विजा, नकोचि रडों ॥

---

१ मेघानें. २ उन्हाळ्यांतलि. वणव्यानें पीडित मोराचीं कुळें. ३ उदकाच्या दानानें. ४ बकऱ्यांच्या कळपास. ५ रक्षितो. ६ शालीच्या भाताचा राशि. ७ समर्थ. ८ ब्राह्मण. ९ हत्तीचें गंड-स्थळ. १० नख. ११ जलानें आपलें पोषण केलें सबब त्यास आपण कृतघ्न होऊंनये अशा करितां. १२ कनक ह्म० निवळीची बी. तिची पूड. १३ भक्तीनें.

हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नकोचि रडों ४१॥
विप्र ह्मणे शिवाशिव पर- घातक जो स्वार्थलुब्ध नर कामी
तो जैसा तैसा या कर्में पावेन घोर नरका मी ॥४२॥
करुनि परांचें आहित स्वहित विहित काय! तापसि, कवीसी
माते, असें कसें मज व्हाया याहूनि ताप सिकवीसी४३॥
कुंती ह्मणे मदात्मज गुरुवर मंत्रें असे महातेजा ॥
साहों नशकति राक्षस वज्राघातासही सहाते जा ॥४४॥
सुरवल्लिचा नव्हे गा क्षुद्रलतागुच्छकासम स्तवक[1] ॥
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक ॥४५
परि हें विप्रवरा, त्वां न प्रकटावें मनींच जिरवावें ॥
विद्यार्थिजनोपद्रव लागेल ह्मणूनियां न मिरवावें[2] ॥४६॥
मग विप्रपृथाप्रार्थित[3] भीम धरुन राक्षसापराध मनीं ॥
कोपे, जाणों दहनचि तो होय; प्रार्थना तया धमनी[4]४७॥
तें मान्य करुनि मुनिला व्हा स्वस्थ असेंचि तो कवि प्रार्थी
निःस्व[5] जसे वित्तार्थी तैसेचि कुलीन लोक विप्रार्थी ॥४८॥
स्वाऽनुज साहस कांहीं करणार, असें युधिष्ठिरा समजे ॥
आकारेंचि परेंगितें[6] कळे ह्मणति कवि युधिष्ठिरासम जे ॥
पुसतां पृथा कथी तें, धर्म ह्मणे अंब, परिस तोकवच[7] ॥

१ फुलांचा झुबका. २ विद्यार्थ्यांना हें समजलें असतां, ते गमतीनें ती गोष्ट जिकडे तिकडे सांगतील व त्या पासून आह्मांस त्रास होईल. ३ ब्राह्मण व कुंती यांनीं मागीतलेली गोष्ट. ४ फुंकणी. ५ निर्धन. ६ दुसऱ्याचा अभिप्राय. ७ मुलाचें भाषण.

द्याया काय उचित! जो रणीं सहाणार अरिस तो कवच
द्यावा परा न, तरतां अंबुधिमध्यें जसा स्व नावाडी ॥
धार्मिक न तो,जना जो नगणुनि शिशु-रोदन-स्वना वाडी
कुंती ह्मणे अरे बा, पावों द्यावा मुनी कसा असुखा ॥
आह्मीं सुखें ह्मणावें काळा, द्विज सोड, आमुचे असु खा
विप्रार्थ तुह्मी असुही स्वर्गी सुखवावया जनक वाडा ॥
हेंचि हित, न काळासहि पाहुनि लाविति भलेजन कवाडा
भीससी कां? अनुभविलें अनुजबळ तुवां न काय गा रानीं॥
पावो ताप पराचा परि हिमगिरिचा न कार्य गारांनीं५४
पडला निकट शिशुपणीं भीम मदंकावरूनि जावरि तें ॥
झालें चूर्ण शिळा-तळ, न धरीं भय, यश तवानुजा वरितें
ब्राह्मणसाहाय्य-कर- क्षत्रिय जो तोचि संत, तोचि तरे ॥
ऐसें व्यासें कथिलें ह्मणुनि तुह्मां हेंचि संततोचित, रे॥५६
जननीस धर्म वर्णी नवल न, वर्णील तीस सुरभी ती ॥
तरिच तसे खळ वधिले तत्पुत्रांनीं, जयांसि सुर भीती५७
रात्रौ एकाकीही शिरतां सागर-वनीं न भी मकर ॥
भीमहि तसा बक-वनीं आणि तदन्नीं तसाचि भमिकर ॥
जेवी भीम बका ये ऐसी मारूनि हाक उग्रास ॥

---

१ रणीं अरीस सहाणारा कवच ह्म०युद्धांत शत्रूचा मारा सहन करणारा भीम हा एक कवच आहे. २ स्वर. ३वाढी. ४वाढा. ५देह. ६माझ्या मांडीवरून. ७ मदत. ८निरंतर योग्य. ९ कामधेनु. १० समुद्रोदकांत. ११ भी न आणि ह्म० मनांत भय आणिलें नाहीं. १२ त्या बकराक्षाचे अन्नांत. १३ एकटा.

शिरले काय सदुदरीं सदोदनाचे भिवोनि सुग्रास ॥५९॥
हें पाहुनि बक धांवे मानेवरि दे धडाधड बुक्यांतें ॥
होय तया अशनीं त्या कुरुकीर्तिकुचाचिया हित बुक्यांतें
हंसेंहि जेववावा जो प्रेमें धरुनियां चिंबुक लावा ॥
तो त्यां गरुडा झडपी, आमरण ह्मणे असाचि बुकलावा
भीम न सोडी भोजन राक्षस ताडी बळें जरि बुक्यांनीं ॥
खळ गांजी, परि सादर हरिभजन जसा करी बुध मुक्यांनीं
पांडव जेवुनि आधीं मग राक्षसजीवितास आंचवला ॥
सन्मणि न कोटिलक्षा ये, ये तो काय राक्षसा चवला ॥
मारी हरि लीलेनें जेंवि गजा, तेंवि पार्थ कुणपांशा ॥
तैं सुर ह्मणति यमाच्या गुरु साजति भीमबाहुगुण पाशा
ठेवी नगर-द्वारीं परम-भयानक अशुद्धिमत् कुणप ॥
जाणों मातेनें तो वधिला शिशुरक्तपोग्रमत्कुणप ॥ ६५ ॥

---

१ उत्तम अन्नाचे. २ भोजनसमयीं. ३ कुरुकीर्तिरूप स्त्रीच्या स्तनास सुगंधी द्रव्या सारखा. ४ हनुवटी. ५ लावापक्षी. ६ हंसाच्या प्रार्थनेनें जेवणाऱ्या गरुडावर लाव्यानें हल्ला करावा, तसा भीमावर, तो जेवीत असतां, बकानें हल्ला केला. ७ मरे पर्यंत. ८ बकराक्षस पाठीवर बुक्क्या मारीत असतां, भीम ह्मणाला, ह्यानें माझ्या पाठीवर अशाच बुक्क्या माराव्या. ९ ज्ञाता. १० मुकाट्यानें. ११ उत्कृष्ट रत्न, जें कोटी किंवा लक्ष रुपयांनीं मिळत नाहीं. १२ दोन आण्यांस. १३ प्रेतभक्षकाला. १४ भीमाचे बाहु हेच दोर. १५ अपवित्र. १६ प्रेत. १७ मुलाचें रक्त पिणारा भयंकर असा मोठा ढेकूण. १८ नगरी हीच माता, तिनें.

भीमें हळूचि जाउनि कथिली वार्ता द्विजासि कानीं ती॥
श्लाघ्यहि करुनि न मिरवी कुळज सुजनहो असी सिका नीती
चुकलों क्षमा करा मज अपराधसहस्र घातुका[1] घडलें ॥
या भावें जाणो तें द्वारीं दक्ष क्षमार्पना[2] पडलें ॥ ६७ ॥
प्रातःकाळींच तसें बक-शवपाहोनि एकचक्रा तें ॥
यश देती झाली करि[3]- वर-पाळाच्याचि एक-चक्रातें ६८॥
ह्मणति विचक्षण पुर-जन अन्योन्य मनीं धरूनि हरिख चला
ज्याचा वार[4] तयासचि हेतु पुसों कीं कसा स्व अरि खचला
सांगे विप्र मजकडे येतां प्राणघ्न उग्रतर वार ॥
बहु भ्यालों अज जैसा भीतो पाहूनि उग्र तरवार ॥ ७०
सकुटुंब रडत होतों तों आला मंत्रसिद्ध विप्र कृती ॥
रोदनहेतु मज पुसे तो सदय महामना शुचिप्रकृती ॥७१॥
ऐकोनि व्यसन वदे मी देतों अन्न राक्षसाऽपसदा ॥
हरिणवनीं वृक न बरा मंडूकाच्या बिळांत साप सदा ७२
मच्चिंता नकरावी स्वस्थ असावें असें अभय मातें ॥
देउनि जाय दमाया[5] जेंवि शिवाप्राणवल्लभ[6] यमातें ॥७३ ॥
त्याचेंचि कर्म हें, तो आह्मांला होय पौर हो, तात ॥
साधूसि सहाय सुखें देव सकर्पूरगौर[7] होतात ॥ ७४ ॥

---

१ राक्षस. २ रागावलेल्या मनुष्यास मृदुभाषणादिकें करून क्षमाविशिष्ट करणें. ३ गजेंद्राचें रक्षण कर्त्ता श्रीविष्णु, त्याच्या चक्रास, जें यश मिळणार तें यश त्या नगरीनें दिलें. ४ पाळी. ५ दमन करण्यास. ६ पार्वतीपति शंकर. ७ कर्पूराप्रमाणें गौर-जो शंकर त्यासहित.

ऐसें ऐकुनि पौर ब्रह्मोत्सव करिति गाति महिमा ते ॥
ह्मणती ब्राह्मणचि तुझा पति गुरु आह्मां प्रजांसि माहि माते

# अध्याय ३१ वा.

## सारांश.

पाण्डव एकचक्रानगरींत एका ब्राह्मणाचे घरीं होते. तेथें एके दिवशीं एक ब्राह्मण आला त्यानें त्यांस गोष्ट सांगितली ती अशीः—"द्रोणानें द्रुपदाचा पराभव केला. तो राग मनांत धरून द्रोणास मारणारा पुत्र आपणास व्हावा ह्मणून द्रुपद उपयाज ऋषीकडे गेला. व त्यानें त्यास आपला हेतु कळविला. उपयाजानें त्यास आपला ज्येष्ठबन्धु 'याज' याजकडे जाण्यास सांगीतलें. तेव्हां द्रुपद याजऋषीकडे गेला. व त्यास त्यानें आपलें मनोगत सांगितलें. याजानें तें कबूल केलें व द्रुपदाकडून पुत्रकामेष्टिनामक यज्ञ करविला. तेव्हां यज्ञकुंडांतून एक पुत्र व एक कन्य उत्पन्न झाली. पुत्राचें नांव धृष्टद्युम्न व कन्येचें नांव कृष्णा असें ठेविलें. सांप्रत तिचें स्वयंवर आहे." कृष्णा ही द्रौपदी यानांवानें प्रसिद्ध आहे.

पांडव जेथें होते तेथें वासार्थ एक विप्र हित ॥
ग्राचे तेजस्वी आला किरण जसा नीरजीं रविप्रहित ॥१

१ कमळावर. २ सूर्यानें पाठविलेला.

तो सांगे द्रुपदमखं- प्रभवा कृष्णा अयोनिजा कन्या ॥
तीचा स्वयंवरोत्सव, न कळे कोणा वरील ती धन्या ॥२॥
पांडुसुत तिची पुसती जैसे अनभिज्ञजन कथा नमुनी ॥
होय श्रोतृश्रोत्रं- क्षुधिताऽर्भकतृप्तिजनक थान मुनी ॥ ३॥
कथिली द्रोण-द्रुपद- द्वेप-कथा परिभवान्त आधींची ॥
जी त्या पांचाळाची झाली उत्पत्तिभूमि आधींची ॥४॥
मग विप्रें ऐकविली पुढिल कथा ती असी, स्व अहितातें
मारीसा सुत व्हाया शोधी मुनितें तपस्वि-महितातें ॥५॥
उपयाजाख्य-मुनीतें सेवी बहु, काम तो पुसे आर्य ॥
द्रुपद तयाला सांगे जें होतें योजिलें मनीं कार्य ॥ ६ ॥
अर्बुद गाई देइन तुज; दे द्रोणान्त-हेतु सुत मातें ॥
नाशी मद्व्यसनातें जैसा नाशी विभावसु तमातें ॥ ७ ॥
मान्य करी न महात्मा परि नृप जोडोन हात दास्यातें
विधुतें चकोरसा तो ह्मणे "वरामृत वदा" नदास्यातें॥८॥
उपयाज ह्मणे प्रार्थी मद्भ्राता ज्येष्ठ याज- नामा जी ॥
इच्छा ती सांग तया तो परम समर्थ या जनांमाजी ॥९॥
कार्य करील तुझें, जा आहे ज्ञाता, परंतु लोभी तो ॥
हूं न ह्मणेल इतर जन पापापासूनि थोर जो भीतो॥१०

१ द्रुपदाच्या यज्ञापासून जन्म जिचें ती. २ शुक्रशोणितसंयोगानें उत्पन्न न झालेली. ३ अज्ञानी मनुष्य. ४ श्रोत्याचे कर्ण हेंच क्षुधित बालक त्यांची तृप्ति करणारे. ५ पराभवापर्यंत. ६ चितेची. ७ आपला शत्रु द्रोण त्यास. ८ तपस्विजनांस मान्य अशा ऋषीला. ९ दशकोटि. १० द्रोणाच्या नाशास कारण. ११ सूर्य.

ह्मणसील कसा लोभी तरि आचरणावरूनि वळखावें ॥
भक्षी विजनींही जें स्थळ-शुचिता न कळतां न फळ खावें
उपयाजमतें प्रार्थी पुत्रार्थी भूप हा तया, जाला ॥
धनलोभांकं[1] असे परि जोडी द्विजराजे[2] हात याजाला१२
याज द्रुपद-मनोरथ परिपूर्ण करावया नयज्ञात्या[3] ॥
अनुजा घेवोनि करी जो देता पुत्र-दानयज्ञा त्या ॥१३॥
हवनान्तीं याज ह्मणे ये राज्ञी, क्षिप्र घे वरा[4] हवितें ॥
होइल मिथुन तुज असें कीं जें शत- पुत्र-मद न राहवितें
राज्ञी ह्मणे मुने मी पुण्य-हवि-प्राशना नसें उचिता ॥
तांतड कां, बा थांबा, मलिना[5] आहें, घडो मला शुचिता
याज ह्मणे, देवि, रहा, किंवा जा, न प्रयोग राहेल ॥
घन-बिंदु चातकीच्या काय विलंबें विलंब साहेल ॥१६॥
देवीच्या आत्म-रजो- दोपें जेव्हां स्वभाग राहविला ॥
याज शिखिमुखीं[7] होमी संतति-पीयूष-सागरा[8] हविला १७
कवच-किरीट-शर-धनु- श्चर्मा[9]ऽसिधरा विभावसु[10] कुमारा॥
प्रसवे, वेदीहि महा- कन्यारत्ना स्वभाव- सुकुमारा॥१८
कन्यारत्न जसें क्षिति जनकाला[11] व्हावया सुख निवेदी[12]
तैसेंचि द्रुपदाला भाग्यें होऊनियां सुखेंनि वेदी ॥ १९ ॥
होय नभोवाणी कीं हे सर्वस्त्रीश्वरी सुसत्कार्या[13] ॥

---

१ धनलोभाचा कलंक. २ चंद्र, ब्राह्मणश्रेष्ठ. ३ नीति जाणाऱ्याला. ४ उत्तम, पवित्र. ५ हवनास योग्य अशा घृताला. ६ ऋतुमति. ७ अग्निमुखांत. ८ संततिरूप अमृताचा सागर. ९ चर्म-ढाल. १० अग्नि. ११ जनकराजाला. १२ अर्पण करी. १३ उतम खाण.

अवतरली देवांच्या सिद्धीप्रति न्यावयासि सत्कार्या २०
भय जानकी-निमित्तें झालें रात्रिंचरा जसें होतें ॥
एतन्निमित्त साध्वस स-नृप-जनां कौरवां तसें होतें॥२१॥
ऐसें श्रवण करुनि नर- राजहि याजहि सहाप्त-जन नाचे
गाणार सुरहि झाले दिव्य-कुमारी-कुमार- जननांचे २२
राज्ञी ह्मणे मुने, हे कन्या हा सुतहि कल्पनग, मोहें ॥
माता जाणोत मला, हविराहुति माय, यांसि न गमो हें
धृष्टद्युम्न असें त्या पुत्राचें नाम अर्थ साधूनीं ॥
कृष्णा हें कन्येचें केलें अभिधान सर्व-साधूंनीं ॥ २४ ॥
याजाच्या मंत्र-वळें त्यांला वाटे खरीच जननी ती ॥
मोह-मदा जरि तरी त्या मुनिची गाति साधुजन नीती ॥
द्रोण तयासहि पढवी जरि झाला स्वनिधनां असें कळलें
कीं भावि यश न मळलें यत्नशतेंही कधीं नसे टळलें२६
जें नमिळालें अन्या तिळमात्रहि वेचितांहि कायशतें ॥
भृत्यंजिता अजिता, कीं लाभे त्या सुज्ञ-नायका यश तें

१ आप्तजनासह. २ जन्माचे. ३ कल्पवृक्ष. ४ यज्ञद्रव्याची आहुति. ५ बल, धैर्यशालिता, पराक्रम व उत्कृष्ट जन्म ह्या गुणांनीं संपन्न असल्यामुळें धृष्टद्युम्न असें नांव ठेविलें. ६ वर्णानें काळी असल्यामुळें कृष्णा हें नाम ठेविलें. ७ त्या दोघां मुलांना. ८ घृताची आहुति. ९ आपल्या नाशाला. १० यश न मळलें व (निधन ) यत्नशतेंही टळलें नसे असें भावी. ११ शंभर देहांनीं १२ दासांनीं जिंकिलेल्या अजितास ह्म० ईश्वरास.

# अध्याय ३२ वा.

## सारांश.

व्यास पांडवांस भेटले. ते ह्मणाले "एक ऋषिकन्या तप करीत होती. तिला शंकर प्रसन्न झाले. तिनें 'आपणास पति दे' असें पांच वेळ मागितलें. शंकर ह्मणाले पुढील जन्मीं तुला पांच नवरे मिळतील. तीच द्रौपदी होय. व ती तुमचीच स्त्री होणार. करितां तुह्मी जाऊन द्रुपदपुरांत राहावें." तें मान्य करून पांडव तिकडे जाण्यास निघाले. ते गंगातीरीं आले. तेथें अंगारपर्णनांवाचा गंधर्व स्त्रियांसह क्रीडा करीत होता. त्यानें पांडवांस पुढें येण्यास प्रतिबंध केला. तो पांडवांनीं ऐकिला नाहीं. त्या मुळें अर्जुनाचें व गंधर्वाचें भयंकर युद्ध झालें. त्यांत गंधर्व पराभव पावला. व धर्माला शरण आला. त्यानें आपलें पहिलें नांव सोडून चित्ररथ असें दुसरें नांव घेतलें. धर्मानें त्यास क्षमा केली. गंधर्वानें अर्जुनास चाक्षुषीविद्या देऊन त्याशीं सख्य केलें. अर्जुनानें गंधर्वास कांहीं प्रश्न केले. गंधर्वानें त्याचीं उत्तरें देऊन त्याचें समाधान केलें.

भेटोनि व्यास ह्मणे पौत्रांसि तुह्मां सुखांऽब्धिमज्जन[1] हो
तुमच्या सत्कीर्तीनें बहु लज्जित अन्य कीर्तिमज्जन[2] हो १.

१ सुखाच्या सागरांत स्नान. २ कीर्तिमान् जन.

ऐका सुकथा कोण्ही ऋषिकन्या तप करूनि अत्यर्थ ॥
शंभूप्रति आराधी बहु काळ तपोवनांत पर्सर्थ ॥ २ ॥
दर्शन देउनि हर वर माग असें वचन तो अगाध वदे ॥
ती पांचदां ह्मणे मज देवा वरदेश्वरा अगा धर्व दे॥ ३ ॥
शंभु ह्मणे पांच दिल्हे त्यांची जन्मांऽतरांत नवरी हो ॥
ती प्रार्थूनि ह्मणे, हें काय! सती बहुवरांसि न वरी, हो४
देव ह्मणे तूं पति दे ऐसें वदलीस पांचदां साचें ॥
करणें लागे प्रार्थित मज टाकुनि पेंचपांच दासाचें ॥ ५॥
वर दे वरदेश जिला, झाली ती द्रुपद- कन्यका, नातें
येतें तुह्मां कडे हें, जाऊं द्यावें न अन्य कानातें ॥ ६ ॥
द्रुपद-पुरींच रहा जा तेथ तुह्मांला वरील नवरी ती ॥
तोंवर हेचि असोंद्या बुध हो दावूंनकाचि नव रीती॥ ७॥
पृषत कुळ-नंदनींच्या व्हाल वरुनि त्या सभाग्य वल्लीला
बहु लाजतील तुमच्या लीलेला सर्व-भाग्यवल्लीला ॥ ८ ॥
मुनि गेल्यावरि चिंतिति त्यां, सेवी यत्पदांबुजा मा ते ॥
मग तेथूनि निघाले व्हाया पांचाळ-राज-जामाते ॥ ९ ॥
मार्गासि अहोरात्र क्रमितां रात्रौ धरूनि कोलीतें ॥
चाले धनंजय पुढें स्वपथोंच्या घनतमांस सोलीत॥ १०॥

१ पतीकारितां २ गंभीर. ३ हे वर देणाऱ्या जनांत श्रेष्ठा. ४ पनि. ५ वेडेवांकडे डावपेंच. ६ पृषत राजाचें कुळ हें नंदनवन त्यांतील ७ सर्व भाग्यवानांच्या कृति. ८ त्या श्रीकृष्णाला. ९ ज्याच्या पदकमलाला. १० लक्ष्मी. ११ जळतें लांकूड. १२ निबिड अंध-काराला.

त्या उल्मुकें[1] कुठारें घनवनसें निबिड तिमिर भंगे तें ॥
आले जों ते पांडव रात्रौ मार्ग क्रमूनि गंगेतें ॥ ११ ॥
कोपे गंधर्वांचा राजा अंगारपर्ण पाहूनीं ॥
दार्पूनि[2] ह्मणे, वांचा, मागें परतोनि दूर राहूनी ॥ १२ ॥
इच्छित असाल व्हाया जरि खगपंति-गृह-बिलेशयासम[3] या
नाहीं लंघीत कधीं जे मुनिवर तेहि लेश या समयीं १३ ॥
गंधर्व-यक्ष-राक्षस- भाग निशा, नरविभाग दिन, याला
वेद प्रमाण, रक्षिति बुध मर्यादा धरूनि विनयाला[4] ॥१४॥
गंधर्व-राज मी या करिती क्रीडा जळांत मज्जाया[5] ॥
बालिश हो येतां कां प्राण-व्यसनाऽब्धि[6]-माजि मज्जायां[7]
जिष्णु ह्मणे रे मंदा गंगा-स्नानासि नियम काळाचा ॥
कोण करील स्वांबाऽभिगमीं[8] उत्साहभंग बाळाचा ॥ १६ ॥
रात्रौ थान न प्यावें प्यावें, दिवसाचि, जो असें वदता ॥
त्यालागिं पशुत्वाची साची साजे सुधीमतें[9] पदतां[10] ॥१७॥
हो दूर मार्ग सोडुनि; रविचा तम होतसे जसें दूर ॥
गृध्र नव्हेचि अरुणसख आनखशिख[11] विखरितांहि सेंदूर १८
गंधर्वराज कोपें सोडी शर जे शिखीच[12] तिखटपणें ॥
दाविति तें जें भेकीं दाखविति क्षुधितउग्रविख[13] टपणें[14] १९॥

१ कोलितानें. २ दर्डावून. ३ गरुडाच्या गृहांत गेलेल्या सर्पाप्रमाणें. ४ नियमाला. ५ माझ्या स्त्रिया. ६ प्राणसंकटाच्या समुद्रांत. ७ बुडण्या करितां. ८ आईकडे जाण्यास. ९ ज्ञात्याच्या तानें. १० पद-स्थान. ११ नखापासून शेंडीपर्यंत. १२ अग्निच. १३ भयंकर विष ज्यांचें ते सर्प. १४ लक्ष्य लावून जपत बसणें.

खंडी शरांसि अर्जुन लीलेनें फिरवुनी अलातातें[1] ॥
धरि मोहुनि अग्न्यस्त्रें; नकुळ ह्मणे जिंकिला भला तातें॥
केशीं धरूनि त्यातें वोढुनि धर्मासमीप जों आणी ॥
पत्यऽभया[2]ऽर्थ प्रार्थी जोडुनि कुंभीनसी[3] सती पाणी ॥२१
धर्म ह्मणे हे याची मज ह्मणत्ये नमुनि वायको पावें ॥
सोडीं, सिंहें शशकीं, मशकीं गरुडेंहि, काय कोपावें२२
जिष्णु ह्मणे गंधर्वा, देतो तुज अभय आर्य; जा, वांचें ॥
नसरो त्वदायु, न सरे जेंवि विवाहांत कार्य जावांचें[4]२३
गंधर्व ह्मणे त्याजिलें म्यां निज अंगारपर्ण हें नाम ॥
चित्ररथ ह्मणा, मज तूं मान्य तसा, जेंवि भार्गवा[5] राम[6]
मी चाक्षुषी[7] स्वविद्या देतों घ्या दिव्य पांचशत वाजी॥
श्रीपद्म[8]हो तुह्मीं निज सख्यरसीं हा द्विरेफ[9] तरवां[10] जी२५
घेउनि फळाद्युपायन[11] हर्षवितो तात पदनता[12]ऽपत्या ॥
तैसें करीं, ह्मणो हूं मात्र तुझें दानि[13] वदन, तापत्या[14], ॥२६
जिष्णु ह्मणे सख्य असो, माझें मज हूं ह्मणों नदे शील

१ कोलिताला. २ पतीला अभय मिळण्याकरितां. ३ ही गंधर्वाची स्त्री. ४ बंधुस्त्रिया परस्पर जावा होत. ५ परशुरामास. ६ दाशरथिराम. ७ त्रिभुवनांतील कोणतीही वस्तु, आपल्या नेत्रानें ज्या प्रकारची पाहूं इच्छितो तशी पाहतो ह्मणून त्या विद्येला "चाक्षुषीविद्या" ह्मणतात. "यच्चक्षुषा द्रष्टुमिच्छेत्त्रिषुलोकेषुकिंचन। तत्पश्येद्यादृशंचेच्छेत्तादृशंद्रष्टुमर्हति॥" ८ लक्ष्मीचें विलास मंदिर जें कमल तद्रूप. ९ भ्रमर. १० तरावयास लावा. ११ फळें इ०चा नजराणा. १२ पदाचे ठायीं नम्र झालेल्या मुलाला. १३ दानाविषयीं. १४ तपतीच्या कुळांत उत्पन्न झालेला.

अस्त्रविनिमयें घेऊं विद्या; जरि हूं म्हणोन देशील ॥ २७
पुसतों तेंहि वद खरें आह्मी कवण्या गुणें उणे गमलों
धर्षण कां त्वां केलें धर्मपथीं तों न लेशही भ्रमलों॥२८॥
भारत पौरव कौरव आह्मी तापत्य वद कसे वदतां ॥ ॥
उच्चारिलें सख्या हें तापस असें नवेंचि कीं पद तां ॥
चित्ररथ ह्मणे आश्रम- रहित अहां, एक हें तुह्मांत उणें॥
आणि पुरोहितहि नसे धर्षण केलें कळोनि याचि गुणें ॥
असतें पुरोहित-कवच लागों देतें न हा उपद्रव तें ॥
ब्राह्म-हिमें घन, अल्पें अहितोष्णें क्षात्र हें तुप द्रवतें३१॥
वाढो भुज-सागर-बळ- जळ, तुमचें वांछिलें पुरो,हित हो
शक्रें बृहस्पति तसा विजयार्थ बरा वरा पुरोहित, हो३२॥
वदलों तापत्य असें तें सत्यचि, तत्कथा तुह्मी परिसा ॥
तुमचा पूर्वज होता संवरण महायशा बळी हरिसा॥३३॥
साधु-मति-मक्षिकांला झाली स्थिति शुद्ध शर्करा ज्याची
भक्ति सदा वाखाणी निज भक्त जनांत अर्क राजाची ॥
अनुरूप वर मिळावा या कामें तीव्र जी करी तप ती ॥
अर्क ह्मणे संवरणा द्याया स्वसुता असे बरी तपती३५॥

---

१ अस्त्राच्या अदलाबदलीनें. २ प्रतिबंध. ३ त्वां. ४ गृहस्थाश्रमरहित. ५ क्षात्र ( क्षत्रियतेज ) हें तूप. तें ब्राह्म ( ब्राह्मणाचें तेज)हेंच हिम; त्याच्या योगानें घन होतें. व त्या हिमाचा आश्रय नसल्यास अल्पें अहितोष्णें. (शत्रुरूप उष्णतेनें ) तें तूप द्रवतें. ६ सिंहसा. ७ सूर्य.

मृगयेसि एकदा तो जाय मृगाऽनुसरणें, चुके कटका ॥
अश्वहि मरे गिरिवनीं हिंडे मार्ग भ्रमोनि एकटका ३६॥
त्या समयीं एकांतीं दर्शन दे त्या नृपासि ती तपती ॥
यत्सख्याऽर्थ सुर-सुता सांबशिवातें उपासिती तपती३७॥
भूप ह्मणे जन्मुनि जें कुळ केलें धन्य, सांग सुन्दरि तें ॥
मत्कर्णांनीं वृत्त- श्रवण-रस भरावया स्व उदर रितें॥ ३८
त्वन्माता जी, साजे रत्नाकर बन्धु आयताक्षि, तिला ॥
स्वर्ग-शताऽधिक महिमा आलाआतांचि आयता क्षितिला
नयन-द्वय भूरि-तृषर्त त्वद्वपु पीयूषवार्षि, सुतनो, हें ॥
हळहळतों बहु, कीं मी दश-शत-दृक् कश्यपर्षिसुत नोहें॥
विनवी असें, परि न ती उत्तर दे भानुजा, अदर्शन दे ॥
तो समय जसा त्याला ताप चकोरासि तोंवि दर्श न दे ॥
संवरणीं होय तिचा सीतेचा विरह तो जसा रामीं ॥
मांगों काय बहु असो कथितों तुज ती कथाचि सारी मी
नृप मूर्च्छित पडतां ती भेटोनि ह्मणे अहो पहा हे मी ॥
कोण कुशळ जन मणिला न ह्मणेल जडोनियां रहा हेमीं
मी तपनसुता तपती विनवा माझ्या मदर्थ जनकास ॥
तरती मनोरथातें निज-धर्माची धरोनि जन कास॥४४॥

---

१ त्या संवरणाच्या सख्याकरितां २ देवकन्या. ३ अंबा (पार्वती) तीसहित शंकराला. ४ तप करितात. ५ वृतांताचें श्रवण हाच रस. ६ विशाल नेत्र जिचे ती. ७ फार तृषाक्रांत. ८ अमृताचा वर्षाव करणारें. ९ सहस्र नेत्र ज्याला तो इंद्र. १० अमावास्या. ११ श्रेष्ठ. १२ सूर्यकन्या.

धर्मेंकरूनि भजतां होइल हे विषलताहि सोमलता ॥
त्यजितां धर्म-पथातें धरिते पीयूषवल्लि सोमलता ॥४५॥
गांधर्वें मजला भज ऐसें विनवी नृपाळ, परि तपती ॥
पितृसंकोचें गेली पडिला तीचा विलाप करित पती ४६
शोधीत सचिव आला झाला कश्मळ समस्त हरिता तें ॥
करुणा करी तयावरि जेंवि करावी स्वसूनुवरि तातें४७॥
सचिव ह्मणे रविलाचि प्रार्थी, दुसरा उपाय नकरावा ॥
करितां तसेंचि भेटे आपव सरतांचि दिवस अकरावा४८
ज्याचें तेज न तापद ज्या लोपविलें नसेचि चरमागें ॥
तो अपर अद्भुत तपन, नरपतिस ह्मणे अभीष्ट वर मागें॥
भेटोनि जेधवां त्या अभयवरातें मुनींद्र आपव दे ॥
यापरि संवरण तया प्रभुला कळवूनि आत्म ताप वदे ॥
आंगेंचि वारिला त्वां प्रणतार्त्तांचा न ताप वारविला ॥
यास्तव मदर्थ कन्या- रत्नातें माग, आपवा, रविला५१
कार्यार्थ व्योमपथें गेला हो तो रविप्रतिम हर्षी ॥
श्रीमान् वसिष्ठ भेटे दुसरा रविसा रविप्रति महर्षी ॥५२
सूर्य ह्मणे वद तुज जें व्हावें, देतों असंशय मुने, तें ॥

---

१ सोम ही एक वनस्पति आहे. यज्ञांत हिचा रस काढून पि-
तात. २ अमृतवल्ली. ३ सोमल हें एक विष आहे. ४ मूर्च्छा. ५ वसिष्ठ.
( आदि. प. अ० १३ आ० ५० पहा. ) ६ अस्ताचलानें. ७ नम्र
झालेला व पीडिलेला, त्याच्या. ८ आकाशमार्गानें.

ग्यां सन्मतितें पुरवुनि आळ सुखविलें तसें न यमुनेतें ॥
मुनि-तिलक ह्मणे झाली पावुनि धात्री अनर्यामा ज्यातें
तपती मागों आलों मी सा संवरणनाम-याज्यातें ॥९४॥
रवि आणवूनि हर्षें मुनि-हस्तीं दे तदैव तनयेतें ॥
नित्याराधित जें कां कामा वर देत दैवत न ये तें ॥९५॥
गुरुनें दिली जसी ती सद्विद्या कीं सदोषधी रमणी ॥
तीनें सुखमय केला जो होता तो सदोषं धीर-मणी ॥९६
पावोनि निवे तीतें तो नृप रोगी जसा नव-सुधेतें ॥
भुलला तिलाचि राजा द्वादश वर्षें भजे न वसुधेतें ॥९७
तपतीस पुत्र झाला कुरु, तद्वंशीं तुह्मी ह्मणोनि असें ॥
तापत्यनाम पौरव कौरव इत्यादि वंशनाम जसें ॥ ९८ ॥
जिष्णु वसिष्ठमुनीचा महिमा गन्धर्वपतिमुखें परिसे ॥
ज्याचे वर्णनवर्ण त्रासद दुरितांसि करिकुळां हरिसे ॥९९

# अध्याय ३३ वा.

## सारांश.

कान्यकुब्ज देशाचा राजा विश्वामित्र ह्यानें वसिष्ठाची काम-

---

१ सज्जनांला. २ हीं सूर्याची कन्या आहे. ३ पृथ्वी. ४ सुखी. ५ यजमानाकरितां. ६ उत्तम वनस्पति. ७ पृथ्वीला. ८ वर्णनाचीं अक्षरें. ९ पातकांला. १० सकामें.

धेनु जबरीनें नेली. तेव्हां तिनें आपल्या शरीरापासून यवन उत्पन्न केले. व विश्वामित्राचा पराभव करविला. तेणें करून विश्वामित्र वसिष्ठाशीं द्वेष करूं लागला. कल्माषपाद राजानें वसिष्ठपुत्र शक्ति ह्यास चाबकानें मारिलें. शक्तीनें "राक्षस हो" असा राजास शाप दिला. विश्वामित्रानें किन्नर राक्षसास सांगितलें कीं, "तूं कल्माषपाद राजाच्या शरीरांत प्रवेश करून वसिष्ठाचे पुत्रांचा नाश कर." त्या वरून त्या राक्षसानें राजाच्या शरीरांत प्रवेश केला. कल्माषपादराजानें एका ब्राह्मणास नरमांसभोजन दिलें. त्यामुळें ब्राह्मणानें त्यास " तूं राक्षस होऊन नरमांस भक्षण कर" असा शाप दिला.

पूर्वोक्त दोन शाप, शरीरांतील राक्षस, व विश्वामित्राची मसलत ह्या चार गोष्टी एकत्र झाल्या. त्यामुळें राजानें वसिष्ठाचे शंभर पुत्र मारिले. त्यामुळें वसिष्ठास शोक झाला. शक्तीची स्त्री गरोदर होती तिला पुढें पराशर झाला. त्यामुळें त्याचा शोक कमी झाला. पुढें कल्माषपादराजा त्यास ही मारण्यास आला. तेव्हां वसिष्ठानें राजावर मन्त्रोदक शिंपून त्यास शापमुक्त केलें.पराशर,राजाचा नाश करणार होता. पण वसिष्ठानें त्यास उपदेश करून शांत केलें.

**पार्थ म्हणे तो कोण ब्रह्मर्षि असे मनोरमहिम्यां तें ॥**
**तद्यश नसे परिसिलें सांग सख्या तूं तदीय महिम्यातें १**

---

१ ब्राह्मण जो ऋषि झाला तो. २ त्या ब्रह्मर्षीच्या.

गंधर्व ह्मणे होता कुशिक[१]तनुज गाधि कान्यकुब्ज-पति ॥
तत्सुत विश्वामित्र प्रभु, यत्सेवेसिं[२] नृप सदा जपती ॥ २॥
सबळसचिव[३] तो भूपति मृगया करितां वनीं बहु श्रमला॥
दैवें वसिष्ठमुनिचें पुण्याश्रम-पद विलोकितां रमला ॥३॥
स्व-पदं-नत-गाधिजातें[४] सत्कारुनि मुनि ह्मणे अगा राया ॥
जावें न क्षुधितें त्वां येउनियां आमुच्या अगारा[५] या ॥४॥
वाल्मीकिच्या जन जसा तृप्तिसि पावे कुळासकट कवनीं[६]
मुनिच्या उटजीं तैसा तो गाधिज भूपही सकटक वनीं ५
नृपति ह्मणे कोठुनि हें आलें साहित्य जेवणा रानीं ॥
अस्मद्गृहींहि न कधीं वरिली हे तृप्ति जेवणारांनीं ॥ ६ ॥
जें न नृपप्रासादें[७] तें मुनिच्या भुक्तिसुख[८] दिलें उटजें[९] ॥
हें मोठें नवल अहो लाजविला पारिजात[१०] कीं कुटजें[११] ॥ ७
वल्कलरुद्राक्ष-धर[१२] ब्राह्मण अकृताऽन्ययत्न[१३] हा रानीं ॥
बळ पूजिलें कमें हो बहुमूल्यदुकूल-रत्न-हारांनीं[१४] ॥ ८ ॥
करितां शोध कळे कीं उटजीं सुर-धेनु-नंदिनी आहे ॥
पाहे तीस नृप ह्मणे मग मुनिला गाय मागतों द्या हे ९ ॥
अर्बुद गाई देतों अथवा देतों स्वराज्य भोगाया ॥

---

१ कुशिकराजाचा पुत्र. २ ज्या विश्वामित्राच्या सेवेला. ३ सैन्य व प्रधान यांसह. ४ आपल्या पदीं नम्र झालेल्या विश्वामित्राला. ५ गृहाला. ६ कवितेमध्यें. (रामायणांत.) ७ राजवाड्यानें. ८ भोजनाचें सुख. ९ पर्णशालेनें. १० कल्पवृक्ष. ११ कुड्याच्या झाडानें. १२ झाडांच्या साली व रुद्राक्ष धारण करणारा. १३ (वेदपठनावांचून) अन्य यत्न ह्म० उद्योग न करणारा. १४ फार किमतीच्या रेशमी वस्त्रांनीं व रत्नांच्या हारांनीं.

दे गाय, काय विनिमय[1] हा भवदर्थोन[2], मान्य हो गा या॥ १

मुनिवर ह्मणे नृपा हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे ॥
या धेनु-बळें माझा हा आश्रम[3]धर्म सांग[4] संपादे ॥ ११ ॥
कोण ज्ञाता राज्य- स्वीकार करील आधि[5] जामाजी ॥
मागों नको, न देया[6] हेयां[7] हे धेनु गाधिजा माजी ॥ १२
विश्वामित्र ह्मणे मी क्षत्रिय, आधार[8] जाण तेजाचा[9] ॥
आज्ञामानसभंग[10] न करिती भद्रेच्छ[11] जाणते जाचा ॥ १३
स्वाध्यायें[12] तुझें बळ, तूं ब्राह्मण, कैंचें असह्य[13] तेज तुला
पिप्पलजत्व[14] सम असो दहनीं तेजास्विता न ते जतुलां[15] ॥
मानधन[16] प्रभु मी, जें वदलों कर्तव्य, तें करीन खरें ॥
ऐसा कोण प्राणी ज्यातें नकरील वश हरी नखरें[17] ॥१५॥
भगवान् वदे बळी तूं तुझिया चतुरंग[18] सैन्य सांगातें[19] ॥
तुज कर्तव्य असे जें सिद्ध न करिसी अभीष्ट[20] कां गा तें ॥
कौशिक अनुगांसि[21] ह्मणे सोडा हो धेनु ही चला हाका ॥
हा काय रत्नभोक्ता मारू अनुताप पावुनी हाकां ॥

---

१ एका वस्तूबद्दल दिलेली दुसरी वस्तु. २ भवत्-अर्थ-ऊन-तुझ्या वस्तूहून (गाईहून) कमी. ३ गृहस्थाश्रमांतील कर्तव्य. ४ संपूर्ण. ५ चिंता. ६ देण्याजोगी. ७ टाकण्याजोगी. ८ आश्रय. ९ पराक्रमाचा. १० आज्ञा व मर्जी मोडणें. ११ कल्याण इच्छिणारे. १२ ईश्वरप्रीत्यर्थ वेदपठन करणें. १३ न सोसणारें ह्म० जर्जर करणारें. १४ पिंपळापासून होण्याचा गुण. १५ लाखेला. १६ मान हेंच धन(प्रियवस्तु)ज्याची तो. १७ नखानें. १८ चतुर- अंग ह्म० चार अंगें(हत्ती, घोडे, रथ, पायदळ)ज्याचीं तें. १९ बरोबर. २० इच्छिलेली गोष्ट. २१ सेवकांस.

दंडें ताडुनि नेतां फोडी ती धेनु फार हंबरडे ॥
तेव्हां आश्रमवासी द्विजमृगवनदेवताकदंब रडे ॥ १८ ॥
नेतां बळेंचि धांवत येउनि ती मुनिपुढें उभी राहे ॥
आणूनि लोचनीं जळ बहुदीनत्वें मुखाकडे पाहे ॥ १९ ॥
धेनु ह्मणे स्वामी, त्वां पालन केलें, करी न बाप तसें ॥
कां मज उपेक्षिलें हो मी खळ दंडें उदंड तापतसें ॥ २० ॥
साधु ह्मणे मज ह्रदयीं शत तुज बाहेर हे कशा लागे ॥
मी ब्राह्मण क्षमावान्, माते, रडतेस तूं कशाला गे ॥ २१ ॥
क्षात्रियतेज, असें जें तुजला पीडितें कशापातें ॥
मत्तेज क्षांति, मला ह्मणति! अहाहा, न ओक शापातें २४ ॥
मन्मतिदरींत न शिरे कोपमतंगज, विवेकहरि जागे ॥
म्यां न त्यजितां नेतो भूप बळें, तुज रुचेल तरि जागे ३
गाय ह्मणे भगवंता आज्ञा नसतां तुझी न मद्धरणीं ॥
काळाहि वळी, किती हा, न तृणबळें वह्नि होय बंद्ध रणीं
विप्र ह्मणे नेला कीं दृढ बद्ध करूनि वत्स दाव्यानें ॥
स्वबळें नृपें मदाश्रम, देह जसा व्यापिला सदा व्यानें २५
शक्य असेल तरि रहा ऐसें मुनि वोलतांचि ती क्षोभे ॥

१ पक्षी, पशु व वनदेवता ह्यांचा समूह. २ चाबुक. तुझ्या पाठीवर एक चाबूक बसला ह्म० माझ्या ह्रदयांत शंभर बसतात. ३ क्षमा करणें हाच ब्राह्मणाचा धर्म होय. ह्मणून मी क्षमाशील झालों. ४ चाबकाच्या प्रहारानें. ५ दुसऱ्यानें पीडा केली असतां सहन करणें. ६ माझी मति हीच गुहा. तींत ७कोप हाच मतंगज ह्म० हत्ती. ८ विचार हाच सिंह. ९ मत, हरण. ह्म० मला नेण्यास. १० सर्वशरीरव्यापी वायु.

ग्रीष्मगममध्याह्नाऽर्क- प्रतिम तिचा देह तेधवां शोभे२६॥
धेनुमिषें त्या मुनिची सुतपस्यासिद्धि कोपली वाटे ॥
फाटे गाधिजबळतम त्या चपळेच्या धरूनियां वाटे२७॥
अंगापासुनि केले प्रकट तिनें म्लेच्छ यवन शबर शक ॥
बळ उडविलें तिहीं,खग- पतिपक्षांहीं जसें सहज मशक२८
जेंवि दिगंतामति ने तिमिरा तूळा रविप्रभा वात्या ॥
सेना तसी नृपबळा, निस्तुळें ह्मणती कवि प्रभावां त्या२
दशशतसहस्र पीडिति एकैका गाधिजाऽनुगा यवन ॥
गाय वन स्वर्गीहि तें, दावि पितां आपणांत गाय वनें ३०
पकडो लियो हकालो बे बिसवामितर भागे जावेगा ॥
यवन ह्मणति, दाखविती शब्दीं हरि करिवरांसि जा वेगा
मागें पाहों न दिलें तीं बारा कोश पळविलीं कटकें ॥
यश हारविलें तेथें किति शस्त्रें हार कुंडलें कटकें ॥३२॥
भूप ह्मणे जे नेणति गोब्राह्मण, तेज ते जन क्षेत्रीं ॥
कल्पिति, जसें न पाहुनि शिशु शशभृत्तेज तेज नक्षत्रीं३३
धिक् क्षत्रियतेजातें सार नसे नाश या पलालसमीं ॥

---

१ ग्रीष्मऋतूंतील दुपारच्या सूर्यासारखा. २ धेनूच्या रूपानें. ३ विश्वामित्राचें सैन्य हाच अंधकार. ४ विजेच्या. ५ पक्ष्यांचा नायक गरुड. त्याच्या पंखांनीं. ६ चिलट. ७ कापसाला. ८वावटळ. ९ अनुपम. १० सामर्थ्याला. ११वन ' उदक' पितां तें आपणांत गाय दावि ह्म० विश्वामित्राच्या लोकांस पाण्यांत सुद्धां गाय दिसू लागली. १२ विश्वामित्र. १३ पळून जाईल. १४ आवेशाला. १५ क्षत्रियांचे ठायीं. १६ चन्द्राचें तेज. १७ कडबा.

येणेंचि जाहलों हत[1]- काम पराभूत पापलालस[2] मी ३४ ॥
क्षत्रबळ नाव फुटकी, जें ब्राह्मणतेज तेंचि नव नौका ॥
बुडतों न अन्यथा मी तरता व्यसनांत तोहि[3] न वनौका[4] ३

प्राज्य[5]हि राज्य हित नव्हे, तप साधावें; तयांत सर्वहि तें ॥
तप न करावें कोण्या प्रभुनें विनिमग्न[6] ज्यांत सर्व हितें ३६

निश्चय करूनि राज्य- श्री सोडुनि सर्व ताप साहूनी ॥
होमुनि[7] तपोनळीं[8] वपु होय अधिक सर्व तापसांहूनी[9] ॥ ३७ ॥

सिद्धि ह्मणति पति वरिले व्यर्थ तुह्मीं बहु तपोनि, धिक् क्षणदे[10]
धिक् स्वाहे[11], धिक् पद्मिनि[12], सुख न, जसें हा तपोनिधि क्षण दे

ब्रह्मर्षिता वरी त्या, पतिस म्हणे तूंहि अच्छ[13] विप्र खरा ॥
रवि भावी, कीं भुलली निजरुचि[14], अन्यत्र न च्छवि[15] प्रखरा

झाला नृपति वसिष्ठ- स्पर्धेनें विप्र, तें असो आतां ॥
विस्तर भय दे, नाहीं तरि काळाचेंहि भय नसे गातां ४०

त्यां[16] मुनिनें सिद्धिबळें मोहुनि सौदास[17]-नृपतिच्या मतितें ॥
केला वसिष्ठ सुतशत[18]- शोकार्त, किजे जसें महापतितें ४१

ज्येष्ठ सुत वसिष्ठाचा शक्ति मुनि, पथीं वनांत आढळला ॥
कल्माषपाद मागे पथ, परि कवि तो न सर्वथा ढळला ४२

---

१ ज्याचा आशाभंग झाला तो. २ नीचकर्म करण्याविषयीं उत्सुक. ३ तो वसिष्ठ. ४ वन—ओक. वन हेंच वसतिस्थान ज्याचें तो. ५ पुष्कळ. ६ गढून गेलेलीं. ७ होम करून. ८ तपोरूप अग्नींत. ९ तपस्व्यांहून. १० हे रात्री. ११ हे अग्निस्त्रिये. १२ हे सूर्यस्त्रिये. १३ पवित्र. १४ आपली कांति. १५ कांति. १६ विश्वामित्रानें. १७ ऋतुपर्णपुत्र सुदास. सुदास पुत्र कल्माषपाद. १८ शंभर पुत्रांच्या शोकानें पीडित.

संकुचित पथ नसोडी ह्मणुनि नृपें ताडिला कशापातें ॥
धर्मघ्ना, राक्षस हो, दे मुनि या उग्रपाक शापातें ॥४३॥
भेटे राक्षस मंत्री गाधिसुताज्ञेंकरूनि शापाला ॥
ग्रासी मोह नृपाला, राहु महाग्रह जसा निशापाला ॥४४॥
मृगमांसभोजनार्थी त्यावरि भेटे द्विज क्षमापतिला ॥
मान्य करुनि तें विसरे कीं शापें मोह जाहला मतिला ४
रात्रौ स्मरलें, सरलें, होतें यद्यपि उदंड परि पळ तें॥
दैव प्रसन्न नसतां वस्तु सकल भें दिल्याचि परि पळतें ४६
नरमांस द्या ह्मणे नृप कोठुनि आणूं तदर्थ हरिणा मी ॥
नुमजे मोहें कीं हें कर्म मला तापवील परिणामीं ॥४७॥
करितां तसेंचि सूदें, उमजे, नुमजेल काय हो मुनितें ॥
पेटे जें अतिशुष्क क्रोधें ज्वलनांत काय होमुनि तें ॥४८॥
विप्र ह्मणे हा दुष्टा ब्राह्मण नर-मांस काय रे खाती ॥
श्रुति-कृत-मर्यादेची जी पुसली आजि काय रेखा ती ४९
मीं विप्र, नव्हें राक्षस, राज्यमदांधें न नीट वळखावें ॥
हें त्वांचि आजिपासुनि राक्षस होउनि मनुष्यपळ खावें
हे दोन शाप, राक्षस, गाधिज, एकामतेंचि गुरु चवघे ॥

---

१ अरुंद मार्ग २ चाबकाच्या प्रहारानें. ३ भयंकर परिणाम ज्याचा अशा शापाला. ४ किन्नरनामक राक्षस त्या शापाला मंत्रीह्म० मसलत देणारा भेटला. ५ गाधिराजाचा पुत्र विश्वामित्र, त्याच्या आज्ञेनें. ६ निशाप (रात्रिपति) चन्द्र, त्याला. ७ मांस. ८ आचाऱ्यानें. ९ एकाच मताचे राजास चार उपदेशक झाले.

पढवुनि मित्रसह-करें मारविती श्रीवसिष्ठ-सुत अवघे ५१॥
सेवी द्विज-रक्त-रसा नृपति, वसिष्ठहि नव्याचि शोकरसा॥
सेवन करवी भरवी विधि त्याचा शापभूत तो करसा५२
होय विफळयत्न मुनि स्व-तनु-त्यागीं धरूनि कामातें ॥
मेर्वग्न्यर्थींस ह्मणे, ह्मणतां कांहो मरूं नका मातें॥५३॥
बद्ध करूनि कर चरण बुडतां तोडी महानदी पाशा ॥
कोणा नको सुतेजा काय पतंगीं लहान दीपाशा ॥५४॥
तोडी पाश नबुडवी जी सकरुणमानसा धुनी तीस॥
टेउनि नाम विपाशा गाति सबहुमान साधु नीतीस ५५
जेंसा यत्न नसोडी, जरि धन नमिळे तथापि धनकामी॥
निर्धनार्थी मुनिहि ह्मणे यत्नीं फळ, आवरूं स्वमन कां मी
शक्ति-स्त्री न विसंबे श्वशुरासि, वनीं फिरे तया मागं ॥
गुरुसेवनें भुलविलें मन कुळजाचें तसें न हेमांगें ॥ ५७ ॥
भारे एकदा श्रुतिमुखें तद्गर्भाचेंहि कानना तुंड ॥
तें कुल-लय-शोकतमीं धरिल हिमकरत्व कां न नातुंड ५८
ब्रह्मर्षि पुसे वत्से, शक्ति तसा वेद कोण गे ह्मणतो ॥
वाटे आलिंगावा कडकडुनि, मला दिसेचिना पण तो५९
ती साऽश्रु अदृश्यंती बोले जोडूनि हात मामाजी ॥

---

१ कल्माषपाद राजा. २ दैव. ३ तो राजा. ४ मेरु-अभि-अग्नि यांस. ५ नदी. ६ पाश तोडणारी. ७ धन इच्छिणारा. ८ मरणेच्छु. ९ वसिष्ठपुत्र शक्ति ह्याची स्त्री. १० मेरूनें. ११ वेद-घोषानें. १२ कुलनाशनिमित्त शोक हेंच तम, त्याविषयीं. १३ चन्द्रत्व. १४ ही शक्तीची स्त्री.

गर्भ मदुदरीं ह्मणतो मज घालायासि हा तमामाजी ६०
मुनि-पति ह्मणे अगा कुळ- तंतो, संतोषदान नातूंनीं ॥
नादिलें, असें अमृत तव गळतें संतोषदाननांतूनी ॥ ६१॥
ऐसें मद्व्यसनशमन कवण दयित सोयरा शिशो करिता॥
तव-वेद-ध्वनि-घटजें केला विष-तोय-राशि शोक रिता६२
सोडुनि मरणोद्यम शम- धन अनघ नलिन-भव-प्रभव परते
चित्तीं ह्मणे अकृपमे गमले मेवादि, सदयतम पर ते ६३॥
तों मार्गीं भक्षाया मुनिसह तत्कुलकरांहि उर्वरितां ॥
तों भूप ये सुरुत्त्व त्यजुनि विधिबळें धरूनि उर्वरितां॥६४
गुरुशाप-दुरिंधन-हत- तेजा राजार्षि, वाह्नि न्व याज्य ॥
व्हाया पुन्हा प्रकाशित सिंची मुनि मंत्र-पूत तोयाज्य६५
मलिन कुगंधि कुरूप क्रूर कठिन शुष्क राक्षसत्वानें ॥
तो नृप केला स्मरसा सहसा त्या पुष्करांक्ष-सत्वानें ६६

---

१ मोहांत. २ सन्तोषदायक मुखांतून. ३ माझ्या दुःखाची शांति. ४ तुझा वेदपठनाचा शब्द हाच अगस्ति, त्यानें. ५ मरणाचा उद्योग. ६ शांति हेंच धन (प्रियवस्तु) ज्याचें तो. ७ निष्पाप. ८ ब्रह्मदेवापासून प्रभव ह्म० उत्पत्ति ज्याची तो वसिष्ठ. ९ अतिदयाळु. १० त्याचा कुलकर ह्म० कुलवृद्धि करणारा पराशर, त्यास. ११ शेष राहिलेल्यास. १२ उरु—अरिता ह्म० महाशत्रुत्व. १३ गुरुशाप हेंच दुरिंधन ह्म. दुष्ट काष्ठ, त्यानें नष्ट झालें तेज ज्याचें तो. १४ यजमान. १५ मंत्रानें पवित्र. १६ उदकरूपी तूप. १७ पुष्कराक्ष ह्म० विष्णु, त्याप्रमाणें सत्व ह्म० धैर्य ज्याचें त्या वसिष्ठानें.

निजसत्कीर्ति तिलाही होऊं दे न वितथा, पिंशा पावे,॥
यद्यपि शापार्ह तिचे, न ह्मणे तो कवि तथापि शापावे ॥
तारुनि नृपासि, कुलकर पुत्रहि दे, न मुक्तासि मुनि वेची
तत्कीर्तिला नमी श्रीं शरद्दतुच्या लक्षवेळ पुनिवेची ६८
व्हावा अद्भुत जैसा प्रध्वस्त-तमःपराश रविस रवी ॥
मुनिला सुतशोक तसा होउनि शक्तिज पराशर विसरवी॥
तो आज्यालाचि ह्मणे तात, किजे अधिक काय हो तातें
खेद अदृश्यंतीतें दे, श्वशुरा तात ह्मणत होता तें ॥७०॥
ती एकदा ह्मणे, बा, ह्मणासि असेंचि पसरुनि आज्याला
ह्मणुनि तुझा निववावें तें कैचें ह्मणसि तात आज्याला७१
मामाजीस ह्मणसि, तें न ह्मण,ह्मण तयासि आर्य आजावा
आज्या बा न ह्मणावें, गहिंवर येतो तयासि माजा वा ७
राहु निशेच्या, माझ्या राक्षस, करि रोष नंदना,तिलकीं
काय वदावीं दावें गिळिला कल्पद्रु नंदनांतिल कीं ॥७३
ज्यांस ह्मणत होती कर जोडुनि विद्याकळासभा 'वो जी'
हरिस हरिणसें झाले नव्याण्णव त्या खळासि भावोजी
पितृ-घात-वृत्त कळतां सर्वा लोकांस दोष तो लावी ॥

१ पिशा-वेड्याला पावे ह्म० मिळविता झाला. ह्म० वसिष्ठास तो पिसा झालेला कल्माषपाद सांपडला पण वसिष्ठानें आपली कीर्ति व्यर्थ होऊं दिली नाहीं. २ कल्माषपादानें राक्षसीस्थितींत एका ब्राह्मणास मारून खाल्लें. ब्राह्मणस्त्रीनें "स्त्रीसंग करतांच मरशील" असा शाप दिला. म्हणून वसिष्ठानें राजाच्या स्त्रीला पुत्र दिला. ३ प्रध्वस्त 'नाहींशी केली'तमानें, 'राहूनें' पक्षीं मोहानें,परा 'उतम' आशा ज्याची तो. ४ चन्द्र, पक्षीं कुंकू.

कीं शक्तोपेक्षकमति[1] ती अघकृन्मतिसवेंचि[2] तोलावी ७५॥
जैसें सुटों न द्यावें प्राण-क्षय-तत्परा[3] शराशि कवी ॥
ब्रह्मर्षि तसेंचि करी निज-शांति-कळा[4] पराशरा शिकवी
धरिति शिवेच्छु क्षत्रिय-जन जिंकाया परा शरालीला[5] ॥
संत क्षमेसि धरिती, तुज हेचि रुचो पराशरा, लीला७७
व्याघ्र-वृक-हरि-व्याळ-प्रभृतींचा जो समूह हानि-कर ॥
त्याहूनि काम-कोप- प्रमुखांचा निपट दुष्ट हा निकर ७८॥
बा, सादर अभयाच्या तापस दानींच; हानि करवि खरीं
धृतिलाधुळींत नेउनि ताप सदा नीच हानिकर विखरी
जी शीतागाधजळा[6] सरितां[7], शिरतां निवे करी[8] तींत ॥
निवतो प्रवेशतां जन सर्वहि तैसा विवेकरीतींत ॥ ८० ॥
नाशी स्व-सेवनें-करा[9], अन्यजनाही; ह्मणोन कोपानें ॥
बहु अहित[10] होय, तैसें अहित विषाच्या ह्मणों नको पानें[11]॥
भृगुकुळज[12] और्वमुनिही[13] पूर्वी ऐसाचि कोपला होता ॥
पितृवचनें परि टाकी स्व-क्रोधाग्नीस[14] सागरीं पोता[15] ८२

---

१ समर्थाची, उपेक्षा करणारी बुद्धि. २ पाप करणाऱ्यांच्या बुद्धीशीं. ३ प्राण घेण्यास सिद्ध झालेल्या बाणास. ४ आपली क्षांतिरूप कला. ५ शरांच्या पंक्तीला. ६ थंड व खोल पाणी जिचें ती. ७ नदी. ८ हस्ती. ९ आपलें सेवन करणाराला. १० अकल्याण. ११ प्राशनानें. १२ भृगूच्या वंशांत जन्मलेला. १३ ऊरू(मांडी)पासून उत्पन्न झाला तो और्व. १४ आपल्या क्रोधाग्नीस, हाच समुद्रांत वाडवाग्नि झाला. १५ चालला.

द्वे मज हें, लोकांचें भस्म क्रोधें करूं नको, पावें ॥
कथिला धरूनि हनु नय, अनुनय किति बा करूं न कोपावें
कोपें कुळज जरि, तमें तरि फुगवुनि गल्ल भानु गांठावा॥
महिमा क्षमारतांचा बहु, तो श्रीवल्लभानुगां ठावा ॥८४॥
वंदनशील ह्मणति त्या तापाकुळ नंदनाप्रति ज्ञाते ॥
सोडावी मद्वचनें बापा कुळनंदना प्रतिज्ञा ते ॥ ८५ ॥
लोकक्षयसंकल्प त्यागुनि ,सुखवुनि, मनांत आजोबा ॥
राक्षस-सत्र करी, कीं भाव्यजसुतसा सुरांत साजो बा॥८६
जें भस्मसात् पराशर करि मंत्रबळें पुलस्त्य-संततितें ॥
आले संरक्षाया क्रत्वत्रिपुलस्त्य-पुलह संत ततितें ॥ ८७ ॥
त्यासि पुलस्त्य ह्मणे बा तुज पाहुनि सर्व ताप हरपावे ॥
सद्यः साधुसमागम तेंवि न नाशूनि ताप हर पावे ८८ ॥
तेजः प्रमाण आत्मा, तत्वज्ञांस प्रमाण, न वय जनीं ॥
तें अद्भुत तेज तुझें दिसलें कोणास या न नव-यजनीं ९
हा आर्याहि न क्षांति क्षण दूर करून कोपला शांत ॥

१ प्रार्थना. २ कोपानें जर कुलीनाला जिंकिलें तर तम 'अंधकार' सूर्यास जिंकील. ३ क्षमेमध्यें निमग्न झालेल्यांचा. ४ लक्ष्मीपति विष्णु, त्याच्या सेवकांला. ५ आनंददायक शील(स्वभाव) ज्याचा तो. ६ दुःखानें व्यापिलेले जन. ७ भावी म्ह० पुढें होणारा जो अजसुत म्ह० अजराजाचा पुत्र दशरथ, त्या सारखा. ८ शक्तिऋषि. ९ भस्माच्या स्वाधीन. १० पुलस्त्याची सन्तति राक्षस. ११ क्रतु,अत्रि, पुलस्त्य, पुलह हे सृष्टिकर्त्या सप्तर्षीं पैकीं आहेत. १२ तत्काळ. १३ वासिष्ठ.

काळचि निमित्त करितो भलत्यास, करूं नको पलांश
पावे क्षमी सुकृत, सुख, यश, जें पावेचिना अमर्षी ॥
विधुतें लक्ष्म तसें हें अकृषपण नसो भवत्तशीं, ते ॥
साहे न कोप-वेगा जो, कीं जो न्मं ह्मणति हा! ज्ञाते॥
त्याची रुचेल शांतिस, ावरि तुज हें न कार्य सत्र, पहा
कामाची क्रोधाची तव व्हाया येणें न आर्य सत्रपं हा
चुकले, स्वहिता सद्वचनाच्या निर्वेचि तो पानें ॥
हित इतर न ध त, परि सद्वचनींच शांति-सोपानें९५
कवि रवि-रु प्रभुचरितें जिष्णु तो निवाला हो ॥
शक्तिज स मी सर्वहि जन पात्र या शिवाला हो९६
हो पानें त, ह्मणे आचार्यत्वेंकरूनि सौम्यातें ॥
गंधर्वो तीर्थी क्षिप्र वरा जा नमूनि धौम्यातें ॥९७॥
प्रेमें ह गुण जाणे, जे तत्पूर्वज मुनींद्र देवल ते ॥
पुसत ी ह्मणत्ये "न सुख स्पर्धेत बाइ देव-लते"९८

उ अश-अन्त. मांसभक्षकराक्षसांचा नाश. २ क्रोधाविष्ट
ज ४ तुझ्यासारख्या ऋषीला. ५ पद्धति. ६ करण्यास
त र- ज्ञ. ८ सूर्याप्रमाणें कांति ज्याची. ९ शुद्ध जन्म ज्या-
मलज्ज. ११ शांतीच्या पायऱ्या. १२ चित्ररथानें
प्रेमानें चरित. तेणें करून. १३त्याच्या पद्यांची जोडी;

द्रे मज हें, लोकांचें भस्म क्रोधें करूं नको, पावें ॥
कथिलाः धरूनि हनु नय, अनुनय किति बा करूं?न कोपावें
कोपें कुळज जरि, तमें तरि फुगवुनि गल्ल भानु गांठावा॥
महिमा क्षमारतांचा बहु, तो श्रीवल्लभानुगां ठावा ॥९४॥
नंदनशील ह्मणति त्या तापाकुळ नंदनामति ज्ञाते ॥
सोडावी मद्वचनें बापा कुळनंदना प्रतिज्ञा ते ॥ ८५ ॥
लोकक्षयसंकल्प त्यागुनि ,सुखवुनि, मनांत आजोबा ॥
राक्षस-सत्र करी, कीं भाव्यजसुतसा सुरांत साजो बा॥८६
जें भस्मसात् पराशर करि मंत्रबळें पुलस्त्य-संततितें ॥
आले संरक्षाया क्रत्वत्रिपुलस्त्य-पुलह संत तितें ॥ ८७ ॥
त्यासि पुलस्य ह्मणे बा तुज पाहुनि सर्व ताप हरपावे ॥
सद्यः साधुसमागम तेंवि न नाशूनि ताप हर पावे ८८ ॥
तेजः प्रमाण आत्मा, तत्वज्ञांस प्रमाण, न वय जनीं ॥
तें अद्भुत तेज तुझें दिसलें कोणास या न स्व-यजनीं ९
हा आर्याहि न क्षांति क्षण दूर करून कोपला शांत ॥

१ प्रार्थना. २ कोपानें जर कुलीनाला जिंकिलें तर तम 'अंधकार' सूर्यास जिंकील. ३ क्षमेमध्यें निमग्न झालेल्यांचा. ४ लक्ष्मीपति विष्णु, त्याच्या सेवकांला. ५ आनंददायक शील(स्वभाव) ज्याचा तो. ६ दुःखानें व्यापिलेले जन. ७ भावी म्ह० पुढें होणारा जो अजसुत म्ह० अजराजाचा पुत्र दशरथ, त्या सारखा. ८ शक्तिऋषि. ९ भस्माच्या स्वाधीन. १० पुलस्त्याची सन्तति राक्षस. ११ क्रतु,अत्रि, पुलस्त्य, पुलह हे सृष्टिकर्त्या सप्तर्षीं पैकीं आहेत. १२ तत्काळ. १३ वासिष्ठ.

काळचि निमित्त करितो भलत्यास, करूं नको पलांशांत ॥
पावे क्षमी सुकृत, सुख, यश, जें पावेंचिना अमर्षी तें ॥
विधुतें लक्ष्म तसें हें अकृपपण नसो भवत्सकर्षीतें ॥९१ ॥
साहे न कोप-वेगा जो, की. चो. कापरा शरास रणीं ॥
त्याची रुचेल शांतिस, कीं कीर्तिस कां पराशरा, सरणी ॥
कामाची क्रोधाची ज्यांहीं केली जयोनि आज्ञा, ते ॥
चुकले, स्वहिता मुकले, त्यांतें पाहोनि ह्मणति हा! ज्ञाते॥
हित इतर न धर्म शमसम, यावरि तुज हें न कार्य सत्र, पहा
कवि रवि-रुचि शुचि-भव तव न्हाया येणें न आर्य सत्रपं हा
शक्तिज सत्र पुरें करि, सद्वचनाच्या निवेचि तो पानें ॥
हो पानें सुखद अमृत, परि सद्वचनींच शांति-सोपानें९८
गंधर्वोक्त वसिष्ठ- प्रभुचरितें जिष्णु तो निवाला हो ॥
प्रेमें ह्मणे 'जसा मी सर्वहि जन पात्र या शिवाला हो'९६
पुसतां पुरोहित, ह्मणे आचार्यत्वेंकरूनि सौम्यातें ॥
उत्कोचनामतीर्थी क्षिप्र वरा जा नमूनि धौम्यातें ॥९७ ॥
ज..., तो गुण जाणे, जे तत्पूर्वज मुनींद्र देवल ते ॥
त... युगली ह्मणत्ये "न सुख स्पर्धेत बाइ देव-लते"९९

---

पल-अश-अन्त. मांसभक्षकराक्षसांचा नाश. २ क्रोधाविष्ट ... लंक. ४ तुझ्यासारख्या ऋषीला. ५ पद्धति. ६ करण्यास योग्य. ७ यज्ञ. ८ सूर्याप्रमाणें कांति ज्याची. ९ शुद्ध जन्म ज्याचा. १० सलज्ज. ११ शांतीच्या पायऱ्या. १२ चित्ररथानें ...लेलें वसिष्ठाचें चरित. तेणें करून. १३ त्याच्या पदांची जोडी.

घेउनि अग्न्यस्त्रातें ठेवुनि चित्तीं तदुक्त-मंत्रास ॥
धौम्याप्रति जातां, दे कुदशेसि पदोपदींहि संत्रास॥९९॥
तीर्थी स्वाऽनुज-सें जी होती तप करीत देवलता ॥
तीणें बहु लाजविली पांडुसुतांऽऽच्छत करूनि देवलता१.००
यत् ध्रुवमाश्रिततारक- मनलसमुरुभवपयोनिधौ स्यां तें ॥
हें यानपात्र वरिलें धर्मं ह्मणे पद धरूनि धौम्यातें ॥१०१

# अध्याय ३४ वा.

## सारांश.

पांडवांनीं धौम्यऋषि हा आपला गुरु केला. नंतर ते द्रुपद-पुरींत गेले. आणि तेथें ते एका कुंभाराच्या शाळेंत राहिले. भिक्षावृत्तीनें ते उदरनिर्वाह चालवीत. द्रुपदाच्या मतांत द्रौपदी अर्जुनासच द्यावी असें होतें. पांडव लाक्षागृहांत जळून गेले. असें त्यानें ऐकिलें होतें, तथापि ती गोष्ट त्यास खरी वाटली नं. [illegible]

१ आपला धाकटाभाऊ धौम्य याच्या रूपानें. २ देवलत. ३ उरुभवपयोनिधौ यत् अनलसं, ध्रुवं आश्रिततारकम्, ह्म० विशाल भवसमुद्रामध्यें जें आलस्यरहित होऊन निश्चयानें आश्रितांस तारणारें तें पद. ४ नौका.

घेउनि अग्न्यस्त्रातें ठेवुनि चित्तीं तदुक्त-मंत्रास ॥
धौम्याप्रति जातां, दे कुदशेसि पदोपदींहि संत्रास॥९९॥
तीर्थी स्वाऽनुज-सें जी होती तप करीत देवलता ॥
तीणें बहु लाजविली पांडुसुतांच्छत करुनि देवलता१००
यत् ध्रुवमाश्रिततारक- मनलसमुरुभवपयोनिधौ म्यां तें ॥
हें यानपात्र वरिलें धर्म ह्मणे पद धरुनि धौम्यातें ॥१०१

# अध्याय ३४ वा.

## सारांश.

पांडवांनीं धौम्यऋषि हा आपला गुरु केला. नंतर ते द्रुपद-पुरींत गेले. आणि तेथें ते एका कुंभाराच्या शाळेंत राहिले. भिक्षावृत्तीनें ते उदरनिर्वाह चालवीत. द्रुपदाच्या मतांत द्रौपदी अर्जुनासच द्यावी असें होतें. पांडव लाक्षागृहांत जळून गेले असें त्यानें ऐकिलें होतें, तथापि ती गोष्ट त्यास खरी वाटली नं. च भ पु

१ आपला धाकटाभाऊ धौम्य याच्या रूपानें. २ देवलत. ३ उरुभवपयोनिधौ यत् अनलसं, ध्रुवं आश्रिततारकम्, ह्म० विशाल भवसमुद्रामध्यें जें आलस्यरहित होऊन निश्चयानें आश्रितांस तारणारें तें पद. ४ नौका.

मग इष्टहेतु सिद्धीस जाण्यास त्यानें एक युक्ति काढिली. अंतराळीं अतित्वरेनें फिरणारें एक चक्र ठेविलें. त्या चक्रास खालच्या बाजूस एक सूक्ष्मच्छिद्र होतें. व शिवधनुष्याप्रमाणें प्रचंड असें एक धनुष्य आणून ठेविलें. जो कोणी हें धनुष्य सज्य करून पांच बाणांनीं तें लक्ष्य भेदील त्यास द्रौपदी द्यावयाची असें प्रसिद्ध केलें. लक्ष्यभेद अर्जुनावांचून इतराच्यानें होणार नाहीं अशी द्रुपदाची खात्री होती. स्वयंवरास हजारों राजे,तसेच देव, ऋषि, ब्राह्मण, यादवां सहित बलराम, कृष्ण व ब्राह्मणवेषधारी पांडव हे आले होते. लक्ष्यभेद कोणाच्याही हातून झाला नाहीं. शेवटीं अर्जुनानें लक्ष्य भेदिलें.द्रौपदीनें त्यास वरिलें. तेथें आलेल्या राजांस तें रुचलें नाहीं. ते युद्धास सिद्ध झाले. पण भीमार्जुनांनीं त्यांचा पराभव केला. मग द्रौपदीस घेऊन ते कुलालशाळेस आले. व ' आह्मीं आज अपूर्व भिक्षा आणिली आहे ' असें ते कुन्तीस ह्मणाले. कुन्ती न पाहतां ह्मणाली, "पांचही मिळून तिचें सेवन करा." मातेच्या त्या वचनावरून व व्यासाच्या पूर्वोक्त वचनावरून द्रौपदी पांचांची स्त्री झाली.

**गेले धन्य कराया पांडूचे नंदन द्रुपद-राजा ॥**
**तो गुरुहि जाय समुचित पसराया नंदनद्रु पदरा ज्या १॥**
**राजसुतांसि रहाया त्या द्रुपद- पुरीं कुलाल दे शाला ॥**
**कालगति पहा बुधहो बा एखादे भुलाल देशाला ॥ २ ॥**

---

१ नन्दनद्रु (कल्पवृक्ष) त्या (धौम्याला ) पदरा पसराया समुचित, तो गुरु जाय इ० २ कुम्भार.

मिरवायासि न उरला स्वमहत्त्वाचा कुला लव सतींत ॥
रत्नगृहोचित पृथ्वी- पति-सुत वसले कुलाल-वसतींत ३ ॥
सेवुनि भिक्षान्न सुखें रत होते देव-विप्र- भजनांत ॥
कोण्हीहि न ओळखिले, झाले दाटूनि विंप्रभ जनांत॥४
बहु, विप्र बहु क्षिति-पति, बहु मागधं, सूतं, बंदिजनं,आले
कृष्णास्वयंवरोत्सव- दर्शनभाग्येच्छु देवही झाले ॥ ५ ॥
वर-बुद्धि अर्जुनीं च स्थिर होती सर्वदा, परि पुरा जे ॥
आले ते आदरिले द्रुपदें, पहिले जरि स्व रिपु राजे ॥६॥
झालें जतु- गृह-दाह- श्रवण परि मना न साच वाटे तें
वांछितसिध्यर्थ धरी तो राजा युक्तिच्याच वाटेतें ॥ ७ ॥
करवी लक्ष्यं व्योमीं पार्थासचि शक्य भेद त्याचा कीं ॥
चल-चक्रतळीं भेदन- साधन तें सूक्ष्म रंध्र त्या चाकीं ८॥
शर पांच मात्र, धनुही त्र्यंबकं-कोदंड-मित्र कठिनपणें ॥
करवुनि ऐसें भिववी बहुतांच्याही मनास कठिन- पणें ९
घोषंविलें, कीं "चढवुनि धनुला पांचा शरांतलक्षानें ॥
भेदील जो कृती, त्या माझी कन्या वरील दक्षां"तें॥१०॥
सर्व मिळाले रंगीं विप्र-नृपांहीं सुमंच शोभविले ॥
रंगीं ते लोक तसे कमल-वनीं जेविं भृंग लोभविले॥११॥
बसले होते पांडव विप्रांच्या शिवमया समाजांत ॥
कोण न्हातील तदा- श्रित शांत दया सुधासमा जांत ॥

---

१ पृथ्वीला. २ तेजोहीन. ३ राजापुढें वंशवर्णन करणारे. ४ पुराणवक्ते. ५ स्तुतिपाठक. ६ निशाण. ७ शंकराच्या धनुष्याचें मित्र. ८ भयंकर प्रतिज्ञेनें. ९ प्रसिद्ध केलें. १० चतुराला.

रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली स्वसा[1] रमणी ॥
जाणों भुजगें प्रेक्षक- जन-नयन-मनोहर[2] स्व-सार[3] मणी ॥
तद्रूपें मोहे सुर- जनहि, धरिल धैर्य तो कसा रंग ॥
मूर्तिमती गीति[4] गमे ती, भुलले तेहि लोक-सारंग[5] ॥१४॥
वरिलें उमापण तिनें पाववुनी स्वच्छवि[6] प्रकाशाला ॥
तसि नसती तरि मिळते बहु सुज्ञ स्वच्छ विप्र काशाला[7]॥
कर वळविला अजें,[8] जें विष्णु-धृत-स्त्रीस्वरूप[9] कित्ता तें ॥
चित्र तसेंचि उतरिलें चतुरें, वाटे कवींद्रचित्तातें ॥ १६॥
रंगीं धृष्टद्युम्न स्व-भुज उभारुनि ह्मणे "अहो परिसा ॥
भेदील लक्ष तो या मद्भगिनीला वरुनि हो हरिसा"॥१७
कृष्णेसि ह्मणे "वत्से दे माळा लक्ष-भेदकरियातें ॥
कुळ शीळ रूप सद्गुण असतील स्वाऽनुरूप जरि त्यातें॥
हा दुर्योधन नृप, हे व्यास-वरें बंधु जन्मले शत गे ॥
हा कर्ण, ज्यापुढें पर- चाप-श्रुति-कुशळता न लेश तगे१९
हा शल्य मद्र-पति, हा चैद्यप[10] शिशुपाळ हा जरासंध ॥
गंधें-द्विप-गंध[11] तसा दुःसह याचाहि शत्रुला गंध ॥ २०॥
हे रामकृष्ण यदु-पति, हे दोघे साधु उद्धवाऽक्रूर ॥

१ भगिनी. २ पहाणाऱ्या लोकांचे नेत्र व मन हरण करणारा ३ आपलें द्रव्यसर्वस्व. ४ गायनकला. ५ लोक हेच हरिण. ६ आपली कांति. ७ काशाकरितां. ८ ब्रह्मदेवानें. ९ विष्णूनें अमृत-मथनसमयीं धरिलेलें स्त्रीस्वरूप. १० चैद्यदेशाचा राजा शिशुपाळ. ११ मदमत्त हत्तीचा गन्ध.

गमले रिपु गोप स्त्री- त्त्दया जे परम शुद्ध वाक्-क्रूर"२१
ऐसें समागतांचें कळवी कुळ-शीळ-कर्म-जन्म तिला ॥
कीं लक्ष्य-भेद-करही अकुळज कोण्ही रुचो न तन्मतिला
दुर्योधनादिकांची कन्यारत्नींच वेधली दृष्टी ॥
जसि वृष्टि चातकाला, त्यांला तसि ती विरंचिची सृष्टी॥
कृष्णेकडे जनाची तसि दृष्टि, श्रीकडे जसी सृष्टी ॥
भक्ताकडेचि हरिची दृष्टि, जसी वांसुराकडे गृष्टी ॥ २४॥
बळदेवासि ह्मणे प्रभु "आर्या, त्या ब्राह्मणांत तो धर्म ॥
तो भीम, तो धनंजय, ते यम, म्यां वळखिले, नव्हे नर्म२५
ब्राह्मण-वेष असोद्या, तेज पहा, चातका सदा दाते ॥
घनसे निवविति, मज यश झालेचि, न घातकास दादा, ते"
"नवल इथें मिळाल्या कनकाच्या ईष्टिका, मला भाचे॥
गुरुंचे बहु, यांहुनि शांत हर्में उणे इष्ट-काम-लाभाचे"॥२७
ऐसें बळभद्र ह्मणे श्रवणीं त्या विश्व-साक्षि-दृष्टीतें ॥
सृष्टीतें जी रचिती, यश न जिचें ये सुधार्द्रवृष्टीतें॥२८॥
देशोदेशींचे नृप झटले, परि परशुरामसें चाप ॥
न वळे, लवे भुज-बळें, तत्ताडित बहुत पावले ताप॥२९॥

१ अक्रूर कृष्णाला मथुरेस नेण्याकरितां आला. व उद्धव गोपींचे समाधानारा आला होता ह्या दोघांचें भाषण गोपींना क्रूर वाटलें. २ जमलेल्यांचें. ३ ब्रह्मदेवाची. ४ गाय. ५ थट्टा. ६ विटा. ७ सर्व जगाला पाहणारी दृष्टि ज्याची, त्याला. ८ अमृतमेघाचे वृष्टीला. ९ त्या धनुष्यानें ताडिलेले. १० वसुदेवाचे.

चोळुनि कर करकर रद खाउनि दष्टोष्ठ मोघचापल ते॥
हतदर्प भूप ह्मणती 'हंत हताःस्म त्वयाद्य चापलते' ३०
तेंव्हां स्वात्युसाहें त्दष्टमना तात उष्णकर करुनी ॥
रविसमवर्णे कर्णे चाप चढविलें क्षणांत करकरुनी ॥३१॥
स्वमनीं पांडव ह्मणती 'हा हा ! या दुष्कुळप्रसूतानें ॥
नेलेंचि लक्ष्य भेदुनि सह कन्यारत्न यशहि सूतानें' ३२॥
जों कर्ण ह्मणे 'न शिवों देईन इला दुज्या नवरया मी॥
तोंचि ह्मणे ती कृष्णा 'सूतमहं जातुचिन्नवरयामी' ॥३३॥
कर्ण विगुणं धनु टाकुनि पाहुनि रविला चुरूनि हाताते॥
चित्तीं ह्मणे "कशाला केला निर्माण पुत्र हा तातें॥३४॥
वैतरणी सुतरा,ही बुडवी, तिद्योत पाप सुतरेतें ॥
केला कां बुडवाया दुस्तरलज्जानदींत सुत रेतें" ॥३५॥
शिशुपाल यत्न करि,परि बोले स्वमनांत चापदैवत, 'मी

१ दांत. २ चाविले ओठ ज्यांनीं ते. ३ निष्फळ चपलपणा ज्यांचा ते. ४ हंत, हे चापलते, त्वया अद्य वयं हताः स्मः ह्म० हाय हाय! हे धनुष्या, तूं आज आह्मांला ठकविलें. ५ आपल्या अति उल्हासानें. ६ त्दष्ट (हर्षयुक्त) मन ज्याचें तो. ७उष्ण आहेत कर (किरण) ज्याचे तो सूर्य. स्वात्युत्साहें तात उष्णकर त्दष्टमना करुनी इ० हा अन्वय. ८ नीचकुलोत्पन्नानें. ९ अहं जातुचित् सूतं न वरयामि ह्म० मी कधींही सूताला वरणार नाहीं. १० दोरीनें रहित. ११ ही नदी यमलोकीं जातांना लागते. ही फार भयंकर असें वर्णन आहे. तरी ह्याप्रसंगीं कर्ण ह्मणतो लज्जानदीपेक्षां ही नदी फार सतर ह्म० तरण्यास सोपी आहे.

न कठिन, तुला बुडवितें आठवुनि तुझेंचि पाप दैव तमीं'
मागधराजसुत ह्मणे 'कृष्णा होईल आजि मज्जया' ॥
त्यासि ह्मणे चापलता 'लज्जापंकीं तुह्मीहि मज्जा या' ॥
शल्यहि पडला, झडला मद, न प्रकटूनि शक्तिला जे तें॥
कौतुक पाहत होते, सांपडले तेच कवि न लाजेतें ।३८॥
पाहति उगेचि दूरुनि न शिवोंदे चाप त्या अहीनकुला
लेखी तृणतुच्छ जसा, अबळा बाळा, बळी अही नकुला॥
जाणों तत्तेज ह्मणे त्यांला, "वश चित्तवृत्ति कामा जी, ॥
ती न भली,सावध व्हा, कां करितां निपटमृत्तिका माजी"
न बुडो क्षत्रयश ह्मणुनि उठवी उत्साहदायि मन पार्था
धर्महि ह्मणे 'असो गुरु- लब्धा शिक्षा सदैव अनर्पार्था'४१
जें धनुकडे निघे द्विज- वृंदांतुनि विप्र एकला जाया ॥
साधूंसि तोंचि शिकवी साधूत्साहातिरेक लाजाया॥४२॥
कोणही ह्मणति "निवारा आह्मां क्षत्रियकृतोपहासाचें ॥
पात्रत्व नवें द्याया सुचपळ वटु जोडितो पहा साचें"४३॥
कितिं ह्मणती "जाऊंद्या होउं न देईल कर्म कुत्सा हें ॥

---

१ जरासन्ध. २ माझी स्त्री. ३ बुडा. ४ श्रेष्ठकुलोत्पन्नांला. ५ निर्बळाला. ६ त्या राजांचें तेज. ७ मी तेज, त्याची. ८ धैर्य देणारें. ९ गुरूपासून प्राप्त झालेली. १० न-अप-अर्थ ह्म० निष्फल. ११ उत्तम उत्साहाचा अतिशयितपणा, १२ क्षत्रियांनीं केलेल्या थट्टेचें. १३ निंदा.

पूर्वी श्रीराम जसा   उठलासे, हा तसाचि उत्साहें ॥४४॥
त्याला अगस्त्यनामा   ब्राह्मण निःशेष नद[1]नदीपातें ॥
विस्मरलां रामातें   कां त्या भृगुवंशसदनदीपातें[2] ॥ ४५ ॥
ब्रह्मतपः[3] केलिगृह   ब्राह्मण नकरील काय हो बोला ॥
'विजयोऽस्तु, ह्मणा'चढला   विप्राशीनें[4] न कोण तो मोला"
पावे तत्काळ महा-   ऋद्धीमति पार्थ तोक[5], विप्राशी[6] ॥
त्या माता कामदुधा,   कारुण्य स्तन्य, तो कवि प्राशी ४७
नमिला आधीं पार्थे   विश्वप्रिय[7]सुहृद[8]कृत्रिम पिनाकी[9] ॥
ह्मणती 'यद्यश[10] सेवुनि   अमृतीं गोडी नसे किमपि नाकीं[11]'४
मग त्हृदयीं आठविला   कुशळकर[12] कुशेशयाक्ष[13] कंसारी[14] ॥
यत्स्मरणें शुचिमति[15] यति[16]- पति गतिला योग्य होय संसारी[17]
करुनि प्रदक्षिणा धनु   उचलोनि ख्याति तो करी मोटी ॥
चापाच्याचि नकेवळ   नरवीरांच्याहि वांकवी कोटी[18] ५०

---

१ नद व नद्या ह्यांचा पति समुद्र, त्यास. २ भृगूचा वंश हेंच गृह, त्यांतील दीप परशुराम, त्याला. ३ ब्रह्म(ईश्वराचें सूक्ष्मस्वरूप) एतद्रूप जी तपस्या तिचें क्रीडास्थान. ४ ब्राह्मणांच्या आशीर्वादानें. ५ बालक. ६ ब्राह्मणांचे आशीर्वाद. ७ विश्व-प्रिय-सुहृद् ह्म० विश्वाचा प्रियमित्र. ८ अकृत्रिम ह्म० स्वाभाविक. ९ शंकर. १० ज्या शंकराचें यश. ११ देव. १२ कल्याण करणारा. १३ कुशेशय—अक्षि ह्म० कमलनेत्र कृष्ण. १४ कंसाचा शत्रु. १५ वासनादिदोषरहित बुद्धि ज्यांची ते. १६ श्रेष्ठसंन्यासी. १७ संसार करणारा. १८ धनुष्याचीं दोन टोकें. पक्षीं, कोटिसंख्या.

यंत्रच्छिद्रद्वारें　पांचहि शर एकदांचि सोडोनी ॥
पाडी पळांत पृथ्वी-　वरि पुरुषप्रवर[१] लक्ष्य तोडोनी॥५१॥
प्रीति मुनिगणांच्याही,　राजांच्या कीर्ति सोमवंशाच्या,॥
घाली कंठीं माळा,　कृष्णा त्या श्रीमरुत्वदंशाच्या[२] ५२॥
आशीर्वादांच्या द्विज,　पुष्पांच्या करिती सुरहि वृष्टीतें ॥
द्रुपदपुरी जनकपुरी-　सम सुखदा होय साधुदृष्टीतें ॥ ५३॥
ब्राह्मण नाचति रंगीं　आनंदें उडविती स्वचैलातें[३] ॥
तें तोय होय हो यश　खळजननृपचित्ततप्ततैलातें[४] ॥५४॥
सत्कांतलाभचिंता[५]　उत्साहें उचलितांचि धनु सरली ॥
सद्गुणरक्ता[६] कृष्णा कृष्णाऽजिनधारकाहि[७] अनुसरली ५५॥
कोपोनि कर्णशल्य-　प्रमुख नृपति ह्मणति "हा द्रुपद खोटा
आह्मां मानधनांचा　केला अपमान, घात हा मोटा ॥५६
मुख्य स्वयंवरीं अधि-　कारी क्षत्रिय, न विप्र, हें कळतें॥
भलतेंचि बळें करितो,　श्रुतियश ऐशा खळामुळें मळतें ५७
विप्र नव्हे वध्य, वधा　द्रुपदा, नकरो दुजा अशा अनया॥
चढवा गुण, घ्या शर, हूं, धर्मार्थि मुहूर्त[८] दृढ करा मन या५८
आह्मां नृपांत भलत्या　एका स्वमतें वरील नवरी ती ॥

---

१ पुरुषश्रेष्ठ अर्जुन. २ श्री-मरुत्वद्-अंश. इंद्राचा अंश जो अर्जुन, त्याच्या. ३ आपल्या वस्त्राला. ४ दुष्टजन जे राजे त्यांचें चित्त हेंच तापलेलें तेल,त्यांत. ५ चांगल्या पतीच्या लाभाची चिन्ता. ६ उत्तम गुणांवर प्रीति करणारी. ७ हरिणाचें कातडें धरणाराला. ८ दोन घटिका.

विप्र स्वयंवरवधू[1]- वर, हे स्थिति नाशहेतु[2], नव रीती ५९
नवरी न वरील परा जरि, तरि दीप्तानळांत[3] होमा[4] ती ॥
वारुनि तेजें, अनया कारण, त्याची पळांत हो माती" ६०
युद्धोद्यत-नृप-चक्र- त्रस्त-मति[5] द्रुपद काळजी वाहे ॥
विप्रांसि ह्मणे 'माझ्या झालेचि नृपाळ काळ जीवा हे' ६१
कमल-वनावरि गजसे, द्रुपदावरि धांवले बळी पर[6] ते ॥
त्यांवरि सज्य करुनि धनु धन्वीश्वर[7] जिष्णु सिहसा परते
सरळ सबळ जवळ द्रुम समयीं मिळतां कशास कोदंड[8] ॥
वाटे, भीम परतला काळ, कवळिला न वृक्ष, तो दंड ६३
शरणागताभिमानी समरोद्यत[9] सर्व विप्र पाहोनी ॥
अर्जुन बोले, डोले सुरगुरु रोमांचभार वाहोनी ॥ ६४ ॥
"षडरिघ्न तुम्ही गुरु हो षडरिजितमदासि[10] काय हरिनां[11] मी
अरि[12] हरिनें नुचलावें अघदलनीं[13], बळ उदंड हरिनामीं ६५
युष्मदभयवर आह्मां- करवीं करवील दुष्टमदनाशा ॥
साधुपुढें अहिताशा, शंभुपुढें जेंवि दुष्टमदनाशा" ॥ ६६॥
भीमार्जुन शत्रूंवरि फिरतां, दावी मुकुंद रामातें ॥
ज्यां[14] पाहे त्यासि ह्मणे बळ, "तूं बहु सुखद सुंदरा मातें"

१ स्वयंवरांतील कन्येचा पति. २ नाशास कारण. ३ प्रदीप्त झालेल्या अग्नींत. ४ जाळून टाका. ५ युद्धास तयार झालेल्या राजसमूहानें भयभीत केली बुद्धि ज्याची. ६ शत्रु. ७ धनुर्धरांत श्रेष्ठ. ८ धनुष्य. ९ युद्धास तयार झालेला. १० कामक्रोधांनीं जिंकलेल्या लोकांच्या गर्वास. ११ हरण करीना. १२ चक्र. १३ पापनाशाविषयीं. १४ भीमाला किंवा अर्जुनाला.

कर्णाशीं भीमानुज, शल्यासीं भीमसेन, युद्ध करी ॥
तत्तेजस्तब्ध[1] इतर नृप झाले जेंवि पंक[2]-रुद्ध करी ॥६८ ॥
रण-विस्तर काशाला, हेमाक्षरणीं[3] महाकिरी[4] टिकला॥
कीं अर्जुन कर्णरणीं, अरिसहि वहु तोषवी किरीटि-कला[5]॥
कर्ण ह्मणे "विप्रवरा आनंद दिल्हा तुवां भला आजी॥
ऐसी नसेचि पूर्वी आढळली कामुका[6] मला आजी[7] ॥७०॥
तूं चापवेद, किंवा भार्गव, कीं शक्र, कीं स्वयें विष्णु ॥
कीं मजशीं झगडेसा होता सुत एक पांडुचा जिष्णु ७१
या पांचांमध्यें तूं कोण? वद स्पष्ट, जाणत्या कळतें ॥
वरि गारसा हिरापरि, त्या कवचें तेज कायहो मळतें"॥
पार्थ ह्मणे "मी कार्मुक- वेद नव्हें, रामही नव्हें, आहें ॥
विप्र-गुरु-प्रिय, अस्त्रीं शस्त्रीं पटु, चित्र[8] ह्मणसि कां गा हें
गुरुचा प्रसाद ज्यावरि काळासहि तो कदापि आटेना ॥
वाटे नारायणसा, अजित[9]-परा तत्सुकीर्ति वाटेना"॥७४॥
त्या विप्रवेष-वासवि- मुखवर्णांहीं[10] भरूनिगां कर्ण[11] ॥
परते, पुरतें जाणे, जय्य[12] नव्हे ब्रह्मतेज, हें कर्ण ॥ ७५॥
त्या भीमानेंही सुर[13]-रुचिर समर अमर[14]-तोष-कर केला ॥

१ त्यांच्या पराक्रमानें स्तब्ध झालेले. २ चिखलांत रुतलेले. ३ हिरण्याक्षाच्या युद्धांत. ४ महावराह. ५ अर्जुनाची युद्धकला. ६ युद्धाविषयीं उत्सुक अशा मला. ७ युद्ध. ८ आश्चर्य. ९ जिला शत्रूंनीं जिंकिलें नाहीं ती. १० ब्राह्मणवेषधारी अर्जुनाच्या तोंडच्या अक्षरांनीं. ११ कान. १२ जिंकण्यास शक्य. १३ देवांप्रमाणें मनोहर. १४ देवांस संतोषदायक.

यत्कीर्तिनें विरेसा दिल्हा जडात्मत्वदोष करकेला ॥७६॥
भीमें शल्य क्षितिवरि कंदुकसा भुजरणांत आपटुनी ॥
हांसविले मुनि, न तसे शिशुहि कधीं हास्यरसकथापटुंनीं
शल्य-पराभव पाहुनि कर्णादिक सर्व शंकले परं ते ॥
दाविति, परि धैर्य उडे आधीं, मग मर्द्र-पति-कलेवर तें ७८
नृप ह्मणती, "हे ब्राह्मण, आह्मांला भीड फार वेदाची॥
मानधनासि न साहे वार्ता अपमान-जन्य-खेदाची ॥७९॥
कोठील ब्राह्मण हे तेजस्वी भीम-जिष्णुसे धीट ॥
शोधूं, बरें करूं, कर- णें तें न विचारितां नव्हे नीट"॥८०
ऐसें वदोनि गेले नृप निज-शिबिरासि कीर्ति हारउनी ॥
झाले म्लान-श्री ते द्विज-तेजें, जेंवि पुष्प-हार उनीं ॥८१॥
साऽग्रज जिष्णुहि मग त्या द्रुपदसुरद्रु-प्रसूनमाळेला ॥
सांभाळुनी स्व-वस्त्र- च्छायेंत क्षिप्र जाय शाळेला ॥८२॥
वदले, "भिक्षा घेउनि आलों, ये जननि, घे"असें कवि ते
तच्चिता-तिमिरहृद्य- पद्माचे प्रेक्षणीय जे सवितें ॥ ८३ ॥
शालेंत पृथा बोले " भिक्षा माझ्यासमीप ती ठेवा ॥
हो तृप्तिदा सुधासी, सर्व भ्राते मिळा, सुखें सेवा" ॥८४॥
नमितां द्रुपदसुतेतें पाहुनि कुंती ह्मणे "अहा देवा ! ॥

---

१ अचेतनदेहरूप दोष. २ गारेला. ३ चेंडूसारखा. ४ बाहुयुद्धांत. ५ हास्यरसाच्या कथा सांगण्यांत निपुण अशा लोकांनीं. ६ शत्रु. ७ शल्याचें शरीर. ८ तेजोहीन. ९ द्रुपदरूपकल्पवृक्षाच्या पुष्पमाळेला ह्म० द्रौपदीला. १०तिचें ह्म०पृथेचें चिंतारूप अंधकारानें युक्त जें हृदय हेंच कमळ, त्याचे. १३पाहण्यास योग्य. १४सूर्य.

वदलें असें कसें? कीं सर्व, भ्राते मिळा, सुखें सेवा"॥८५
भलतेंच वदे सासू, सासूया[1] जाहली न परि सून ॥
कुंती अधर्मभीता मुदिताही होय वृत्त परिसून ॥ ८६ ॥
गौरवुनि धरूनि करीं नेउनि धर्माकडे सुने, सातें ॥
सांगोनि पुसे अनृतांऽ[2] धर्महर सुयुक्ति त्या सुनेत्यातें[3] ८७
मातेला समजावुनि धर्म ह्मणे "अर्जुना, इचा विधिनें ॥
पाणि स्वीकारावा आतां त्वां शक्ति-कीर्तिच्या निधिनें ॥
जिष्णु ह्मणे "गुरुलंघन अज्ञ जन करो, करी न परि वेत्ता[4]
मी तों न आपणाला जाणत जाणत करीन परिवेत्ता[5] ८९
त्वां, भीमें, म्यां, नकुळें, सहदेवें, कार्य[6] पाणिपीडन[7], तें॥
व्हावें क्रमेंचि, धर्म्य व्यवहारीं धरुंनयेचि भीड नतें"९०
धर्म विचार करी तों अनुजांच्या आपुल्याहि नयना तें ॥
रुचलें स्त्रीरत्न, मनें एकचि धरिलें त्यजूनि नय नातें ९१॥
जनकेंचि चुंबिली जी चुंबावी नंदनेंहि नलिनी ती ॥
धरिली त्या कृष्णा-रत-मतिनीं[8] आति नीचसीच अलिनीती[9]
गज गंगेंत निवाया ह्मणति, न चिंतूनि शुद्धि, मज्जन हो
तैसेचि पांडुसुत त्या लावण्यनदींत बुद्धिमज्जन[10] हो ॥
धर्म ह्मणे "ज्या ध्याना अनुसरले हे स्व बंधु चवघे, तें॥

---

१ असूया ह्म० गुणांचे ठिकाणीं दोषारोप करणें. २ असत्यरूप अधर्म हरणारी. ३ उत्तम मार्गाला दाखविणाऱ्या धर्माला. ४ ज्ञाता. ५ ज्येष्ठबंधूपूर्वी विवाह करणारा. ६ करावें. ७ हस्तग्रहण ह्म० विवाह. ८ द्रौपदीचे ठायीं रमलें मन ज्यांचें, त्यांनीं. ९ भ्रमराची पद्धति १० बुद्धिमान् लोक.

धरिलें माझ्याहि मनें, कोणाही न पुसतांचि चव घेतें१४
झालें वश निजतनयां मन, या अनया न यत्न, होगलितें
जैं भे३दे कटक, किजे तैं रायें युद्ध काय हो गलितें॥१५॥
व्यासोक्ति पृथोक्ति जसी अस्मद्वृत्तिहि पहा तसीच बरें
प्रभुच्या कोण न सन्मत दे्तो दासासि कीर्तिचीं चवरें"१६
ज्याची हे स्त्री होइल, होतिल रिपु त्या स्वबंधुचे अन्य ॥
जो वासितासहचर द्विप, होती तद्दरि मदकरी वन्य१७
धर्म भ्रात्यांसि म्हणे "पांचांची हे सती असो भार्या ॥
श्रुतिची मातेची सम आज्ञा आम्हां नव्हेचि परिहार्या"१८

# अध्याय ३५ वा.

## सारांश.

द्रौपदीस्वयंवर झाल्यावर रामकृष्ण पांडवांस भेटले. व त्यांचा निरोप घेऊन ते द्वारकेस गेले. पुढें धृष्टद्युम्न व द्रुपद ह्यांनीं त्या

---

१ मनापासून मदन उत्पन्न होतो ह्मणून त्यास मनाचा पुत्र ह्मटलें. २ हाकून लावणारें. ३ पराभव पावे. ४ धैर्य खचलेल्यानें. ५ सज्जनांस मान्य. हें दासांचें विशेषण. ६ स्त्रीचा किंवा हत्तिणीचा सहचर. ७ हत्ती. ८ त्याचे शत्रु. ९ मत्तहस्ती. १० उल्लंघन करण्याजोगी.

वेषधारी ब्राह्मणांची गुप्तरीतीनें फार बारीक चौकशी केली. त्या, वरून हे क्षत्रिय आहेत, अशी त्यांची खात्री झाली. मग द्रुपदानें विचारिल्यावरून धर्मराजानें त्यास आपलें कुलगोत्रनाम सांगितलें व वृत्तही कळविलें. तेव्हां द्रुपदास फार संतोष झाला. पण द्रौपदी पांचास कशी द्यावी हा त्यास मोठा विचार पडला. तेव्हां व्यासानें त्यांस देवगुह्य सांगून त्याची समजूत केली. मग द्रुपदानें द्रौपदी विवाहविधीनें पांडवांस देऊन त्यांचा सत्कार केला.

प्रभु राम कृष्ण दोघे गेले शाळेसि त्या कुलालाच्या ॥
तद्भस्मभाग्य, भाळीं न बुक्याच्या, तें नवा गुलालाच्या॥
सांगुनि नाम युधिष्ठिर नमिला यमि-लालसा-कर-यशांनीं
भ्यावें श्रितांऽशिवांहीं ज्यांप्रति, जैसें हरीप्रति शशांनीं
ह्मणाति पृथेला "आत्या- बाई, नमितात हे तुला भाचे"
यत्पदरजाहुनि उणे इष्टाच्या सर्व हेतु लाभाचे ॥ ३ ॥
हरि भीमासि नमी, दे आलिंगन जिष्णुला, तया यमलं॥
नमिति, वृकोदर भेटे रामा, यच्चिंतनेंचि जाय मल ॥४॥
कुंती ह्मणे "असे तो ताप न अमृताब्धिची हरी लहरी

१ त्या शाळेंतील भस्माचें ह्म० राखेचें भाग्य. २ जितेंद्रिय योग्यांनीं इच्छा करण्याजोगीं यशें ज्यांची ते. ३ आश्रितांच्या अकल्याणांनीं. ४ ज्यांच्या पायांच्या धुळीहून. ५ नकुळ व सहदेव. ६ ज्या बळरामाच्या स्मरणानें

झालेंचि ह्मणत होतें मी जें कीं व्यसन हें हरील हरी ५
या दिन-तुळेसि पावे न दिवाळी पाडवाहि न न दसरा॥
आह्मांसि भेटला हें तेंवि जसा वाळतांचि वनद सरा॥ ६
हे द्वारका, न भार्गव- शाळा, मज भेटलेंचि माहेर ॥
आहे रक्षाव्रतरुचि करुणा तुमच्याचि आंत बाहेर"॥ ७ ॥
ज्याच्या स्व-रोम-कूपीं सतत सुख-स्वस्थ सत्यपांड वसे ॥
धर्म ह्मणे त्या प्रभुला 'कळले हे केंवि सत्य पांडवसे'॥ ८॥
कृष्ण ह्मणे "असतांही गूढ कसा अग्नि भारता कळतो ॥
आकळिला मृगमद जरि बहुयत्नें वास काय आकळतो९
लोपे कवि न कुंवासें पावे ख्यातीस मंद न सु-वासें ॥
कळतोचि जाणत्याला सर्व-तरु-श्रेष्ठ चंदन सुवासें ॥१०॥
आहेत वीर बहु जरि, परि भेदाया पणा असाध्या या॥
निपुण तुह्मी, मज इतर नाहीं जी आपणा असा ध्याया
व्यसन चुकविलें, पहिला लोकीं हा लाभ साजिरा, ज्याची
प्रथम असावी ती ही कीर्ति मिळालीच आजि राजाची
वाटे, ह्मणेल त्यांची मति त्यांला कीं तुह्मीं नभा उखळा ॥
मूर्ख भलतेंचि करिती, सज्जनही आवडे न भाउ खळा१३
वृद्धि असावी तुमची शत्रूचे सर्व गर्व हरपावे ॥
व्यसनीं बुडवूं पाहति खळ ज्या त्या सज्जनासि हर पावे

१ मेघ. २ सरोवराला. ३ कुंभाराची मडकीं घडण्याची जागा. ४ रक्षणाच्या व्रताची आवड. ५ रोमरंध्राचे ठायीं. ६ सत्यपअंड ह्म०ब्रह्मांड. ७ कस्तूरी. ८ आवरतो. ९ वाईट वस्त्रानें १० चिंतिण्यास. ११ सुंदर वस्त्रानें.

द्यावा निरोप आह्मां झालों भेटोनि आजि सानंद ॥
धर्म तुह्मांला व्यसनीं रक्षक, मज साऽग्रजा जसा नंद १५
प्रिय आमुचे बहिश्चरे[1] पंच प्राणचि तुह्मी, न अस्वहित[2] ॥
कोण्हीही होवूं दे, भवद्वन स्वहित, अन्य अ-स्वहित" १६
ऐसें वदोनि ते प्रभु करिती कोणासि नकळतां गमन ॥
मग भिक्षान्नें केलें रात्रौ त्या साधुनीं क्षुधाशमन ॥ १७ ॥
राहोनि गुप्त धृष्ट- द्युम्नें तच्छोध लाविला आंगें॥
त्यातें द्रुपद-नृप पुसे वत्सेची गति कसी? सुता सांगें १८॥
धृष्टद्युम्न ह्मणे "ज्या पुरुषें नेली स्वसा[3] महाभागें[4] ॥
गेलों कुलाल-शाले- प्रति शोध करावया तयामागें ॥१९॥
ते पांच बंधु, आहे माता ज्यांची जसी सुरी[5], तीतें ॥
त्यांतें पाहुनि झालों त्दृष्ट विलोकूनिही सु-रीतीतें ॥२०॥
त्यांचें विलोकिलें म्यां तैसें कोठेंहि दिव्य तेज नसे ॥
आश्चर्यरूप पांचहि न पहावे ते धरापते[6] जनसे ॥ २१ ॥
भिक्षान्न त्यांसि वाढुनि मग कृष्णा तेंचि जेविली नमुनी
गमलें नसेल तैसें सुख त्या ब्रह्मींहि जे विलीन[7] मुनी २२॥
त्यांच्याचि पायथां ती निजली, ते राशि रत्नहेमाचे ॥
गणिले कुशशयनोनाचे[8] कृष्णेनें हे पलंग हेमाचे ॥ २३ ॥
मज त्यांच्या शब्दादि- व्यवहारीं क्षत्रियत्व आढळलें ॥

---

१ शरीराबाहेर फिरणारे. २ आपल्या प्राणांचें अहित. ३ भगिनी. ४ महा भाग्यशाली पुरुषानें. ५ देवस्त्री. ६ हे पृथ्वीपते द्रुपदा. ७ गढून गेलेले. ८ दर्भशयनापेक्षां कमी योग्यतेचे.

जरि भिक्षुवेष शिव तरि तेज तयां त्यजुनि काय गा ढळलें॥
न जळाले पांडव ते होईनचि सत्य-तर्क बहुधा मी ॥
न विशेष विप्रवेशीं त्यांचा दिसतो विशेष बहु धार्मी"२५
राजा ह्मणे "असो हा वत्सा, तव सत्य तर्क रे, तें हो ॥
जें दमयंती-जनका सुख, मुख हें पात्र शर्करेतें हो"॥२६॥
प्रातःकाळीं धाडी मग पार्षत त्यांकडे पुरोध्यास ॥
देव-द्विज-प्रसादें तोहि ह्मणे 'नृपतिचा पुरो ध्यास'॥२७॥
त्यांसि उपाध्याय ह्मणे "स्वयशोर्थ करा कृपा, सकळ वाहो॥
आधीं, महासुख पुढें, कुळ नाम तुह्मी नृपास कळवा हो२८
झाला द्रुपद बहु सुखी, आजि तुह्मां व्हाणणार, कनकानें॥
पूजील, पूजिले ते जैसे दशरथ-कुमार जनकानें॥ २९॥
वाटे होता अर्जुन वर व्हावा, तोचि काम पुरला हो ॥
बुधहो निजकुळ कळवा, हें मिथिलेच्या यशासि पुर लाहो'
पूजुनि धर्म "ह्मणे कां नृप करितो खेद, जें गत न ये तें॥
हा पण, कीं लक्षाचा भेदक जो, तोचि योग्य तनयेतें॥३१
झालें तेंचि, मनोरथ पुरला असतां किमर्थ हा शोध ॥
समजा मनीं, कसें यश मेळविता अकुळ भलतसा योध"३२
यापरि धर्म वदे तों द्रुपदें प्रेषूनि आप्त 'जेवा या'॥
ऐसें विनवुनि नेले, गेले सुरथीं बसोनि जेवाया॥ ३३ ॥
ऐकुनि धर्मोक्ति पुरो- हित-वदनें त्दृष्ट होय तो लेश॥

---

१ खरा आहे तर्क ज्याचा तो. २ तेजांमध्यें. ३ दमयंतीच्या पिता भीमराजा यास. ४ पृषतराजाचा पुत्र द्रुपद. ५ उपाध्यायाला. ६ इच्छा. ७ आपली कीर्ति होण्याकरितां. ८ वीर. ९ पाठवून.

चिताब्धिमग्नमतिभू- द्धारा योजी उपाय-कोलेश ॥ ३४॥
ज्या ज्या वर्णा जें जें व्यवहारा योग्य वस्तु सर्वहि तें ॥
तद्दृष्टीस पडेसें मांडविलें पार्षतें सुधीमहितें ॥ ३५ ॥
वर्णपरीक्षार्थ असें केलें, कीं वस्तु जें तयां इष्ट ॥
त्यावरुनि जाति त्यांची जाणावी ते अशिष्ट कीं शिष्ट ३
पाहुनि त्यांसि जन ह्मणाति अहा पहाहोअहो अजिनरहितें
उडविति सुरत्वरूपें करितिल ते काय कीं अजि नरहितें॥
द्रुपदातें द्रुपद दाते स्वर्गींहुनि वाटले गृहा आले ॥
आधींतें आधीं तें तद्दर्शन नुरवि, सर्वही धाले ॥ ३८ ॥
बसतां वरासनीं कीं भोजन करितां न शंकले चुकले ॥
श्रीमद्गुणत्त्ववें ते पांडु-तनय जिष्णु-विष्णुसीं तुकले ३९
त्या विविध वस्तु-मध्यें जें जें धनुरादि वस्तु समरहित ॥
तिकडेच ते पहाती जैसे विषयाकडेचि शर्म-रहित ॥४०॥
असकृद्भागवतें जसें मुमुक्षुंहीं, धीरजनकृतस्तुतिहीं ॥
अवलोकिलें धरुनियां बहु आदर संगराई वस्तु तिहीं ४१
नृप तच्चेष्टित पाहुनि विप्र न ते, पांडसुत असें समजे॥

१ चिंतारूप समुद्रांत बुडालेली बुद्धि हीच पृथ्वी, तिच्या उद्धाराकरितां. २ उपायरूप महावराह. ३ सुज्ञांस मान्य अशा द्रुपदानें. ४ वृक्षश्रेष्ठ, ५ श्रीमंताच्या गुणांनीं संपन्न असल्यामुळें. ६ इंद्र व विष्णु यांशीं. ७ तुलना पावले. ८ युद्धोपयोगी. ९ मनोनिग्रहरहितजन. १० वारंवार. ११ श्रीमद्भागवतग्रंथ. १२ मोक्षार्थी जनांनीं. १३ मुक्तलोकांनीं केली स्तुति ज्यांची त्यांनी. मुमुक्षु व तिहीं याचें विशेषण,

सुज्ञांसि झांकिलेही कळति गुण ख्यात मृगमदासम जे ४२
धर्मासि मग ह्मणे "हो, पूर्ण करा सर्व कामना, मातें ॥
सांगा स्वनाम, सांगति जैसे गुरुराज रामनामातें ॥४३॥
माझें मानस आहे तुमच्या बहु साऽभिलाष कुलनामीं ॥
पावेन श्रवण करुनि पीताऽमृत-तुष्ट-पुष्ट-तुलना मी ॥४४॥
विधिनें करीन कन्या- दान, महोत्सव, ह्मणून कामातें ॥
पुरवा हो, पुर वाहो सुख-पूरीं, पर ह्मणूं नका मातें" ४५
धर्म ह्मणे "नृप-नाथा, युष्मत्कृत तर्क जे न ते लटिके ॥
तज्ज्ञातज्ज्ञपरीक्षे- माजि पळहि घृतपणें न तेल टिके ॥४६
भूदेव नव्हों, क्षत्रिय आह्मी, श्री-पांडु-राज-सुत, राया, ॥
हा विप्रवेषसेत्वव- लम्ब व्यसनाऽर्णवासि उतराया॥४७॥
वोळख गा, वोळें, खगा- वरि घनसा, राजसत्तमा राया॥
हे तेचि, जपत होता ज्यां तो मद-मद्य-मत्त माराया" ४८
भूप ह्मणे "मीच सुखी, न असा पावोनि अन्य कामातें॥
झाली ताराया शत- पुत्र-वरा धन्य कन्यका मातें ॥४९॥
व्यसनीं सहाय झाला रामाला काननांत वानरही ॥
होइल सहाय मग तुज भीष्माच्या कां न नातवा नरही ॥

१ प्रसिद्ध. २ कस्तूरीसारखे. ३ उत्कंठित. ४ अमृत पिऊन जो तुष्ट व पुष्ट झाला त्याची बरोबरी. ५ परका. ६ तुह्मीं केलेले. ७ तें जाणणारे व न जाणणारे यांच्या परीक्षेंत. ८ ब्राह्मण. ९ ब्राह्मणवेषरूप सेतूचा अंगीकार. १० संकटरूप समुद्रास. ११ प्रसन्न हो. १२ चातकपक्ष्यावर. १३ मदरूपमद्यानें माजलेला दुर्योधन. १४ शंभर पुत्रांहून अधिक. १५ पुण्यवान्.

विहितचि सत्कार्यार्थे स्व-प्राणांचा विनाश पथ करितां ॥
देवाऽधीन सकळ परि, मज तें भय दात्रिना शपथ करितां"
करुनि समाधान असें पंचायतनापरीच तो भावें ॥
पूजी पांडु-कुटुम्बा, सुज्ञें पूज्यांसि कां न लोभावें ॥ ५२ ॥
"पाणि-ग्रहण करावें कृष्णेचें अर्जुनें विधानानें" ॥
हें धर्माप्रति ह्मणतां द्रुपदानें प्रीतिच्या निधानानें ॥५३॥
धर्म ह्मणे मी" आधीं, मग भीम-प्रभृति बन्धु हे तीतें ॥
विधिनें धरितील करीं, धरिति जसे वीर एक हेतीतें"५४
द्रुपद ह्मणे "धर्मज्ञा सविधि वरावी तुवांचि, अथवा हे ॥
एकेंचि युष्मदनुजें, ह्मणसी ऐसा जगीं न पथ वाहे" ५५
धर्म ह्मणे "मातेची आज्ञा आह्मां, नृपा श्रुतिसमान ॥
धर्मज्ञ साधु देती मान गुरूक्तिस, जसा श्रुतिस मान ५६
बहुतां ऋषींस भजली जटिलाख्या गौतमी, तेथैव सती
वार्क्षी दश-प्रचेतः- स्त्री, यत्कीर्तीस सत्सभा वसती"॥ ५७
धर्मोक्ति वक्ता परि केवळ पांचाळ कोंडला, गावें ॥
तत्कालागत शुकगुरु- सद्यश, तेथेंचि तोंड लागावें ॥५८॥
द्रुपदातें एकान्तीं नेउनियां दैव-गुह्य सांगाया ॥
व्यास ह्मणे "धर्माचें शुचि मत, होसी न मान्य कां गा या

१ योग्यच. २ सज्जनाच्या कार्या करितां. ३ अंगिकारितां. ४ तरवारीला. ५ तुमच्या बंधूनें. ६ वृक्षापासून उत्पन्न झालेली मारीषानामक कन्या. ७ हे प्राचीनबर्हिराजापासून वरुणकन्येच्या ठायीं झालेले पुत्र. ८ त्याच वेळीं आलेला शुकगुरु ह्म० व्यास, त्याचें चांगलें यश. ९ ईश्वराच्या मनांतील गुप्त हेतु.

पूर्वी सत्रीं दीक्षित यम असतां राहिलें प्रजा-शमन ॥
सास्तव सेन्द्रसुरांचें इच्छी अमर-प्रजा-विनाश मन॥६०॥
विधि विनविला तिहीं, तो सांगे सत्रीं यमाकडे जाया ॥
येतां विलोकिली श्री- गंगा-स्रोतांत ऐश्वरी मार्या॥६१॥
हेमाब्ज येत होतें वाहत, साचा करावया शोध ॥
एकाकी शक्र निघे अवलम्बुनि देवसिन्धूचें रोध ॥६२॥
गंगेत पावक-द्युति योषा दूरूनि देखिली रडती ॥
त्यांचे होती कांचन- पद्म; जळीं अश्रुबिन्दु जे पडती ६३
शक्र ह्मणे "कोणाची तूं, दुःखा पात्र दुःसहा या जी,,॥
ती 'सांगूं काय' ह्मणे 'पुसतांचि, तरि स्वयें पहा याजी'
स्त्रीसह जातां, हरि गिरि- वर-शिखरीं, अशनिला करीं वाहे,
सिंहासनस्थ अक्ष- क्रीडा-रत, दिव्य दम्पती पाहे ॥६५॥
दावी प्रभुत्व शब्दें, तों त्यापुरुषें विलोकिला मात्र ॥
झाला स्तम्भितगात्र च्छात्रें गुरूचा भयाऽब्धिंत्रला पात्र६६
त्या स्त्रीस ह्मणे तो प्रभु "आण पुढें, फार दावितो बल हा"
स्त्री स्पर्शतांचि पडला छिन्नाऽद्रिद्रुम जसा तसा बलहा६७॥
आज्ञा करूनि करवी त्या हातीं दूर अद्रिच्या शिखरा ॥

१ प्रजा मारणें. २ इंद्रासहित देवाचें. ३ मृत्युरहित अशा प्रजांला नाश. ४ गंगा प्रवाहांत. ५ ईश्वराची अद्भुत कृति. ६ स्वर्णकमल. ७ एकटा. ८ गंगेचें. ९ तीर. १० अग्नितुल्य कांतीची. ११ स्त्री. १२ इंद्र. १३ मोठ्या पर्वताच्या शिखरावर. १४ वज्राला. १५ फांशांच्या खेळांत निमग्न. १६ स्त्रीपुरुष. १७सत्ता. १८ स्तब्ध झालें शरीर ज्याचें तो. १९ शिष्य. २० बृहस्पतीचा. २१ भीतीच्या सागराला. २२ तुटलेला पर्वतावरील वृक्ष. २३ इंद्र.

तेव्हां शक्र समजला कीं, हाचि प्रभु बळांऽबु-राशि[1] खरा
शिखरपिधानापनयन[2] करितांचि, गुहेंत तो पुरुष चवघे ॥
पाहे बहुतेजस्वी, मंजूषेमाजि[3] फणि तसे अवघे ॥ ६९ ॥
"चौघांत पांचवा हो" ह्मणतां हरि, त्या महेश्वरा कुपिता
नमुनि ह्मणे, "विश्वगुरो, होताति कुपुत्र[4],परि न व्हे कुपिता[5]"
देव ह्मणे "रे, यावरि मद-मत्त तुह्मी कदापि व्हाना कीं?
जा, होउनि नर भू-भर[6] हरुनि पुन्हा वास-योग्य[7] व्हा नाकीं[8]
बहु-भोगासक्त[9] तुह्मी, नव्हतांचि मदर्चनीं[10] बरे जागे ॥
पांचांसि दिली स्वश्री[11] हे स्त्री, मुलि तूंहि जन्म घे, जा गे"॥
ती कृष्णा हे, पांडव झाले ते पांच इन्द्रही नव रे ॥
त्वत्कन्येचे पांचहि होणारचि ते नरोत्तमा, नवरे ॥७३॥
तैसेचि भूमि-भर-परि-हारार्थ[12] सहाय यांसि लोकेश[13] ॥
सित[14] असित कच दिले; बळ शुक्लें, कृष्णेंहि कृष्ण तो केश"

---

१ बलरूप उदकाचा संचय. २ शिखर हेंच पिधान ह्म० झांकण त्याचें अपनयन ह्म० दूरीकरण. ३ पेटीमध्यें, ४ वाईट पुत्र. ५ वाईट बाप. ६ पृथ्वीचा भार. ७ वसतीस योग्य. ८ स्वर्गांत. ९ सुखोपभोगांविषयीं अत्यंत आसक्त. १० माझ्या पूजेविषयीं. ११ आपली शक्ति, १२ पृथ्वीचा भार निवारण्याकरितां. १३ भगवान् रामकृष्ण. १४ उज्जहारात्मनःकेशौ सितकृष्णौ महामुने॥

सचापिकेशौहरिरुद्ववर्ह शुक्लमेकमपरंचापिकृष्णम् ॥
तौचापिकेशौनिविशेतांयदूनां कुलेस्त्रियौरोहिणींदेवकींच
तयोरेकोबलभद्रोबभूव योऽसौश्वेतस्तस्यदेवस्यकेशः ॥
कृष्णोद्वितीयःकेशवःसम्बभूवकेशोयोऽसौवर्णतःकृष्णउक्तः

सारांश.—परमेश्वरानें एक पांढरा व एक काळा असे दोन केश उपटून यदुकुळांत टाकिले,त्या केशां पासून क्रमानें रामकृष्ण झाले.

सांगोनि देव-गुह्य व्यास स्व-कमंडलु-स्थ तीर्थजळ ॥
लावुनि नयनीं देता झाला द्रुपदासि दिव्य-दृष्टि पळ ॥
शक्रांऽश एक, पहिले चार, असे इन्द्र पांच त्यारूपें ॥
अवलोकिले प्रसादें मुनिच्या तत्काळ पार्थतें भूपें ॥
मुनिसि नमूनि विमोह- द्रुपदें स्वीकारिली तदाज्ञा ते ॥
कन्या पांचांसि दिली, झाले बहु-त्दृष्ट-धी तदा ज्ञाते ७७॥
द्रुपद पृथेसि ह्मणे "म्यां वरिले कुरु-कीर्ति-हेतु जामाते ॥
परिपाळावी दिधली कन्या सेवेसि हे तुजा माते" ॥७८॥
कृष्णें पांडव गज-रथ- हय-दासी-दास-रत्न-धन-दानें ॥
गौरविले, ऐसे ज्यां पाहुनि व्हावें सलज्ज धनदानें ॥७९॥
पांडव-वृत्त-श्रवणीं स्व उर क्षाळुनि उदश्रुबिन्दूनीं ॥
गेले स्वयंवरागत नृप,भीष्मासहि मनांत निन्दूनी ॥ ८० ॥
दुर्योधन कर्ण शकुनि बहु निन्दुनि सा पुरोचना यवना ॥
भवना गेले लावुनि वैर, हरीसीं करी जसे स्ववना ॥८१॥

# अध्याय ३६ वा.

## सारांश.

'स्वयंवरांत द्रौपदीनें अर्जुनास वरिलें' असें विदुरानें

---

१ मोहरहित. २ संतुष्ट अंतःकरण ज्यांचे ते. ३ कुरूंच्या कीर्तीस कारणभूत. ४ कुबेरानें. ५ ज्यांच्या नेत्रांतून अश्रुबिंदु निघाले ते. ६ सिंहाशीं. ७ आपल्या वनांला.

धृतराष्ट्रास सांगितलें. राजास तें बरें वाटलें नाहीं. तरी बाह्या-कारीं बरें वाटलें असें त्यानें दाखविलें. मग दुर्योधन व कर्ण यांनीं पांडवांचा नाश करण्याची युक्ति धृतराष्ट्राजवळ सांगितली. भीष्मानें त्यांस तसें न करण्याविषयीं उपदेश केला. द्रोणानें ही तसेंच सांगितलें. मग धृतराष्ट्रानें पांडवांस आणण्या करितां विदुरास द्रुपदपुरास पाठविलें. विदुर पांडवांस द्रौपदीसह ह-स्तिनापुरास घेऊन आला. पांडव आलेले पाहून नागरिकजनांस मोठा संतोष झाला व त्यांनीं मोठा उत्साह केला. कांहीं दि-वसांनीं धृतराष्ट्रानें पांडवांस अर्धराज्य देऊन खांण्डवप्रस्थ ह्म० इंद्रप्रस्थ ह्याठिकाणीं राहण्यास सांगितलें. धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून पांडव तेथें जाऊन राहिले.

विदुर ह्मणे "राजाजी, कौरव[1] उदयासि पावले जाणा"॥
धृतराष्ट्र ह्मणे "कृष्णे- सह मन्नमना सुयोधना आणा" ॥
क्षत्ता[2] ह्मणे "नृपाळा, नमना आतांचि आणितों, पण ती
पांडव-भार्या कृष्णा 'आहे निज-पितृ-पुरीं' असें ह्मणती"
अन्ध ह्मणे "गा विदुरा, झालें हें वृत्त अमृत कानांतें ॥
जें द्रुपदासीं घडलें तें न यशस्कर गमेल कां नातें ॥ ३ ॥
यांच्या त्यांच्या ठायीं समता, ममता, न तातता[3] दुसरी॥

---

१ विदुरमतें, कौरव ह्म० कुरुकुलोत्पन्न पांडव. धृतराष्ट्र मतें, दुर्योधनादि. २ सूत, विदुर. ३ पितृत्व.

तत्सुख मत्सुख, हे तनु   होतचि होती तदाधिनें उसरी" ॥४
विदुर ह्मणे "गा बापा,   बुद्धि असावी असीच आर्यांची॥
यालोकीं परलोकीं   सम्पत्तीहूनि हेचि कार्यांची" ॥ ५ ॥
नसतां विदुर, सुयोधन   धृतराष्ट्राला ह्मणे "अहो तात, ॥
मज बहु दुःखद तुमचे   आतांचे मन्त्र-वर्ण होतात ॥ ६ ॥
करिसि सपत्नगुणस्तुति, मानिसि रिपुवृद्धिला स्ववृद्धि नृपा
व्यर्थ अपत्यें कां हीं?   कांहीं यांवरि कसी नसेचि कृपा"॥
प्रज्ञाचक्षु ह्मणे, "मज   पडतो संकोच फार विदुराचा ॥
सर्वहि हेतु सुखाचा   स्वापसाचा तसा न विदुराचा ॥ ८॥
पांडव-गुण-वर्णन तें   विदुर-मनो-धारणाऽर्थ, हें साचें, ॥
वरि सरस, आंत नीरस,   मद्रापण मित्र होय फेंसाचें ॥९॥
इनकांत काय होतो   मन्दाक्षाच्या त्यजून काच मना ॥
मज हित तूंचि, न धर्म,   प्राणाच्या तो करील आचमना?
दुष्करा हे करीन; वदा,   धरिला स्व-मनांत निजहितोपाय
छेदावा गति-हेतुहि   जो विषरुग्दुष्ट निजहि तो पाय" ११.
स्व-मत सुयोधन सांगे,   "भेदावा द्रुपद भूरि-धन-दानें ॥
येणें कोण चळेना?   काय महातरु चळेल न नदानें ॥१२॥
कीं जें अन्योन्य असे   पावेल प्रेम अन्त, राया तें ॥
जेणें योजावें त्या   पांचांत रुष्यादि अन्तरायातें ॥ १३ ॥
कीं भीम मारवावा   देववुनी क्ष्वेड हेंचि भद्र हित ॥

---

१ पांडवांच्या चिंतेनें. २ सुकाविलेलें अळूं इ० वस्तु. ३ मसलतीचीं अक्षरें. ४ शत्रूंच्या गुणांची स्तुति. ५. धृतराष्ट्र. ६ ज्ञात्याचा. ७ विदुराची मर्जी राखण्याकरितां. ८ सूर्यकांत. ९. गमनास कारण. १० विषरूप रोगानें दूषित. ११. पुष्कळ द्रव्याच्या देण्यानें. १२ नाश. १३ विघ्नाला. १४ विष. १५ सुख.

सरतीलचि, वांचोनिहि काय? शवचि ते समस्त तद्रहित[1]
ऐशा सांगे तो खळ मूर्ख पित्याजवळि नैककूपाया[3] ॥
सुविचार-हंस भेटति कैसे कुविचार-भेक-कूपा या[4] ॥१८॥
कर्ण ह्मणे "राया हें व्यर्थ, जसें बुद्धि-हीन मृगपोरं[5] ॥
योजावें पढवुनि वध- युक्ति विदारावयासि मृगपोर[6] १९॥
तों वणवा विझवावा, जों भेटि तया दिली नसे वातें ॥
यदु-बळ नभेटतां आरि मारा, जें अन्य मत, न सेवा तें१७
ऐसें स्व-मत तुह्मांला कथितों मी आप्त ह्मणुनि मायेनें ॥
मज आजि आजिनें फळ- सिद्धि दिसे जसि तसी न मायेनें"
धृतराष्ट्र ह्मणे "कर्णा, कथितों शक्रासि जीव जेंवि हित
कीं यदुवरांसि उद्धव, सांगसि मज तूं तसेंचि जें विहित
मग भीष्म-द्रोण-विदुर- सम्मत घ्याया समीप आणविले
त्यांला वृद्ध-सुयोधन- कर्णानीं निज-विचार जाणविले२०
गांगेय ह्मणे "वत्सा, गांधारी-नन्दना स्व भावांसीं ॥
न वरा विरोध दुष्टां- सींहि, करिल कोण सु-स्वभावांसीं
मज ते तुह्मी सम, जसा धृतराष्ट्र, तसाचि पाण्डुराजा गा
कुरुवंश हा जयास्तव सुयशा डिंडीरं-पांडुरा जागा २२॥
तुमचें, तसेंचि त्यांचें राज्य, तयां भाग द्या, समन्यूनें[13] ॥

१ प्रेत. २ भीमरहित. ३ अनेक वाईट उपाय. ४ दुष्ट विचार-रूप बेडूक ज्यांत अशा कूपाला ह्म० दुर्योधनाला. ५ हरिणाचें पोर. ६ मृगप- उर ह्म० सिंहाचें हृदय. ७ युद्धानें. ८ कपटानें. ९ बृहस्पति. १० श्रीकृष्णाला. ११ वृद्ध धृतराष्ट्र. १२ फेंसा प्रमाणें शुभ्र. हें सुयशाचें विशेषण. १३ सम किंवा न्यून हें अंशाचें विशेषण.

अंशें, अनिष्ट धरितां धन्व करीं अर्जुनें समन्यूनें ॥ २३ ॥
वैरें भस्म करावें न कुरु-कुळा, जेंवि कानना दावें ॥
यश, सुख, पुण्य, मिळे; मग बंधूनीं कां न नीट नांदावें?
साम-जळें प्रक्षाळा, व्याकुळ करितें महाऽपयश मातें ॥
तप्तहि सन्मन धरितें पुनरपि वरितें महा पय शमातें॥ २५
साधील हरिमुखींचा कोणी घालोनि हात कवळा हो ॥
दुर्मिळ पांडुसुतामिष, न तुह्मी व्हा आत्मघातक,वळा हो"
द्रोण ह्मणे "धृतराष्ट्रा, पुसतां, जें युक्त, तेंचि सांगावें ॥
सुजनीं, सुजनें त्यागुनि हरिगीत ग्राम्य-गीत कां गावें२७
तिकडे साम-पटु पुरुष शीघ्र तुह्मांकडुन आत्मसम जावा॥
द्या अर्धराज्य, त्यांला आणा, चित्तीं धरोनि समजावा२८
धाडा उत्तम वस्त्रें, रत्नाऽलंकार, हार, अथवा जी ॥
हे संपत्ति समर्पा, भेपा पंत्ति द्विपेंद्र रथ वाजी" ॥ २९ ॥
कर्ण ह्मणे "मेळवुनी प्रभुपासूनी प्रभूत धन मान॥
बहु अंतरग होउनि करिती स्वाऽर्थार्जनीं न अनमान ३०
प्रभुचें नकरिति आपण यद्यपि नय-धर्म-पटु तथापि हित॥
अद्भुत हितशत्रुत्व न उमजे सद्रीतिसत्कथापिहित॥ ३१॥

---

१ धनुष्य. २सक्रोध, अज्ञानें. ३वणव्यानें. ४सख्यरूप उदकानें. ५ उत्साहाला. ६ शांतीला. ७ ग्रासाला. ८ पांडवरूपी मांस. ९ गांवढळ गाणें लावण्यावगैरे. १० सख्य करण्यांत कुशल. ११ समजून. १२पाठवा. १३ पायदळ.१४ हत्ती. १५घोडे.१६पुष्कळ. १७जिवलग. १८नीति व धर्म ह्यांत निपुण. १९हित दाखवून शत्रुत्व करणारे. २०उत्तम रीति व उत्तम कथा यांनीं आच्छादित, प्रभु.

शठ-मित्र-मंत्र-पान[1] प्राज्ञ-मतें[2] परम विषम[3] रायाला ॥
हें घडतां नलगेचि प्राशावें इतर विष मरायाला ॥ ३२ ॥
शिष्ट ह्मणति 'दिष्ट[4] खरें सुख-दुःखद विष्टपीं[5]' जसें इष्ट॥
किंवा अनिष्ट करितें, मित्र तसें, अन्य कल्पन[6] क्लिष्ट,[7] ३३॥
लोकांत सावधपणें, शब्दें, हित अहित बोळखा वागा"॥
दुर्योधना सख्या, बहु बोलुनि व्यर्थ काय बोळखा गा?
द्रोण ह्मणे "आह्मी हित- शत्रु, न तूं, सुप्त-सर्प तुडवाया॥
सांगसि जो दाटूनी[8] व्यसन-विष-महाऽर्णवांत[9] बुडवाया ३५
रे कर्ण, दीर्घदर्शी जो, तोचि मनुष्य, अन्यथा नरसा ॥
दिसला, तरि पशु, ज्या दे,मालेचें त्या न अन्य थान रसा
सेवितया,[10] वृद्धाचें मंत्रित हित, हित तसें न तरुणाचें ॥
विष ह्मणसि कसें त्याला, अमृताऽधिक उक्त जें सकरुणाचें
झाला असतां प्राप्त क्षयनामा काळ-वल्लभ[11] व्याधी ॥
क्षीणांवलाचि[12] वाटे वैद्याची स्वाहिताचि[13] भव्या धीं"३८॥
विदुर ह्मणे "दादाजी, करिताहे ज्यासि आ पतितें[14] ऊनीं[15]॥
पाजिलियाहि धरावें तिळभराहि न जेंवि आंप[16] तितऊनीं[17]
तैसेचि हे, गुरूक्ता तापत्रयतप्त सुज्ञ आ पसरी ॥

१ ठक अशा मित्राच्या मसलतीचें सेवन. २ सुज्ञांच्या मतानें. ३ दुःसह. ४ दैव. ५ जगांत. ६ तर्क. ७ असंगत. ८ निजलेला. ९ संकटरूप विषाच्या महासागरांत. १० सेवन करणारास. ११ काळाचा मित्र. १२ ज्याचें आयुष्य सरलें त्यास. १३ आपल्या अकल्याणाची. १४ ज्या आपासि ह्म० उदकाला. १५ पडलेला. १६ उनांत. १७ उदक. १८ चाळणींनीं.

जडचि नघे, ज्याची कारें अमृत न,सुरसिंधुचेंहि आप सरी
भीष्मोक्तासि न देसी मन, देउनि काय त्यांविना कर्ण॥
गुरुमूक्तासहि तुमचा हितकरवर सूक्त मानिना कर्ण॥
काय न हितवाग् गुरु हे, हितवाग् गुरुहूनि काय गा बाळ
टाकूनि सार सुज्ञा, गोळा करितोसि काय गावाळ ४२॥
दुर्योधनकर्ण-शकुनि-मंत्र महा-घात-कर अगा राया॥
बालोक्तीं वश होउनि लाविसि शोकाऽग्नि कां अगारा या
पूर्वज-संपादित, जें करितो ज्ञाता भला जतन यश तें॥
तुझिया तों लोभ-हत- ज्ञानें त्यजिलीच लाज तनय-शतें
पांच न ते, पांचशतें, पांडुतनय वीर-धीर-हीरमणी॥
हे काच साच नाचति, परि राज्यश्री न मंदधी-रमणी ४५
धर्मीं युधिष्ठिर निरत, युधिष्ठिरीं स-बळ वृष्णि-वर शौरी
त्या शौरिच्याचि ठायीं विजयश्री, जेंवि शंकरीं गौरी ४६॥
यदु-सिंह सहाय जयां, त्यांला वधितील बाळ हे राया, ॥
न समर्थ वक्रनेत्रें पांडुकुमारांसि काळ हेराया ॥ ४७ ॥
तैं या कुळाहिताच्या त्वां केलें दृढ न मानस त्यागा ॥

१ गंगेचें. २ बरोबरी. ३ त्या मनावांचून. ४ कान. ५ हित करणारांमध्यें प्रमुख. ६ हितवचन. ७ हितवचन बोलणारे. ८ मूर्खाच्या भाषणाला. ९ गृहाला. १० लोभानें नष्ट झालें ज्ञान ज्याचें. ११ शूर व स्थिरचित्त अशा पुरुषांमध्यें हिरे. १२ अल्प-बुद्धीचे पुरुषाची स्त्री. १३ बलरामासहित. १४ यादवांत श्रेष्ठ. १५ श्रीकृष्ण. १६ पार्वती. १७ पाहण्यास. १८ कुळांचा शत्रु दुर्योधन, त्याच्या.

अद्यापि तरी राया ती माझी उक्ति मान सत्या गा" ४८
धृतराष्ट्र ह्मणे "विदुरा, सर्वज्ञा, भरत-कुळ-हिता, भ्रात्या,
युष्मद्वचनां भजतों मी, जेंवि भजे शिखी हिताभ्रांसा
वास्तव मज लावितसे आचार्य, द्रोण, बोल तातँहि तें ॥
कर्म कशास? अगा, जे हित वचनें तेचि बोलतात हि तें५०
माझेचि पुत्र पांडव, त्यांचें, यांचेंहि, होय सम राज्य ॥
वैराऽग्नि पेटवाया दाटुनि सिंचील? कोण समराज्य ५१
जा, पांडव घेउनि ये, जें लागेल प्रभूत वसु,ने तें ॥
पाहोत तूर्ण, विदुरा, भीष्म द्रोण प्रभू तव सुनेतें ॥ ५२ ॥
मान्य बृहस्पतिला तूं, वक्त्यांचा साधुराय, काव्यांही ॥
आह्मांवरी प्रसन्न- स्वांत करीं बंधुनायका, व्याही"॥५३॥
राजाज्ञेनें भेटे विदुर द्रुपदा नृपा सदिष्टातें ॥
मग पांडवबलभद्र- प्रभुसहिता सांवळ्या सदिष्टातें ॥ ५४॥
वस्त्राऽलंकारांहीं द्रुपदप्रमुखांसि कवि अळंकारी ॥
विदुरप्रियार्थ सर्वां सह घे तो भोजकुळकंळकारी ॥५५ ॥
विदुर ह्मणे, द्रुपदातें "तुज ह्मणतो यां मुखें असें व्याही ॥

---

१ तुमच्या भाषणाला. २ मोर. ३ हितकारक मेघाला. ४ भीष्म देखील. ५ मित्र. ६ हितें, वचनें याचें वि० ७ युद्ध हेंच तूप. ८ पुष्कळ. ९ द्रव्य. १० लौकर. ११ शुक्राचार्याला. १२ प्रसन्न मन ज्याचें तो. १३ दैवशाली द्रुपदाला. १४ साधूंचें हित करणाऱ्या श्रीकृष्णाला. १५ सुज्ञ विदुर. १६ भोजकुळास कलंक लावणारा कंस,त्याचा शत्रु श्रीकृष्ण. १७ या विदुराच्या मुखानें. १८ धृतराष्ट्र.

नातें तुझें मधुर हें, न रसा मधुरत्व देवसेव्याही ॥ ५८ ॥
नंदननामें सुत, सुकृत केलें त्वां हें करूनि नव नातें ॥
श्रवणें जसी सुखदता, या आजि सुरांचियाहि न वनातें॥
सीतेस्तव अर्कातें, कृष्णेस्तव कीं स्व वंश, सोमातें ॥
बहु मान्य आजि, राया, यावरि सुतविरह हा जसो मातें
यामार्गे न तसें मज आजि जसें दुःख एक गा राया ॥
कृष्णाविलोकनसुखा पात्र न, गारा नसोनि गारा या५९
ज्यांहीं साकेतींचें श्रुत केलें कुतुक, नरवरा, ते तें ॥
या गजपुरीं स्मरोत प्रेक्षुनि सस्त्रीक नर वरातेंतें" ॥६०॥
द्रुपद ह्मणे "विदुरा, म्यां काय वदावें ?तुला सकळ कळतें
प्रेक्षकमन बहु चरणें चुरितां वंद्या फुलास कळकळतें ६१
वर्तेन तसेंचि, जसें विहित तुह्मीं परम आप्त सांगाल ॥
अमृत भरवितां सकृपें फुगविल स्वहितकामि कां गाल" ६२
धर्म ह्मणे "ताता, तूं, द्रुपदनृपति, राम, कृष्ण, परम हित
सांगाल तसेंचि करूं, आह्मां न तुह्मांपरीस परमहित" ६३
कृष्ण "ह्मणे धर्मा, जा, कीं आला न्यावया स्वयें चुलता

---

१ देवांनीं सेवन करण्यास योग्य रस जें अमृत त्याला. २ नंदन ह्म० आनन्दकारक. नन्दन हें नाम सुताला व नन्दन वनाला देतात. त्वां हें नव नातें करून सुताला दिलेलें नन्दन हें नांव आज सुकृत ह्म० यथार्थ केलें. ३ सूर्याला. ४ चन्द्राला. ५ अयोध्येचें. ६ आत्महितेच्छु. ७ अत्यन्त मान्य.

धृतराष्ट्र वांचला त्वत्- कुशळें, नाहीं तरी उरीं उलता[१] ६४
कोणेंहि पाविजेल स्वप्नींहि विनाश न विदुराधीनें[२] ॥
व्याकुळ होऊं देइल न तुझ्यां हा साधु कवि दुराधीनें[३]" ६५
प्रणतां देतें ज्याच्या पदपद्माचें सदा रज गतीतें ॥
त्या प्रभुमतें परततां बहु सुखविति ते सदार[४] जगतीतें ६६
कृष्णाग्रजावरज[५] बळ- कृष्णाश्रित[६] करुनि कीर्तिला जतन
कृष्णात्मजकुलनंदन[७] कृष्णापति वीर पावले वतन॥६७॥
धृतराष्ट्रनृपप्रहित[८] द्रोणकृपविकर्णचित्रसेनांहीं ॥
नगरांत आणिले ते पांडव वेष्टूनि चित्र सेनांहीं ॥ ६८ ॥
पौर ह्मणति " जसि द्यावी येउनि गहना[९] प्रभा वसंतानें
तसि पांडुच्या दिली या नगरा अतुलप्रभावसंतानें[१०]" ६९
ह्मणति स्त्रिया "पुरश्री जाणुनि समजाउनी स्वयें भार्या
होउनि घेउनि आली, वाटे, द्रुपदात्मजा न व्हे, आर्या ७०
पांडव नव्हेत, हे घन, यांची हे सहचरी[११] सुतनु[१२] शंपा[१३] ॥
या स्वविरहदवहतपुर- विपिनीं[१४] केली उदंड अनुकंपा[१५] ७१

---

१ फुटला असता. २ विदुराधीन मनुष्यानें. ३ दुष्ट चिंतेनें. ४ स्त्रीसहवर्तमान. ५ कृष्ण ह्म० अर्जुन, त्याचे अग्रज धर्म व भीम, आणि अवरज नकुल व सहदेव. ६ रामकृष्णांचे आश्रित. ७ कृष्ण ह्म० व्यास, त्याचा आत्मज पांडु, त्याच्या वंशांतील पुत्र पांडव. ८ पाठविलेले, ९ वनाला. १० अनुपम पराक्रमी पुत्रानें. ११ सखी. १२ सुंदर शरीराची. १३ वीज. १४ आपला वियोग हाच वणवा. त्यानें नष्ट झालेलें पुर हेंच अरण्य, त्यांत; १५ दया.

सितकाक[1] मानसश्री[2] कर नोहे करुनियां अधं[3] मराळा[4] ॥
शालि[5] कनक पात्रोचित[6] न धरुनिहि सुवृत्तता[7] अधम राळा[8]
प्रभु राम कृष्ण हे तों चिंतामणिचे श्रिता जना वाडे ॥
अपत्सरिदुत्तारक[9] धर्माचे आप्तराज[10] नावाडे[11]" ॥ ७३ ॥
ऐसें श्रवण करीत प्रियजनहृत्सरसिजांसि[12] फुलवीत ॥
उलवीत[13] असदुरातें[14] कुरु-राज्य-श्री-मनासि भुलवीत॥७४॥
जावुनि पांडव भीष्म- प्रमुखगुरु-जनाचिया पदीं नमनें ॥
करुनि निज-प्रासादीं[15]- माजि सुखें राहिले अदीनमनें[16] ७५
कांहीं काळ कुरु-पुरीं होते, सामें तयांसि मग राजा ॥
अंध "ह्मणे राज्यार्ध स्वीकारा, या त्यजूनि नगरा, जा ॥
राज्य करा, नगर रचा, वसवा वासार्ह[17] खांडवप्रस्थ[18] ॥
चांदांची वृद्धि असो,[19] नांदा सानंद सानुग स्वस्थ ॥७७॥

---

१ पांढरा कावळा. २ मानस सरोवराला शोभा आणणारा. ३ खालीं. ४ हंसाला. ५ शालीनामक धान्य. ६ सुवर्णपात्रांत राहण्यास योग्य. ७ उत्कृष्ट वर्तुलाकारता. ८ हें एक धान्य आहे. ९ विपत्तिरूप नदीच्या परतीरास नेणारे. १० आप्तांत श्रेष्ठ. ११ नौकावाहक. १२ प्रियजनांच्या हृदयरूप कमळास. १३ फोडीत. १४ शत्रूच्या हृदयाला. १५ राजवाड्यांत. १६ उदार मनानें. १७ वसतीस योग्य. १८ इंद्रप्रस्थ. १९ चंद्राची वृद्धि तुह्माला असो.

भ्रात्यांत पुन्हा विग्रह न प्रकटावा, न पूर्व[1] तापावे, ॥
कुलज-विरोधें संतत ताप गुण मनीं अपूर्वता[2] पावे" ॥७८॥
वंदुनि पित्यासि साऽच्युत[3] पाडवहि चतुर्मुखांडवप्रस्था[4] ॥
स्व-पशासि घालवाया बाहिर, गेले स्वखांडवप्रस्था[5] ७९
तेथें त्रिभुवन[6]-शिल्पी प्रभु आपण कथुनि युक्तिला, पुर तें,
जें रचवी धर्माचें, निरुपम झालें नसेल कां पुरतें ॥८०॥
प्रभु पुर असें रची कीं, हरिसा सानंद[7] धर्मसुत[8] राहो ॥
सर्वजनांसहि दुस्तर सुरभोगेच्छापगा[9]हि सुतरा[10] हो ॥८१॥
जें प्रभु-दर्शन दुर्लभ कामित[11] नाकींहि[12] तेंहि तें पुर वी[13]॥
मग कोणतीं न संश्रित- लोकांचीं कामितें हि तें पुरवी॥
तें न पुर, प्रभुनें रस- पूर्ण स्व-जनासि वाढिलें पात्र ॥
चोळिति निजागुणें[14] कर बहु मलिन-प्रकृति मक्षिका मात्र
स्थापुनि सन्मणि-कनकें[15]- प्रासादीं पांडवांसि राम हरी ॥
गेले द्वारवतीतें[16] गात्यांचा[17] श्रम यदीय नाम हरी ॥ ८४॥

---

१ पूर्वज. २ अ, हा वर्ण पूर्वी असणें. झ० अनुताप. ३ श्रीकृष्णासह. ४ चतुर्मुख—अण्ड-वप्रस्थ झ० ब्रह्मांडरूप तटावर राहणारें, अशा. ५ आपल्या इंद्रप्रस्थ नगरास. ६ त्रिभुवन तयार करणारा कारागीर. ७ आनंदानें. ८ यम पुत्र. ९ देवभोगांची इच्छा हीच नदी. १० तरण्यास सुलभ. ११ इच्छित. १२ स्वर्गांत ही. १३ प्रसवे. १४ आपल्या दुर्गुणानें. १५ उत्तम रत्नें व स्वर्ण यांनीं तयार केलेल्या वाड्यांत. १६ द्वारकेस. १७ ज्यांचें.

# अध्याय ३७ वा.

## सारांश.

[ १—१०४ ] पांडव खाण्डवप्रस्थ येथें जाऊन राहिले. तेथें त्यास नारद भेटला. तो ह्मणाला "एक स्त्री, व तुह्मी पांच असामी आहां. करितां परस्परांत वैर उत्पन्न होणार नाहीं अशी वर्तणूक करा. नाहींतर सुंदोपसुंदांप्रमाणें नाश पावाल." तें ऐकून धर्म ह्मणाला. "आह्मां पैकीं प्रत्येक क्रमें करून द्रौपदीचें सेवन करील. तो द्रौपदीसह एकांतांत असतां त्यास जो कोणी पाहील त्यानें ब्रह्मचर्य धारण करून बारा वर्षें वनवास करावा. पांडवां कडून वरील नियम करवून नारद निघून गेला.

त्या वर एके दिवशीं एका ब्राह्मणाच्या गाई चोरांनीं नेल्या. तो ब्राह्मण ओरडत राजा कडे आला. त्या वेळीं धर्मराज द्रौपदीसह एकांतीं होता. त्याच मंदिरांत अर्जुनाचीं शस्त्रास्त्रें होतीं. तीं घेऊन अर्जुनानें चोरांचा वध केला. व गाई ब्रह्माणास दिल्या. पुढें एकांतांत धर्म व द्रौपदी ह्यांस पाहिलें, त्या बद्दल अर्जुन धर्मास विचारून तीर्थाटनास गेला. तो गंगाद्वारीं गेला असतां, तेथें त्यानें कौरव्यनामक नागाची कन्या उलूपी व चित्रवाहनकन्या चित्रांगदा ह्यांस वरिलें. मग द्वारकेस जाऊन सुभद्राहरण केलें. सुभद्रेस अभिमन्यु हा पुत्र झाला.

द्रौपदीस ही क्रमें करून प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकर्मा, शतानीक व श्रुतसेन असे पांचांपासून पांच पुत्र झाले.

एका समयीं पांडव यमुनेंत क्रीडत होते. तेथें अग्नि, ब्राह्मणवेषानें आला. श्वेतकि राजानें यज्ञ केला. त्यांत त्यानें बारावर्षें पर्यंत तुपाची धार अग्नींत धरिली. तेणें करून तो रोगी झाला होता. तो औषधाकरितां खाण्डववन खावयास मागूं लागला. तें वन इंद्राचें होतें. अग्नीनें श्रीकृष्णास सुदर्शन चक्र व अर्जुनास अक्षय भाते, गांडीवधनुष्य व विजयी रथ दिला. त्या रथांत बसून कृष्णार्जुनांनीं इंद्राशीं लढून त्याचा पराभव केला. व अग्नीस खाण्डववन देऊन संतुष्ट केलें.

इंद्रप्रस्थीं राया, धर्माला ह्मणति लोक "हा राम ॥
साधु, विवेकी, कामद; अधिक न जड कल्पभूरुहारामें १॥
न पराचें, आवडलें धर्माचें त्या प्रजेसि नव राज्य ॥
रसनेसि वराज्यें जसें गव्यचि, माहिष गमेल न वराज्य २
तेथें नारद आला, पूजूनि तयासि धर्म तन्नमना ॥
कृष्णेसि आणवी, ती वंदी, मुनि होय सु-प्रसन्नमना ॥३
तीस ह्मणे "सति पतिमति- रतिदा हो, राज्ञिपुत्र हा राजा

१ कल्पवृक्षांचा बाग. २ जिभेला. ३ उत्तम तूप. ४ गाईचें. ५ ह्मशीचें. ६ सुप्रसन्न मन ज्याचें तो. ७ पतीचा मनोरथ पूर्ण करणारी.

साऽनुज नांदो तुजसीं चिर, विरह नसो, करा विहारा, जा"
कृष्णा जाय, मग ह्मणे श्रीनारद पांडवांसि "पौरवं हो
नयशील-धर्मरक्षा- प्राप्त तुह्मां सत्सभेंत गौरव हो ॥ ६ ॥
एक स्त्री, पांच तुह्मी, भेद घडेना असी करा नीती ॥
प्रीति-क्षतिकर-विषयां- पासुन बहु साधुमानसीं भीती ॥
धर्मा, एकस्त्रीच्छु भ्राते भेदासि पावले मागें ॥
एकात्मेही मेले, ऐकावें तें तुवां महाभागें ॥ ७ ॥
कनक-कशिपु-कुळ-संभव होते सुंदोपसुंद, ते देहें ॥
कीं नामें भिन्न; मनें एकचि, विख्यात अद्भुत-स्नेहें ॥८॥
ब्रह्मांडाचा स्वतप- स्तेजें अतितप्त करुनि ते मध्य ॥
परमेष्ठि-वरें झाले अतुळ- बळें स्वेतरांखिलावध्य ॥ ९ ॥
त्रस्त-तर-सुर-प्रार्थित- विधि-वचनें चतुर विश्वकर्मा तें ॥
व्यसन हराया, द्याया निज-कौशल्यें सुरांसि शर्मातें१०
लोक-त्रय-स्थ तिळ तिळ उत्तम लावण्य मेळवुनि यत्नें ॥
स्त्रीरत्न रची, जाणो अवयव ते न, खचिलींच तीं रत्नें११

१ पुरुवंशोत्पन्न पांडवहो. २ नीति व सदाचरण यांनीं केलेलें जें धर्मरक्षण, त्या पासून मिळालेलें. ३ स्नेहाचा नाश करणाऱ्या विषयां पासून. ४ एका स्त्रीची इच्छा करणारे. ५ एक चित्ताचे. ६ दैवशालिपुरुषानें. ७ हिरण्यकशिपूच्या वंशांत जन्म ज्यांचें ते. ८ ब्रह्मदेवाच्या वरानें. ९ आपणां हून इतर सर्वां कडून मारले जाण्यास अशक्य. १० अति पीडा पावलेल्या देवांनीं प्रार्थिलेल्या ब्रह्मदेवाचे वचनानें. ११ सुखाला. १२ तीन्ही लोकांतील.

द्रौपदीस ही क्रमें करून प्रतिविंध्य, सुतसोम, श्रुतकर्मा, शतानीक व श्रुतसेन असे पांचांपासून पांच पुत्र झाले.

एका समयीं पांडव यमुनेंत क्रीडत होते. तेथें अग्नि, ब्राह्मणवेषानें आला. श्वेतकि राजानें यज्ञ केला. त्यांत त्यानें बारावर्षे पर्यंत तुपाची धार अग्नींत धरिली. तेणें करून तो रोगी झाला होता. तो औषधाकरितां खाण्डववन खावयास मागूं लागला. तें वन इंद्राचें होतें. अग्नीनें श्रीकृष्णास सुदर्शन चक्र व अर्जुनास अक्षय भाते, गांडीवधनुष्य व विजयी रथ दिला. त्या रथांत बसून कृष्णार्जुनांनीं इंद्राशीं लढून त्याचा पराभव केला. व अग्नीस खाण्डववन देऊन संतुष्ट केलें.

इंद्रप्रस्थीं राया, धर्माला ह्मणति लोक "हा राम ॥
साधु, विवेकी, कामद; अधिक न जड कल्पभूरुहारामें[1] १॥
न पराचें, आवडलें धर्माचें त्या प्रजेसि नव राज्य ॥
रसनेसि[2] वराज्य[3] जसें गव्यचि[4], माहिष[5] गमेल न वराज्य २
तेथें नारद आला, पूजूनि तयासि धर्म तन्नमना[6] ॥
कृष्णेसि आणवी, ती वंदी, मुनि होय सु-प्रसन्नमना ॥३
तीस ह्मणे "सति पतिमति- रतिदा[7] हो, राज्ञिपुत्र हा राजा

१ कल्पवृक्षांचा बाग. २ जिभेला. ३ उत्तम तूप. ४ गाईचें. ५ ह्मशीचें. ६ सुप्रसन्न मन ज्याचें तो. ७ पतीचा मनोरथ पूर्ण करणारी.

साऽनुज नांदो तुजसीं चिर, विरह नसो, करा विहारा, जा"
कृष्णा जाय, मग ह्मणे श्रीनारद पांडवांसि " पौरव[1] हो
नयशीलें-धर्मरक्षा-[2] प्राप्त तुह्मां सत्सभेंत गौरव हो ॥ ६ ॥
एक स्त्री, पांच तुह्मी, भेद घडेना असी करा नीती ॥
प्रीति-क्षतिकरँ-विषयां-[3] पासुन बहु साधुमानसीं भीती ॥
धर्मा, एकस्त्रीच्छु[4] भ्राते भेदासि पावले मागें ॥
एकात्मेही[5] मेले, ऐकावें तें तुवां महाभागें[6] ॥ ७ ॥
कनक-कशिपु-कुळ-संभव[7] होते सुंदोपसुंद, ते देहें ॥
कीं नामें भिन्न; मनें एकचि, विख्यात अद्भुत-स्नेहें ॥८॥
ब्रह्मांडाचा स्वतप- स्तेजें अतितप्त करुनि ते मध्य ॥
परमेष्ठि-वरें[8] झाले अतुळ- बळें स्वेतरांखिलावध्य[9] ॥ ९ ॥
त्रस्त-तर-सुरँ-प्रार्थित-[10] विधि-वचनें चतुर विश्वकर्मा तें ॥
व्यसन हराया, द्याया निज-कौशल्यें सुरांसि शर्मातें[11] १०
लोक-त्रय-स्थ[12] तिळ तिळ उत्तम लावण्य मेळवुनि यत्नें ॥
स्त्रीरत्न रची, जाणों अवयव ते न, खचिलींच तीं रत्नें ११

---

१ पुरुवंशोत्पन्न पांडवहो. २ नीति व सदाचरण यांनीं केलेलें जें धर्मरक्षण, त्या पासून मिळालेलें. ३ स्नेहाचा नाश करणाऱ्या विषयां पासून. ४ एका स्त्रीची इच्छा करणारे. ५ एक चित्ताचे. ६ दैवशालिपुरुषानें. ७ हिरण्यकशिपूच्या वंशांत जन्म ज्यांचें ते. ८ ब्रह्मदेवाच्या वरानें. ९ आपणां हून इतर सर्वां कडून मारले जाण्यास अशक्य. १० अति पीडा पावलेल्या देवांनीं प्रार्थिलेल्या ब्रह्मदेवाचे वचनानें. ११ सुखाला. १२ तीन्ही लोकांतील.

नामें तिलोत्तमा ती, लावण्य तिचें नृपा, अपारचि तें ॥
जणें वेधावेंचि क्षण तरि, जें मन महातपा रचितें ॥१२॥
तीस ह्मणे द्रुहिण[1] "अये[2] देवि, त्रैलोक्यसुंदरि, पुनीते[3], ॥
वारीं ताप, जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते" ॥१३॥
ती, भुलले सुरहरिहर पाहुनि लोकैकसुंदरा, ज्याला[4] ॥
ब्रह्मनियोगें[5] दावी तें मोहक वदन सुंदराजाला ॥ १४ ॥
विंध्यवनीं ललनाजनं-[6] परिवृत ते दैत्यराज पीतसुर[7] ॥
स्वर्गाधिपत्य साधुनि होते स्व बळें करूनि भीत सुर॥१५
पुष्पावचयव्याजें[8], जैसी चपळा[9] घनीं, वनीं चपळ ॥
फिरतां, तिला पहाती, स्थिर पाहुनि बैसती न नीच पळ
अवलोकितांचि चित्तें तद्रूपीं जेंवि सुंद रमला हो ॥
उपसंदही ह्मणे 'हें प्राप्त स्त्रीरत्न सुंदर मला हो'॥१७॥
धांवुनि धरिति कर तिचे सोडुनि सुंदोपसुंद रीतीतें ॥
दोघांचेंहि कटाक्षें अनुमोदी कृत्य सुंदरी ती तें ॥ १८ ॥
सुंद ह्मणे "म्यां वरिली, सर परता, धरुनि हात तो डावा
गुरुदारधर्षणोद्यत[10] जो, तो लागेल हात तोडावा ॥ १९ ॥
उपसुंद ह्मणे "माझी न करावी धर्महानि करकरुनी ॥
कां धरिला मृदुकर? सर,हरहर! मरसील हा निकर[11] करुनी"

---

१ ब्रह्मदेव. २ हे. ( अव्यय.) ३ पवित्र. ४ ज्या वदनाला, पाहुनि सुरहरिहर भुलले, तें वदन, ती लोकैक सुंदरा, ब्रह्मनियोगें सुंदराजाला दावी. ५ ब्रह्मदेवाचे आज्ञेनें. ६ स्त्रीजनांनीं वेष्टिलेले. ७ सुरा ह्म० मद्य प्यालेल. ८ फुलें वेंचण्याच्या निमित्तानें. ९ वीज. १० गुरुजनाचे स्त्रीला स्पर्श करण्यास सिद्ध झालेला. ११ हें अयोग्य कर्म.

सुन्द जसा, उपसुन्दाहि  दे, देत्यातें जसें गगन गांळी ॥
ज्यासि अमर्प रुचे,तो  अन्ध विवेकासि कां मग न गाळी
सुन्दीं जैसा काम  क्रोध उठे, तदनुजीं तसाचि तदा ॥
बिम्बप्रतिबिम्बचि ते,  घे ज्येष्ठ, कनिष्ठही तसीच गदा२२
सुन्दाची उपसुन्दीं,  उपसुन्दाची गदा पडे सुन्दीं॥
तन्मरणमुदुद्धासें  गणपतिच्या कळ नुठेल कां तुन्दीं॥२३॥
परम सखे होते, परि  एक-स्त्री-रत्न-भोग-कामुक ते ॥
मेलेचि, जरि न ऐसें करिते, तरि जीवनासि कां मुकते?३४
ह्मणुनि तुह्मी स्व-स्नेह-प्राण-यशो-व्यय न होय, सुख वाढे,॥
ऐसें वर्ता बुध हो,  कद्धहि सदुपदेश हित,जसे काढे" ॥२५
पांडव ह्मणति "गुरुवरें  हित कथिलें,अमृत पाजिलें कानीं
अवलोकिला बहुदिसां  राजर्षी पांडु आजि लेंकांनीं ॥
आह्मांत जो द्रुपदजा-  सहिता पाहेल केलिच्या भवनीं ॥
तो ब्रह्मचारि-धर्में  वर्तेल द्वादशाब्द-काळ वनीं" ॥ २७ ॥
समय असा करवुनि मुनि  गेल्यावर एकदां असें घडलें ॥
गोधन कोणा एका  विप्राचें दस्युच्या करीं पडलें ॥२८॥
तो द्विज शक्रस्पर्धी  हाका मारी ह्मणे" अगा राया, ॥

---

१ शिव्या. गगनास शिव्या देणाराला तें उलट शिव्या देतें ह्म० प्रतिध्वनि होतो. २ क्रोध. ३ तत्-,मरण-मुद्-उद्धास. ह्म० त्यांच्या मृत्यूच्या आनंदानें आलेलें मोठें हांसें ४ पोटांत. ५ गुरु-श्रेष्ठानें. ६ विलासाच्या. ७ मंदिरांत. ८ नियम. ९ गांईचा समूह. १० चोराच्या

संरक्षितोसि राष्ट्रा- प्रति, कीं तूं आपुल्या अगारा या२९
दुष्ट-विनाशें यश बहु वाढो ह्मणती न, ते खंचो[1] राजे ॥
ते साधु भूप, देती सुख साधुजनासि, दुःख चोरा जे ३५
चोरापह्त-ब्राह्मणें[2]- गोधन, निज-कीर्ति-धन उठा राखा॥
न ह्मणो पुनरपि भगवान् राम[3] "क्षत्रिय-कुळा कुठारा[4] खा"
न द्विजगोधन केवळ नेलें, तुमचेंहि सुयश, धांवाहो ॥
धांवारे पांडव हो, ह्मणतां[5] रक्षाऽर्ह वस्तु कां वाहो"॥ ३२
तें ऐकतांचि "माभै- विप्र" ह्मणे, सद्वनैकरसं[6] कृष्ण[7] ॥
परि तें शस्त्राऽगारीं[8], होता श्री-धर्म-भूवरें[9] सकृष्णें[10] ॥३३॥
वासवि[11] पडे विचारीं, कैसा हा स्वकृत-नियम मोडावा॥
रक्षण नकरुनि, कैसा विप्राचा अप्रसाद[12] जोडावा ॥३४॥
विप्रार्थ[13]चि रक्षावा; लागो निज-नियम-लंघनें शब्द ॥
बारा सारावे वन- वासीं, बुध शतहि सारिती अब्द ३५
निश्चय करुनि असा तो शस्त्राऽगारीं शिरे, नमूनि नृपा॥
धनु घेउनि चोर वधुनि संपादी कार्य करुनि विप्र-कृपा ३६
मग बहुकष्टें धर्में आज्ञा दिधली, सुखें न, वनवासा ॥

---

१ नष्ट होवोत. अनेक वचना बद्दल एक वचन, हें निरंकुशत्व. २ चोरांनीं नेलेल्या ब्राह्मणाच्या गाई. ३ परशुराम. ४ हे परशो. हे विप्र, माभैः ह्म०हे ब्राह्मणा, भिऊं नको. ६ साधूंच्या रक्षणा विषयीं मोठी प्रीति ज्यास. ७ अर्जुन. ८ शस्त्रगृहांत. ९ राजा. १० द्रौपदीसह. ११ वासव ह्म० इंद्र. त्याचा पुत्र अर्जुन. १२ अवकृपा. १३ विप्राचा अर्थ ह्म० वस्तु, गोरूप.

तीर्थाटनीं धनंजय उत्सव पावे सदा नवनवासा ॥ ३७ ॥
त्या तीर्थपरा[1] प्रभुला बहु मानवती सुरर्षि नाकर्षी ॥
कामाकुला[2] उलूपी[3] गंगाद्वारीं जळांत आकर्षी ॥
ती ऐरावत-नागप- वंशजकौरव्य[4]-कन्यका आर्या ॥
नेवूनि नागलोकीं पितृगेहीं होय जिष्णुची भार्या ३९ ॥
चित्रांगदाहि[5] वरिली मणिपूराऽधीश-चित्रवाहनजा ॥
ज्ञात्यास न व्रतच्युति[6], विषयांचा वाहवि प्रवाह न जा[7]॥
तैशाच पावल्या ज्या होत्या ग्राहत्व[8] अप्सरा शापें ॥
त्या पांचहि उद्धरिल्या तीर्थीं पार्थें हरूनियां पापें ॥४१॥
तीर्थें पाहत पाहत गेला तो वासवि प्रभासा[9] जों ॥
भेटुनि कृष्ण ह्मणे "ये दोघे सुखवूनि यदु-सभा साजों"४२
जो देवाश्रय-गर्वित[10]- मणिसानूप्रतिहि रैवतक[11] दापी॥
तेथें ने, नाविसरवे क्षणही तें इष्ट दैवत कदापी ॥ ४३ ॥
मिरवीत स्वपुरींत प्रभुनें नेला सिताश्व[12] वासवसा ॥
वृष्णि ह्मणति "अर्जुनजी, येथेंचि पुरे करा प्रवास, वसा"

---

१ तीर्थाटना विषयीं तत्पर अशा अर्जुनाला. २ कामपीडित. ३ ही एक नागकन्या. ४ हा एक नाग. ५ मणिपूरचा राजा चित्रवाहन याची कन्या. ६ व्रतापासून भ्रष्ट होणें. ७ जाला. ८ सुसरीचा जन्म. ९ उत्तर हिंदुस्थानांत एक पुण्यतीर्थ आहे, त्यास. १० देववसतीमुळें गर्विष्ठ अशा मेरूलाही. ११ हा एक पर्वत आहे. १२ ज्याच्या रथाचे घोडे पांढरे आहेत असा अर्जुन.

वसुदेवें आदरिला   बहु करुनि तदात्मरंजना भाचा ॥
सर्वत्र मान पावे   साधु सखा भक्त कंजनाभाचा[१] ॥ ४८ ॥
कुन्ती-सुतें सुभद्रा   नवरी वसुदेव-कन्यका सुरुची[२] ॥
देखिलि अनुजा मनुजाऽकारधरा[३] त्या विरिंचिच्या[४] गुरुची ॥
अमृतांशुची[५] अहंकृति सर्व जिच्या नाशिली मुखानें ती ॥
तद्धृतिसे[६] होय त्वद्दर्यी   हाणुनि नयना-शिलीमुखा[७] नेती ॥
जाणोनि भाव, भक्त-   प्रियकर हांसे, ह्मणे "मन कुलीनें ॥
त्वां नदिलें, परि नेलें   करुनि बळ पहा कसें पटु मुलीनें"
पार्थ ह्मणे, "तूं चेत-[८]   श्चोर, तसीच स्वसा[९] तुझी देवा ॥
मोहाव्या स्मरहर[१८], हर   हर! तेथें आमुचा किती केवा[१०]" ॥ ४९ ॥
करुनि कृपा कृष्ण ह्मणे "अर्जुनजी, तरि मुलीस पळवा ही
पळ वाहो कोपें बळें[११], हे तनु अतनुज्वरें[१२] न पळ वाहो" ५० ॥
शीघ्रंचर[१३] चर[१४] प्रेषुनि   धर्माज्ञा जाणवूनि मग तीतें ॥
पळवी, पळ वीशानें[१५]   हरिलीसें वाटवूनि[१६] जगतीतें ॥ ५१ ॥
रैवतनगोत्सवीं[१७] ती   हरिली, ऐकूनि राम कर चोळी ॥

---

१ कंज ह्म० कमल, नाभीच्या ठायीं ज्याच्या तो श्रीकृष्ण. २ सुंदर. ३ मनुष्याचा आकार धरणारी. ४ ब्रह्मदेवाचा गुरु ह्म० पिता श्रीकृष्ण. ५ चंद्राची. ६ त्याच्या धैर्यास. ७ बाणाला. ८ चित्त चोरणारा. ९ भगिनी. १० पाड. ११ बलराम. १२ कामज्वरानें. १३ जलद चालणारा. १४ दूत. १५ गरुडानें. १६ भासवून. १७ रैवत पर्वताच्या उत्साहांत. १८ शंकर.

नुरवी रिपु-दार-जनीं जो तच्छोभाविरामकर चोळी८२॥
यादव सर्वहि झाले सिद्ध, परि हरि स्वयें न लेश वदे ॥
बळभद्र ह्मणे "ऐका यादवहो, न मन यांत केशव दे॥८३
बसला उगाचि मौन- व्रत धरुनि, स्वस्थ कुतुक पाहतसे॥
थांबा, यासि पुसोंद्या, कां हा स्वाऽतिक्रमासि साहतसे"
ऐसें ह्मणूनि बळ, बळ पळभर तें स्थिर करूनि भावाला॥
आपण पुसे"उगा कां, वद, जाणोंदे त्वदीय-भावाला८५
माझ्या मतें वधावें त्या यदु-कुरु-कीर्ति-नाशका पापा ॥
जेणें भलें ह्मणविलें पाजुनि पय पाळिल्या खळा सापा ॥
आह्मीं, तुझा सखा, या- भावें तो पूजिला सदा सुरसा॥
सर्पा अर्पावें जें, विषपण येतें तया पया सुरसा ॥
ज्यांत सदनें जेवी, भंगी हाणोनि दुष्ट लत्ता तें ॥
न कृतघ्न उपेक्षावा, शीघ्र वधावें अशा प्रमत्तातें ॥ ८८॥
स्वयशोघ्न जो, वधावा. तुज आजि उपेक्षणीय कां गमला
करिसी काय विचार स्पष्टतर स्वमत शीघ्र सांग मला"॥
कृष्ण ह्मणे "दादाजी, पडला आहे असा विचार मला॥
कीं भगिनी-हरणास्तव जिष्णु तुह्मां दुष्ट वध्यसा गमला॥
कन्येच्या लाभाचा निश्चय नाहीं स्वयंवरीं स्पष्ट ॥
द्यावें दान, दिलें तरि, हें कर्महि मानधन-जना कष्ट ९१॥

---

१ त्या रिपुस्त्रियांच्या शोभेचा नाश करणारा. २ दुष्टाला. ३ जेणें सापा,भलें ह्मणविलें. ह्म० जो सापापेक्षां दुष्ट. ४ ज्या गृहांत. ५ उन्मत्ताला. ६ स्वयशाचा नाशक.

धन देवुनि घ्यावी, तरि न अपत्याचा भला करी विकरा॥
चित्तीं या दोषांच्या आणुनि त्या पंडितोत्तमें[2] निकरा[3]६२
युक्त प्रसह्यहरण[4] क्षत्र-प्रभवांसि[5] याचि भावानें ॥
यदु-कुरु-कुळ-कीर्तिकरें नवरी हरिली महार्भभावानें[6] ६३॥
मज तों असेंचि दिसतें, कीं जो धर्मज्ञ, शुद्ध कुळ ज्याचें
तो अन्याय करीना, धर्मींच मन प्रसन्न कुळजाचें[7] ॥ ६४
कीं न पराभव त्याचा श्रीकण्ठ[8] करूं ह्मणेल, तरि त्याला
नाहीं अशक्य कांहीं दृग्पातें[9] भुवन भस्म करित्याला ॥
शक्ति पुरहरावांचुनि[10] पार्थ-परिभवीं[11] नसेचि अन्यास॥
पण न घडतां मरण, कीं मान-धन-जनास युक्त संन्यास॥
नचुके कन्या अन्या धन्या कवणा वरासि अर्पावी ॥
क्षितिधर[12] एकचि, न दुजा, कद्रूहि तशा दुज्या न सर्पा वी
यास्तव मज वाटतसे सुज्ञ प्रेषूनि पार्थ फिरवावा ॥
जिरवावा कोप मनीं भगिनी-सह तो पुरांत मिरवावा॥
केलें तसेंचि रामें वृष्णिपुरीं लग्न-कार्य साधूनी ॥
पार्थ स्व-पुरा आला गौरविला बन्धु-पौर-साधूंनीं ॥६९॥
कुन्तीतें नमुनि तिची आज्ञा घेवोनि फार शंकितसा[13] ॥

---

१ भला मनुष्य. २ अत्यंत विचारी अशा अर्जुनानें. ३ समूहाला. ४ बलात्कारानें हरण करणें. ५ क्षत्रियकुलोत्पन्न पुरुषाला ६ महा पराक्रम्यानें. ७ कुलीनाचें. ८ शंकर. ९ दृष्टि फेकण्यानें १० शंकरावांचून. ११ अर्जुनाच्या पराभवाविषयीं. १२ पृथ्वी धरणारा शेष. १३ भयभीत असा.

कृष्णेकडे हळु हळू एकाकी जिष्णु जाय अंकितसा[1]॥७०॥
प्रणयें[2] प्रिया[3] प्रियातें[4] स्मित[5] करुनि ह्मणे तया नरमणीतें[6] ॥
"दृष्टि निववली आजी. स्व-वियोगें घा भया न रमणीतें[7]
हा प्रेम-बन्ध पहिला, दुसरा तो प्रेम-बन्ध, दृढअन्य ॥
भाराचाही बन्ध प्रथम श्लथ[8] होय, जाणती वन्यें[9] ॥७२॥
मधुप[10] नव्या नलिनीला[11] सोडुन पहिलीस काय सेवील ॥
कां सद्यः[12] पक्वान्न त्यजुनि रसिक गतरसास[13] जेवील" ॥७३
जिष्णु ह्मणे" त्वद्रचितें[14] मज मिळतिल हे न गोडवे[15] दास्यें
लागति तुझ्या मुखें हे बोल, जसे शब्द गोड वेदास्यें[16] ॥
दास्यें तुझीं सुमति हे सुखविल, सुरसिंधु[17] जेवि गौरीची॥
मूर्ति धरुनि तुजकडे आली ही प्रीति जाण शौरीची[18]" ७५
बहु रंजवी प्रियेच्या करुनि परोपरि सुसांत्वनें[19] मनातें ॥
गोपीवेषें प्रेषी सेविल न द्रुपदजांघ्रि-नमनातें ॥ ७६ ॥
कृष्णेसि पट्टमहिषी- वेषें यावा न कोप या भावें ॥
वेष तसा करवी कीं आवृत[20] लावण्य तें तिचें व्हावें ॥७७

---

१ पराधीनसा. २ प्रेमानें. ३ द्रौपदी ४ अर्जुनाला. ५ हास्य. ६ पुरुषश्रेष्ठाला. ७ सुभद्रेला. ८ सैल, ढिला. ९ रानटी. १० भुंगा ११ कमलिनीस. १२ ताजें. १३ नीरस अन्नाला, शिळ्या अन्नाला. १४ त्वां केलेल्या. हें दास्याचें विशेषण. १५ गोडपणा. १६ वेदमुखानें. १७ गंगा. १८ श्रीकृष्णाची. १९ उत्तम समाधान. २० आच्छादित.

परि ती फारचि शोभे गुंजा-शिखि-पिच्छ-धातु-धर तीचे
भ्राते झाले चेतो- हर सांगा कोणत्या त गरतींचे ॥७८॥
"देवि, तुझी प्रेष्या मी," नमुनि असें ती ह्मणे स्व सवतीतें
कृष्णा बहु मानवली त्या नम्रपणें तिच्या प्रसवतीतें ॥
कृष्णा भेटोनि ह्मणे "नित्य असो निःसपत्न तव नवरा॥
नवनव राज्यसुख पहा, पाव सुताद्यखिलभर्व्यभवनवरा"८०
साऽक्रूरोद्धव-सात्यकि- वृष्णि-कटक-युक्त रामकृष्ण मग॥
आले आंदण घेउनि भक्तांचे मूर्तिमन्त देवनग ॥ ८१ ॥
भरलें तिहीं धनें पुर, राष्ट्रहि बहु, धर्मगृह न, केवळ तें ॥
चातक-मुखचि भरी कीं अभ्र भरायासि भूमिके वळतें८२
बल जाय, कृष्ण राहे, ठेवी न सुत, न वधू, न सेना, कीं
जें सुख भक्त-गृहीं या हरिस, तया हरिस[११] तें नसे नाकीं८३
शक्रप्रस्थीं असतां झाला नरवेष विष्णुला भाचा॥
फारचि कामुक होता स्वसख्यासह[१३] त्याचि जिष्णु लाभाचा
ह्मणति "पितृ-कृत-ध्यानें झाला तो बाळकृष्ण साच कवी"
आजवरीं निजचित्रें जो भासे बाळकृष्णसा चकवी॥ ८५

---

१ गुंजा, मयूरपिच्छें व गैरिकादि धातुरस धारण करणारे रामकृष्ण. २ मन हरणारे. ३ पतिसेवेंत तत्पर अशा स्त्रीचे. ४ दासी. ५ बहुमान्य झाली. ६ देवकीला. ७शत्रुरहित. ८ पुत्रादि सर्वसुखांचें घरच अशा वराला. ९ कल्पवृक्ष. १० मेघ. ११ इंद्राला. १२ स्वर्गात. १३ श्रीकृष्णासह. १४ पित्यानें केलेल्या कृष्णाचे ध्यानानें.

धरिली प्रभुनें,बहु निज-रूप-निरत जिष्णु, ह्मणतुनी तनु ती
हा तर्क फार बरवा, एक असो दोष, फार यांत नुती[१]८६
तो अभिमन्यु बहिश्चर[२] साक्षात् स्व-प्राण पद्मनाभाचा[३] ॥
आत्माहि तसा त्याचा वल्लभ नगमे, जसा मना भाचा८७॥
प्रसवे कृष्णा पांचां- पासुनि सुत पांच, त्यांत जो ज्येष्ठ ॥
तो प्रतिविन्ध्य माहात्मा, दुसरा सुतसोम गुरुजनप्रेष्ठ[१२] ८८
श्रुतकर्मा आणि शता- नीक श्रुतसेननाम एवंच[४] ॥
धर्मज, भीमज, जिष्णुज, नकुलज सहदेवज,क्रमें पंच॥८९
दोघां कृष्णांसि जसा आवडला, तद्गुणांसही[५] फार ॥
विद्या कळा मग न कां सौभद्रगळ्यांत घालिती हार९०॥
प्रतिविन्ध्यादि कुमार स्वपितृसम ज्ञानशौर्यरूपगुणें ॥
असाग्रहें पहातां दिसलें वय एक मात्र त्यांत उणें ॥९१॥
एके समयीं ससुत्हृत्- जन ते सद्देवतरु[६] निंके[७] लीला ॥
दाविति विषयिजनांच्या त्या श्रीयमुनेंत करुनि केलीला[८]
तेथें द्विजरूप अनल[९] एकान्तीं त्या प्रभूसि भेटूनी ॥
मागे खांडववन तो व्हाया नीरोग[१०] त्यांत पेटूनी ॥९३॥
श्वेतकिनृप घृतधारा द्वादशवर्षें मुखीं सतत ओती ॥
बहु धा[११] ह्मणोनि देती झाली निजसेवनीं ह्ळाहि ओ ती ॥

१ स्तुति. २ देहा बाहेर फिरणारा ३ श्रीकृष्णाचा. ४ या प्रमाणें. ५ त्या दोघां कृष्णांच्या गुणां॰. ६ सज्जनांचे कल्पवृक्ष. ७ उदार मनाचे. ८ क्रीडेला. ९ अग्नि. १० रोगरहित. ११ बहुत तृप्त हो. १२ मातापितरांस अतिप्रिय.

परि ती फारचि शोभे  गुंजा-शिखि-पिच्छ-धातु-धर[1] तीचे
भ्राते झाले चेतो-  हर[2] सांगा कोणत्या त गरतींचे[3] ॥७८॥
"देवि, तुझी प्रेष्या[4] मी," नमुनि असें ती ह्मणे स्व सवतीतें
कृष्णा बहु मानवली[5]  त्या नम्रपणें तिच्या प्रसवतीतें[6] ॥
कृष्णा भेटोनि ह्मणे  "नित्य असो निःसपत्न[7] तव नवरा॥
नवनव राज्यसुख पहा, पाव सुताद्यखिलभर्ण्यभवनवरा"[8]८०
साऽक्रूरोद्धव-सात्यकि-  वृष्णि-कटक-युक्त रामकृष्ण मग॥
आले आंदण घेउनि  भक्तांचे मूर्तिमन्त देवनग[9] ॥ ८१ ॥
भरलें तिहीं धनें पुर,  राष्ट्रहि बहु, धर्मगृह न, केवळ तें ॥
चातक-मुखचि भरी कीं  अभ्र[10] भरायासि भूमिके वळतें८२
बल जाय, कृष्ण राहे,  ठेवी न सुत, न वधू, न सेना, कीं
जें सुख भक्त-गृहीं या  हसिस, तया हरिस[11] तें नसे नाकीं[12]८३
शक्रप्रस्थीं असतां  झाला नरवेष विष्णुला भाचा॥
फारचि कामुक होता स्वसख्यासह[13] त्याचि जिष्णु लाभाचा
ह्मणति "पितृ-कृत-ध्यानें[14] झाला तो बाळ कृष्ण साच कवी"
आजवरीं निजचित्रें  जो भासे बाळकृष्णसा चकवी॥ ८५

---

१. गुंजा, मयूरपिच्छें व गैरिकादि धातुरस धारण करणारे रामकृष्ण. २ मन हरणारे. ३ पतिसेवेंत तत्पर अशा स्त्रीचे. ४ दासी. ५ बहुमान्य झाली. ६ देवकीला. ७शत्रुरहित. ८ पुत्रादि सर्वसुखांचें घरच अशा वराला. ९. कल्पवृक्ष. १० मेघ. ११ इंद्राला. १२ स्वर्गात. १३ श्रीकृष्णासह. १४ पित्यानें केलेल्या कृष्णाचे ध्यानानें.

धरिली प्रभुनें,बहु निज-रूप-निरत जिष्णु, ह्मणवुनी तनु ती
हा तर्क फार बरवा, एक असो दोष, फार यांत नुती[१]८६
तो अभिमन्यु बहिश्चर[२] साक्षात् स्व-प्राण पद्मनाभाचा[३] ॥
आत्माहि तसा त्याचा वल्लभ नगमे, जसा मना माचा८७॥
प्रसवे कृष्णा पांचां- पासुनि सुत पांच, त्यांत जो ज्येष्ठ ॥
तो प्रतिविन्ध्य माहात्मा, दुसरा सुतसोम गुरुजनप्रेष्ठ[१२] ८८
श्रुतकर्मा आणि शता- नीक श्रुतसेननाम एवंचें[४] ॥
धर्मज, भीमज, जिष्णुज, नकुलज सहदेवज,क्रमें पंच॥८९
दोघां कृष्णांसि जसा आवडला, तद्गुणांसही[५] फार ॥
विद्या कळा मग न कां सौभद्रगळ्यांत घालिती हार९०॥
प्रतिविन्ध्यादि कुमार स्वपितृसम ज्ञानशौर्यरूपगुणें ॥
असाग्रहें पहातां दिसलें वय एक मात्र त्यांत उणें ॥९१॥
एके समयीं ससुत्कृत्- जन ते सद्देवतरु[६] निके लीला ॥
दाविति विषयिजनांच्या त्या श्रीयमुनेंत करुनि केलीला[८]
तेथें द्विजरूप अनल[९] एकान्तीं त्या प्रभूसि भेटूनी ॥
मागे खांडववन तो व्हाया नीरोग[१०] त्यांत पेटूनी ॥९३॥
श्वेतकिनृप घृतधारा द्वादशवर्षें मुखीं सतत ओती ॥
बहु धा[११] ह्मणोनि देती झाली निजसेवनीं हळुहि ओ ती ॥

---

१ स्तुति. २ देहा बाहेर फिरणारा ३ श्रीकृष्णाचा. ४ या प्रमाणें. ५ त्या दोघां कृष्णांच्या गुणांस. ६ सज्जनांचे कल्पवृक्ष. ७ उदार मनाचे. ८ क्रीडेला. ९ अग्नि. १० रोगरहित. ११ बहुत तृप्त हो. १२ मातापितरांस अतिप्रिय.

श्वेतकिची ब्रह्मांडीं अप्रतिमा कीर्ति हे. "तुपा प्याला ॥
झाला रुग्ण[1] अनळ" असि न दुजी पूतत्वहेतु[2] पाप्थाला[3] ॥
चक्र दिलें गुरु कृष्णा कुरुकृष्णा[4] अक्षयेषुधरं[5] भाते ॥
गांडीव-धनु कपि-ध्वज[6] रथ-हय जे हरिति शीतकरभा[7] ते॥
दिव्यरथीं वैसुनि ते कृष्ण ह्मणति "भय तुला न वाटावें॥
आरोग्याऽर्थ ज्वलना, खांडववनभेषजासि[8] चाटावें"॥९७॥
रक्षिति दहना, गहना-[9] सह नानाजातिसत्वरस[10] खात्या ॥
होतां सहाय ईश्वर, भेटे धांवोनि सत्वर सखा[11] त्या॥९८॥
माधव पांडव खांडव- गहना दहनासि देति भक्षाया ॥
यत्न करी परि साऽमर[12] शक्र न झाला समर्थ रक्षाया॥९९॥
आला सर्वांचाही प्राणघ्न[13] महोग्र एकदा समय ॥
खग[14] चार, पांचवा अहि,[15] वांचे तैसाचि एक दास मय[16]१००
यातें वांचविला तक्षक-सुत अश्वसेन, जनकानें ॥
शार्ङ्गक-पक्षी, पार्थें मयही, परिसा हिताऽर्थ जन कानें॥ १
शरणागतासि हेंचि व्यसनीं देणार शर्म[17] परम तिवे[18] ॥
या तत्वातें येथें सुखें नव स्वहित, धर्मपरमति[19] घे ॥ २ ॥

---

१ रोगी. २ पवित्रपणास कारण. ३ शास्ता. ४ कुरुकुलोद्भव अर्जुनाला. ५ नसंपणारे बाण धरणारे. ६ कपि ह्म० मारुतिनामा वानर, ध्वजावर ज्याच्या तो. ७ चंद्रकांति. ८ खांडववनरूप औषधाला. ९ अरण्यासह. १० प्राणी. ११ अग्नीचा सखा वायु. १२ देवांसह. १३ प्राणनाशक. १४ पक्षी. १५ सर्प. अश्वसेन नामा. १६ मयासुर. १७ सुख. १८ श्रीकृष्णार्जुन व अग्नि. १९ धर्मपरायण बुद्धि ज्याची तो.

[illegible] [illegible] [illegible]

[illegible] मांती [illegible] [illegible] है [illegible]

[illegible] [illegible] खरें [illegible] [illegible]

[illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] पदीं [illegible]

[illegible] [illegible] [illegible]

---

[illegible] [illegible] [illegible] [illegible] अपने [illegible]

[illegible] [illegible] [illegible]. ३ [illegible]

[illegible] [illegible]. [illegible] [illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] प्रताप [illegible] [illegible]

---

[illegible])

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

---

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

---

[illegible] ([illegible])

REFBK-0019435
REFBK-0019435